Social Studies
(Marathi)
CLASS VII

# सामाजिक अध्ययन

## इयत्ता सातवी

Free



प्रकाशन
तेलंगाना सरकार,हैद्राबाद



तेलंगाना शासनाचे मोफत वितरण

सामाजिक अध्ययन इयत्ता सातवी

सामाजिक अध्ययन इयत्ता सातवी

Government of Telangana
Department of Women Development & Child Welfare - Childline Foundation

When abused in or out of school.

To save the children from dangers and problems.

CHILD LINE 1098 NIGHT & DAY
24 HOUR NATIONAL HELPLINE

When the children are denied school and compelled to work.

When the family members or relatives misbehave.

1098 (Ten...Nine...Eight) dial to free service facility.







IN ANY EMERGENCY
DIAL
100
TELANGANA POLICE
www.tspolice.gov.in
@ Telangana State Police

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद
हैद्राबाद, तेलंगाना

तेलंगाना शासनाचे मोफत वितरण

SCERT TELANGANA

## CHILDREN'S BILL OF RIGHTS

***A child is every person under the age of 18 years. Parents have the primary responsibility for the upbringing and development of the child. The State shall respect and ensure the rights of the child.***

- I have the Right to express my views freely, which should be taken seriously, and everyone has the Responsibility to listen to others. [Article-12,13]
- I have the Right to good health care and everyone has the Responsibility to help others get basic health care and safe water. [Article- 24]
- I have to Right to good education, and everyone has the Responsibility to encourage all children to go to school [Article- 28,29,23]
- I have the Right to be loved and protected from harm and abuse, and everyone has the Responsibility to love and care for others. [Article-19]
- I have the Right to be included whatever my abilities, and everyone has the Responsibility to respect others for their differences. [Article- 23]
- I have the Right to be proud of my heritage and beliefs, and everyone has the Responsibility to respect the culture and belief of others. [Article- 29,30]
- I have the Right to safe and comfortable home and everyone has the Responsibility to make sure all children have homes. [Article- 27]
- I have the Right to make mistakes, and everyone has the Responsibility to accept we can learn from our mistakes. [Article- 28]
- I have the Right to be well fed and everyone has the Responsibility to prevent people starving. [Article- 24]
- I have the Right to a clean environment, and everyone has the Responsibility not to pollute it. [Article- 29]
- I have the Right to live without violence (verbal, physical, emotional), and everyone has the Responsibility not to be violent to others. [Article- 28, 37]
- I have the Right to be protected from economic exploitation, and everyone has the Responsibility to ensure that no child is forced to work and is given a free and secure environment. [Article- 32, 34]

These rights and responsibilities are enshrined in the United Nations Convention on the Rights of the Child, 1989. It contains all the rights which children and young people have all over the world. The Government of India signed this document in 1992.

## DO YOU KNOW DO'S AND DON'TS

### FOR FACING THESE

### NATURAL DISASTERS !







SCERT TELANGANA

# सामाजिक अध्ययन

इयत्ता सातवी

**SOCIAL STUDIES Class VII**


## लेखक

**श्री. सी.एन. सुब्रमण्यम,**
एकलव्य, भोपाल,म.प्र.

**प्रो. आय. लक्ष्मी,** इतिहास विभाग
उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद

**प्रो. एम.कोदंडराम,** राज्यशास्त्र विभाग,
पी.जी. कॉलेज, सिक्रंदाबाद, हैद्राबाद

**प्रो. के. विजय बाबु,** इतिहास विभाग,
काकतीया विद्यापिठ, वरंगल

**डॉ. एम. व्ही. श्रीनिवासन,** स. प्रो.
डीईएसएसएच, एनसीइआरटी, नवी दिल्ली

**डॉ. एम. व्ही. एस. व्ही. प्रसाद,** स.प्रो.
डीईएसएसएच, एनसीइआरटी, नवी दिल्ली

**डॉ. सी. दयाकर रेड्डी,** स. प्रो
विद्यापीठ महिला महाविद्यालय,कोटी, हैदराबाद

**श्री के. सुरेश**
मंची पुस्तकम, हैदराबाद

**प्रो. जी. ओंकारनाथ,** अर्थशास्त्र विभाग,
हैदराबाद विद्यापीठ, हैदराबाद

**प्रो. एस. पद्मजा,** भूगोल विभाग,
उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद

**प्रो. ए.सत्यनारायणा (निवृत्त)** इतिहास विभाग,
उस्मानिया विद्यापिठ, हैद्राबाद

**डॉ.के.के.कैलाश,** राज्यशास्त्र विभाग,
एचयुसी, हैद्राबाद

**श्री अरविंद सरदाना,** संचालक,
एकलव्य,भोपाल,म.प्र.

**डॉ. के. नारायणा रेड्डी,** (स.प्रो) भूगोल विभाग,
उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद

**श्री. राममुर्ती शर्मा,** शिक्षण विभाग,
पंजाब सरकार, पंजाब

**श्री अलेक्स एम. जॉर्ज**
एकलव्य, भोपाल,म.प्र.

## पाठ्य पुस्तक विकास समिती

**कु. चारु सिन्हा,** आय.पी.एस,
सल्लागार लिगं संवेदनशीलता - बाल शोषण
संचालक, A.C.B तेलंगाना, हैद्राबाद

**श्री.एस.जगन्नाथ रेड्डी,** संचालक,
S.C.E.R.T., तेलंगाना, हैद्राबाद

**श्री.बी. सुधाकर,** संचालक,
शासकीय पाठ्यपुस्तक मुद्रण विभाग,
तेलंगाना, हैद्राबाद

**श्री.के.कृष्णा मोहन राव,** प्राध्यापक,
S.C.E.R.T., तेलंगाना, हैद्राबाद

**डॉ.एन. उपेंद्र रेड्डी,**
Professor & Head C&T Dept.,
S.C.E.R.T., तेलंगाना, हैद्राबाद



तेलंगाना राज्य सरकारचे प्रकाशन


कायद्याचा आदर करा
हक्क मिळवा

शैक्षणिक उन्नती साधा
प्रेमाने वागा


SCERT TELANGANA

© Government of Telangana, Hyderabad.

*First Published 2012*
*New Impressions 2013, 2014, 2015, 2016, 2017,2018,2019,2020*

All rights reserved.

No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted, in any form or by any means without the prior permission in writing of the publisher, nor be otherwise circulated in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition including this condition being imposed on the subsequent purchaser.

The copy right holder of this book is the Director of School Education, Hyderabad, Telangana.
We have used some photographs which are under creative common licence. They are acknowledge at the end of the book.

This Book has been printed on 70 G.S.M. Maplitho,
Title Page 200 G.S.M. White Art Card

**तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2019-20**

*Printed in India*
at the Telangana Govt. Text Book Press,
Mint Compound, Hyderabad,
Telangana.

— o —

SCERT TELANGANA

# SOCIAL STUDIES
## Class VII

### Writers

**Sri K. Laxminarayana,** Lecturer, DIET, Angalur, Krishna Dist.
**Sri M. Narasimha Reddy,** GHM, ZPHS Peddajangampally, Y.S.R.Kadapa.
**Sri K. Subramanyam,** Lecturer, DIET, Kurnool.
**Sri M. Papaiah,** Lecturer, SCERT, Telangana, Hyderabad.
**Dr. B.V.N. Swamy,** S.A., GHS Huzurabad, Karimnagar.
**Sri P. Srinivasulu,** S.A., ZPHS Bandaposanipally, Medak.
**Sri Ayachithula Laxman Rao,** S.A., GHS Dhangarwadi, Karimnagar.
**Smt S. Suvarna Devi,** Lecturer, Govt. Degree College, Narsapur, Medak.
**Dr. Racharla Ganapathi,** S.A., ZPHS Ladella, Warangal.
**Sri Korivi Srinivasa Rao,** S.A., MPUPS, P.R.Pally, Tekkali, Srikakulam.
**Sri Ch. Radha Krishna,** S.A., ZPHS Venkatapuram, Srikakulam.
**Sri T. Rama Krishna,** S.A., ZPHS Deva Penugonda, West Godavari.
**Sri K. Kumara Swamy,** S.A., ZPHS Dowdepally, Adilabad.
**Smt B. Sarala,** S.A., ZPGHS Indukurupet, Nellore.
**Sri P.V. Krishna Rao,** LFL HM, P.S. Mohalla No. 16, Yellandu, Khammam
**Sri A.R. Ramesh Rao,** S.A., ZPHS Roddam, Anantapur.
**Sri P. Rathanga Pani Reddy,** SA, ZPHS Polkampallym,Moosapet , Mahabubnagar.
**Sri Vanguri Gangi Reddy,** SA, ZPHS Kondurg, Mahabubnagar.
**Dr. Chakinala Srinivas,** GHM, GHS Durgammagadda, Karimnagar.
**Sri U. Anandkumar,** S.A, Z.P.H.S, Sujatha Nagar, Khammam.
**Sri NC Jagannath,** GHS Kulsumpura, Hyderabad.
**Smt. Hemakhatri,** IGNIS, Hyd. **(Proof reading)**

### Co-ordinators

**Prof. J. Raghavulu,** SCERT, Telangana, Hyderabad.
**Sri M. Papaiah,** Lecturer, SCERT, Telangana, Hyderabad.
**Sri S.Vinayak,** Co-Ordinator , C&T Dept. SCERT, Telangana, Hyderabad.
**Dr. Racharla Ganapathi,** S.A., ZPHS Ladella, Warangal.
**Sri Ayachithula Laxman Rao,** S.A., GHS Dhangarwadi, Karimnagar.
**Sri P. Srinivasulu,** S.A., ZPHS Bandaposanipally, Medak.

### Illustrators

**Sri Kurella Srinivas,** S.A., ZPHS, Pochampally, Nalgonda.
**Sri B. Kishore Kumar,** SGT, MP UPS, Alwala, Anumula, Nalgonda.
**Sri P. Anjaneyulu,** Geomapper, CESS-DCS, Hyderabad

### DTP & Design

**Kishan Thatoju,** Computer Operator, C&T Dept., SCERT, Telangana, Hyderabad.
**Kannaiah Dara,** Computer Operator, C&T Dept., SCERT, Telangana, Hyderabad.
**Rajesh Danka,** Computer Operator, Adilabad

SCERT TELANGANA

## विद्यार्थ्यांना पत्र

दिवसभर शेतात काबाडकष्ट करून थकून भागून घरी आलेल्या माझ्या आईजवळ जाऊन बसलो अन् माझ्या मनात विचार आला, महिलांचे जीवन किती कठीण आहे ? मी जर घराच्या बाहेर पडलो, तर मला अनेक प्रकारचे लोक भेटतील. लोक, जे अनेक भाषा बोलतात, आणि अनेक चालीरीती बाळगतात माझ्या मनात विचार येतो ते कोण असतील अन् त्यांच्यामध्ये किती विविधता आहे

आमचे शेतकरी अनंत अडचणींना तोंड देत, दुष्काळावर मात करीत, अन्नधान्य पिकविण्याचे काम करीत असतात त्यांना दु:खात निराशेत लोटण्याचे काय कारण असेल ? असा मी विचार करतो मी जेव्हा-जेव्हा रस्त्याने चालतो तेव्हा मला सुंदर इमारती, मोठा रस्ता,देऊळे,मशिदी दिसतात मला विचार येतो का,कोणी यांची निर्मिती केली असेल ? किती खर्च केला असेल ! मला झोपडपट्ट्याही दिसतात त्यांचे दुर्दैव पाहून मला वाटते की, या सुंदर इमारती यांच्यासाठी नाहीत का?

मोठी माणसं नेहमी निवडणुका आणि मतदानाविषयी चर्चा करतात आपण योग्य लोकांना निवडून दिले पाहिजे योग्य लोकांनी राज्य केले पाहिजे मला विचार पडतो आपणावर कोण व कसे राज्य करतो माझे आजी-आजोबा मला राजा-राणी तथा देव व संताच्या कथा सांगतात त्यात देवांनी ,संतांनी सामान्य लोकांबरोबर मिळून सहप्रवास केला मला वाटते हे आता खरच शक्य आहे का ?

माझ्याजवळ अनेक प्रश्न आहेत मला वाटते की कुणीतरी याची उत्तरे देईल का ? कदाचित कुणालाही याची उत्तरे माहीत नसतील किंवा कुणीही यांपैकी काही प्रश्नांची उत्तरे देऊ शकणार नाही कदाचित, मला एकट्यालाच याचा शोध घ्यावा लागेल कसा शोधणार मी ?कोण मला मदत करणार?

**प्रिय मित्रांनो,**

तुमच्या मनात निर्माण झालेल्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे सर्वांनाच हवी आहेत; परंतु या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे सोपे काम नाही किंवा एक निश्चित असे उत्तर नाही वास्तवत: अनेक प्रश्नोत्तरे अनेकजन अनेक पद्धतीने देतील म्हणून समस्यांचा अभ्यास केल्यावर तुमच्या स्वत:ची उत्तरेही असू शकतील सामाजिक शास्त्र आपण पाहत असलेल्या अशा सर्व प्रश्नांची उत्तरे, प्रश्न विचारून विविध पद्धतीद्वारे देतो अनेक लोक अनेक प्रश्नाची उत्तरे अनेक पद्धतीने का देतात यांचे विश्लेषणही हे शास्त्र करते उदा तुम्ही एखाद्याला विचारले की शाळेच्या तुलनेस कॉलेजात मुलींची संख्या फारच थोडी का ? तर तुम्हांला अनेकांकडून अनेक प्रकारची उत्तरे मिळतील जर का तुम्ही विचाराल की उपनगरासारख्या गलिच्छ वस्त्यांची स्वच्छता का केली जात नाही ? तर याचेही तुम्हाला पुन्हा अनेकांकडून अनेक उत्तरे मिळतील लोक प्रश्नांची उत्तरे अनेक प्रकारे का देतात! याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न सामाजिक शास्त्र करते.

सामाजिक शास्त्र एखाद्या समस्ये संबंधी निर्माण होणाऱ्या प्रश्नाच्या अनुषंगाने येणाऱ्या उत्तराचे संकलन करते त्या प्रश्नांचा अभ्यास करण्याचे कठीण कामही करते प्रश्न कसा निर्माण झाला त्यात कसे बदल झाले ? प्रश्नाचे स्वरूप सर्वत्र सारखेच आहे का ? की स्थानपरत्वे भिन्न स्वरूप आहे ? उत्तरे ही तर अनुषंगाने बदलतात भूतकाळात मुलीचे प्रमाण किती होते ? जगभरात त्याचा सद्यपरिस्थिती काय आहे ? शिक्षणापासून दूर जाण्याचे कारण काय ! मुलींना शिक्षणापासून वंचित करण्यात पालकांचा जवाब काय ! मुलीच्या शिक्षणाचे समर्थन करणाऱ्या-या पालकांचे मत काय ? मुली म्हणजे काय ? शिक्षकांचे मत काय ? समाजशास्त्रज्ञ या सर्व प्रश्नाचा एकत्रित अभ्यास करून मुख्य प्रश्नाचे उत्तर शोधतात परंतु कोणताही समाज शास्त्र या प्रश्नाचे अंतिम उत्तर देत नाही ते केवळ तुमच्यावर अवलंबून आहे की कोणते उत्तर जास्त समाधानकारक आहे

**- संपादक**



SCERT TELANGANA

# या पुस्तकाविषयी....

आपल्या सभोवती असलेल्या समाजाचा अभ्यास करणाऱ्या या एकंदर शास्त्राचा एक भाग म्हणजे हे पुस्तक होय. तथापि संपूर्ण अभ्यासक्रमाचा हा एक भाग आहे हे लक्षात ठेवा तुम्हाला काय माहीत आहे, याची वर्गात चर्चा करण्याचे एक साधन मात्र आहे? हे असेच का घडते? याचा शास्त्रोक्त विचार करणे गरजेचे वर्गातच नव्हे तर वर्गाबाहेर जाऊन, बाजारात ग्रामपंचायत किंवा नगरपालिका, कार्यालय, गावं, मंदिर, मशीद आदी निरीक्षण करणे तथा त्याचा चिकित्सक अभ्यास करणे, तसेच अनेक लोकांच्या भेटी घेऊन चर्चा करणे जसे, क्षेत्रफळ, दुकानदार, अधिकारी, पुजारी इत्यादी.

एखादी समस्या समजून घेऊन त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याची संधी या पुस्तकां द्वारे मिळते म्हणून या पुस्तकात प्रश्नांची उत्तरे नाहीत कदाचित हे पुस्तक परिपूर्ण नाही तुम्ही तुमचे मित्र एकत्र येऊन जेव्हा एखाद्या समस्येचा चिकित्सक अभ्यास कराल तेव्हाच या पुस्तकाचा हेतू सफल होईल या पुस्तकात व्यक्त करण्यात आलेल्या अनेक बाबीशी तुम्ही सहमत नसाल भिऊ नका, त्याची कारणे शोधा तुमचे मित्रही असहमत असतील परंतु मत भिन्नता कार्याचा विचार करा शेवटी तुमच्या स्वत:च्या निष्कर्ष प्रत या तुमचा निष्कर्ष पक्का नसेल मनाची तयारी करण्या पूर्वी अजून तुम्हांला बरेच काही शोधायचे आहे तशा परिस्थितीतील आपल्या प्रश्नांची उजळणी करा ! तुमचे मित्र, शिक्षक, ज्येष्ठ लोकांची मदत घ्या आणि उकल करण्याचा प्रयत्न करीत.

आपल्या सामाजिक जीवनाच्या विविध पैलूचा अभ्यास करण्याची एक संधी तसेच भूभाग, लोक, त्यांचे राहणीमान तशीच लोकांच्या गरजा भागवण्याच्या पद्धती, लोकांमधील असमानता, ती दूर करण्यासाठीचे प्रयत्न विविध लोकांच्या विविध उपासनापद्धती आणि शेवटी एकमेकास पूरक अशा समाजातील ऐक्यता, हेही एक महत्त्वाचे साधन होय.

या सर्व बाबींना समजून घेण्यासाठी तुम्हांला पृथ्वी, टेकड्या, पठारे, नद्या, समुद्र यांचा अभ्यास करावा लागेल. हजारो-शेकडो वर्षापूर्वी काय झाले असेल, हे समजून घ्यावे लागेल; परंतु या सर्वांपेक्षाही महत्त्वाची बाब म्हणजे तुम्हाला अधिक समाजाभिमुख व्हावे लागेल.

वर्गात या पुस्तकाचा अभ्यास करताना तुम्हाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे त्यासाठी थांबू नका. शोध घ्या किंवा सुचवलेले काही प्रयोग करा. पाठ लवकर संपविणे हे महत्त्वाचे नाही तर पाठ्येतर प्रश्न व त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

काही पाठांच्या शेवटी विशेष प्रकल्प दिले आहेत. त्यासाठी थोडे दिवस लागतील. तसेच वर्गात काय लिहिले यापेक्षा हे प्रकल्प महत्त्वाचे आहेत.

कृपया एक गोष्ट लक्षात ठेवा की, पाठांतरापेक्षा विचार करणे आणि मतप्रदर्शन हे महत्त्वाचे आहे.

- अभ्यास आणि मुल्यमापनसाठी पाठ्यपुस्तका ऐवजी, विषयी संबंधीत नकाशे, तकते आणि आलेखांचा वापर करु शकतो.
- धड्यांच्या मध्ये आणि तुमच्या अभ्यासाची पुनरावृत्ती करा ह्या मध्ये चर्चा, मुलाखत आयोजीत करणे, वाद-विवाद आणि प्रकल्प देण्यात आले आहेत. ह्याच्या उद्देश्य मुलांमध्ये सामाजिक जागृकता, संवेदनशीलता आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसीत व्हावा. म्हणून हे मुलांकडुन करुन घेतले पाहिजे.

**संचालक,**
**एस. सी. इ. आर. टी., तेलंगाना हैदराबाद**


## कृतज्ञता

या पुस्तकाच्या निर्मितीसंबंधी आम्ही खालील लोकांची संस्थांची कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो त्यात डॉ.के.एन.आनंदन शिक्षण तज्ज्ञ केरळ, डॉ. पी. दक्षिणामूर्ति निवृत्त उपसंचालक, तेलुगू अकादमी, श्री ए.आर.के. मूर्ति निवृत्त उपसंचालक, तेलुगू अकादमी, दीपा श्रीनिवासन्, आमच्या कार्यशाळेत सहभागी झालेल्या कृतिका विश्वनाथ ज्यांनी या पुस्तकाचा दर्जा सुधारण्यासाठी मोलाच्या सूचना केल्या. तसेच पुस्तकाची मांडणी आणि सजावटीमध्ये मार्गदर्शन आणि साह्य केले. या पुस्तकात वापरलेल्या काही प्रतिमा आणि चित्रे याबद्दल आम्ही वस्तूसंग्रहालय तथा पुरातत्व विभाग, आंध्रप्रदेश यांचेही आभार मानतो.

यातील काही चित्रे तथा माहिती ही फ्लीकर आणि अन्य संकेतस्थळांवरून अंतरजालाच्या माध्यमातून गोळा करण्यात आली आहे, ती अशी. सगळी चित्रे 28 फेब्रुवारी 2012 आधी घेतलेली आहे.आम्ही बहुसंख्य शिक्षकांद्वारे विविध शीक्षण तज्ञा द्वारे, आम्हाला मिळालेल्या अभिप्रायानुसार, आम्ही आपल्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. ज्या मुळे पाठ्य पुस्तकाची सुधारीत आवृत्ती निर्मितीस मदत झाली. विशेषतः हॉउस्टन टेक्सास (Houston Taxas, U.S.A.) द्वारा केलेल्या भारतीय इतिहासाचे विस्तृत शोध कार्य,(IHAR) यामुळे आम्हला पुस्तकाची सुधारीत आवृत्ती निर्मितीस मदत झाली.




SCERT TELANGANA

# भारतीय संविधान

प्रास्ताविका

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा** व त्याच्या सर्व नागरिकास सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय,** विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;** दर्जाची व संधीची **समानता;** निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची **एकता** आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून,

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी **याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत.**

**The first page of the Constitution that clearly states that all Indians are entitled to equality of status and opportunity.**

SCERT TELANGANA

## अनुक्रमणिका


| S.No | Content | Month | Page No |
|---|---|---|---|
| | **Theme - I: Diversity on the Earth** | | |
| 1. | विविध प्रकारचे नकाशे समजुन घेणे | मार्च / एप्रिल | 1-6 |
| 2. | पाऊस आणि नद्या | एप्रिल | 7-21 |
| 3. | तळे आणि भुगर्भजल | जुन | 22-32 |
| 4. | महासागरे आणि मासेमारी | ऑगस्ट | 33-41 |
| 5. | युरोप | ऑक्टोबर | 42-57 |
| 6. | आफ्रिका खंड | नोव्हेंबर | 58-68 |
| | **Theme - II: Production Exchange and Livelihoods** | | |
| 7. | हस्तव्यवसाय - हातमाग | जुलै | 69-77 |
| 8. | औद्योगिक क्रांती | सप्टेंबर | 78-85 |
| 9. | कारखाण्यातील उत्पादन- कागद कारखाना | डिसेंबर | 86-94 |
| 10. | दळण वळणाचे - महत्व | फेब्रुवारी | 95-100 |
| | **Theme -III: Political Systems and Governance** | | |
| 11. | नविन राज्ये आणि राजे | जुन | 101-109 |
| 12. | प्रांतीय राजांचा उदय - काकतीय राजे | जुलै | 110-116 |
| 13. | विजयनगरचे राजे | ऑगस्ट | 117-125 |
| 14. | मोगल साम्राज्य | सप्टेंबर | 126-134 |
| 15. | भारतात ब्रिटीश राज्याची स्थापना | नोव्हेंबर | 135-146 |
| 16. | विधान सभेत - कायद्याची निर्मीती | डिसेंबर | 147-157 |
| 17. | जिल्ह्यातील कायद्यांची अमलबजावणी | जानेवारी | 158-164 |
| | **Theme - IV: Social Organisation and Inequities** | | |
| 18. | जातीभेद आणि समतेची लढाई | जुलै | 165-171 |
| 19. | जिवनमान- शहरी कामगारांचा लढा | सप्टेंबर | 172-180 |
| | **Theme - V: Religion and Society** | | |
| 20. | लोक परंपरा- धर्म | ऑगस्ट | 181-187 |
| 21. | देव दैवत्व - भक्ती मार्ग | जानेवारी | 188-196 |
| | **Theme -VI: Culture and Communication** | | |
| 22. | राजे आणि इमारती | फेब्रुवारी | 197-207 |
| | **Revision & Annual Examinations** | | |


| Syllabus Division for Summative Assessments | |
|---|---|
| **SA 1** | **SA2** |
| 1, 2, 3, 4, 7, 8, 11, 12, 13, 14, 18, 19, 20 | 1 - 22 |

SCERT TELANGANA

# आपले राष्ट्रगीत

- रविंद्रनाथ टागोर

जन गण मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता ।
पंजाब, सिंध, गुजरात, मराठा
द्राविड उत्कल बंग ।।
विंध्य हिमाचल यमुना, गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे ।
तव शुभ आशिष मागे ।
गाहे तव जय गाथा
जन गण मंगलदायक जय हे
भारत भाग्य विधाता ।
जय हे, जय हे, जय हे
जय जय जय जय हे ।

## प्रतिज्ञा

**- पैडिमर्री वेंकटा सुब्बाराव**

"भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी, म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.सर्व प्राण्यांवर दया दाखविन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे."

SCERT TELANGANA

पाठ 1

# विविध प्रकारचे नकाशे समजुन घेणे

आपण राहतो त्या जगामध्ये अनेक भौतिक बाबी आहेत. पर्वत, नद्या, टेकड्या, समुद्र किनारे, वाळवंट, जंगले, बर्फाच्छित प्रदेश अशा अनेक प्रकारचा फरक का जाणवतो? त्या प्रांतात राहणाऱ्या लोकांच्या राहणीमानावर याचा कसा प्रभाव पडतो? या प्रश्नांचे उत्तर विविध प्रकारचे नकाशे पाहुन देता येते. या अडचणी समजुन घेता येतात. काही नकाशे त्या भागातील उंची, खोली, काही भागातील पाऊस, उष्णता, थंडी या गोष्टी माहिती होतात. काही भागातील पिक,जंगले हे पण नकाशे दर्शवितात. या प्रकारे नकाशांचा अभ्यास केल्यामुळे त्या भागातील बऱ्याच गोष्टी जाणुन घेऊ शकतो.



*चित्र 1.1 कर्नाटकमधील पश्चिम घाटाचे सदारहित जंगले*



*चित्र 1.2 द. अमेरिकेतील ब्राझील मधील कोकाना किनारपट्टी*



*चित्र 1.3 आफ्रिकेतील लिबियामधील सहारा वाळवंटातील मरुवन (ओयासीस)*



*चित्र 1.4 बर्फाने आच्छादलेले अंट्रार्कटीका खंड*

तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

SCERT TELANGANA

तुमच्या शाळेतील नकाशा पुस्तकाची प्रति आणि आणि किती प्रकारचे नकाशे आहेत यांचे निरिक्षण करा. तुम्ही वाचुन समजुन घेतलेल्या नकाशांची यादी तयार करा. गेल्या वर्षी काही साधारण नकाशांबद्दल आपण शिकलो. या वर्षी उंची माहिती देणाऱ्या नकाशाबद्दल आपण माहिती घेऊ या. सुरुवातीस गेल्यावर्षी शिकलेल्या नकाशांची पडताळणी करु या.

- तुमच्या वर्गाच्या भिंतीवर भारताच्या राजकीय नकाशाचे चित्र लावुन त्याचे काळजीपुर्वक निरिक्षण करा व खालील प्रश्नांचे उत्तरे लिहा.
  - i. राजेश हैद्राबादपासुन भोपाळला गेला तो कोणत्या दिशेने गेला?
  - ii. शिवाजी लखनऊ पासुन चेन्नई ला गेला, तर तो कोणत्या दिशेने गेला?
  - iii. धमेंद्रला मुंबई पासुन भुवनेश्वरला कोणत्या दिशेने जावे लागणार?
  - iv. रमेश कोहिमापासुन जयपुरला गेला आहे, तो कोणत्या दिशेने गेला आहे?
- अशा प्रकारचे बरेच प्रश्न तुम्ही तयार करुन तुमच्या मित्रांना विचारु शकता.
- नकाशात दिलेले चिन्ह पहा. तेलंगानाच्या सीमा दाखवा आणि सिमेवरुन तुमचे बोट फिरवा.
- राज्याच्या सीमा, देशाच्या सीमा (आंतरराष्ट्रीय सिमा) दाखवणाऱ्या चिन्हांना तुमच्या वहीत नमुद करा.
- तेलंगानाच्या उत्तरेस, दक्षिणेस, पुर्वेस, पश्चिमेस असणाऱ्या राज्यांची यादी तयार करुन? तुमच्या वहीत नोंद करा?
- नकाशात दिलेल्या स्केलच्या मदतीने दोन भागामधील असणारे अंतर मोजणाऱ्या पध्दतीस आपण 6 व्या वर्गात शिकलो. आता हैद्राबाद पासुन जयपुर, इम्फाल, गांधीनगर, तिरुअंनपुरम या राज्याच्या राजधान्याच्या अंतराना मोजुन दाखवा?

## चिन्ह:

बिंदु, रेखा, ठिकाण: कोणत्याही भौतिक वस्तुंना नकाशात दाखवण्यासाठी त्या वस्तु संबंधीत चिन्हाचा उपयोग करतो. तुम्ही काही चिन्हांना 6 व्या वर्गात शिकलात.

एखाद्या वेळी भारताच्या नकाशात दिल्ली दाखवण्यासाठी (●) या चिन्हाचा वापर करुन दिल्ली म्हणुन लिहितो. मंजीरा नदी दाखवण्यासाठी त्याचा प्रवाह मार्ग (———) या रेषेस दाखवतो. रेल्वे मार्गास (┿┿┿┿┿) या चिन्हाने काढला जातो. तेलंगानाच्या नकाशातील मेदक किंवा हैद्राबाद जिल्ह्यांना दाखविण्यासाठी सीमा काढुन वेगवेगळ्या रंगानी डिझायने दाखवतो. ते त्या भागास दाखवणारे चिन्ह (●) या प्रकारे सर्व भौतिक वस्तुंना नकाशात बिंदु, रेषा, भाग प्रांताना चिन्हाव्दारे दाखवतो.

- पुढील पाठातील काही नकाशाकडे पहा? त्यातील काही घटक शोधुन खालील तक्त्यात लिहा?

[redacted]

SCERT TELANGANA




SCERT TELANGANA

## भौतिक नकाशे (Physical Maps)

तुमच्या अॅटलसमध्ये काही भौतिक नकाशे आहेत पहा. ह्या नकाशात तुम्हाला असे दिसुन येईल की, जमीनीच्या विविध भागांना हिरवा, पिवळा, गव्हाळी, रंग देण्यात आला आहे. जमिनीचे स्वरुप दाखवितात. त्यात पहा ती नकाशे विविध प्रकारच्या जमीनीच्या रुपरेषा दाखवितात. (पठारे, मैदाने, पर्वते इत्यादी) ना विविध ठिकाणांच्या उंचीना सुध्दा सुचवितात.

समतल व सपाट असणाऱ्या कागदावर उंच ठिकाणांना कसे दर्शवु शकता? हे पहा असे तुम्ही दर्शवु शकता खालील चित्रप्रमाणे तुम्ही दर्शवु शकता का?

तुम्ही पाहात असलेले चित्र आहे, नकाशा नाही. चित्रातील उंच टेकड्यामुळे मागील भाग दिसेनासा झाला, नकाशात सर्व ठिकाणे निर्देशित केली पाहिजे. या ठिकाण्याचा नकाशा आपण कसे काढू शकतो? विचार करा.



*चित्र 1.5 निमपुर गावाचे दृष्य*

आपण नकाशात उंची दाखविण्यासाठी रंगाचा वापर करु शकतो. पाहू या.

पण नकाशामध्ये सर्व भाग ओळखल्या सारखे या प्रदेशातील नकाशास कसे काढु शकता तो विचार करा.

## जमीनीवरील उंची मोजणे
### (Measuring Height on Land)

जमीनीवरच्या उंचीस समुद्रपातळीपासुन मोजतात. समुद्राची पातळी जवळपास जगातील सर्व ठिकाणात सारखी असते कारण जगातील सर्व समुद्र एका दुसऱ्यांशी मिळुन आहेत. या विषयास समजुन घेण्यासाठी निमपुर गावाचा नकाशात पहा.

वरील चित्रातील निमपुर गाव समुद्रपातळी पासुन सुमारे 50 मिटर उंच आहे. हे लक्षात घ्या.

- मंदीर समुद्र पातळीच्या किती मिटर उंचीवर आहे?
- डोंगराचा वरचा भाग समुद्र पातळीच्या किती मिटर उंची आहे?

## नकाशातील उंची दाखविणे:

बाजुचा दिलेल्या निमपूरगावाचा नकाशा पहा.(चित्र 1.7)



*चित्र 1.6 निमपुर गावाची उंची वरील दृष्य*



SCERT TELANGANA

नकाशात तिन क्षेत्रात दाखवणाऱ्या उंचीस पाहिलात का? पहिला क्षेत्र 0 मीटर उंचीपासुन, 50 मीटर उंचीपर्यंत, दुसरा क्षेत्र 51 मीटर उंचीपासुन 100 मीटर उंचीपर्यंत आणि तिसरा क्षेत्र, 101 मीटर उंचीपासुन 150 मीटर उंचीपर्यंत आहेत. म्हणजे 51 मीटर उंचीपासुन 100 मीटर उंचीमधील असणाऱ्या कोणताही प्रांत 50 मीटर उंचीपेक्षा वरील भाग 100 मीटर उंचीच्या खाली आहे असे समजु या. उंचीस विविध रंगाने दाखवु शकतो.

- उंची दाखवणाऱ्या निमपुर गावाच्या नकाशास पहा समुद्राच्या बाजुला असलेल्या प्रांतास कोणता रंग दिला ते पहा?
- चित्रातील सर्वांत उंच प्रदेशास कोणता रंग दिला ते शोधा?

आता तुमच्या अॅटलसमधील किंवा भिंतीवर लावलेल्या तेलंगानाच्या किंवा भारताच्या भौतिक नकाशास पहा. तक्ता -1 मध्ये दाखवलेल्या प्रदेशाची उंची ओळखुन रंग भरुन पुर्ण तक्ता भरा.

**समोन्नत किंवा आकार रेषा**(Contour Lines)

समान उंचीच्या प्रांताना जोडुन काढणाऱ्या रेषेसच समोन्नत रेषा म्हणतात. निमपुर गावाच्या नकाशात गोल जाणाऱ्या एक रेषेस पाहिलात का? ती 50 मीटरची आकार रेषा, त्या रेषेवर असणाऱ्या सर्व प्रदेश 50 मीटर उंचीवर असतात. जमीनीच्या



*Fig 1.7 Figure of Nimpur Village showing heights*

स्वरुपानुसार ही समोन्नत रेषा वाकड्या तिकड्या असु शकतात. हे एक दुसऱ्यांना जुळुन जात नाहीत. दोन आकार रेषांमधील अंतर त्या जमीनीच्या स्वभावार अवलंबुन असते. जमीनीचा उतार उंच असेल तर आकार रेषा एकमेकांच्या जवळ असतात. जमिनीचा उतार सौम्य असेल तर आकार रेषा दुर दुर असतात. या रेषा कधीच एकमेकांना छेदत नाहीत. जर जमीनीच्या उंची जास्त असेल तर रेषा जवळ जवळ असतात जर जमीन उताराची असेल तर रेषा दुर दुर असतात.

**तक्ता -1**

| जागा | उंची | रंग |
|---|---|---|
| हैद्राबाद | पासुन......ते........मी. | |
| खम्मम | पासुन......ते........मी. | |
| आदिलाबाद | पासुन......ते........मी. | |
| नलगोंडा | पासुन......ते........मी. | |

- अशा प्रकारे काही प्रश्न तयार करुन वर्गात दाखवा?
- तुमच्या कडे भारताच्या नकाशातुन अन्य काही शहरांची उंची मोजा?
- जगाच्या नकाशात अन्य काही शहरांची उच्ची मोजा?

**उंची दाखविण्याच्या नकाशांचा उपयोग**

हे नकाशे जमीनीच्या वरच्या भूभागाच्या स्वंभावाना दाखवण्यासाठी उपयोगी पडतात. पर्वते, दऱ्या कुठे आहेत याची माहिती घेता



**चित्र 1.8** नकाशा 2 तेलंगानातील समुद्र पातळी

SCERT TELANGANA

येते. तेलंगानाच्या भौगोलीक नकाशास पाहिले असता. गोदावरीचा उतार पूर्व भागाकडे आहे असे दिसून येते. किनाऱ्यापासुन पुर्वेकडे तुम्ही पठारमयी प्रदेशाकडे पोहचाल. या पठारमयी प्रदेशांना कृष्णा, गोदावरी नदी विभागुन आहेत. त्यामुळे खोलगट विशाल अशा दऱ्या निर्माण झाल्या आहेत.

रस्ते बांधतांना, पुल बांधतांना उंचीना दाखविणारे हे नकाशे खुप उपयोगी पडतात. उंची कमी जास्त असणाऱ्या प्रांतातील दोन प्रदेशांमधील रस्ते बांधतांना कोणत्या मार्गाने रस्ते बांधावेत हे ठरविण्यासाठी नकाशाचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे पुल बांधतांना किती भाग पाण्यात ठेवावा याची मेजणी करण्यासाठी याचा उपयोग होतो.

## समुद्राची पातळी (Mean Sea Level)

समुद्राच्या पृष्ठभागावर लहान मोठ्या लाटा नेहमीच येत असतात. ते कधीच स्थिर राहु शकत नाही. या प्रक्रियेमुळे समुद्राची उंची नेहमी कमी जास्त होते. तर या उंचीमध्ये आपण समुद्राची पातळी किंवा 0 मीटर उंची ओळखता येते का? या समस्यांचे निवारण करण्यासाठी समुद्राची पातळी वारंवार काळजीपूर्वक मोजतात आणि समुद्राची मध्यम पातळी शोधून काढतात. शास्त्रज्ञांनी अनेक वर्षापासुन समुद्राच्या उंच आणि कमी पातळीचे निरीक्षण केले आणि त्यांनी सरासरी पातळी मोजली. ज्याला मध्यम समुद्राची पातळी असे म्हणतात.

- तुम्ही राहत असलेल्या ठिकाण रेल्वे स्टेशनच्या जवळ असेल तर तिथे लावलेल्या फलकानुसार त्या प्रांताच्या उंचीस ओळखा त्या उंचीस तुमच्या वहीत लिहुन घ्या ती उंची "___ M.S.L."म्हणुन लिहा.

- 1.6 आणि 1.7 चित्राप्रमाणे 30 मीटर उंचीवर पावसाचे पाणी असेल तर निमपुर गाव बुडेल का?

1.8 चित्र पाहुन उत्तरे लिहा?
- नदीच्या प्रवाहाची दिशा ओळखा?
- सर्वात खाली असलेल्या जमिनीची उंची ...... मीटर ते ...... मीटरमध्ये आहे.
- या नकाशात दोन उंच प्रदेश आहेत. त्यांची उंची किती ते सांगा?

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. जगातील सर्व समुद्रांच्या पातळी समान का असतात ?
2. समुद्राची पातळी कशी मोजतात?
3. उंची दाखविणाऱ्या नकाशाचे काय फायदे आहेत?
4. उच्च प्रदेशातील आणि मैदानी प्रदेशातील लोकांच्या राहणीमानात काय फरक जाणवतो?
5. नकाशाचा लोकांना कसा फायदा होतो?
6. पृष्ट क्र.5 वरील ***समोन्नत किंवा आकाररेषा*** वाचुन विवेचन करा?




SCERT TELANGANA

पाठ 2

# पाऊस आणि नद्या

पृथ्वीवर मानव, प्राणी, जिव जंतु, वनस्पती जगण्यासाठी पाणी हे मुळ आधार आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर 71% पाणी व्यापुन आहे. पिके पिकविण्या करीता आपण पाण्यावर आधारीत असतो. पण वर्षभर नियमित पाणी उपलब्ध होऊ शकत नाही. पाण्याचा गुणधर्म सर्वत्र सारखाच नसतो. सर्वत्र एकाच प्रमाणात पाणी नसते. तुमच्या ठिकाणी कोणत्या महिण्यात पाऊस पडतो.



तुमच्या गावात किंवा शहरात कोणत्या प्रदेशात जास्त प्रमाणात पाऊस पडतो? कमी प्रमाणात कोणत्या प्रदेशात पाऊस पडतो? गोडपाणी, खारे पाणी, जाड पाणी कोठुन मिळते? वर्गात आपआपसात चर्चा करा? नंतर आपण पुढच्या पाठातुन पाणी मिळणाऱ्या वैविध्याविषयी त्याचे परिणाम प्रभाव या विषयी माहिती मिळवु.

## भाग - I

### सुर्य, ढग आणि पाऊसमान

एप्रिल, मे, जुन या महिण्यातील प्रखर उन्हाळ्यानंतर पावसाळा येतो. काही महिणे असतो. तुम्हाला माहित आहे का पाऊस पडण्याची कारणे काय? पाऊसाला वाहुन नेणारे ढग कोठुन येतात? तुम्हाला माहित असलेल्या घटकाविषयी विचार करा व त्या विषयी वर्गात आप आपसात चर्चा करा.

**बाष्पीभवन** **(Evaporation)** (पाण्याची वाफ होणे)

निरजा ही पहाटे लवकर उठते. अंघोळीसाठी तिला गरम पाणी लागते. म्हणुन तिने चूलीवर भांड्यात पाणी गरम करण्यास ठेवले. जसे पाणी गरम होते, पाण्याची वाफ झाकणास स्पर्श करते आणि बाहेरच्या थंड हवेमूळे, वाफ पाण्याच्या बिंदुत बदलुन भांड्याच्या झाकणावर साचते. जेंव्हा ती झाकण काढते, तेंव्हा पाण्याचे कांही बिंदु परत पाण्यात पडतात. याचे निरीक्षण केले असता, तिला असे दिसुन येते की, पाण्याचे बाष्पीभवन होते आणि थंड झाल्यामुळे द्रवीभवन घेते.

पावसाची गोष्ट ही पाण्याच्या वाफेपासुन सुरु होते. पाण्याची वाफ म्हणजे काय? तुम्ही ओले कापडे बाहेर वाळवीत घालता काही वेळानंतर कपडे सुकतात. त्या कपड्यातील पाणी कुठे गेले?



SCERT TELANGANA

त्याचप्रकारे एका तबडीमध्ये थोड राणी ठेवल्यास, दोन दिवसानंतर पाणी वाळुन जाते. खरं पाहता, कपड्यातील पाणी किंवा तबकडीमधील पाणी वाफेत बदलते आणि हवेत मिसळुन जाते. या विधानास बाष्पीभवन असे म्हणतात. म्हणुन जेंव्हा पाणी उकळत नाही, तेंव्हा बाष्पीभवन होत असते.

हवेमुळे देखील पाण्याची वाफ होते. पृथ्वीच्या वरच्या पृष्ठभागावर अनेक जलाशय आहेत. महासमुद्र, नद्या, सरोवरे इत्यादी ह्या जलाशयामधून सतत पाण्याचे बाष्पीभवन होत असते. खर तर जेथे जेथे ओलसरपणा असतो. तेथे तेथे बाष्पीभवन होते. ही बाष्पीभवनाची क्रिया आपल्या शरीरातुन, वनस्पतीतुन आणि जमीनीतुन सतत होतच असते. ही बाष्पीभवनाची क्रिया उष्णता वाढत गेली तशी वाढत जाते.

- कोणत्या ऋतुत जास्त प्रमाणात बाष्पीभवन घडते विचार करा? उन्हाळ्यात किंवा हिवाळ्यात?
- बाष्पीभवनाचे प्रमाण दुपारच्या वेळी जास्त असते की रात्रीच्या वेळी जास्त असते?
- चित्र 2.1 पाहुन अशा ठिकाणांची/ जागांची यादी तयार करा व जिथे बाष्पीभवन होत असते.
- अत्याधिक प्रमाणात बाष्पीभवन कोठुन घडते तुमच्या मते सांगा? वनस्पती,नद्या, समुद्र, जमीनीपासुन.

## ढग तयार होणे आणि पाऊस पडणे:

जेंव्हा पाण्याची वाफ गरम हवेसोबत आकाशात वर उंच जाते, तेंव्हा जाता-जाता ती थंड होते. याचे कारण म्हणजे जस जसे आपण पृथ्वीच्या पृष्ठ भागापासुन वर जातो, तस तसे वातावरण थंड होत जाते, याप्रकारे वाफ थंड होत पाण्याच्या सुक्ष्म बिंदुत बदलते. हे सुक्ष्म बिंदु हवेतील सुक्ष्म धुळीचे कण किंवा धुर यांच्यात मिसळतात आणि पाण्याच्या बिंदुचे प्रमाण वाढते. हे सुक्ष्म पाण्याचे बिंदु एकत्र येऊन ढग तयार होतात.

- जमीन, आकाश, पाण्याची वाफ वाढणे, थंड होणे, धुळीचे कण, पाण्याचे बिंदु, ढग या सारख्या शब्दांचा उपयोग करा. वाफेचे ढग कसे तयार होतात चित्राव्दारे दाखवा.




*चित्र 2.1 पाण्याचे बाष्पीभवन*

SCERT TELANGANA

ढग जस जसे वर जातात तस तसे ते थंड होतात आणि जास्त प्रमाणात पाण्याचे थेंब तयार होतात. हे थेंब एकत्र येतात आमि मोठ मोठे थेंब तयार होतात. ते थेंब वजनदार असल्यामुळे, त्या थेंबाना हवेत राहणे फारच कठीण जाते आणि म्हणून ते थेंब पावसाच्या रुपात जमिनीवर पडतात.

- पाऊस पडण्यासाठी ढग वर जाणे याची आवश्यकता आहे का तुमचे मत सांगा?
- केव्हा तरी द्रव पडतांना तुम्ही पाहिले का? द्रव कोठे तयार होते?
- कोणत्या ऋतुत द्रव पडते? कोणत्या वेळेस पडते?
- पर्जन्यमान (रेनफॉल) आणि यात काय फरक आहे?
- बर्फांचा पाऊस पडतांना तुम्ही कधी पाहिला आहे का?
- गारांच्या वादळांना तुम्ही पाहिले आहे का?


*चित्र 2.2 जलचक्र*

### काही प्रमुख शब्द

**बाष्पीभवन (Evaporation):** पाणी वाफेत बदलने यासच पाण्याची वाफ किंवा बाष्पीभवन असे म्हणतात. पाण्याची वाफ पाण्यात बदल ते यास द्रवीभवन असे म्हणतात. ढग म्हणजे हवेच्यावरच्या भागात वाहत असणारे पाण्याच्या लहान लहान थेंबाचा समुह होय.

**जलचक्र(Water Cycle) :** समुद्रातील पाण्याची वाफ होऊन ती वर जाते ढगात बदलते ढगांना थंडीचा स्पर्श होऊन ते पाण्याच्या मोठ्या जड थेंबात बदलुन पाऊस पडतो. हे पाणी गावातील प्रदेशातुन वात जाऊन नद्यात मिळते. नद्याव्दारे वाहत जाऊन समुद्रात मिळते ही प्रक्रिया निरंतर चक्राप्रमाणे घडत असते. यालाच जलचक्र असे म्हणतात.

**अवक्षेप (Precipitation):** पाण्याच्या वाफेचे विविध रुपात द्रवीकरण होण्यास अवक्षेप असे म्हणतात. हे ह्या स्वरुपात आढळुन येते. धूके, द्रव, पाऊस बर्फ किंवा गारा.

**आर्द्रता (Humidity):** वातावरण अदृष्यरुपात असणाऱ्या पाण्याच्या वाफेस आर्द्रता(ओलावा) असे म्हणतात. उष्णतामानासहीत आपल्याला आर्द्रतेची फार आवश्यकता आहे. उष्णतामान वाढले की आर्द्रता देखील वाढत असते त्यामुळे आपल्याला त्रास होतो. शरीरावरील घाम लवकर सुकत नाही गरमी आपल्याला चिकटपणा जाणवतो. अशाप्रकारेच हवामान दमट असते.

## वारे आणि ढग (Winds and Clouds)

पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वत्र बाष्पीभवन होते आणि सर्वत्र ढग पण तयार होतात. तरीपण महासागराच्या पृष्ठभागावरच जास्त प्रमाणात बाष्पीभवन होते आणि ढग तयार होतात. पृथ्वीवर महासाग हजारों किलो मीटर पर्यंत पाण्याने व्यापलेले आहे. त्यामुळे पाऊस जास्त प्रमाणात महासागरातच पडतो. ढग देखील देशान्तर्गत काही हजारों

SCERT TELANGANA

किलोमीटर पर्यंत प्रवास करीत आपल्याला पाऊस देतात. ढगांना जमीनीपर्यंत कोण वाहुन आणतात. हे तुम्हाला माहित आहे का?

पावसाळ्यात हवा कोणत्या दिशेकडुन कोणत्या दिशेकडे वाहत असते?

हे वारे अरबी समुद्राकडुन वाहत येऊन बंगालच्या उपसागरावरुन वाहतात. हे वारे पाऊस पाडणाऱ्या ढगांना वाहत आणतात.यांना मौसमी वारे किंवा ऋतु पवन वारे असे म्हणतात. हे वारे नेऋत्य वाहत येतात. म्हणुन यांना नैऋत्य मौसमी वारे देखील म्हणतात. हे वारे उन्हाळ्यातच वाहतात.

मौसमी वाऱ्यांचे दोन प्रकार आहेत. पहिले अरबीसमुद्रा वरुन वाहत येणारे व दुसरे बंगालच्या उपसागरा वरुन वाहत येणारे वारे हे होत. नकाशा-1 मधील बाण वाऱ्याच्या दिशा सुचीत करतात.




SCERT TELANGANA

- बंगालच्या उपसागरावरील ढगांना वारे कोणत्या दिशेकडे वाहत नेतात?
- अरबी समुद्रावरील ढगांना वारे कोणत्या दिशेकडे वाहत नेत आहेत?
- पश्चिम बंगाल, दिल्ली आणि लखनऊ येथे पडणाऱ्या पावसास मौसमी वारे कोणत्या दिशेकडुन वाहत आणतात?
- मुंबई, हैद्राबाद आणि बॅगलोर येथे पडणाऱ्या पावसास मौसमी वारे कोणत्या दिशेकडुन वाहत आणतात?

## तेलंगानातील पाऊसमान

- तुमच्या प्रदेशात कोणत्या महिण्यात सर्वात जास्त पाऊस पडतो? जास्त पाऊस पडणाऱ्या तीन महिण्याचे नावे लिहा?
- कमी पाऊस पडणारे किंवा कोरडे तीन महिने कोणते ते सांगा?
- तुमच्या येथे दरवर्षी साधारण पाऊस पडतो का? किंवा दर वर्षी पाऊस वेगवेगळ्या प्रमाणात पडतो का?
- कमी पावसाचे अनुभव सांगा?
- अधिक पाऊस पडुन पुर आला असा कोणता अनुभव तुम्हाला आला का?

तेलंगाना राज्यात मार्च आणि जुन दरम्यान दररोज वातावरण वाढत जाते, जेंव्हा नैऋत्य वारे (दक्षिण-पश्चिम मान्सुन) जुनच्या सुरुवातीस वाहण्यास सुरु होतात, तेंव्हा ढग वागुन नेणारे वारे तेलंगानास पोहोचतात. पावसाचा तात्कालीन परिणाम म्हणजे एका आठवड्याच्या पावसानंतर अचनाकच वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल जाणवतो. नकाशा-1 पहा.

नैऋत्य वाऱ्यांमुळे (दक्षिण-पश्चिम) तेलंगानात साधारण पाऊस होतो. तेलंगानाच्या उत्तर आणि पूर्व भागात मुसळधार पाऊस होतो. तेलंगाना पठारातील अनेक भागात कमी पाऊस होतो. तेलंगाना राज्यातील महबूबनगर जिल्ह्यात सर्वात कमी पाऊस होतो. नकाशा- 2 पहा.

पश्चिम पर्वत रांगा पाऊस वाहून नेणाऱ्या वाऱ्यांना आडवे येतात आणि पाण्याच्या वाफेचे द्रवीकरण होते. अजुन ते वर गेले तर पाऊस पडतो. अशा प्रकारचा पाऊस सर्व सामान्यपणे डोंगराळ प्रांतात होतो.

मे ते ऑक्टोबर महिण्याच्या दरम्यान बंगालच्या उपसागरात वादळ निर्माण होतात. ह्या वादळांमुळे आपल्या भागा (तेलंगाना) मध्ये पाऊस शकतो. किंवा पडु शकत नाही. हे बंगाल्चाय खाडीतील वादळाच्या तीव्रतेवर आणि किनारपट्टी पार करुन गेल्यानंतर वादळाची ह्यावर आधारीत असते. कधी कधी वारे आणि वादळ ह्या भागात अत्याधिक पाऊस पडतो आणि पिकांची नासाडी पण होते.

आक्टोबर नंतर वारे विरुद्ध दिशेने वाहतात. बंगालच्या उपसागरावरुन नैऋत्य दिशेकडे वारे वाहतात. या वाऱ्यांमुळे तेलगांना प्रांतात ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिण्यात खूप कमी पाऊस पडतो. यालाच इशान्य मौसमी वारे म्हणतात.

**सिरसिला शहरातील गत 10 वर्षातील पावसाचे प्रमाण**

| वर्ष | पाऊसमान मी.मी | वर्ष | पाऊसमान मी.मी |
|---|---|---|---|
| 1996 | 933 | 2001 | 763 |
| 1997 | 695 | 2002 | 605 |
| 1998 | 926 | 2003 | 819 |
| 1999 | 823 | 2004 | 619 |
| 2000 | 895 | 2005 | 891 |

संदर्भ : तहसिलदाराचे कार्यालय, सिरसिला

- सिरसिला शहराचे सरासरी पर्जन्यमान किती आहे?
- वरील तक्ता पाहुन सांगा. कोणत्या वर्षी सर्वात जास्त व कोणत्या वर्षी सर्वात कमी पाऊस होतो?
- कोणत्या दोन वर्षाच्या कालावधीत सर्वाधिक पाऊसमान झाला?

SCERT TELANGANA




- तेलंगानाच्या विविध प्रांतातील वर्षापात सुचित करणारा नकाशा पहा.

i. तुमच्या जिल्ह्यात सर्वाधिक साधारण किंवा कमी पाऊसमानापैकी कोणत्या प्रकारच्या पाऊसमानात येतो?

ii. नलगोंडा, महबुबनगर, जोगुलाम्बा, कोमारम भीम, यादाद्री या शहरापैकी कोणत्या शहरात कमी पाऊसमान कोणत्या शहरात अधिक पाऊसमान आहे?

iii. या सारखे काही प्रश्न एकमेकांना विचारा?

- तुमच्या अॅटलास मधील भारत देशाच्या नकाशात पश्चिम पर्वत रांगा, पुर्व पर्वत रांगा दाखवा.
- पश्चिम पर्वत रांगा व्यापीत राज्य कोणकोणती ______, ______, ______.
- पुर्व पर्वत रांगा व्यापुन असलेली राज्य कोणकोणती ______, ______, ______.
- पश्चिम पर्वत आणि पुर्व पर्वत रांगा कोणत्या प्रदेशात आहेत?
- भारत देशाचा नकाशा काढा. त्यात पुर्व, पश्चिम पर्वत रांगाचे चित्र काढा, तेलंगाना प्रांत दाखवा या प्रांतात कोणत्या महिण्यात पाऊस पडतो ते दाखवा (चित्रकाढा)

SCERT TELANGANA

## वर्षामापक यंत्र (Rain gauge)

पाऊस मोजणाऱ्या उपकरणास वर्षामापक असे म्हणतात. एका प्रमाण प्रदेशात पडणाऱ्या पावसाचे से.मी. मध्ये मोजतात. आपण पावसास कशा प्रकारे मोजतो? कोठे जास्त पाऊस पडला, कोठे कमी पाऊस पडला हे आपण कशाप्रकारे सांगु शकतो? निजामबाद मध्ये जास्त पाऊस पडतो किंवा रंगारेड्डी मध्ये पडतो?

### स्वत: वर्षामापक यंत्र तयार करा



*चित्र -1 वर्षामापकास तयार करण्यासाठी वरील भागावरील सुचित केलेल्या वस्तु गोळा करा*



*चित्र -2 बाटलीचा भाग या प्रकारे कापुन घ्या खालील गोल मापनानुसार कापलेला भाग तळाच्या गोल मापनाशी समान असावा.*



*चित्र -3 बाटली वरचा भाग उलटा करुन बाटलीमध्ये लावा*




*चित्र -4 बाटली वरील एका विशिष्ट ठिकाणी शुन्य नोंद करा. तेथे एका मोजपट्टीची जोडणी करुन हे पात्र उघडे ठेवा.*

SCERT TELANGANA

आता या बाटलीस बाहेर एका मोकळ्या प्रदेशात ठेवा. बाटलीत पाऊस पडतांना काही अडवे येऊ नये याची काळजी घ्यावी. नंतर स्केलने पाण्याच्या परिमाणास मोजा. काही दिवस याच प्रकारे बाटलीत बाहरे मोकळ्या प्रदेशात ठेवत जा. एका आठवडा किंवा एका महिण्यापर्यंत पाऊस किती पडला याची माहिती आपण घेऊ शकतो.

जेंव्हा पाऊस पडतो तेंव्हा बाटलीतील पाण्याची पातळी वाढते. स्केलपट्टीच्या सहाय्याने पाण्याची उंची मोजी आणि ज्या काळापर्यंत ज्या ठिकाणी तुम्ही बाटली मोकळ्या प्रदेशात ठेवली होती त्या भागातील पावसाचे प्रमाण तुम्ही सेंटीमीटरमध्ये मोजू शकता.

## भाग -II

### नद्यांचा प्रवाह (Flow of Rivers)

पावसाचे पाणी जमीनीवर पडल्यानंतर काय होते? या पाण्याचा काही भाग जमीनीत झिरपत जातो. काही भाग जमीनी वरच्या पृष्ठभागावर वाहतो. उरलेले पाणी वाफेत बदलुन हवेत मिसळते. जमीनीत झिरपलेले पाणी या विषयी पुढच्या पाठात आपण शिकु या. या पाठात जमीनीवर वाहणाऱ्या पाण्या विषयी माहिती घेऊ या.

### नद्या (Rivers)

उतार जमीनीवर नाल्यातुन पावसाचे पाणी वाहत असते तुम्ही केव्हातरी पाहिले आहे का? पावसाळ्यात पावसाचे पाणी उंच भागाकडुन उतार भागाकडे वाहत असते हे जलप्रवाह काही काळानंतर वाळतात. पर्वतावर वाहणाऱ्या पाण्याचे प्रवाहीत कालवे दिसत नाहीत.

पाऊस परत पडायला लागला की पाणी त्याच कालव्याव्दारे वाहत असते. या प्रकारे नद्यांचे मार्ग, नद्यांच्या दऱ्या तयार होतात. या विधानास खालील चित्रात बघु या.(चित्र 2.3)

चित्राआधारे खालील प्रश्नांचे उत्तरे द्या.

- बाणांच्या चिन्हाने नदीची प्रवाहाची दिशा दाखवा.
- जमीनीचा उतार प्रांत बाणाच्या चिन्हांने दाखवा.
- जमीनीच्या उतार प्रांतात नदी एकाच दिशेने का वाहते ते सांगा?

### नाले पसरुन नदी रुपात बदलने:

उगमाच्या स्थानी, नदी शक्य तो लहान नाल्याच्या रुपात सुरु होते. जस जसे ती पुढे जाते तस तसे ती नदी मोठी आणि रुंद होत जाते. हे घडण्याचे कारण म्हणजे बरेच लहान नाले तिच्या प्रवाहाशी जाऊन मिळतात. लहान नद्या किंवा नाले मोठ्यशा नदीशी जाऊन मिळतात. त्यांना उपनद्या म्हणतात. नदी रुंद मोठी झाल्यानंतर नदीचा प्रवाह हळुहळु वाहत असतो.

या प्रवाहात वाहत येणारा कचरा, चिकनमाती, रेती नदीच्या तळाशी, काठाशी साचतात व समतल होतात. यामुळे मैदाने तयार होतात.

नदी समुद्राच्या जवळ येते. तेंव्हा नदीतील पाण्याची गती कमी होत जाते आणि म्हणुन नदी



**चित्र 2.3 उतार आणि नदीची निर्मीती**

SCERT TELANGANA

चिकन माती आणि रेती घेऊन जाऊ शकत नाही. नदीच्या स्वतःच्याच मार्गावर गाळ माती साचुन जाते. जेंव्हा पुन्हा पूर येतो तेंव्हा नदी नवीन मार्गाने समुद्रास मिळते. अशाप्रकारे समुद्राला जाण्याच्या शेवटी नदीचे त्रिकोणी प्रदेश (डेल्टा) तयार होतात. आपल्या राज्यात दोन फार मोठे डेल्टा आहेत. गोदावरी, कृष्णा नद्यांना आहेत. नकाशा बघा.

कृष्णा, गोदावरी या लांब व मोठ्या नद्या आपल्या राज्यातुन वाहत जातात. वर्षभर या नद्यातुन पाणी वाहत असते. म्हणुन या नद्यांना जिवनद्या म्हणतात. आपल्या कडे देखील अनेक लहान नद्या आहेत ज्यात पाणी फक्त पावसाळ्यात असते. असे का घडते? पश्चिम पर्वत रांगामधुन कृष्णा, गोदावरी या नद्या उगम पावतात. या नद्यांना पावसाचे भरपुर पाणी मिळते.

पावसाचे पाणी हळु हळु जमीनीत झिरपत जाते. याप्रकारे वर्षभर पाणी नद्यातुन वाहत जाते. दुसरीकडे खुप नद्या ज्या कोरड्या भागातुन सुरु होतात जसे मंजीरा, दिंडी, मुसी नद्या कमी पावसाचे पाण्याने भरल्या जातात.त्यामुळे या नद्या वर्षा ऋतू नसलेल्या ऋतूत सुकून जातात. पुर्व पर्वतरांगा मध्ये उगम पाऊन नद्या साधारण पावसाचे पाणी घेऊन त्वरीत समुद्रात जाऊन मिळतात. त्यामुळे वर्षा परिस्थितीत या नद्या सुकुन जातात.

**नकाशा - 3 तेलंगाना प्रदेशातील नद्या**




Based on map prepared by
Telangana State Remote Sensing Applications Centre
Planning Department,
Govt. of Telangana.

SCERT TELANGANA

- तिसऱ्या क्रमांकाचा नकाशा महत्वाच्या नद्या दाखवतो. कृष्णानदीचा दक्षिण किणारा आणि गोदावरीचा उत्तरपुर्व सिमेकडुन भाग दिसतो.
- तुमच्या जिल्ह्यातील महत्वपुर्ण नद्याच्या प्रावाहाची माहिती गोळा करा. त्यांची एक यादी तयार करा. संगमांची नांदे करा.
- नद्यांचा प्रवाह बारमाही आहे काय? किंवा केवळ पावसाच्या पुरतेच यांची नोंद करा.

| जिल्हे | नद्यांचा प्रवाह | नद्यांचा संगम |
|---|---|---|
| | | |

- तेलंगानाच्या नकाशात उतार दिशेविषयी तुम्हाला काय आढळुन आले? उत्तरेकडुन दक्षिणेकडे? पुर्वेकडुन पश्चिमेकडे किंवा पश्चिमेकडुन पुर्वेकडे?

## पुरांची मैदाने आणि पुर

**(Flood-Plains & Floods)**

कोणत्याही नदीत वर्षभर एकाच प्रकारचा प्रवाह नसतो. पावसाळ्यात नदी भरुन वाहते. उन्हळ्यात पाणी सुकुन जाते. चित्र 2.4 व 2.5 पहा. चित्रात नदी पुर्वतः रुंद उंच काठा प्रमाणे आहे. नदीत रेती, दगड भरुन आणतात. या दोन्ही काठा मधुन रेती, दगड मधुन नदी लहान कालव्या प्रमाणे वाहत असते. म्हणुनच या ठिकाणी झाडे वाढु शकत नाहीत. अधिक पावसामुळे लहान झाडे लावण्यास मोठी झाडे वाढविण्यास ही जागा उपयोगी नसते. या नदीच्या दोन्ही काठावरील झाडे नसलेल्या भागास पुरांची मैदाने म्हणतात.

सर्व नद्यांच्या दोन्ही काठाशी या प्रकारची पुरांची मैदाने असतात. आपल्या देशात अधिक पावसामुळे पावसाळ्यात पुर येतात हे तुम्हाला माहित आहे. कृष्णा गोदावरी ब्रम्हपुत्रा, गंगा या नद्यांच्या काठावर अशा प्रकारची मैदाने आहेत.

चित्र 2.5 चे काळजीपुर्वक निरिक्षण करुन खालील प्रश्नांचे उत्तरे लिहा.

- नद्यांचे पाणी पुरांच्या मैदानास पुर्णपणे व्यापुन आहे का? पावसाच्या कमतरतेच्या वेळी हे लहान कालव्या प्रमाणेच वाहतात का?
- नद्यांचे पाणी काठावरील मैदानासच सीमीत आहे का? काठावर देखील वाहत असते का?
- गावात शेती जमीनीस, वनस्पतीस पुर कशाप्रकारे प्रभावित करतात?
- पुर देखील शेतीजमीनी करीता फार लाभदायक असतात हे तुम्ही कशा प्रकारे सांगु शकता?

SCERT TELANGANA




*चित्र 2.4 पुर प्रवण क्षेत्र*




*चित्र 2.5 पुर*

आपल्या देशात या सध्याच्या गत काळात पुरामुळे फार मोठ्या समस्या उद्‌भवत आहेत. देशातील काही भाग प्रत्येक वर्षी पावसाळ्यात येणाऱ्या पुरास तोंड देत आहे. यामुळे जनता, पिके, जिवजंतु यांना हानी होत आहे.

पुरांच्या निवारासाठी कोणत्या प्रकारच्या योजना अंमलात आणाव्या याची माहिती घेऊन आपण सर्वांनी सहाय्यक योजना पुरवाव्या. जमीनीवरील रोपे, झाडे, वाढविल्यामुळे (झाडे, रोपे, गवत) पावसाच्या पाण्याच्या प्रवाहास अडवु शकता येते. प्रवाह वेगास कमी केल्यास पाणी जमीनीत झिरपत जाऊ शकते. याप्रकारे रोपांच्या वाढीमुळे पाण्याचा प्रवाह वेगाचा विरोध करुन पाण्यास जमीनीत झिरपत जाण्यास संधी दिल्याने पुर्ण पाणी नदीव्दारे वाहुन जाऊ शकत नाही. त्याचप्रकारे पावसाच्या पाण्याने होणारी जमीनीची झिज देखील थांबते.

रोपे झाडे नसली तर जमीनीवरील मातीची झिज होऊन ती वाहुन जाते. ही माती नदीच्या दोन्ही काठावर थर रुपात साचते. जमीनीच्या खोलाईस देखील कमी करते. त्यामुळे नद्यात पाणी भरण्याचे सामर्थ्य व वाहत नेण्याचे सामर्थ्य दोन्हीही कमी होतात. रोपांना, झाडांना वाढविल्यामुळे जमीनीची झिज थांबते. जर का थोडे काही रोपे नसली तर पुराच्या पाण्याचे जमीनीवरचा थर वाहुन जातो. ही सर्व माती नदीत साचते व नदीची खोली कमी होते. त्यामुळे नदी वाहत नेणारे पाणी घटते. कमी पाऊस पडला तरी पुर येतो. अधिक प्रवाहाने हानी संभावते. जमीनीच्या वरच्या थरास झाडे रोपे व्यापुन असल्यास माती वाहुन जाऊ शकत नाही. ती अडुन राहते. व मातीची झिंज थांबते.

**उदाहरणास : गंगानदी** पुरातन काळात गंगानदीस तिच्या उपनद्या उगमस्थळ हिमायलयात खुप झाडे, झुडपे, रोपे, जंगले असायची. सध्याच्या काळात हिमालयाच्या जवळच्या प्रदेशातील जंगले फार मोठ्या प्रमाणात तोडण्यात आली आहे. त्या प्रभावामुळे अधीक पाऊस पडतो तेव्हा तेव्हा पाण्याचा प्रवाह उतार भागातुन जातो. पुरांची मैदाने तयार होतात. हे घडत असते सतत पुर येणे, आधिक प्रमाणात नद्यात माती साचने या सारखे अंश नदीकाठावरील लोकांना त्यांच्या जिवनास अस्ताव्यस्त करुन टाकतात.

यामुळे आपली जंगले त्यांच्या रक्षणाची प्रामुख्याता जमीनीवर झाडे वाढविणे याची आवश्यकता आहे हे कळते.

- पुरांच्या निवारणासाठी वृक्षसंपदा ( जंगले ) कशाप्रकारे मदत करतात हे तुम्ही सांगु शकाल का?
- दुष्काळ याप्रभावास कमी करण्यासाठी जंगले का आवश्यक असतात? कशाप्रकारे?



SCERT TELANGANA

## वादळे, पुर या वेळेस उत्पन्न होणाऱ्या समस्या



*चित्र 2.6 बंगालाच्या उपसागरातील वादळाचे चित्र*

आपल्या देशात खुप लांब असा समुद्रकाठाची रेषा असल्याने अधिक प्रमाणात बंगालच्या उपसागरातून वादळे संभवतात. समुद्रावरुन वाहत येणारे वारे जमीनीच्या भागांचे नुकसान करतात. खुप उंच उसळणाऱ्या समुद्राच्या लाटा समुद्रकाठाच्या प्रदेशास नष्ट करतात. या प्रकारची परिस्थिती जुन-डिसेंबर महिण्यात संभावित होते. आपल्या राज्यात भयंकर असे वादळ 1977 मध्ये नोव्हेंबर महिण्यात पूर्व किनार तटावर आले होते. 6 मीटर उंची पर्यंत उसळणाऱ्या समुद्राच्या लाटा उसळत येऊन आंध्र कोस्तातीर प्रांतातील 100 गाव नष्ट करुन 9941 लोकांचा बळी गेला. आकाशातुन पाहिल्यास हा प्रदेश पाण्यात तरंगत बुडत खेळ खेळत आहे असे दिसत होते. रक्षणासाठी बापटला येथील सुमारे 100 लोक एका इमारती वर चढले पण ती इमारत कोसळुन त्या 100 लोकांचा बळी गेला.

मानवाच्या नियंत्रणेत नसणारी वादळे नैसर्गिकरित्या तयार होतात. आपल्या समाज निर्माणानुसार संसिद्धतेनुसार या प्रकारच्या समस्यांचा प्रभाव अधिक आहे की कमी आहे हे आपण सांगु शकतो. उदा. वादळे जास्त प्रमाणात संभवित होणाऱ्या समुद्रतीर प्रदेशात निवास करुन राहणाऱ्या गरीब जनते जवळ यांचा विरोध करण्याची साधने सामर्थ्य कमी असतात.

किनारपट्टीत प्रदेशात मासे पकडणाऱ्या (कोळी) लोकांच्या झोपड्या वादळाच्या प्रभावाने अस्त व्यस्त होऊन जातात. कॉक्रीट इमारती मध्ये निवास करुन राहणारे लोक आवश्यक आहार, पाणी साठवुन ठेऊन घेऊ शकतात. या प्रकारे उद्भवित झालेल्या अनेक समस्यांच्या आहारी गरीब लोकच जातात. पुर ओसरुन गेल्यानंतर पाण्याचे साठे दुषीत होतात. पिण्याचे पाणी मिळत नाही. पण गरीब लोकांना न चुकता याच प्रकारचे पाणी प्यावे लागते. व कॉलरा, काविळ या सारख्या रोगांस बळी जावे लागते. ज्यांच्याकडे साधन संपत्ती आहे, ते लोकच सुरक्षित पाण्याची सोय करु शकतात. पुरामुळे रस्त्याची हानी होते परत दुरुस्ती करण्यास सोपे नसते. अशा प्रकारच्या प्रदेशात स्वत:चे रक्षण करुन घेण्यासाठी लोक स्वत:च्या उपलब्ध असणाऱ्या सामग्रीवर आधारीत असतात.

प्राणहानी, वित्तहानी, पिकांची नसाडी वगैरे वादळामुळे संभावतात. यामुळे दिर्घकालीन नुकसान देखील आहेत. ते कोणते तर गरीब लोक स्वत:च्या गरजासाठी घरात साठवुन ठेवलेले आहार पदार्थ वस्तु, जनावरे, वाहने, दुकाने, नावा, होड्या, जाळे सर्वाची नसाडी होते, परत या वस्तु विकत घ्याव्या लागतात

SCERT TELANGANA

कुटुंबातील मंडळी देखील मृत्यु मुखी पडतात. कामकाज मिळत नाही. परत साधारण वातावरण उत्पन्न होईपर्यंत काही आठवड्यापर्यंत त्यांना काम शोधावे लागते. उपासमार होते. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते. जमीनीची झिज पण होते. पण अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**वादळे, पुर या सारख्या नैसर्गिक विपदांचा लोकांनी कशा प्रकारे सामना करावा?**

शासनाने तयार केलेल्या दिर्घ कालीन योजना जनता शासन संस्था या मधील सहाय्य सहकारावर या विपदांचा सामना करण्याची प्रक्रिया आधारीत असते. सध्याच्या काळात वादळे पुर या सारख्या नैसर्गिक विपदा संबंधीत अगोदरच अंदाज सांगणे कठिण बाब राहिली नाही. विपदा संभावित होण्याचा अवकाश असल्यास त्या प्रदेशात आवश्यक योजनांची अंमलबजावणी करावी. या अंशाची लोकांना माहिती द्यावी. सर्व लोकांना आवश्यक पक्की घरे बांधुन द्यावी. पक्क्या रस्त्यांची निर्मीती करावी. पुराच्या वेळेस समुद्र तिर प्रदेशातील लोकांना आहार, गोड शुध्द पाणी, दवाखाण्याच्या सोयी, औषधींच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन द्याव्या. त्यांच्या रक्षणाची पुनर्वसनाची जबाबदारी शासनाने घ्यावी.

**नैसर्गिक विपदेपासुन रक्षण करुन घेण्यासाठी लोकांना कशा प्रकारे सिध्द कराल? How can the people prepare for disasters?**

1. वादळे, पुर काळानुसार, ऋतुमानुसार संभावित होतात. त्या काळात टी.व्हि. रेडीओ यासारख्या प्रसार माध्यामाव्दारे किंवा घरोघरी फिरुन लोकांना यांची सुचना द्यावी व त्यांना जागरुक करावे.
2. प्रत्येक घरात आवश्यक सामग्रीचा संच तयार ठेवण्याची काळजी घ्यावी. या संचामध्ये पेपर्स, आहार पदार्थ, रुपये अत्यावश्यक वेळेस उपयोगी असे फोन नंबर्स उपलब्ध ठेवावेत.
3. जवळच्या पुनर्वास केंद्राची माहिती आधीच घेऊन ठेवावी.
4. आवश्यकता असल्यास घराच्या भिंती, छत, दारे, खिडक्या मजबुत राहतील या प्रकारे दुरुस्ती करुन ठेवण्यात यावे.
5. वादळ येण्याची सुचना मिळताच लगेच गोड शुध्द पाणी, आहार पदार्थ पावसाने न भिजणाऱ्या पिशव्या मध्ये भरुन ठेवावेत.
6. सुचना मिळाल्यानंतर बाहेर, मुख्यता समुद्रातीर प्रदेशात जाऊ नये.
7. दारे, खिडक्या बंद करुन घरातच राहावे.
8. दारे, खिडक्या बंद करुन आपले घर सुरक्षित नसल्यास जवळच्या पक्क्या घरात जावे.
9. तुम्ही वाहनात असतांना वादळ आल्यास वाहनास समुद्रतीर प्रदेशापासुन, झाडापासुन, विद्युत खांबापासुन दुर प्रदेशात उभे ठेवावे नाही तर वाऱ्याच्या प्रचंड वेगाने ते आपल्या वर पडतील.
10. वादळे, वारे अचानक थांबल्यास शासन संस्थेच्या सुचने शिवाय घराच्या बाहेर पडु नये.
11. आवश्यक सुचना, सल्ला घ्यावयाची काळजी या अंशाचे प्रसारण रेडीओव्दारे, टि.व्हि. व्दारे करावे.


SCERT TELANGANA

12. वादळापासुन कोणत्याच प्रकारची दुर्घटना संभावित नाही याची माहिती मिळताच आपण घरी जातांना रस्त्यावर पडलेल्या झाडांना बघत काळजीपुर्वक जावे.
13. बिळातुन, रस्त्याच्या आजुबाजुच्या छिद्रातुन साप निघत असतात तर रस्त्याने काळजीपुर्वक जावे.
14. पुराच्या पाण्यात जावु नये, ते पाणी खुप खोल असते.
15. तुम्ही सर्व विद्यार्थी वर दिलेल्या संरक्षण पध्दतीस सुरक्षितता योजनेस प्रसारीत करण्यासाठी या व्दारे लोकांना चैतन्ययुक्त करण्याची महत्वाची भुमिका बजावावी.

**नैसर्गिक आपदा : घर खाली करण्याची वेळ आली तर**

1. कपडे, आवश्यक औषधी, मौल्यवान वस्तु, ओले न होणाऱ्या पिशव्यात भरुन ठेवावेत.
2. स्वयंपाकाचे सामुग्री, स्टिल, पितळेची भांडी, कपडे, फर्निचर इत्यांदींना पलंगावर ठेवावे.
3. विद्युत शक्तीस बंद करुन ठेवावे.
4. तुम्ही घरात असतांना, बाहेर गेल्यास लॅट्रीनच्या वरच्या भागास झाकुन ठेवा. त्यातील पाणी बाहरे येऊ नये या साठी सांडपाणी छिद्रांना बंद करुन ठेवा.
5. घरास कुलुप लावा. सुरक्षित प्रदेशास जाण्याचा मार्ग माहित करुन घ्या.
6. खुप खोल असलेल्या पाण्याच्या प्रवाहात जाऊ नका किंवा खड्यात जाऊ नका.

**पुराच्या वेळेसः**

1. उकळुन गाळलेले पाणी प्यावे.
2. आहार पदार्थ झाकुन ठेवावेत. कमी जेवन करावे.
3. डायेरीया रोगाची साथ पसरली असतांना चहा, भाताचे पाणी, नारळाचे पाणी वगैरे सेवन करावे.
4. लहान मुलांना उपासपोटी ठेऊ नये.
5. रोगाची साथ पसरु नये म्हणुन सभोवताल ब्लिंचींग पावडर शिंपडावे.
6. पावसाच्या पुराच्या पाण्यात जाऊ नये जायची गरज असल्यास त्या पाण्याची खोली किती आहे ते एका काठिने बघावे गुडध्या पर्यंत पाणी असेल तर जाऊ शकता.
7. पुराच्या पाण्याने बनविलेल्या आहारास घेऊ नये.
8. ग्रामीण प्रांतातील लोकांनी पाणी उकळुन, गाळुन प्यावे, पाण्यास शुध्द करण्यासाठी त्यात हलोजीन गोळ्या टाकाव्या.( या गोळ्या विषयी तुमच्या गावातील ग्राम आरोग्य कार्यकर्त्यास विचारावे.)
9. पुराच्या वेळेस साप चावणे ही साधारण गोष्ट आहे. म्हणुन सापापासुन रक्षणासाठी त्या करीता काळजीपुर्वक वावरावे.

SCERT TELANGANA

**महत्वाचे शब्दः**

1. नद्या आणि उपनद्या 2. वार्षिक पाऊसमान 3. द्रविभवन 4. पुरांची मैदाने

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. पाणी कशा प्रकारे वाफेत बदलते? वाफेपासुन ढग कशा प्रकारे बनतात?
2. बाष्पीभवन, ढग तयार होणे हे कोठे/कोणत्या प्रदेशात घडते?
3. जमीनीवर ढग कशाप्रकारे पोहचतात?
4. कोठे अत्याधिक प्रमाणात पाऊस पडतो? योग्य त्याची निवड करा?
   a) वाऱ्याच्या दिशेत असणाऱ्या समुद्र प्रदेशात
   b) वाऱ्याच्या दिशेत असणाऱ्या पर्वत प्रदेशात
   c) समुद्रापासुन दुर असणाऱ्या प्रदेशात
5. गोदावरी नदी पुर्वेकडुन पश्चिमेकडे वाहत जाते? कारण काय?
6. जलचक्राच्या प्रमुख दिशा सांगा.
7. तुमचे गाव किंवा शहराजवळ नाले किंवा नद्या असतीलच त्यांच्या विषयी माहिती घ्या व खालील तक्ता भरा.

| अ.क्र. | नांव | नदीचे उगमस्थान | मिळणारी नदी | मिळणारा समुद्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |

8. तुमच्या भागातील नद्यात/झऱ्यांना वर्षभर पाणी असते का? तुमच्या वरीष्ठांकडुन माहिती करुन घ्या की पुर्वी त्यात जास्त पाणी होते का?
9. नैसर्गिक विपत्तीशी सामना करण्यासाठी लोकांना कसे प्रवृत्त करावे?
10. वादळे, पुर या बाबतच्या चित्रांचा एक संच (वही) तयार करा?
11. पुरामुळे होणाऱ्या नुकसानाची माहिती दर्शविणारे एक भिंतीपत्रक तयार करा?

**प्रकल्प कार्यः**

तुमच्या गावात/ उपनगरात पाण्याचा कसा दुरुपयोग/वाया जात आहे याचे निरिक्षण करुन पाणी वाचवण्याचे उपाय, चर्चा, सुचना खालील तक्त्यात भरा.

| अ.क्र. | पाणी वाया जाते ती जागा | कारण | पाणी वाचविण्याचे मार्ग सुचवा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

SCERT TELANGANA

पाठ 3

# तळे आणि भुगर्भजल

## पहिला भाग

### तळे (सरोवरे,तलाव) Tanks (*Cheruvulu*)

हजारों वर्षापासुन आपल्या पुर्वजांनी जमीनीवर वाहणाऱ्या पाण्यास साठवुन ठेवण्यासाठी तळ्यांना खोदण्यात आले. बृहतशिला युगापासुन तळ्यांची निर्मीती करुन साठवलेल्या पाण्यास शेतीसाठी उपयोगात करण्यात आला. म्हणुन आपल्याकडे बरेच आधार आहेत. तेलंगाना, रायलसिमा भागामध्ये हजारों सरोवरांना काकतीयांनी, विजयनगराच्या राजांनी नेत्यांनी निर्मीती केली हे तुम्हाला माहितच असेलच, या सरोवरांची निर्मीती शेतीसाठी या प्रांताचा विस्तार वाढवण्यासाठी मदत झाली. विस्तार होवुन कोरड्या प्रांतात वाढ झाली.आतापर्यंत या प्रांतातील अनेक गावामध्ये कमीत कमी एक दोन मोठे तळे आहेत.

### तळे कसे निर्माण केले ?

तळ्यांना साधारणपणे वाहत जाणाऱ्या नद्यांना दगडांनी मातीने भिंत बांधतात. मजबुत बांधलेल्या त्या भिंतीच्या एका बाजुच पाणी जमा राहुन तळे खोल्या निर्माण होतात. खालील आकृती पाहा.

या सरोवरांना पुर्वी राजा, सेनाधिकारी, नेतेच बांधत होते. पण जास्त करुन त्या गावातील गावकरी लोकच स्वत:तळे बांधत. तशी तळे बांधणाऱ्या व्यक्तीस कथेव्दारे, देवळात, किर्तनाव्दारे त्यांचे स्मरण करत. गावामध्ये प्रत्येक जण मेहनत करुन खर्चाना सर्वजन गोळाकरुन तळ्यांच्या कठ्यांना दुरुस्ती करुन सर्वजन मिळुन त्या तळ्यांना सांभाळत असत. तळ्यांतील गाळास निर्मुलन करतात. तळ्यांत येणाऱ्या पाण्यास कोन्हीही दुसरीकडे पाठवत नसत साठवुन ठेवणे, घाण होऊ न देणे, याची काळजी घेत. तळ्यांतील पाण्याचा योग्य वापर करण्यासाठी बांध बांधणारा माणुस म्हणुन एका माणसाची नियुक्ती केली जात असे काही प्रांतामध्ये यास बांधक म्हणुन सुध्दा म्हणतात.



*चित्र 3.1(अ) तळे आणि शेती*

SCERT TELANGANA

## तळे आपणास कशा प्रकारे उपयोगी पडतात?

तळे लोकांच्या पाण्याच्या गरजा भागवणे, जनावरांच्या तहान भागवणे, एवढेच नाहीतर दुष्काळाच्या वेळेस सुध्दा कोणत्याही एकाच पिक पिकवण्यासाठी याची मदत होते. जवळच्या विहिरीमध्ये पाण्याची पातळी वाढवण्यासाठी याची मदत होते.

पाऊस कमी होऊन तळे कोरडे पडल्यानंतर त्या तळ्यांच्या पातळीवरील जमिनीत काही पिके पिकवतात. तळ्यांच्या मुख्य उपयोग पाण्याच्या प्रवाहास अडविणे जमीनीच्या तुटवड्यास थांबविणे दरवर्षी तळ्यांतील गाळाच्या मातीस शेती पीक- पिकांना खत म्हणुन टाकतात.

या प्रकारे जमीनीस क्षारयुक्त करतात. तळे ही एकट्याची मालकी नसुन ती सर्व गावकऱ्यांची संपत्ती आहे. म्हणुन तळ्यांचा एका दोघांसाठीच नाही तर सर्व गावकऱ्यांना याचा उपयोग होतो.

## सध्याच्या काळात लोप पावणारी तळे

गेल्या विस ते तीस वर्षापासुन तळ्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ते जिथल्या तिथे तुटुन जात आहे. तळ्यातील गाळ काढणे, दुरुस्ती करणे, व्यवस्थीत कामे होत नाहीत. लोकसुध्दा तळ्यांच्या जमीनीचा क्रमाने घरांसाठी, शेतीसाठी वापर करण्यास सुरुवात केली. त्यामुळे राज्यातील सर्व प्रांतातील तळे कोरडी पडली त्याकडे लक्ष कोणी देत नाहीत. तळ्यांना वाचवण्या ऐवजी कित्येकजन लाखों रुपये खर्च करुन जास्त खोल असणाऱ्या कुपनलीका, विहिरी खोदत आहेत. पण त्या विंधन विहिरीमुळे काही जनांनाच फायदा होत आहे. येणाऱ्या काळास या विहिरी पाण्याच्या तुटवड्यास कारणीभुत ठरतात. तळे पाण्याचे साधन म्हणुन कायम राहतात.



*चित्र 3.1(ब) बी.रामप्पा तळे वरंगल जिल्हा*

**प्रकल्प कार्य**

- तुमच्या भागातील तळ्यास भेट देऊन त्याचे निरिक्षण करुन त्या बद्दल एक पुस्तक तयार करा.
- तळे आणि त्याच्या सभोवतालच्या प्रदेशाचा नकाशा तयार करा.
- त्या तळ्यास पाणी कोठुन येते जास्त पाणी कुठे जाते त्याची माहिती घ्या.
- तळ्याची निर्मीती कोणत्या नदीजवळ नाल्याजवळ झाली ते कोणत्या डोंगराजवळ आहे त्यांची नावे लिहा.
- तळ्यास कशांनी बांधले आहे. आता त्याचे कोण रक्षण करत आहेत त्याची माहिती घ्या.
- तळ्यास कोणी केव्हा खोदले त्याची माहिती घ्या.
- तळ्या बद्दल काही कथा असतील तर ते लिहा.
- तळ्याच्या छायाचित्र गोळा करा त्या तळ्यांशी संबंधीत इतर गोष्टी माहिती घ्या.
- तळ्यातील पाण्याने कोणते पिक पिकवतात त्या पाण्याची मालकी कोणत्या हाती असते. याची माहिती घेऊन नोंदणी करा.

SCERT TELANGANA

## मिशन काकतीया(आपले गाव - आपले तळे)

नव्या तेलंगाना राज्याच्या निर्मीतीनंतर तेलंगाना सरकारने पाण्याच्या बाबतीत स्वंयपुर्ण होण्यासाठी लघु पाटबंधारे प्रकल्पाची दुरुस्तीसाठी एक महत्वांकाक्षी प्रकल्प हाती घेतला. त्याचेच नाव मिशन काकतीया आपले गाव - आपले तळे. राज्यातील 47000 तळ्यातील गाळ काढणे, तळ्याची दुरुस्ती करणे आणि बांध दुरुस्ती करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्देश होत.

या कार्यक्रमा अंतर्गत तुमच्या भागातील तळ्यांची दुरुस्ती करण्यात आली याची माहिती घ्या आणि किती लोकांना याचा फायदा झाला त्यांची माहिती घ्या.

MISSION KAKATIYA

### तळ्यात मासेमारी (Fishing in Tanks)

तळ्यापासुन पिण्यासाठीच पाणी आणि शेतीसाठी पाणी मिळत नाही तर मासेमारी करण्याऱ्या लोकांसाठी ते महत्वाचे साधन होय. अनेक जाती जमाती जसे बेस्ता(गंगापुत्रा), गुंडला आणि मुदीराज( तेनुगु) या जाती प्रामुख्याने पारंपारीक मासेमारी म्हणुन ओळखल्या जातात. याचे बरेचसे जिवनमान तळे आणि नद्यावर आधारलेले आहे. सुर्यपिट जिल्ह्यातील एका गावास भेट देऊन थोडी माहिती घ्या.

### बेथावेंलु गाव:

सुर्यपिट जवळील कोडाद येथुन 16 कि.मी. वर हे गाव आहे.

गावातील जेष्ठाच्या मते काकतीया राजांचा मांडलीक बेथावेलारेड्डी याच्या पासुन या गावाला बेथावेलु हे नाव मिळाले. त्याने त्याच्या पत्नीच्या नावे विराला देवी च्या नावे या तळ्याची निर्मीती केली. त्यामुळे गावकरी या तळ्याला विरालादेवी तळे कवा इरलादेवी तळे असे म्हणतात. सद्या परिस्थितीत या तळ्याच्या पाण्यावर 1900 एकर जमीनीला पाणी पुरवठा केला जातो. वास्तविक पाहतो याची क्षमता 3000 एकर इतकी होती परंतु अतिक्रमाने आणि गाळामुळे क्षमता फार कमी झाली आहे.



*चित्र 3.1(ड) कट्टा मैसम्मा तळे*

तळ्याच्या बांधावर कट्टा मैसमा आणि गंगम्मा यांची देवालये आहेत. या देवतांना या तळ्याचे संरक्षण मानले जाते. मासेमारी करणारे लोक हंगामापुर्वी या दोन्ही देवतांची पुजा करतात तसेच दरवर्षी या देवतांचा उत्सव केला जातो.

*चित्र 3.1(क) विराल्ला देवी तळे*



SCERT TELANGANA



*चित्र 3.1(इ) जाळे फेकतांना*



*चित्र 3.1(ई) मासे पकडतांना*

बेस्ता किंवा (गंगापुत्र) आणि मुदाराम या मच्छीमारी करणाचा जातीचे बेथावेलु या गावात साधारणतः 600 कुंटुंबे राहतात. यापैकी 60 ते 70 कुटुंबे तळ्यातील मासेमारीवर जगतात. ही मासेमारी साधारणतः मार्च आणि एप्रिल या महिण्यात होते. उर्वरीत काळात हे लोक लहान शेतकरी किंवा कामगार म्हणुन काम करतात.

## तळ्यातील मासे

आधीच्या काळात नद्यांच्या प्रवाहात किंवा इतर ठिकाणी नैसर्गिक रित्या बुटा परकालु, कोडीपेलु, चंदामामालु, कुंटुमुक्कुलु, पुल्लाशु, इसकादोंडुलु, पापेरालु, गुडपापेरालु, गुरीयोपिलालु, कोरामिनालु, वालागुाल, इत्यादी प्रकारची मच्छी सहज उपलब्ध होत असे. नद्याचे पाणी या तळ्यात जमा होत असे त्याबरोबरच हे मासेही येथे पैदा होत असत. परंतु नंतरच्या काळात विषारी औषधे, किटकनाशकाच्या वाढत्या वापराने या जाती नामशेष झाल्या. यामुळे आताच्या काळात कृत्रिम प्रमाणे माशांची वाढ करुन त्यांना तळ्यात सोडले जाते. तेथे वाढ झाल्यानंतर त्या माशांची विक्री केली जाते. विशेषता मरळ, राऊ, कातला आणि बंगारु तीगा मासांची वाढ केली जाते. या प्रकारचे मासे आताशा बाजारात मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. यातील प्रत्येकांची चव वेगळी असते. तुम्ही यापैकी कोणत्या माशाची चव चखली आहे का?

- काही विशेष प्रकारचे मासे आपण का खातो?
- कॅट फिशवर बंदी का आणण्यात आली आहे?

### जाळ्याचे प्रकार

मासेमारी करण्यासाठी मच्छिमार वेगवेगळ्या प्रकाराची जाळी वापरतात. लहान प्रकारच्या जाळ्यात 30 छिद्रे (डोळे) असतात. तर मोठ्या प्रकारच्या जाळ्यात 60 छिद्रे (डोळे) असतात. 30 डोळ्याच्या जाळीला लहान जाळी तर दुसऱ्या जाळीला मोठी जाळी म्हणतात. या जाळ्यांना लोखंड किंवा शिशापासुन बनवलेल्या विशेष कड्या असतात. छोट्या जाळीच्या साहाय्याने लहान आकाराचे मासे जसे झिंगे (प्रॉन्स) पकडण्यात येतात. तर मोठ्या जाळ्याचा उपयोग शंभर ग्राम पासुन ते 5 किलो वजनाची मासोळी पकडण्यासाठी करण्यात येतो. मोठ्या जाळीचे वजनही जास्त असते. याचे कारण काय असावे?

- तुमच्या भागातील मासेमारी करणाऱ्या कुंटुंबाची भेट घेऊन मासेमारी कशी करतात ते जाणुन घ्या?
- तुमच्या भागात कोणत्या प्रकारची जाळी चा वापर करतात याची माहिती घेऊन चर्चा करा?

मच्छिमार किंवा कोळी लोक दोन प्रकारे मासे पकडतात. एक उथळ पाण्यात तर दुसरे खोल पाण्यात कमी पाणी असल्यास दुरवर फेकणारे जाळे (वीसीरे वला)वापरले जाते. तर पाणी खोल असेल तर गाठी गाठीची जाळी (कच्चु वला) वापरली जातात. शकतो

SCERT TELANGANA

खोल पाण्यात मोठ्या गाठीची वजनदार जाळी वापरली जाते.

- पाण्याच्या खोलीनुसार जाळ्यांची निवड केली जाते याची चर्चा करा?

## मासेमारी (मच्छीमारी) (Fishing)

मच्छिमारीचे काम सकाळी लवकर सुरु होते. तलावाच्या काठाजवळ पाणी उथळ असते. तेथे दुरुन फेकण्यात येणारी जाळे वापरले जाते. इतर काही जन विशिष्ट प्रकारच्या थर्माकोलच्या सहाय्याने बनवलेल्या छोट्या नावेच्या साहाय्याने तळ्यात जातात. जेथे पाणी अतिशय खोल आहे. अशा ठिकाणी वजनदार जाळे पाण्यात टाकले जाते. दिवसभर दोनदा मासेमारी केली जाते. सकाळी 4 ते 8 आणि दुपारी 1 ते 4 या वेळात सकाळीचे मासे दुपारी बाजारात तर दुपारचे मासे सायंकाळी बाजारात नेले जातात.

मच्छिमारी करणारी माणस उन, वारा, पाऊस यांची काळजी करत नाहीत. जेव्हा मोठ्या प्रमाणात मासे मिळतात तेव्हा ते हैद्राबाद सारख्या मोठ्या शहरात विक्री साठी नेली जातात. तर थोड्या प्रमाणात मासे मिळाले तर जवळच्या सुर्यापेट किंवा कोदाड येथे मासे विक्री केली जातात. व्रिी नंतर उरलेल्या मास्यांना स्वच्छ करुन उन्हात वाळवले जाते. मासेमारीचे काम पुरुष करतात. तर विक्रीची जबाबदारी महिला समर्थपणे सांभाळतात. चित्र 3.1 (ग) पहा.

## मच्छिमारांची सहकारी संस्था

मच्छिमार सहकारी संस्थेत सदर कुटुंब सदस्य असावे लागते. उत्पादनाच्या पातळीवर सभासदत्व निश्चित केले जाते. साधारणत: एक हेक्टर (अडीच एकर) जागेसाठी एका सभासदाची निवड केली जाते. या गावातील सहकारी संस्थेत आता 339 सदस्य आहेत. मत्स्योत्पादन विभागास सदर संस्था 2,35,000 रुपये मासेमारी साठी देते. मत्स्योत्पादन विभागाकडुन मत्स्यबिज



*चित्र 3.1(उ) मासे विकण्याचे ठिकाण*

विकत घेऊन तळ्यात सोडले जाते. सार्वत्रिक जबाबदारीने संगोपन केले जाते. तसेच विक्रीतुन आलेला नफा सर्वांना समान वाटला जातो.

- तुमच्या गावातील मत्स्योत्पादन सहकारी संस्थाच्या सभासदांची भेट घेऊन सहकारी संस्थेच्या कार्या विषयी माहिती घ्या?
- मत्स्योत्पादकांना मत्स्योत्पादन विभागला पैसे का द्यावे लागतात असे तुम्हास वाटते? या बद्दल चर्चा करा?

सद्याच्या काळात मत्स्योत्पादनात एक वेगळीच पध्दत दिसत आहे. मच्छिमार लोक खुपच गरीब असतात. त्यांना मत्स्यबिजासाठी पैसा हवा असते. स्वबळावर मत्स्यबिज खरेदी करण्याची क्षमता त्यांच्यात नसते. यामुळे त्यांना व्यापाऱ्याकडुन कर्ज घ्यावे लागते. व्यापारी कर्ज देतानांच उत्पादन त्यांनाच विकण्याची अट घालतात. या बरोबरच ते उत्पादाची जबाबदारी ही घेतात. त्यांच्याकडे बाजारभावापेक्षा 20 ते 30 टक्के कमी भाव असतो. याचाच परिणाम म्हणजे व्यापारी मोठा नफा कमावतात आणि खरे मच्छिमार तसेच राहतात. बँकांनी जर व्यापाऱ्यांना कर्ज दिली तर मच्छिमारांची अवस्था जिवनमान सुधारण्यात मोठी मदत होईल. ते स्वावलंबी होतील. त्यांची पिळवणुक होणार नाही.

- बँका मच्छिमारांना कर्ज देण्यासाठी का टाळाटाळ करतात असे तुम्हास का वाटते?

SCERT TELANGANA

# दुसरा भाग

## भुगर्भ जल(जमीनीतील पाणी)Groundwater

पावसाचे पाणी नद्यामध्ये, नाल्यामध्ये, कालव्यात वाहत नसुन मातीतच निरंतर झिरपत जाते असे झिरपत गेलेले पाणी जमीनीतील रेती, खडे, चिऱ्यामध्ये जाऊन बसते. या खडकांच्या पाण्यासच भुगर्भजल किंवा जमीनीच्या आतील पाणी म्हणतो. या पाण्याच आपण विहीरी खोदुन, झऱ्याव्दारे बाहेर काढतो.

खडक, छिद्रांनी लहान छिद्रे असुन पाण्यानी अच्छादित दगडाच्या थरांना नरम दगडाचे थर म्हणतात. या थरामध्ये पाणी पोहोचते. तेलंगानातील खम्मम जिल्ह्यातील रेती, कडप्पा जिल्ह्यातील चुन्याची दगडे या सारखी दगडाची थरे आहेत. यास छिद्र नसुन घट असतात. यामध्ये पाणी पोहचु शकत नाही. भुगर्भजल त्या सारख्या दगडांवरच्या भागावर साचुन असतात. कारण की त्या दगडाच्या तळाशी पाणी पोहचु शकत नाही. यास पाणी न पोहोचणारे घट्ट थर म्हणतात.

आपल्या राज्यामध्ये जास्त दगडाचे थर अशाच प्रकारचे आहेत. राज्यातील नद्याजवळील काही प्रांताध्ये जास्त रेती, खडे, माती, जमीनीचे थर आहेत. या जमीनीच्या थरात सुध्दा पाणी जाते. जमीनीच्या थरांमध्ये पोहोचलेल्या पाण्याच्या थरास जलस्थर असे म्हणतात. या पाण्याच्या थराची जाडी त्या प्रांतात मिळणाऱ्या भुगर्भजलाच्या उपलब्धीस निर्धारीत करते.

तुमच्या प्रांतातील विहिरींचे निरिक्षण करुन किती फुट खोलवर भुगर्भजल आहे याची माहिती घ्या. तळाशी पाण्याचा थर आहे का? असेल तर ते कोणत्या प्रकारच्या दगडाचा थर आहे त्या विहिरीचा मालक कोण आहे? केव्हा विहिर खोदण्यात आली? त्या खोदुन बांधण्यापर्यंत किती खर्च आला? इ.विषयाबाबत माहिती घ्या. या संपुर्ण माहितीस आमच्या गावातील विहिर म्हणुन एक पुस्तकास तयार करा.




***चित्र 3.2 जमीनच्या पातळी खाली असलेले दगड, गोटे, पाणी***

- पाणी न पोहचण्यासारखे दगडे नसली असते तर भुगर्भजल असु शकले असते का? तसे तुम्हाला वाटते का?
- हे पाणी पोहोचण्यासाठी न पोहचण्यासारखी दगडाच्या तळाशी नरम दगड असेल तर काय होईल? भुगर्भजल कुठे पर्यंत पोहोचेल?

तेलंगाना शासनाव्दारे मोफत वितरण 2020-21

## पाण्याची पातळी किंवा भुगर्भजलांची पातळी

चित्र 3.3 सर्व विहिरीमध्ये भुगर्भजल एकाच पातळीत आहेत हे पहा. हे पाऊस पडल्यानंतरची पाण्याची पातळी या सर्व विहिरीमध्ये पाच मीटर खोलवर पाणी आहे. या गोष्टी कडे लक्ष द्या. म्हणजेच त्याच प्रांतात नविन विहिरी खोदल्यास त्या पाच मिटर खोलवर पाणी लांगण्याची शक्यता असते.यास भुगर्भजलाची पातळी किंवा वाटर लेवल असे म्हणतात.

(चित्र 3.3) भुगर्भजलाची पातळी पावसाळ्यात वर तर पाऊस नसतांना उन्हळ्यात खाली जाते. कधीच कायम नसते. ही पातळी मान्सुन मध्ये वर येते.

## तेलंगानातील खडके आणि भुगर्भजल

तेलंगानातील जमीनीतील थरांमध्ये जास्त भाग घट, पाणी न झिरपणारे ग्रायनाईट थरांनी आच्छादीत आहे. पण या थरांवरील भागांत (अंदाजे 20 मीटर) चिऱ्या असुन तिथे पाणी पोहचुन आहे. यातील खुप खडकाळ दगड 50 पासुन 100 मीटर पर्यंत खाचा असतात. या खाचांमध्ये सुध्दा पाणी जाऊन पोहोचते. साधारणपणे आपण खोदलेल्या विहिरी वरील थरावरील पाणी मिळण्या इतकाच फायदा होतो. पण यंत्राव्दारे खोदणाऱ्यांना याचा फायदा जास्त होतो.




*चित्र 3.3 भुगर्भजलाची पातळी*

**चित्र 3.3 पाहुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

i. जमीनीच्या पातळी पेक्षा भुगर्भजलाची पातळी ....... मीटर खाली असते?

ii. उन्हाळ्यात जमीनीच्या पातळीपेक्षा 10 मीटर खोलवर भुगर्भजल गेले तर या चार विहिरीपैकी कोणत्या विहिरी वाळुन जातात?

iii. कोणत्या विहिरीत जास्त पाणी मिळते?

**चित्र 3.4 पाहुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

- अवघड अशा दगडाच्या थराखाली दगडाच्या चिऱ्यामध्ये पाणी कसे गेले ते सांगा?
- उन्हाळ्यात कोणती विहीर अगोदर कोरडी पडते? कारणे सांगा.
- दगडामध्ये चिऱ्या नसल्यातरी त्या दगडाच्या थरांमध्ये खोदलेल्या विहिरीत पाणी असु शकते का?

SCERT TELANGANA




***चित्र 3.4 जमीनच्या खाली दगड, पाण्याची पातळी***

बऱ्याच प्रदेशातील दगडाचे थर जास्त करुन ग्राइनाईट थर नसतात. पण कडप्पा सारख्या दगडाच्या थर चुन्याच्या दगडाची थर होत. हे पण कठिण असे दगड असतात. पण त्यास चिऱ्या फुट असते म्हणुन त्यात पाणी साठवण्याची शक्यता असते.

कृष्णा, गोदावरील यासारख्या महानद्या वाहणाऱ्या प्रांतामध्ये जाड अशी रेती सुपीक मातीचे थर आहेत. येथील पाण्याची पातळी नदीच्या पाण्यावर अवलंबुन असते या भागांमध्ये साधारणपणे जमीनीच्या पातळीस 5 पासुन 7 मीटर खोल पर्यंत पाणी असते. म्हणुन इथल्या विहिरी खोदणे खुप सोपे असते.

- तुम्ही 6 व्या वर्गात शिकलेल्या पेनमकुरु, डोकुर आणि पेनुगोलु गावातील विहिरी, बोर विहिरींची आठवण कराल का?

## भुगर्भजलाचे पुनर्भरण Recharging Groundwater

खड्डे, झाडे गवत नसलेल्या जमीनीवर पाणी जास्त वेगाने वाहुन नाल्यामध्ये नद्यामध्ये जाऊन मिळतात. पण पावसाळ्याच्या पाण्याच्या प्रवाहास झाडांच्या वाढीव्दारे साठवुन ठेवल्यास ते पाणी जमीनीत जिरुन भुगर्भजलामध्ये जाऊन मिळण्याची शक्यता असते. डोंगरावर गवत वाढवुन बांध बांधुन पाण्यास जास्त काळ साठवुन ठेवतात. असे केल्यामुळे भुगर्भजल पुनः मिळण्याची शक्यता असते.

पण देशातील अनेक प्रांतामध्ये जमीनीत जाणाऱ्या पाण्यापेक्षा जास्त पाणी आपण काढत आहोत म्हणजे आपण भुगर्भजलांना तिथे पोहोचणाऱ्या पाण्यापेक्षा जास्त वापरत आहोत. जंगलतोडीमुळे सुध्दा जमीनीत पाणी ओढुन घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे पाण्याची पातळी वेगाने घटुन दरवर्षी अर्धा मीटर पासुन दोन मीटर पाण्याची पातळी खाली घसरत आहे.

असे आपण जर दरवेळेस जमीनीत मुरणाऱ्या पाण्यापेक्षा जास्त पाणी काढलो तर काही काळानंतर पुर्ण भुगर्भजल कमी होतात. शेवटी भुगर्भजलाच्या पातळ्या पुर्णपणे नाहीशा होतात.

- भुगर्भजलाचा नायनाट न होता याचा कमी वापर करणाऱ्या मार्गाबद्दल विचार कराल का?

देशातील आपल्या राज्यामध्ये फक्त तीन चार महिनेच पाऊस पडत असतो. इतर महिण्यामध्ये आपण भुगर्भजलांवरच आधारीत असतो. नद्या, विहिरी, झरे हे सर्व पणया भुगर्भजलांच्या साधनांवरच आधारीत असतात.

भुगर्भजल वाढवण्यासाठी आपण मदत करु शकतो का? जमीनीवर झाडे, झुडपे, दगड गोटे नसतील तर पावसाचे पाणी वेगाने वाहत असल्याचे तुम्ही पाहिले असाल. अडथळे नसल्यामुळे पाणी सरळ नाल्या नद्यामध्ये जाऊन मिळते. म्हणुन झाडे वाढवणे रोपटे लावणे, धरणे बांधणे, गवताला वाढवल्या मुळे पाण्याच्या प्रवाहास कमी करु जमीनीत पाणी जाऊन भुगर्भजलाला वाढण्याची शक्यता जास्त असते.

या पध्दतीव्दारे पाण्याचा साठा वाढवण्याचे प्रयत्न गेल्या काही वर्षापासुन चालत आहेत. हे प्रयत्नांना भुगर्भजल अभिवृध्दी योजना म्हणतात. या योजनाखाली नाल्याच्या उगमस्थाचे ठिकाण, डोंगरे, दऱ्यामध्ये झाडे लावणे, गवत वाढवणे, छोटे बांध बांधल्यामुळे पाण्याचा प्रवाहास कमी करुन जास्त पाणी भुगर्भजलांधमध्ये पोहोचवु शकतो. नाल्यानंतर बांधणारे छोटे छोटे पुल सुध्दा पाण्याला जास्त काळ साठवुन ठेवण्यासाठी मदत होते. हे सर्व प्रयत्न भुगर्भजल वाढवण्यासाठी मदत होते.

- तुमच्या भागांत भुगर्भजल विकास योजना कोणत्यातरी आहेत का? त्या प्रांतास भेट देऊन ते कसे केले त्याच्या अभ्यास करा. ती योजना असणाऱ्या प्रांताचा रेखाचित्र काढा?

## भुगर्भजलाचा दर्जा Quality of Groundwater

भुगर्भजल साधारणपणे अनेक खनिजयुक्त असतात. हे पाणी कधी खारट आणि कधी गोड असते.

- तळे, डबके, विहिरी, बोरींगच्या विहीरीपासुन पाणी गोळा करा. कोणत्या विहीरीचे पाणी गोड तर कोणत्या विहिरीचे खारट असते. अशा पाण्याच्या चवीत फरक का असतो याचे वर्णन कराल का?

या फरकांचे कारणा भुगर्भजलांमध्ये मिळणारे खनिजे ही खनिजे जमीनीच्या तळाशी असणारे दगडाचे थर, जमीनीच्या थरांपासुन येतात. म्हणुनच पाण्याची चव, स्वभाव त्या पाण्यात मिसळणाऱ्या खनिज लवनांवर आधारीत असतात. आपल्या राज्यातील बऱ्याच ठिकाणाच्या पाण्यात मिठ, फ्लोराईड, क्लोराइड, लोह, नायट्रेट इ. खनिज लवने जास्त प्रमाणात असतात. असे पाणी पिल्यास हाडाचे, दांताचे रोग येतात. ते आपल्या आरोग्यास हानिकारक असतात. या परिस्थितीत शुध्द केलेले पाणीच प्यावे. (चित्र 3.5 पहा)

भरमसाठ वापरात येत असलेल्या किटकनाशके, खते योग्य ती सांडपाण्याची व्यवस्था नसल्यामुळे या कारणामुळे पाणी प्रदुषीत होते. आपल्या देशात ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. याचे निर्मुलन केले नाही तर अनेक विहिरीतील नदीतील पाणी पिण्यासच योग्य नसुन शेवटी आंघोळीस सुध्दा याचा उपयोग होता नाही.

SCERT TELANGANA



*चित्र 3.5 फ्लोराईड रोगग्रस्त असलेली व्यक्ती*

## भुगर्भजलांचा उपयोग Use of Groundwater

नदीतील पाण्यासारखेच भुगर्भजल सुध्दा सर्व लोकांची संपत्ती आहे. ही कोणा एकाची संपत्ती नव्हे. पण सध्या भुगर्भजलांना जमीनीवर हक्क असणारे काही जन याचा वापर करत आहेत.

भुगर्भजल असणाऱ्या भागांमध्ये जमीनीचा मालक जास्त पाणी वापरुन, इतरांना पाणी उरणार नाही असे करीत आहे. खोलवर असणाऱ्या बोरींगच्या विहिरी खोदुन पाण्याची पातळी घटत असुन जवळपासच्या विहिरी कोरड्या पडत आहेत. म्हणुनच भुगर्भजल सर्वांची संपत्ती आहे असे समजावे म्हणुनच सर्वजन याचा बचतीने वापर न केल्यास काहीजन बोरींग विहिरी खोदुन त्याचा मनाप्रमाणे पाणी वापरतात. त्यामुळे इतर जनांचे नुकसान होऊन समान भुगर्भजलांचा वापर होत नाही.

- जमीन नसणारे सुध्दा पाण्याचा समान असा वापर करण्याची योग्यता तुमच्या प्रांतात आहेत का विचार करा. त्यांची प्रणालिका तयार करुन तुमच्या वर्गात चर्चा करा ?

या पिढीस जुन्या पिढी पासुन पाण्याची पवित्र अशी संपत्ती म्हणुन मिळाली. आपणास मिळाल्याप्रमाणे आपल्या येणाऱ्या पिढीस या संपत्तीस द्यावे. पाण्याच्या बचतीने वापरण्याच्या पध्दतीस विकसीत करावे. नाहीतर भविष्यात येणाऱ्या पिढ्यांस पाण्यासाठी विनाशकारक युध्दांना तोंड द्यावे लागेल. त्यासाठी या पिढींसाठी आपणच कर्तव्य पार पाडावे.

### महत्वाचे शब्द:

1. पाणी जाण्यासारखे योग्य ते खडे
2. पाणी न जाण्यासारखे खडे
3. सहज झाडांची पसरणी
4. पाण्याचे स्तर
5. बृहत शिलायुग

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. चुकीच्या वाक्यांना दुरुस्ती करा.
   a. पाणी मैदानापासुन पठारमय प्रांतात वाहते.
   b. मैदानामध्ये जाड रेती, कंकाराचे थर असतात.
   c. भुगर्भजल कधीच कोरडे पडु शकत नाहीत
   d. महबुबनगर मध्ये विहिरी खोदणे सोपे आहे.

SCERT TELANGANA

2. चित्रात दाखवलेल्या विहिरी गोदावरीच्या मैदान प्रांतातील आहेत. पण चित्रातील काही चुका असल्यासारखे वाटत आहे. त्या चुका तुम्ही दुरुस्ती कराल का?




3. खालील चित्रात कोणत्या भागातील पाणी जास्त झिरपते? ($AS_1$)




4. पल्लेरला गावातील काही विहिरीचे मालक जास्त बलशाली मोटारीचा वापर करुन पाणी काढण्यास सुरुवात केली. यामुळे इतर विहिरी कोरड्या पडत आहेत. असे विहिरीच्या मालकांना लक्षात आले. या समस्येच्या सोडवणुकी बद्दल चर्चा करा?
5. भुगर्भजलांचा तुटवडा असणाऱ्या भागामध्ये बोरींग खोदण्यावर काही नियंत्रण आहे का? या बद्दल चर्चा करा?
6. पाण्याच्या पुर्नभरणा बद्दलच्या पध्दतीची चर्चा करा?
7. पाठातील 3.1 (अ) चित्र पाहुन तुमच्या भागाशी तुलना करा?
8. तुमच्या गावाचे चित्र/नकाशा काढुन ***जल संसाधने*** दाखवा.
9. पान क्र.30 वरील ***भुगर्भ जलाचा दर्जा*** हा परिच्छेद वाचुन विवेचन करा.

## प्रकल्प कार्य:

तळे किंवा पाणवठा या बाबतची माहिती गोळा करुन खालील तक्ता भरा.

| अ. क्र. | तळ्यांचे/पाणवठा चे नाव | क्षेत्रफळ - एकरात | | तळ्याचे इतर उपयोग | दुरुस्त न करण्याचे कारण | दुरुस्ती केले तर फायदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वीचे | आताचे | | | |
| | | | | | | |

पाठ 4

# महासागरे आणि मासेमारी

## भाग पहिला

सर्व ग्रहापैकी पृथ्वी एकच असा ग्रह आहे की, ज्यावर भरपुर जल संपदा आहे. पृथ्वी जलमय ग्रह आहे. पृथ्वीच्या वरच्या पृष्ठभागावर 71% पाणी महासागरात, सागरात भरुन आहे असा अंदाज लावण्यात आला आहे. महासागरांना किंवा सागरा बद्दल तुम्हाला काय माहित आहे. त्यांच्या विषयी तुमच्या मनात कोणती भावना आहे? महासागरा विषयी किंवा सागरा विषयी पहिलेले किंवा ऐकलेले घटक कोणकोणते? पृथ्वीवरील खाऱ्या पाण्याने व्यापुन असलेला प्रदेश म्हणजेच विशाल सागर असा सागराचा भाग म्हणजेच महासागर, महासागरे म्हणजे साधारणत: खंडामुळे विभाजित झालेले मोठे मोठे जलाशय आहेत.

- तुमच्या गावातील/शहरातील पाणी, गोडपाणी आहे की, खारे पाणी आहे? विविध प्रदेशात पाणी विविध प्रकारचे असते का?
- तुमच्या उपयोगी असणाऱ्या विविध जलाशयांची नांवे सांगा. लहान मोठ्या जलाशयांची वेगवेगळी नावे आहेत का?
- ग्लोब वर किंवा नकाशावर पाच सागरे, महासागरे त्यांची नावे ओळखा या भागांच्या प्रदेशास हाताने स्पर्श करा.

पाण्याच्या आत खोल काय असतात हे माहित करणे फार कुतुहल पुर्वक असते. पाण्याच्या तळाशी असणाऱ्याची आपण पाण्याच्या वरच्या पृष्ठभागाने माहिती घेऊ शकत नाही. नदी, नाले, सरोवरे यांच्या तळाचा भाग कसा असतो ते तु स्पर्श करुन पाहु शकतोस.

- पाण्याच्या पृष्ठभागात तुम्हाला काय दिसुन येते ते सांगा.चर्चा करा.
- जलभागा किती मीटर खोल असतात पाहिले आहेस का?




*चित्र 4.1 समुद्रतळाची उंच सखलता दाखविणारे चित्र*

### सागराचे खोल स्वरुप

महासागाराच्या तळाचा भाग जमीनीच्या वरच्या पृष्ठभागा प्रमाणेच असतो. पण सागराच्या तळाचा भाग सपाट नसतो. हा भाग डोंगरे मैदाने अनेक दऱ्या, पर्वते इत्यादि असतात.कांही महासागराच्या तळातील दऱ्या इतक्या असतात की, त्या हिमालय पर्वत ही बुडविला तर तो बजून जाईल.

महासागरात जास्त भागापासुन समुद्र सपाटी पासुन 3 ते 6 कि.मी. खोल असतात.

या सारख्या सागराच्या तळाच्या भागाच्या स्वरुपास दाखविणारे चित्र 4.1 पहा. आपल्या देशाच्या सभोवताली असणाऱ्या महासागराच्या आतील अंशास दाखविणारे चित्र 4.2 देखील पहा.



चित्र 4.2 भारतीय समुद्राची खोली दाखविणारे चित्र

या चित्रात भारताच्या भुभागास दाखविले आहे. बंगालचा उपसागर, अरबसागर, हिंद महासागर, यातील तळाशी असणारी जमीन, पर्वते, मैदाने, दऱ्या ओळखण्याचा प्रयत्न करा.

महासागरातील पाणी केव्हाही निश्चत स्वरुपात नसते. तर त्यात निरनिराळ्या हालचाली होत असतात.

- नदीच्या पाण्यातील निरनिराळ्या हालचालींना तुम्ही पाहिले आहात का? पाण्याच्या लाटा, प्रवाह, पुर येणे आणि पुर ओसरणे या विषयी तुम्ही बघीतलेच असाल? तुमच्या अनुभवाची वर्गात आपआपसात चर्चा करा?

**सागराचे चलन हे तिन प्रकारचे असतात. ते आपण पाहु या.**

**1) लाटा (Waves):** समुद्राच्या वरच्या पृष्ठभागाचे पाणी उसळणे खाली येणे यास लाटा म्हणतात. सागरावर वाहणाऱ्या वाऱ्यामुळे या लाटा उत्पन्न होतात. वारे किती जोरात वाहतील त्या वेगात लाटा उसळतात.

**2) प्रवाह (Currents):** सागराचे पाणी एका प्रदेशातुन दुसऱ्या प्रदेशापर्यंत प्रवाहीत होत असते. हे प्रवाह एका विशिष्ट दिशेतच निरंतर सागराच्या वरच्या पृष्ठभागावर प्रवाहीत होत असतांना यास समुद्रप्रवाह असे म्हणतात.

समुद्र प्रवाह दोन प्रकारचे असतात. उष्णप्रवाह आणि शितप्रवाह. उष्ण प्रवाह भुमध्य रेखाप्रांतापासुन धृवाकडे प्रवाहीत होतात. तर शित प्रवाह धृवापासुन भुमध्य रेखा प्रांताकडे प्रवाहीत होतात. समुद्रप्रवाह मुख्यता जागतीक वारे, समुद्रजलाची उष्णता लवणीयता यांच्या व्यत्यासामुळे निर्माण होतात.

**3) भरती - ओहोटी (Tides) :** सागरात दररोज लाटा उसळुन बाहेर येतात व परत आत जातात यास भरती ओहोटी म्हणतात. सागर तीर प्रदेशात सर्वत्र तासापर्यंत लहान लाटा उसळुन येतात तर काही तासापर्यत मोठ्या लाटां उसळुन येत असतात. हे लाटा या दररोज एकाच उंचीच्या नसतात. लहान लाटा आल्या तेव्हा सागराच्या तिराच्या थोड्या दुर पर्यंतच पाणी येते तर मोठ्या लाटा आल्या तेव्हा तिराच्या अधीक दुर पर्यंत पाणी जाते. भरती- ओहोटी मासे पकडण्यासाठी फार अनुकुल असते. काही प्रदेशात नद्यांनी वाहुन आणलेल्या चिखलास समुद्रात घेऊन जातात व रेतीस काठाबाहरे साचु देत नाहीत.

SCERT TELANGANA

## दुसरा भाग



### सागर तिरावरील मासे पकडणाऱ्यांची (कोळ्यांची) गावे

सागराचे पाणी हे खारट असते. या पाण्यात अनेक खनिज लवणे असतात. पाऊस पडण्यासाठी मुख्य कारक सागराचे आहेत. सागर मस्त्यसंपदा, समुद्रा संबंधीत इतर आहारपदार्थाचे आगार समुद्रलवणासाठी प्रमुख संपदा आहे. जागतीक व्यापार दळणवळणासाठी साधारण रहदारी समुद्रच आहेत. आंध्रप्रदेशातील समुद्र तिराच्या भागास भावनापाडु या गावास भेट देऊन अध्ययन करा.

- आंध्र प्रदेशाच्या नकाशातील तीर रेषेस बघा. या रेषेत येणाऱ्या जिल्ह्यांची नावे सांगा?
- भावनापाडु हे गाव कोणत्या जिल्ह्यात येते?
- भावनापाडु या गावाच्या नकाशास बघा व खालील अंशाची माहिती द्या.

i) नकाशात जलभाग दाखवा?

ii) गावात शेतीसाठी उपयोगी जमीन आहे का? इतर उद्योगासाठी जमीन आहे का? असे असेल तर त्या जमीनीचा कशासाठी उपयोग करतात?

### मासेमारी (Fishing)

सकाळी चार वाजता उठुन अप्पलकोंडा पत्नीने बनवुन दिलेले जेवन करुन पाच वाजता मासे पकडण्यासाठी समुद्राकडे गेला. समुद्राकाठावर त्याचे मित्र त्याची वाट बघत होते. हे सर्व गरीब लोक असल्याने त्यांच्या जवळ नाव, होड्या जाळ्या स्वता:ची नव्हत्या, तर ताताराव च्या यांत्रिक बोटीवर कामगार म्हणुन काम करीत हाते. ताताराव देखील यांच्या सोबत मासे पकडण्यास जात असे विस जण कोळ्यांचा समुह यांत्रिक होड्या घेऊन मासे पकडण्यास निघाला. एक दिवस अगोदरच या यांत्रिक नाविंना तयार करुन ठेवली होते.

चित्र 4.3 भावनापाडु गावाचे दृष्य



SCERT TELANGANA



**चित्र 4.4 गावाचे उंचावरुन घेतलेले चित्र**

नाव समुद्रात जाण्याआगोदर पाण्याची मोटार, दोरा, ओढुन सोडुन देणारे यंत्र यांचे सर्वांनी परिशिलन केले अधिक डिझल, आहार पदार्थाच्या पुड्या इतर सामुग्री ठेऊन घेऊन स्वत:च्या देवास नमस्कार करुन पुजा केली.

ताताराव ने या यांत्रिक होडीस नावेस ओरीसातील मार्कोंडा येथुन विकत घेतली होती. याची खरेदी सुमारे सहा लक्ष रुपये होती. स्वत:चा जमीन जुमला नसल्याने बॅकेकडुन कर्ज त्याला मिळाले नाही. दररोज मासे पकडण्यास जाण्यासाठी लागणाऱ्या कामगाराला मजुरी संध्दा दलाल पासुन उधार देखील आणावे लागतात. एकदा मासे पकडण्यासाठी जाण्यास डिझल, मजुरी इतर खर्च पाच हजार रुपये लागतात. दलालाने निश्चित केलेल्या दरानेच विकावे लागते. मासे पकडण्यासाठी समुद्रात 15-20 कि.मी. दुर पर्यंत जातात.

अप्पलकोंडाची पत्नी घरची कामे आटोपुन 9 वाजता मजुरी करीता मीठाच्या कारखाण्यास जाते. एकेकदा ती शेतीच्या कामाकरीता देखील जाते. या लोकांना शेत जमीन किंवा मिठाचे वाफे नसल्याने यांचे कुंटुंब उदरनिर्वाहा करीता मजुरी वरच आधारीत असते. मिठाच्या खाडीत काम करीत असतांना देखील धनम्माचे लक्ष सर्व नवऱ्याच्या फोनची वाट पाहत असते. मासे पकडण्यासाठी गेलेला पती सुरक्षीत परत यावा, त्याला भरपुर मासे मिळावे मनात विचार करत वाट बघत असते. भरपुर मासे जाळ्यात फसल्यातर त्यांना यांचा अधिक प्रमाणात वाटा मिळत असतो. व चांगल्या प्रकारे आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह चालु शकतो.

मासे पकडणारे लोक साधारणता: दुपारी एक वाजता जातात व रात्री आठ वाजता घरी परत येतात. एकेकदा रात्रीच्या वेळी खुप उशीर देखील होऊ शकतो. पण त्या दिवशी पारा नावाच्या मासे भरपुर प्रमाणात सापडल्यामुळे सर्वजन तीन वाजता समुद्र किनाऱ्यावर परत आले.

SCERT TELANGANA







***चित्र 4.5 मासे पकडण्यासाठी तयार असलेली होडी, चित्र 4.6 बोटीचे इंजन, इंधन डबे, देवीचा फोटा***

होड्यातुन मासे जमीनीवर पसरवुन त्यांची प्रतवारी करतात त्या मासे शितपेटीमध्ये बदं करुन त्या पेट्या कलकत्यास, बेंगलुरु, चेन्नई, हैद्राबाद ला रवाना करण्यात येतात. मासे पकडणाऱ्या पेक्षा चौपट अधीक फायदा दलालाला होत असतो. चित्र 4.9 पोटय्या अड्यशाचे निरीक्षण करा. (स्थानिक दलाल)

- मस्त्यकारां ऐवजी दलांलाना जास्त फायदा होतो याचे कारण काय?
- दलाल लोकांच्या ठिकाणावर थर्माकोलचे पेट्या दिसत आहे ते कशा साठी आहेत हे तुम्ही सांगु शकता का? व त्यांचा उपयोग ते कशा साठी करतात?

आता आपण मोठ्या मासे व्यवसाया विषयी चर्चा करु या. गावात लहान प्रमाणात देखील मासे व्यापार चालतात. स्थानिक रित्या लाकडापासुन तयार केलेल्या कराटेप्पा होड्या मधुन पाच कि.मी. पर्यंत समुद्रात जाऊन लोक माशा पकडुन आणतात.

कोळ्यांच्या बायकां मासे विकायला बाजारात जातात. गावा जवळच्या नौपडा, टेक्कली, पुंडी, पलासा या शहरातील बाजारात हे मासे विकतात. या विक्रेता असे म्हणतात. लाकडाच्या होड्या पेक्षा यांत्रिक होड्याने मासे पकडण्यास जाणे फार प्रमाददायक आहे. या यांत्रिक होड्यांनी समुद्रात फार दुर वर जावे लागते. अपघात संभाविल्यास तेथुन पोहत परत येणे फार कठिण असते. या शिवाय अशा प्रकारच्या होड्यात प्रथम चिकित्सा पेटी नसणे, जाकेट नसणे, मोठी दुखदायक गोष्ट आहे. मासे पकडणे ही जोखीम आणि साहक्सयुक्त अशी वृत्ती आहे.







***चित्र 4.7होडीतील मासे विकण्यासाठी घेऊन जात असतांनाचे चित्र***

***चित्र 4.8 मासे विकण्याचे ठिकाण व व्यापारी***

SCERT TELANGANA



*चित्र 4.9 दलालाचे ठिकाण, तराजु यंत्र, शितपेठ्या*



*चित्र 4.10 दलाला कडुन शहरात विक्रीकरीता जात असलेले वाहणे*

## जाळे (Nets)

अप्पलकोंडा घरी पोहचला दुपारचे जेवण करुन जाळे घेऊन वादळ गस्त भागामध्ये गेला. जाळे दुरुस्ती करु लागला. भावनपाडु गावात दररोजची ही दिनचर्या सुती धागा, पसरट काठी, या उपकरणासहीत टुल किट जाळ्यांच्या दुरुस्ती करीता प्रत्येक कोळ्या जवळ असते. वलयानुसार अनेक थरानुसार डोळ्यानुसार जाळे अनेक प्रकारचे असतात. आजकाल नविन प्रकारच्या रिंग जाळ्यांच्या अधिक प्रमाणात मासोळ्या पकडण्यासाठी उपयोगी होत आहेत.

त्यामुळे गावातील लोकांचे स्थलांतरण कमी झाले आहे. पुर्वी कॉटन धाग्यापासुन बनविलेल्या जाळे असायचे. सध्या यांच्या ऐवजी प्लॅस्टीक, नायलॉन, इतर सिंथेटिक धाग्यापासुन तयार केलेल्या जाळ्यांच्या उपयोग करण्यात येत आहे. एक जाळे चार, पाच वर्ष टिकुन राहते. जाळ्यांच्या रिंगानुसार वजन करुन विकत घेतात. जाळे 250-300 रुपयांस विकत मिळतात. रिंग असलेल्या



**चित्र 4.11 किरकोळ मासे विक्री करणाऱ्या महिला मासे मिळण्याची वाट पाहत असतांनाचे चित्र**

CERT TELANGANA




*चित्र 4.12 (A) जाळे दुरुस्ती (B) जाळे विणने (C) विणकामाचे साधने*
*(D)तरंगणारे तुकडे, (E) तरंगणारे प्लास्टीकचे तुकडे*

जाळ्यांचे वजन 500 किलो असते. या गावातील मासे पकडणारे ओरीसातील बरहमपुर या गावातुन जाळे विकत आणतात.

## शेती-पशुपालन (Agriculture and Animal Husbandry)

भावनपाडु या गावात मासे पकडणे या उद्योगाशिवाय शेती करुन पिके पिकविणे, पशुपालन, पक्षीपालन या सारखे उद्योगधंदे देखील करीत असतात.

या गावातील जमीन मुख्यत: चिकणमाती (रेती मिश्रीत सुपीक जमीन) आहे. साळीचे प्रमुख पिक आहे. काही एकर जमीनी करीताच पाणी पुरवठ्याची सोय आहे. वंशधारा या नदीच्या कालव्याव्या शेवटच्या भागात हे गाव आहे. या गावाच्या जवळ मर्रीपाडु गावात पाणी पुरवठ्याची सोय आहे. या गावात पाणी पुरवठा झाल्यानंतरच भावनपाडु या गावास पाणी पुरवठा होतो.म्हणुन गावातील शेतीचा जास्त प्रमाणातील भाग पावसावर आधारीत आहे.

या गावात जमीनदार नाहीत. गावातील सर्व शेतकरी लहान प्रमाणातीलच शेतकरी आहेत. काही लोक गाई, म्हशी पाळतात. या गावात पोलेट्रीफार्म (कुकटपालन) जास्त प्रमाणात आहेत. लोकांचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे होतो. शेतकऱ्यांने पिकविलेले पिक पुरत नसल्याने लोक दारिद्र रेषेखालील रॉशन कार्डवर स्वस्त धान्य दरात मिळणाऱ्या रॉशन दुकानातुन तांदुळ विकत घेतात.

## खारे पाणी आणि पिण्याचे शुध्द पाणी

गावात खाऱ्यापाण्याची समस्या (मीठ) आहे. समुद्राकाठावर आठ ते दहा पावले खोल खोदल्यास पिण्याचे गोडपाणी वर येते. उन्हाळ्यात विहिरी खुप खोल जातात. या विहिरी परत पाण्याने भरुन येण्यास खुप वेळ लागतो. एक तास दोन तास वाट पाहत राहिल्यस कोठे एक मडके पाणी भरुन मिळते पिण्यासाठी बायकां रोज 2 कि.मी. दुर पर्यंत पायी चलत पाणी आणतात.

SCERT TELANGANA

चित्र 4.13





चित्र 4.13

**चित्र 4.13, 4.14 मिठागारामध्ये काम करणाऱ्या महिला याला अड्डगेथा असे म्हणतात**



**चित्र 4.15 दुरवरुन पिण्याचे पाणी आणत असलेली वृध्द महिला**

शासनाने या गावासाठी एक पाणी पुरवठा योजना मंजुर केली आहे. जवळच्या सुर्यमणीपुरम या गावातुन पाईपाव्दारे पाणी आणल्या जाते.

या योजना काही काळापर्यंत टिकली मुख्य पाण्याची टाकीची अस्वच्छता सतत मोटार खराब होणे, दुरुस्ती करणे या अडचणी येऊ लागल्या. काही काळ युवक संघानी या योजनेस सहकार दिला पण आता ती योजना बंद झाली आहे.

## सामाजिक जिवन (Social Life)

भावनपाडु गावातील लोकांपैकी जास्त प्रमाणातील लोक गंगेची, गौरीची, शंकराची पुजा करतात. आपल्या नांवाची जाळ्यांची पुजा करतात. यांचा प्रमुख सन गौरी पौर्णिमा (कार्तिक पौर्णिमा ) हे लोक गावाची साधारण निधी पासुन या सणासाठी खर्च करतात. बाजुच्या चित्र 4.16 बघा. अप्पलकोंडा प्रमाणेच



**चित्र 4.16 शरीरावर गोंदन का करुन घेतात? अप्पलकोंडाच्या हातावरील हे गोंदन का दर्शविते?**

गावातील अनेक लोक गोंदावुन घेतात. या गावात एक आहे यावर नाटीका, बुर्रकथा, हरीकथा, रेकॉर्ड डान्स सारखे कार्यक्रम प्रदर्शित होत असतात. या कार्यक्रमाचे आयोजन जातीचा प्रमुख व्यक्ती त्यास पिल्लास म्हणतात. हा करतो. लोकांच्या आचार, व्यवहारांचा निर्णय हे पिल्लासच करतात. आणि त्यांचे पालन करायला लावतात. चुकल्यास दंड भरावा लागतो.निधीत गोळा करतात.

SCERT TELANGANA

**महत्वाचे शब्दः**

1. उपकरणांची पेटी    2. जाळे    3. दंत कथा    4. यांत्रिक होडी

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. भावनपाडु हे गाव तुमच्या गावाप्रमाणेच, शहराप्रमाणे, गावाप्रमाणे दिसते का? तुम्ही विचार करुन त्यातील समानता, फरक, तुलना करुन खालील दिलेल्या अंशानुसार लिहा?
   a. जिवनाधाराचे मुळ    b. उद्योगधंद्याचे प्रकार
   c. जलाशय    d. शेतीचे प्रकार
2. समुद्राचे चलन किती प्रकाराचे आहे? त्यातील कोणते चलन मासेमारीसाठी योग्य होय?
3. यांत्रिक होडीवर किंवा लाकडाच्या होडीवर मासे पकडण्यास जाणे यात काय फरक आहे ते सांगा?
4. यांत्रिक होडीस मासे पकडण्यासाठी जाण्यास कशाप्रकारे तयार करतात ते सांगा?
5. कोळ्यांच्या टुल किट मध्ये काय काय असते?
6. जमीनीचा वरचा पृष्ठभाग, समुद्र तळाचा भाग या मधील समानता सांगा?
7. तुमचे गाव शहराच;यघा जवळपास असणाऱ्या जलाशयांची माहिती गोळा करा. त्यांच्या पासुन होणाऱ्या लाभाविषयी खालील तक्ता भरा.

| अ.क्र. | जलाशयाचे नाव | उपयोग | हद्द |
|---|---|---|---|
| | | | |

8. मस्त्यकारांच्या जिवनाविधाना विषयक चित्रे गोळा करुन एक अल्बम तयार करा?
9. कोळी लोक पैशासाठी मध्यवर्ती (दलाल) लोकावर आधारीत राहु नये यासाठी तुम्ही कोणता उपाय सुचवाल?
10. गेल्या चार पाठात पाण्यासंबंधीत विविध अंश तुम्ही शिकले. जमीनीवरील पाण्याच्या उपलब्धते विषयी माहिती देण्यात आली. काळजीपुर्वक बघुन आपल्या जिवनात जमीनीवर पाण्याच्या उपलब्धते विषयी चर्चा करा?

**शुध्द जल विभागणी**




**पृथ्वीवरील पाण्याचे प्रमाण**




**भुपृष्ठावरील ताजे पाणी**




11. मासेमारी करणाऱ्यांचे जिवन समुद्रांशी बांधील आहे. या वाक्याचे समर्थन कसे कराल.?
12. पान क्र. 35 वरील ***सागर तिरावरील मस्त्यकारांची गावे*** हा परिच्छेद वाचुन विवेचन करा?

SCERT TELANGANA

पाठ 5

# युरोप

औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम युरोपमध्ये झाली. कारखान्याच्या साहाय्याने आपले उत्पन्न वाढवुन जगातील अनेक देशावर आपले वर्चस्व दाखविण्यात पश्चिम युरोपीय देश यशस्वी ठरले. युरोपातील लोकांनी पर्यावरण व भौगोलीक वस्तुचा कसा उपयोग केला याबद्दल या पाठातुन माहिती मिळवु या.

## युरोपचा शोध (Location of Europe)

युरोपचा शोध घेण्याकरीता भारतापासुन युरोप पर्यंतचे अंतर माहिती करण्याकरीता ग्लोब आणि ॲटलसची आवश्यकता आहे. चित्र - 1 पहा. युरोपला काळ्या रंगात दाखवण्यात आले आहे. खंडाच्या सरहद्दीत ओळखा. युरोपच्या उत्तरेस समुद्र आहे. चित्रात ते दाखवा हा समुद्र वर्षभर बर्फमय असतो.

- युरोप खंडाच्या पश्चिमेस असणाऱ्या समुद्राचे नांव काय आहे?

हा समुद्र युरोपला उत्तर अमेरीका खंडा पासुन वेगळा करतो. 500 वर्षाच्या पुर्वी युरोप ते उत्तर अमेरीकातील समुद्र मार्गाचा शोध लागला. लाखो लोक युरोपातुन अमेरीकेत जाऊन स्थिर झाले.

- युरोपच्या दक्षिणेस असणाऱ्या समुद्राचे स्थान नकाशात दाखवा

या समुद्रास उत्तरेतील युरोपला दक्षिणेतील आफ्रिकेपासुन विभाजीत करतो. या समुद्रास मध्यधरा समुद्र असे म्हणतात. तुम्हाला माहित आहे का? याला या नावानी का संबोधीत करतात? हा जगाचा मध्यभागी असल्या कारणास्तव हे नाव आले. प्राचिन काळी युरोपीयांनानी अमेरीका, आस्ट्रेलीया खंडा विषयी माहिती नव्हती. केवळ पश्चिम आशिया आफ्रिका उत्तर प्रांताविषयीच त्यांना माहिती होती. या प्रांताभोवती मध्यधारा समुद्र व्यापलेला आहे. त्या कारणास्तव युरोपीयांनाना जागाच्या मध्यभागी समुद्र आहे अशी समज झाली. आता सुध्दा तेच नाव चालत आहे.

- युरोपच्या पुर्वेस असणाऱ्या पर्वतांची नावे सांगा?




***नकाशा - 1 युरोपचे स्थान***

SCERT TELANGANA

हे जास्त उंचीचे पर्वत नव्हते हे युरोपच्या पुर्वेस सरहद्दीत आहेत. या पर्वताच्या पुर्वेस आशिया व पश्चिमेस युरोप आहे. खरे तर आशिया व युरोप मिळते जुळतेच आहेत. म्हणुनच या प्रांतात युरेशिया म्हणतात.

- आता तुम्हास युरोपच्या शोधाबद्दल चांगलेच माहित झाले आहे.
- युरोपात असणाऱ्या देशाचे नाव नकाशा - 2 पाहुन लिहा.तुम्ही कधी अशा देशांची नांवे ऐकलीत का?
- नकाशा - 3 ही तुमच्या उपयोगा करीता देण्यात आली आहे. त्यातील युरोप देश ओळखा व त्यात वेगवेगळे रंग भरा व दोन शेजारी देशांना एकच रंग भरु नये.

## पर्वते, मैदाने आणि नद्या

आपण आता नकाशा - 4 व्दारे युरोपातील पर्वते, मैदाने व नद्या या विषयी माहिती घेऊ या युरोपातील बर्फाचे पर्वत जास्त आहे. चित्र पहा त्यात आल्पस व पैरीनीस पर्वतांचे निरिक्षण करा. आल्पस पर्वतश्रेणी फारच महत्वाच्या आहेत. त्या वर्षभर बर्फाच्या रुपात राहतात.

- अनेक देशाच्या आल्पस पर्वत रांगा चित्र 2,4 मध्ये दाखवुन विविध देशांची सरहद्द दाखवा.
- आल्पस पर्वतातुन प्रारंभ होण्याऱ्या दोन नद्याची नावे लिहा?
- पैरनिस पर्वतास जोडुन असणाऱ्या सरहद्द देशांची नांवे लिहा?
- युरोपाच्या पुर्वेस असणाऱ्या सरहद्देस असणाऱ्या पर्वतांच्या रांगा कोणकोणत्या आहेत?
- युरोपातील इतर पर्वतरांगाचे यादी बनवा?



*चित्र 5.1 पश्चिम युरापातील हंगरी देश डॉन्युब नदीस लागुन बुडा पेस्ट नगर*

दक्षिण युरोप खंडाच्या सरहद्देस कॉस्पीयन समुद्र व काळा समुद्राच्या मध्ये कॉकसस पर्वत आहेत ते सुध्दा खुप उंच वर्षभर बर्फाळ असतात. युरोप व आशिया खंडात बराच फरक दिसुन येतो.

आशियात अनेत पठारे आपणास दिसतात. पण युरोप मध्ये तशी नाही. पण जर्मनी, फ्रांन्स, स्पेन मध्ये कांही लहान पठारे आहेत. युरोपात भव्य विशाल मैदाने आहेत. युरोप हे एक भव्य मैदान आहे जे पुर्वे रशिया, उक्रेयान, पोलांड, बैलोरशिया देशापर्यंत विस्तारीत आहेत. पुर्वेस या सुपीक भागात जास्त बर्फाची साठवण राहत आसल्यामुळे हिवाळ्यात अति थंडवारे येतात. उन्हळ्यात बर्फ वितळुन त्याचे पाणी नदीच्या रुपात वाहत असते. ह्या नद्या मिळुन मोठ्या नद्यांचा निर्माण होतो. ह्याच मैदानातुन नैपार आणि वोल्गा (युरोपमधील सर्वात लांब नदी) या नद्यांचा उगम होतो.

युरोपातील नद्यांचा वापर केवळ शेती पाणी पुरवठा एवढाच नाही तर ते जलमार्ग अनुकुल आहे. नाव, जहाज, इत्यादी व्दारे वस्तु व मनुष्यांना एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जाता येते. या नद्यांचा संबंध इतर अनेक देशांशी जोडला जातो. अंतरराष्ट्रीय व्यापारास उपयोगी पडतात. संदर्भात रैन ही एक

SCERT TELANGANA

**नकाशा -2 युरोपचा राजकीय नकाशा**



नकाशा - 3
युरोपचा नकाशा




SCERT TELANGANA




नकाशा - 4 युरोपचा भौगोलिक नकाशा

SCERT TELANGANA

अत्यंत मुख्य नदी आहे. कारण ही अनेक देशातुन वाहते आणि उत्तर समुद्रामध्ये मिळते. या नद्यांच्या भोवती कित्येक कारखाने, खनिज संपदा व शहरे आहेत. रैन नदीतुन अनेक शहरांशी व्यापार जोडला जातो. तसेच ओल्गा नदी कॉस्पीयन समुद्रास मिळते. हिचे रुप भव्य आहे त्या मुळे जलमार्ग करणे कठिण आहे. त्या मुळेच ओल्गा नदी व्दारे जलमार्गाने व्यापार केल्या जात नाही.

- नकाशा - 2,4 पहा खालील प्रश्नांचे उत्तरे लिहा.
- रैन नदी कोणकोणत्या देशातुन वाहते? 1....... 2........ 3........ 4........ 5........
- डॉन्युब नदी कोणकोणत्या देशातुन वाहते? 1....... 2........ 3........ 4........ 5........
- हंगेरी मैदान प्रातांच्या सरहद्देस असणाऱ्या दोन पर्वत श्रेणीचे नांवे लिहा? 1......... ................2...........
- काळ्या समुद्राभोवती कोणकोणते देश आहेत? 1....... 2........ 3........ 4........ 5........

- खालील नद्या कोणत्या समुद्रात किंवा महासमुद्रात मिळतात ते सांगा?

| **नद्या** | **समुद्र/महासागर** |
|---|---|
| 1. सेन | |
| 2. रैन | |
| 3. ओढर | |
| 4. पो | |
| 5. डॅन्युब | |
| 6. विस्टुला | |
| 7. ओल्गा | |
| 8. नायपर | |
| 9. डॉन | |
| 10. विना | |

## व्दिप, व्दिपकल्प, उपसागर, आखात

युरोपच्या नकाशात पाहता सर्वभाग एकसारखा दिसतो. जास्त भाग समुद्राचा बॉल्टीक समुद्रात मिसळतो. भुभाग इटली समुद्राभोवती विस्तारीत आहे.

इटलीस तिन्ही बाजुने समुद्र घेरलेला आहे. 3 ऱ्या भागात जमीन आहे. चौथा भाग भरपुर पाण्यात आहे. म्हणजे 3 बाजुने पाणी आणि एका बाजुस जमीन असल्यास त्यास व्दिपकल्प म्हणतात. नार्वे, स्विडन पण त्यातीलच एक भाग होय. चित्रातात पहा या व्दिकल्पांना स्कॉडीनेविया व्दिपकल्प म्हणतात.




**चित्र 5.2 व्दिपकल्प, समुद्र**

- या दोन्हीतुन कोणते व्दिपकल्प आहे? ग्रीस/फ्रांन्स?
- स्पेन, पोर्तुगल पण व्दिपकल्प आहेत का?
- स्कॉडीनेवीया व्दिपकल्पात असणाऱ्या पर्वत श्रेणी/रांगा बदल माहिती लिहा?

युरोप खंडात काही देश तीन भाग पाण्याने नसुन पुर्ण चारभाग पाणी आहे. त्यातुन एक देश म्हणजे ब्रिटेन एक होय.

SCERT TELANGANA

- युरोपात असणारे आणखी काही व्दिप देशांची ओळख करा, माहिती द्या.

प्राचिन काळापासुन समुद्र, महासागर, व्दिपकल्प हे मानवाच्या जिवनपध्दतीवर खुप प्रभाव टाकत आहेत. मध्य व दक्षिण युरोप मध्ये जास्त पर्वतांचा भाग असल्यामुळे प्रवास करणे कठिण व खर्चाचे आहे त्या करीता युरोपवासी जलमार्गाचा प्रवास करीत असत. हा स्वस्त व सोपा प्रवास आहे.

समुद्रातील पाण्याचा खोलपणा पाण्याच्या खाड्या जलमार्गास उपयोगी पडतात. पाण्याच्या खाड्याचे मुखव्दार पसरट असते. व बंगालच्या समुद्रासारखे रुंद असते.गल्फ मुख्यव्दार पसरट असते. बाल्टीक समुद्र चित्रात बघीतला तर असता तो एक मोठा गल्फ भागा सारखा ओळखल्या जातो.

पाण्याच्या खाड्या तुफान व जलमार्गात येणाऱ्या इतर समस्या पासुन संरक्षण करतात. वस्तुंना चढवणे व जहाज थांबवणे या करीता उपयोगी पडतात. बंदर निर्माण करीता खोल असणारा अंतभुभाग जहाजास लागत नाही.

- नकाशा - 4 चे निरिक्षण करा व बाल्टीक समुद्राच्या तिन्ही बाजुस असणाऱ्या देशांची नावे सांगा?

## शितोष्ण स्थिती (Climate)

युरोप देशाचे तापमान उष्णता आपल्या देशापेक्षा थंड असते. हिवाळ्यात पुष्कळ भागात बर्फ पडत असतो. तिथे उन्हाळ्यात आपल्या देशात जेवढी उष्णता असते तेवढी ही राहत नाही.

- युरोपाचे वातावरण भारतापेक्षा वेगळे असते असे तुम्हास का वाटते? यावर वर्गात चर्चा करा?

## भुमध्यरेषापासुन अंतर (Distance from the Equator)

भुमध्य रेषेजवळील भाग वर्षभर गरम असते. भुमध्य रेषापासुन आपण उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे गेल्यास तेथे थंड थंड होत जाते. खरे ध्रुवांच्या जवळ वर्षभर बर्फ पडत असतो.

- उत्तर युरोप भुमध्य रेषा पासुन किती दुर आहे ते पृथ्वीचा नकाशा पाहुन माहित करा?
- उत्तर युरोप भारत देशापेक्षा पुष्कळ दुर आहे का?
- ह्या दोन देशांपैकी कोणते देश उष्ण आहे? नार्वे का इटली का?

## अटलॉटीक महासमुद्र The Atlantic Ocean

भुमध्य रेषेपासुन दुर प्रांतात उष्णतेवर कांही कारणास्तव प्रभाव पडतो. अटलॉटीक महासमुद्र याचा वारे व उष्णता यावर जास्त प्रभाव पडलेला दिसतो. आतील भागापेक्षा आटलॅटीक महासमुद्र तिरावरील भागात जास्त प्रभाव पडतो.

- अटलॉटीक महासमुद्रा भोवतील प्रातांची ओळख करा? माहिती द्या ते पुर्व का पश्चिम भागात मोडतात ते सांगा?

हिवाळ्यात पश्चिम युरोप पुर्ण थंड व पुर्व युरोप अतिथंड असतो. त्या करीता पोलंड व रशियात जास्त थंडी असते. फ्रान्स व ग्रेट ब्रिटन मध्ये हवामान उष्णता साधारण असते. रशियात हिवाळ्यात खुप थंडी असते. समुद्रातील पाणी बर्फ बनते. अशी परिस्थिती पश्चिम युरोपात समुद्राच्या किनाऱ्यावर असणाऱ्या भागात होत नाही.



SCERT TELANGANA

- स्पेन किंवा स्लोवेकियात कशा प्रकारची उष्णता आहे? चित्र पाहुन ओळखा

पश्चिम युरोप आटलॉटीक समुद्राच्या जवळ असल्यामुळे तेथील परिस्थितीचा तुम्ही अंदाज लाऊ शकता हे महासमुद्र युरोपाच्या उष्णतेवर कसा प्रभाव पाडतो तो पाहु या.

## पश्चिमेकडील वारे (Westerlies)

वर्षभर अटलांटीक महासमुद्राकडुन वारे युरोप कडे येत असतात. पश्चिमेकडुन येणाऱ्या या वाऱ्यांना पश्चिमीवारे म्हणतात. ( हे वारे नैऋत्य दिशेकडुन इशान्ये कडे वाहतात) हे भुमीवरील उष्णतेपेक्षा जास्त उष्ण असतात. अशा प्रकारचे वारे वर्षभर येतात व युरोपच्या उष्णतेवर प्रभाव पाडतात.

- पश्चिमकडील वारे युरोपवर कसा प्रभाव पाडतात कल्पने आधारे सांगा?

## उष्णसमुद्र प्रवाह (Warm Ocean Currents)

समुद्राचे पाणी एका ठिकाणी स्थिर राहत नाही. खंडाभोवती परिस्थितीनुसार ते एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी वाहतात. यालाच समुद्र प्रवाह असे म्हणतात. ते हजारों किलोमीटर नदी प्रमाणे वाहतात.

अशा प्रकारचे समुद्रप्रवाह आटलांटीक महासमुद्रात पाहण्यास मिळतात. भुमध्य रेषे वर असलेल्या उष्णतेमुळे वर्षभर असा प्रवाह पहावयास मिळतो. त्या करीता यास उष्ण वारे असे म्हणतात. हे वारे पश्चिमेकडुन उत्तर अमेरीकेकडे वाहतात. अमेरीकाच्या इशान्य किनारपट्टी भागावर याचा प्रभाव पडतो. त्यानंतर युरोपकडे येतात. हे प्रवाह युरोपच्या पश्चिम किनारपट्टींना मिळतात. या प्रवाहांना अमेरीकेत गल्फ स्ट्रिम (समुद्रातील पाण्याचा प्रवाह जेंव्हा जलद असतो त्यास स्ट्रीम म्हणतात) व युरोपात उत्तर अटलांटीक ड्रिफ्ट असे म्हणतात. (समुद्रातील पाण्याचा प्रवाह जेंव्हा मंद असतो त्यास ड्रीफ्ट (Drift) म्हणतात)

या गल्फ उष्णवाऱ्यामुळे उत्तर अमेरीकेत पुर्व किनार पट्टी व युरोप मध्ये पश्चिम भाग पाण्याने बर्फ होत नाही. त्या मुळे जहाजे हिवाळ्यात पण सुरक्षीत चालतात.




*नकाशा - 5 पश्चिमी मौसमी वारे*




*नकाशा - 6 गल्फ स्ट्रिम*

- उष्णवारे युरोपच्या पुर्वेकडील भागावरील उष्णतेवर का जास्त प्रभाव टाकु शकत नाहीत असे तुम्हास का वाटते?

रिकाम्या जागा भरा:

- भुमध्य रेषा जवळ असणारे पाणी ....असते (गरम/थंड/ अतिथंड)
- भुमध्य रेषा जवळ असणारे उष्णवारे ..... अमेरीकाच्या किनारपट्टी भागास पोहचतात. (पुर्व/पश्चिम/उत्तर)
- उष्णवारे....... पासुन प्रांरभ होतात.( अटलांटीक महासमुद्र/ मध्यधारा समुद्र/ काळा समुद्र)
- युरोप किनारपट्टी भागास...... वारे मिळतात. ( थंड/उष्ण/अतिथंड)
- पश्चिमीवारे अटलांटीक समुद्रापासुन युरोपकडे .... येतात.( हिवाळ्यात/ उन्हाळ्यात/वर्षभर)
- हे वारे..... ( सुखेवारे/ कोरडेवारे/ ओलसर थंड वारे)

## पश्चिम युरोप- वर्षभर पाऊस (Western Europe: Showers all Year Round)

उत्तर युरोप व पश्चिम युरोपच्या भागात पश्चिमी वारे ढग निर्माण करतात. व पुढे ते पाऊस पडण्यास कारण ठरतात. या दोन्ही भागात वर्षभर पाऊस पडतो. पण आपल्या देशात पाऊस काही महिण्या पुरताच मर्यादीत असतो. युरोपात आकाश ढगाळ असते असे आपल्या देशात नाही पावसाची वाट पाहावी लागते. पश्चिम युरोप हा सुर्यकिरणाची वाट पाहत असतो.

- भारताच्या उष्णता व युरोपच्या उष्णतापमानात काय फरक आहे असे तुम्हास वाटते?

पश्चिम युरोप देश उष्णतावारणाचा भरपुर फायदा घेत आहेत. मासे पाळणे त्यांचा आहार प्राप्ती करीता योग्य वातावरणा ब्रिटनच्या जवळ उत्तर समुद्रात मासोळी उत्पत्ती मत्स्योत्पान विकसित होत आहे. त्या भागास डॉगर बॅक म्हणतात. युरोप देशवासींयाचा मासे मुख्य आहार होय. मासेमारी हा युरोपमधील महत्वाचा व्यापार आहे.

- डॉगर बॅक व्दारे किती देशांना फायदा होत आहे?

## दक्षिण युरोपात मध्यधरा उष्णस्थिती

दक्षिण युरोप देशाची आपण माहिती पाहिलीत असता तिथे दक्षिणात मध्यधारा समुद्र आहे असे माहित होते. त्या करीता त्यांना मध्यधरा देश म्हणुन ओळखतात. तिथे प्रत्येक अशी उष्णता वातावरण असल्यामुळे त्यांना मध्यधरा उष्णस्थिती म्हणुन ओळखतात.

- नकाशा 2 पाहुन चार मध्यधारा देशांची नांवे लिहा.

मध्यधरा देश हे युरोपचे दक्षिण देश होय. येथे हिवाळा हा फारसा थंड नसतो आणि उन्हाळा उष्ण असतो. येथे वर्षभर पश्चिम युरोपात पाऊस पडत नाही हिवाळ्याच्या महिण्यात वारे वाहतात. याचा अर्थ असा की केवळ हिवाळ्यातच येथे पाऊस पडतो. यामुळे हिवाळ्यातील पाऊस आणि उन्हाळ्यातील कोरडे वातावरणामुळेच या भागातला भुमध्य वातावरण असे म्हणतात.

इतर प्रांतांशी सुध्दा मध्यधारा चा संबंध असतो. या समाशितोष्ण वातावरणाचा फायदा फळे झाडे वगैरे पाळण्याकरीता होतो. अनेक प्रकारचे द्राक्ष, संतरे, ऑलीव फीग फळ वगैरे येथे मिळतात.

SCERT TELANGANA

- मध्यधारा व तेलंगानातील उष्णस्थिती यांची खालील पैकी तुलना होते.
  ऋतु
  पाऊस
- तुमच्या राज्यात जास्त पाऊस केव्हा पडतो? (हिवाळ्यात, पावसाळ्यात)
- तुमच्या प्रांतात हिवाळ्यात जर एकदम थेंब थेंब पाऊस पडला तर त्याला तुम्ही काय म्हणता?
- मासेमारीसाठी मुख्य उपयोगी पडणारा प्रांत /भाग कोणता.........?
- फळांची झाडे लावणे... मध्ये महत्वाचे आहे.

**चार ऋतु (Four Seasons )**

आपल्या देशात आपण हिवाळा, उन्हाळा, पावसाळा हे तीन ऋतु पाहतो. फ्रांन्स सहीत युरोप खंडातील सर्व देशात चार ऋतु आहेत ते हिवाळा, वसंतऋतु, उन्हाळा, शरदऋतु असे चार ऋतु काळानुसार त्या त्या प्रदेशांची दृष्ये बदलत असतात. तसेच पिंकातही बदल होतो. दिलेल्या चित्राव्दारे काळानुसार अनुकुल बदल झालेल्या प्रदेशांना आपण पाहु शकतो.

**हिवाळा (Winter):** नोव्हेंबर महिना येताच थरथरविण्याऱ्या थंडीची सुरुवात होते. डिसेंबर महिण्यात थंडीची वाढ होते. पर्वतावर जास्त प्रमाणात बर्फ पडतो तर मैदानात कमी प्रमाणात बर्फ पडतो. सुर्य फार उशीरा उगवतो. सुमारे 9 किंवा 10 वाजता उगवतो. व दुपारी चार वाजता मावळतो. ढगाळ आकाशाच्या प्रभावाने अंधार पडतो. पसरट पानांची झाडे पांनाना गाळुन टाकतात व पाने नसणाऱ्या झाडामध्ये बदलतात.

**वसंतऋतु (Spring):** मार्च महिना सुरु झाला की, निसर्गाचे दृष्य बदलुन जाते दिवस मोठा रात्र लहान असते. बर्फ वितळायला लागतो. झाडांना नवी पालवी फुटायला लागते. हिरव्या गार पानांनी मनमोहक फुलांनी निसर्गभरुन जातो. ओल्या जागेत गवत वाढायला लागते. वसंत ऋतुत जमीनी नांगरायला सुरुवात करतात. बी पेरण्यास सुरुवात करतात. गहु, रे, बार्ली मक्का बिटरुट ओट्स इत्यादी प्रमुख पिके आहेत.

- वरील पिका पैकी आपल्या देशात कोणकोणती पिके पिकवितात?

**उन्हाळा (Summer):** जुन ते ऑगस्ट पर्यंत उन्हाळा असतो. या काळात अधिक उष्णतामान असते. पाऊस पडत नाही. आपल्या देशापेक्षा येथे दिवस मोठा असतो. पहाटे चार वाजता सुर्योदय होतो. रात्री आठवाजता सुर्यास्त होतो. खरं पाहता स्वीडनसारख्या उत्तरी देशात सुर्यास्त होतच नाही. अशा देशांना लॅन्ड ऑफ मिड नाइड सन असे म्हणतात. याचे कारण म्हणजे सुर्य आकाशात जास्त उंचावर येत नाही आणि क्षितीजा जवळच असतो.

उन्हाळा हा युरोपात शेतीसाठी अनुकुल असा असतो या काळात पिके पिकतात. संदर्भानुसार पाऊस पडत असतो. जस सिंचनांची गरज नसते. त्यामुळे उन्हाळ्याच्या शेवटी पिकांची कापणी करतात.

- विविध ऋतु संबंधीत वरील चित्र बघा आणि तुम्हाला कोण कोणते फरक यात आढळुन आले ते सांगा?

आपल्या देशात शेतीकरीता दोन प्रकारचे ऋतु आहेत ते रबी, खरीब (हिवाळा, पावसाळा) म्हणुनच आठ ते दहा महिण्यापर्यंत पिके पिकविता येतात. पण फ्रान्स मध्ये इतर युरोप देशापेक्षा सहा, सात महिनेच फक्त पिके पिकविता येतात.

**शरद ऋतु (Autumn):** सप्टेंबर ते ऑक्टोंबर पर्यंत परत वातावरण बदलते. झाडांच्या पानांचा रंग लाल, हिरवा, पिवळा रंगात बदलतात. शेतीची

SCERT TELANGANA

ज













कामे थांबतात. हिवाळ्यातील उपयोगासाठी गवताची कापणी करुन वाळवितात. द्राक्षे, फळे व इतर फळे काढुन दारु, जाम, थंडपेय तयार करुन ठेवतात.

### जमीन वातावरण-शेती Land and Agriculture

युरोपात उपलब्ध सुपीक जमीन मैदाने व वर्षभर पाऊस असल्यामुळे नद्या कधीच कोरडीपडत नाहीत. शेती करीता अनुकुल वातावरण असते. पण युरोपातील पर्वतीय भाग शेती करीता उपयोगी पडत नाही. काही देशात जमीनीत शेती उपयोगी जमीन कमी आहे. नार्वेत - 3%, इंग्लंड-30% आणि जर्मणीत-40% शेती उपयोगी जमीन आहे. आपल्या देशात 55- शेती उपयोगी जमीन आहे.

हॉलंड(डच) देशात शेती उपयोगी जमीन नाही. त्यांना शेतीउपयुक्त जमीनीची समस्या आहे. हॉलंडच्या लोकांना ी बांधारे बांधून समुद्रतील कांही भाग शेती उपयुक्त केला. या बंधारांना (डाइक्स) म्हणतात. समुद्रकडुन मिळवलेल्या अशा शेती उपमयुक्त जमिनीला पोल्डर म्हणतात. उत्तर व पुर्व युरोप मध्ये हिवाळ्यात अतिथंडी मुळे शेती करणे कठिण आहे त्या प्रांतांना पुर्व आणि उत्तर युरोपात साधारणता: सहा महिणे बर्फ पडतो. तसेच वसंत ऋतुच्या कालावधीत बर्फ वितळतो. त्यामुळे उन्हाळ्यात पिके वाढतात व ग्रीष्मऋतुत पिके कापण्यासाठी केवळ एकमेव पिकच येथे घेतात

सहा महिण्यापर्यंत बांधुन झाकुण ठेवतात. वंसत ऋतु पर्यंत बर्फ पउत असल्यामुळे पिका योग्य वातावरण राहत नाही. उन्हाळ्यात पिकाचे पाणे गाळतात व पिक काढण्यास वातावरण उपयोगी पडते. यामुळे वर्षातुन एकच पिक घेतात. पण तेच दक्षिण युरोप मध्ये वर्षातुन दोन पिके घेतात.

- मध्यधारा देशात दोन पिके घेण्याकरीता काही कारणे तुम्ही सांगु शकता का?

युरोपाच्या मैदानी भागात मुख्य पिक गहु होय. यास फ्रांन्स, जर्मनी, रशिया, उक्रेयाण, पोलांड, इटली, ग्रीस इत्यादी देशात पिके घेतात. दक्षिण युरोप हा फळ, फळाने यांचे बागीचे वाढवण्यात प्रख्यात आहे. द्राक्ष व फळा पासुन मद्य तयार करतात. या करीता इटली दक्षिण फ्रांन्स प्रसिध्द आहेत.

युरोप मध्ये बार्ली, ज्वारी, ओटस, रौय,बिट इत्यादी मुख्य पिक तसेच रशिया, उक्रेयान, जर्मणी या देशात सारखेच जास्त उत्पन्न काढल्या जाते.

## शेती व्यवसायातील बदल:

युरोप, आशिया सारखा, लहान शेतकरी आणि जमिनदारांचा खंड आहे. गेल्या दोन शतकापासुन यात फार बदल झाला आहे. लोकसंख्येच्या फार कमी प्रतिशत लोक शेती व्यवसायात आहेत. भारतासारखे लहान शेतकरी पण तेथे नाहीत. हे असे घडण्याचे कारण म्हणजे, तांत्रिक क्रांती ज्यामुळे शेतकऱ्यांना विस्तीर्ण रुपात शेती कमी कष्टात करता येते. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात यंत्र, रासायनिक खते, इत्यादीचा वापर केला जातो आणि शेतीचे उत्पादन आता फक्त बाजारपेठेत विकण्यासाठीच केले जाते. मोठ्या जमिंदारांनी आणि भांडवलदारांनी लहान शेतकऱ्यांच्या शेत जमिनी घेतल्या आहेत. ह्या लहान शेतकऱ्यांनी शेती हा व्यवसाय सोडून, शहरांमध्ये कारखान्यात आणि इतर व्यवसायात नौकरी करु लागले.

**युरोपीयन शेतकरी आज** European Farms today

युरोप मध्ये 50 ते 100 एकर विस्तीर्ण रुपात मोठ्या जमीनीत शेती करतात. साधारणता शेतकरी स्वत:च्या शेतात घरे बांधुन राहतात. म्हणुनच युरोपमध्ये मोठ मोठी गावे दिसुन येत नाहीत. साधारणता शेती क्षेत्रातच घर बांधतात घरे मोठी असतात. या मोठ्या घरात जनावारांचे गोठे, पिके साठवुन ठेवण्याच्या खोल्या, पक्षांचे घरटे, डुकरांसाठी गोठे असतात. मोठे जमीनदार शेतकरी कामासाठी कामगार ठेऊन घेतात. शेतीकरीता ट्रक्टर, कापणी यंत्र, वखरणी यंत्र, यांचा वापर करतात. पिकांना बाजारात विकतात. काही वेळा शेतकरी जवळच्या सहकार संस्थे पासुन यंत्रे किरायाने आणतात.

- तुमच्या प्रदेशात सरासरी शेती व्यवसाय क्षेत्र किती प्रमाणात आहे?
- तुमच्या प्रदेशात देखील शेतकरी किरायाणे ट्रक्टर आणतात का?



*आकृती 5.3 पिकाची कापणी नंतर जमा केलेले गवताच्या गाठी हिवाळ्यातील जनावरांचा चारा*

विशाल अशी शेतीक्षेत्र, यंत्र युरोपच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थायी वाढवित आहेत. हे लोक अशा प्रकारच्या सर्व सुखसोयीच्या घरात राहतात. हे लोक स्वयंपाकासाठी विद्युत स्टोव्ह गॅसस्टोव्ह चा वापर करतात. 50 वर्षापुर्वी शेतकरी स्वत:च्या घरी पोळ्या(ब्रेड) बनवित होते. पण आज पिके बाजारात विकुन

SCERT TELANGANA

गरजेनुसार पोळ्या विकत आणतात. यांच्या आहारातील प्रमुख असे मासांहार कोंबड्या जनावरे डुकरे या पासुन मिळतो.

मासास बाळविणे, घनिभुत करणे, धुर करणे, भाजने या पध्दतीव्दारे साठवुन ठेवतात. प्रत्येक घरात दारु चिज, मांस, साठवुन ठेवण्यासाठी आहर कपाटे असतात. मांस थंड डब्यात देखील साठवुन ठेवतात.शेतकरी स्वत:च आवश्यक सामग्रीस जवळपासच्या बाजारातुन विकत आणतात. पोळ्या, ब्रेड आहार पदार्थाशिवाय यंत्रसामुग्री, हत्यारे अवजारे शहरातुन विकत आणतात. शहरात यांची मुले शिकायला राहतात.

**आधुनिक शेतीपध्दत (Modern Agriculture)**

युरोप मध्ये इतर देशाप्रमाणे शेती व्यवसाय एक उद्योग म्हणुनच चालत आहे. यांनी पिकविलेल्या पिकांना बाजारात विकुन आवश्यक सामग्री विकत घेणे हा आचार आहे. शेती व्यवसायात वाढत गेलेल्या सांकेतीक ज्ञानासहीत रसायणीक खते, किटकनाशके औषधे अधिक पिके पिकविणारे औषधे देखील असतात.

आपल्या देशाच्या तुलनेत, युरोपमध्ये फार कमी लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. बरेच लोक कारखान्यात किंवा सेवा क्षेत्र जसे बँक, दळण-वळण इत्यादीत कार्यरत आहेत. जे लोक शोती करीत आहेत, त्या लोकांना पण सरकार कडुन शेती करण्यासाठी सब्सीडीच्या रुपात आर्थिक मदत मिळत आहे. कारण इतर कामापेक्षा त्यांना शेतीपासुन मिळणारे उत्पन्न फार कमी असते. गावामध्ये शेती करण्यासाठी सरकार त्यांना पगार पण देते.

## समुद्र मार्गाचा शोध लावणे

पश्चिम युरोप मध्यें कोणताही प्रांत भाग समुद्रापासुन दुर नाही पण आशियात अनेक देश समुद्रा पासुन हजारों किलो मीटर दुर आहेत.

- वर्गात उपलब्ध असणारा युरोपचा नकाशा पाहुन समुद्राच्या किनारपट्टीवरील सहा शहरांची नांवे लिहा?

हजारों वर्षापासुन मनुष्य समुद्रकिनारी निवास करुन समुद्रातुन मिळणाऱ्या वस्तु जमा करुन जिवन जगतात.युरोपातील कांही लोक अनेक शतकापासुन समुद्राचा अनुभव घेत आहेत. त्यांना नाव तयार करणे, जहाज बनवने यांचे पुर्ण ज्ञान आहे.

समुद्रात जाऊन मासे पकडतात व अंतराष्ट्रीय पातळीवर व्यापार करतात. पुर्वी पासुन युरोपीयन लोक भारत देश व इतर आशिया देशातील चीन, इंडोनियाशी व्यापार करीत असत.जास्त कापुस, कपडे, हिरे, मोती, इतर वस्तु लवंगा, मिर्ची इ. मसल्याचे पदार्थ भेटत असत. त्या बदल्यात ते सोने चांदी घेऊन जात असत. ते युरोपला कोणत्या मार्गाने जात असत तुम्हास माहित आहे का? नकाशा 7 मध्ये दोन मुख्य मार्ग दाखवण्यात आले आहेत. त्या पैकी मध्य पुर्व प्रांत इशान्य अफगानिस्तान हा भुमार्ग व लाल समुद्र व आरेबीया समुद्र हा दुसरा जलमार्ग आहे.

500 वर्षापुर्वी पश्चिम युरोप नाविक व व्यापारी भारत देशासोबत नविन मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात लागले. अरब देशासोबत त्यांचे युध्द झाल्यामुळे त्यांना नविन मार्गाची गरज भासु लागली. मध्यधारा समुद्रावर इटली व्यापाऱ्यांचे वर्चस्व असल्यामुळे इतर



SCERT TELANGANA



*Map 7: Trade routes*

देशांना सहजा सहजी अनुमती भेट नव्हती. त्याकरीता इतर देश नविन मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात लागले. कारण मध्यधारा समुद्र इटलीवासियाच्या ताब्यात होता ते आरेबियांना आडथळे आणल्यामुळे नविन मार्ग शोधणे भाग पडले.

- नकाशा पाहुन नविन मार्ग कोणता असु शकतो ते सांगु शकता का?

अशा प्रकारच्या नकाशे त्या वेळेस नव्हते. पृथ्वी गोल आहे पण असे ते समजत असत. इटलीचा नाविक क्रिस्टोफर कोलंबस पृथ्वी गोल असल्यामुळेच पश्चिमेकडुन भारताकडे जाऊ शकतो असा अंदाज काढला. जर आटलांटीक महासमुद्रारतुन पश्चिमेकडे प्रवास करुन चीन व भारत देशास आपण पोहचु शकतो असे त्याला वाटले.

- जगाचा नकाशा किंवा आटलास पाहुन कोलंबसने विचार केला तो खरा की खोटा याचे निरिक्षण करा?

इ.स. 1492 मध्ये कोलंबसने आटलांटीक महासमुद्र पार करण्याकरीता तीन जहाज घेऊन प्रवास सुरुवात केला. तीन महिण्यानंतर एका जमीनीवर येऊन पोहचला त्या वेळी तो भारत देशात पोहचलो अशी त्याची समज झाली पण भारतापासुन तो फार दुर होता. तो पोहचला वेस्टइंडीज मध्ये ते अमेरीकांच्या जवळ असणारे अनेक व्दिपाचे समुह कोलंबसच्या अगोदर युरोपवासींयाना अमेरीका विषयी माहिती नव्हती.

नकळत अमेरीकेत आपण पोहचलो असे त्यास वाटले. आपण पोहचलो तो देश भारत नसुन अमेरीका आहे असे त्यांचे जाणीव झाली. त्यानंतर अनेक व्यापारी या मार्गाने अमेरीकेत व्यापार करु लागले. व स्थिर होऊ लागले होते.

त्यांच्या प्रवासात जहाजांचा प्रवास वाऱ्यांच्या दिशेने केला. पश्चिमेकडुन येणाऱ्या वाऱ्यांच्या दिशेने प्रवास केला ते पश्चिमी वारे होते का? नाही हे युरोप कडे येणारे वारे नाही हे प्रत्येक विशेष वारे वर्षभर येतात. मान्सुमी युरोप कडुन अमेरीका पुर्व प्रांतात येणाऱ्या वाऱ्यांना व्यापारी वारे म्हणतात. चित्र -7 पहा.

SCERT TELANGANA

तसेच पश्चिमी वारे नैऋत्यु दिशे कडुन इशान्य दिशे कडुन नैऋत्य दिशास येतात. (हे दोन प्रकारचे वारे वर्षभर विरोधी दिशेन वाहतात. यांना चित्र - 7 मध्ये दाखवण्यात आले आहे) हे वारे युरोप अमेरीका वासीयांना प्रवासास मदत करतात.

ते अशा प्रकारच्या वाऱ्यांच्या उपयोग व्यापार करणे , अमेरीका जाणे या करीता त्याचा फायदा घेतात.

चित्र -7 पहा व खालील प्रश्नांचे उत्तरे लिहा.

- युरोप पासुन अमेरीका जाण्याकरीता नाविक कोणत्या वाऱ्यांचा उपयोग करतात?
- युरोपला परत येण्याकरीता व्यापारी वारे उपयोगी पडतात का? कारणे शोधा?

कोलबंस नंतर युरोपियांनी अनेक समुद्र मार्गाचा शोध लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी फक्त अमेरीकाच नाही तर आफ्रिका, भारत, आस्ट्रेलीया देशांना येण्याकरीता समुद्रमार्गाचा शोधाचा प्रयत्न केला. याव्दारे त्याच्या व्यापारात विकास झाला व औद्योगिक विकासाकरीता फायदा होऊ लागला होता.

औद्योगिक क्रांती युरोपमधील बद्दल माहिती पुढील पाठात पाहु.

**महत्वाचे शब्द**

1. व्दिपकल्प
2. व्दिप
3. खाडी
4. प्रवाह
5. गल्फ
6. शितोष्णस्थिती

SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. युरोपातील जिवन पध्दतीमध्ये, शितोष्ण स्थितीमध्ये अटलांटीक महासागराचा तिव्र प्रभाव पडतो. त्यासाठी त्या संबंधीत आधार दाखवित एक निबंध लिहा?

2. पाठ्याभागामध्ये दिलेल्या नकाशा आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

   • खालील दिलेल्या देशाच्या भोवतील भुभाग म्हणजे(हंगेरी, रोमेनिया, पोलंड, स्विजर्लंड)

   • कॉस्पीयन समुद्रातील, काळ्या समुद्रातील कोण कोणत्या पर्वतरांगा आहेत? (अल्प, कॉकासस पर्वत रांगा)

   • आर्कटीक समुद्र किनाऱ्यावर असलेल्या देशाची नावे सांगा?(रशिया, जर्मनी, स्विडण, नार्वे)

   • जहाजाने काळ्या समुद्रातुन अटलांटीक समुद्राला जाता येते का? जर हो असेल तर जहाज कोणत्या मार्गाने जाईल तो मार्ग सांगा? नकाशात तो मार्ग दाखवा?

3. बंदरांची (पोर्ट) निर्मीती करतांना उथळ समुद्र आणि आखांतांना प्राधान्य का दिले जाते?

4. पश्चिम युरोपापेक्षा पुर्व युरोपामध्ये थंडीचे प्रमाण का कमी असते?

5. काळ्या समुद्राभोवती असलेल्या चार देशांची नावे सांगा?

6. पश्चिम युरोपातील लोकांना पश्चिमी वारे कसे उपयोगी पडतात?

7. मध्यधारा समुद्राची शितोष्णस्थिती सांगा. त्या प्रदेशातील देशाची नावे सांगा?

8. युरोप मधील शेतीव्यवसाय प्रभावित होण्याची कारणे कोणती?

9. दक्षिण युरोपातील महत्वाची पिके कोणती?

10. युरोपीयन दर्यावर्दी लोकांनी नविन समुद्र मार्गाचा शोध लावला यामुळे देशादेशा दरम्यान व्यापार, सांस्कृतीक संबंध निर्माण झाले. याचे समर्थन तुम्ही कसे कराल?

11. या पाठातील ***शेवटचा परिच्छेद*** वाचून त्याचे विवेचन करा?

12. युरोपातील शेती आपल्या देशातील शेती पेक्षा भिन्न का आहे?

SCERT TELANGANA

पाठ 6

# आफ्रिका खंड

भारत देशाच्या पश्चिम भागास एक मोठा खंड आहे. या खंडास कित्येक मोठे वाळवंट, घनदाट जंगले जास्त लांब, रुंद असणाऱ्या नद्या असंख्य सरोवरे, विशाल अशा हिरव्यागार रांगामध्ये हजारों मैल अंतरापर्यंत व्यापुन आहेत. आपल्या देशात नसणारे बऱ्याच प्रकारची जनावरे, प्राणी या खंडात आहेत. जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या, हिऱ्यांच्या खाणी या खंडात आहेत. या खंडाचे नाव आफ्रिका आहे. एक गोष्ट आश्चर्यकारक आहे. आफ्रिकेस मानव संततीचे माहेर घर म्हणुन शकतो म्हणजे मानवाची संतती या खंडातच पहिल्यांदा सुरुवात झाली. नंतर येथुन दुसऱ्या खंडास व्यापली.



चित्र 7.1 भुमध्य रेखातील जंगल



चित्र 7.2 केनीयातील सवान्ना



चित्र 7.3 नाईलनदीच्या तीरावरील कैरो शहर

SCERT TELANGANA

- आफ्रिका खंडास जगातील नकाशात पहा. त्याच्या सभोवताली असणाऱ्या समुद्राची नावे लिहा. या खंडाच्या सभोवती असणारी खंडे कोणती?

## आफ्रिका - एक मोठे पठारमय प्रदेश

आफ्रिकेचा भौगोलीक नकाशा पहा. या खंडास सर्वात मोठे अशी एखादी मैदान आहे का? किनारीय प्रांतामध्ये मैदाने आहे का? उरलेला खंडपुर्ण खुप विस्तृत असा पठारमय भाग होय. तुम्ही नकाशास लक्षपुर्वक पाहिलात तर हे पठारमय प्रदेश सगळीकडे सारखे नाहीत. हे लक्षात येते. नाईल, कांगो वाहणाऱ्या प्रांतास पहा. या पठारमय भागात अनेक पर्वताच्या रांगा आहेत. आफ्रिकेतील सर्वांत उंच पर्वत शिखर टंजानियो मधील किलोमांजारो पर्वत होय. **नकाशा - 1 पाहुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

उंच पठारमय प्रदेशात खुप लांब दाट अशा दऱ्या आहेत. या दऱ्या मध्ये कित्येक मोठी अनेक सरोवरे आहेत.

- आफ्रिकातील विक्टोरीया सरोवर सोडुन इतर दोन सरोवरांना ओळखा, त्याचे नावे सांगा?
- आफ्रिकेच्या नकाशात खालील नद्यांना दर्शवा. चित्र 6 पाहुन आफ्रिका खंडातील देशांना ओळखा. कोणत्या देशाच्या सभोवताली खालील नद्या वाहत आहेत? कोणत्या महासागरात त्या नद्या मिळतात?

| नदी | देश | समुद्र |
|---|---|---|
| नाईल | | |
| नैजर | | |
| कांगो | | |
| झांबेजी | | |

- अरुंद किनारीय मैदानांची सरासरी उंची किती?
- जास्त जागा व्यापणाऱ्या पठारमय प्रदेशाची उंची किती
- आफ्रिकेतील दक्षिण पुर्व भागातील पठारमय प्रदेशाची उंची किती?
- उत्तरेस ........... पर्वत आहे?

**नकाशा - 1 आफ्रिकेचा भौतिक नकाशा**




SCERT TELANGANA

या खंडाच्या उत्तरेस कोणती ही नदी दिसत नाही. या प्रांताचे नाव सहारा वाळवंट येथे पाऊसाचे प्रमाण खुप कमी असते एक नदी नाईल सहारा वाळवंटाच्या भोवताली वाहत असते.

पठारांत मोठे सरोवर पहा. आफ्रिकेतील सर्व सरोवरापैकी विक्टोरीया सरोवर हे मोठे सरोवर आहे. जगातील शुध्द पाणी मिळणारे एक मोठे सरोवर होय. नाईलनदीच्या सरोवरांपासुन उगम पावते. .

या नदीच्या उगमस्थानी जास्त पावसाचे प्रमाण असल्यामुळे पाणी जास्त असुन सहारा वाळवंटा भोवती वाहत मध्यधारा समुद्रात जाऊन मिळते. नाईलनदी इजिप्त मधुन वाहते. इजिप्त मध्ये जास्त भाग वाळवंटाने व्यापला आहे.

संसकृतिच्या विकासासाठी नाइलनदीची मदत होते. इजिप्तची संसकृति खुप प्राचिन असुन कित्येक हजारों वर्षापासुन नाईलनदीच्या पाण्याव्दारे इजिप्त च्या जमीनी पिक पिकवत आहेत. (नकाशा 3 मध्ये पहा)

**Map 2: Africa - Out line**




## शितोष्णस्थिती (Climate)

तुम्ही आफ्रिकेच्या खंडास ग्लोबवर पाहिला असाल तर भुमध्यरेषा या खंडाच्या मध्यभागी गोल जातांना दिसते या प्रकारे आफ्रिका उत्तर, दक्षिण भागात विभागली आहे.

- आफ्रिका नकाशात पाहुन कर्क रेषेस ओळखुन नकाशा - 2 मध्ये दाखवा आणि भुमध्य रेषेच्या दक्षिण भागास मकररेषा आहे. या रेषेस ओळखुन नकाशा 2 मध्ये दाखवा ?
- भुमध्य रेखा इतर कोणत्या खंडामधुन जात आहे का ?

कर्क रेषा व मकर रेषा असणाऱ्या प्रांतामध्ये शितोष्णस्थिती उष्ण असते. जगातील हे अति उष्ण प्रांत म्हणुन ओळखल्या जाते. येथे थंडी नसते या प्रांतात आयनरेषा प्रांत असे म्हणतात. (Tropic region)

- आफ्रिकेच्या नकाशात या ठिकाणांना ओळखुन तिथे आयन रेषा प्रांत लिहुन भुमध्य रेषेच्या उत्तरेस असणाऱ्या प्रांताना एकरंग दया व दक्षिण असणाऱ्या प्रांताना दुसरा रंग द्या.

विषृवृत्त रेषेच्या दक्षिण व उत्तरेच्या बाजुस असणाऱ्या प्रांतामध्ये उन्हाळा, हिवाळा असतो. यास समशितोष्णा प्रांत म्हणतात. (*'Temperate Regions'*)

आतापर्यंत आपण उन्हाळा आणि हिवाळ्या बद्दल बोललो. तर या प्रांताशी संबंधीत असुन सुध्दा पावसाचे प्रभाव आहे. दुसऱ्या एका प्रांतात हिच शितोष्णस्थिती असुन सुध्दा कमी पावसाचे प्रमाण असते.

SCERT TELANGANA

**नकाशा -3 आफ्रिका पाऊसमान विस्तार**




**नकाशा - 4 आफ्रिकेतील सहज वृक्षसंपदा**



भुमध्य रेषा प्रांतातील जंगले

विशाल वृक्षे

गवताळ जमीन सवान्ना

उंच पठारातील गवत

पर्वत रांगातील वृक्ष संपदा

वाळवंटातील वृक्ष संपदा



SCERT TELANGANA

## जास्त पावसाचे प्रदेश

भुमध्य रेषेच्या दोन्ही बाजुस आफ्रिकेतील खुप प्रदेशांमध्ये अत्याधिक पावसाचे प्रमाण असते. नकाशा - 3 मध्ये अत्याधिक पावसाचे प्रमाण असलेल्या प्रदेशांना ओळखा आफ्रिकेतील पश्चिम भागात मध्यभागात ही प्रदेश आहेत. जास्त पावसाचे प्रमाण उष्ण वातावरणांमुळे येथे घनदाट जंगले आहेत.

## मर्यादीत आणि अति कमी पाऊसाचे प्रमाण असणारे प्रदेश

नकाशा - 3 ला पाहुन कमी पावसाचे प्रमाण असणाऱ्या प्रदेशांना ओळखा. एका प्रकारचे पावसाची नोंदणी असणारे प्रदेश अत्याधिक पावसाचे प्रमाण असणाऱ्या प्रदेशांशी लागुन आहेत. पावसाचे प्रमाण कमी असणाऱ्या प्रदेशात पाऊस उन्हाळ्यात पडतो पण भुमध्य रेषा प्रदेशामध्ये वर्षभर पाऊस पडतो.

आपल्या देशांसारखेच आफ्रिकेत मध्यम पाऊस पडणाऱ्या प्रदेशामध्ये कोरडे, ओलसर, वातावरण असते. या प्रदेशामध्ये या प्रकारच्या पावसाच्या प्रमाणांमुळे खुप मोठे लांबसर गवत वाढते. हे गवत एवढे जाड, घनदाट उंच असते की, हत्ती सुध्दा त्यात दिसत नाहीत यासच सवान्ना गवताळ जमीनी म्हणतात. नकाशा - 4 पहा कित्येक प्रकारचे क्रुर प्राणीह्या प्रदेशात असतात. याबद्दल तुम्ही पुन्हा माहिती घ्याल.

आफ्रिकेतील जास्त भुभागातील पाऊस अतिकमी किंवा कित्येक वर्षापासुन पाऊस न पडणारे प्रांत सर्व कोरडे असणारे शुष्क प्रदेश आहेत.

- नकाशा - 3 मधील कोरड्या प्रदेश सांगा ?

आफ्रिकेच्या उत्तर भागात कोरडा भुप्रदेश आहे. या प्रदेशास सहारा वाळवंट म्हणतात. या सहरा वाळवंटा काही ठिकाणी काटेरी झाडे, छोटे छोटे गवत वाढते. उरलेला पुर्ण प्रदेश पुर्णपणे रेतीने, डोंगराने, पर्वतांने, खडीमातीने भरुन असते. दक्षिण भागात उष्णतामय प्रदेश आहेत. यास कलहरी वाळवंट म्हणुन ओळखतात.

**नकाशा 2-4 पाहुन खालील पुर्ण करा.**

- अत्याधिक पावसाचे प्रमाण असणाऱ्या प्रदेशामध्ये झाडे आहेत...........
- पावसाचे प्रमाण मध्यम असणाऱ्या प्रदेशांमध्ये....... झाडे आहेत.
- पावसाचे प्रमाण नसणाऱ्या प्रदेशात....... झाडे असतात.

या पाठात सुरुवातीस आफ्रिकेतील विविध प्रदेशांना दाखविणारे चित्र आहे. काही ठिकाणी झाडे गवत काटेरी झुडपे काही प्रदेशात कोणत्याच प्रकारचे झाडे, झुडपे दिसतच नाहीत.

## आफ्रिकेतील लोक

विविध भाषा बोलणारे लोक विविध जिवनशैली सवयीने वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये राहत आहेत. प्राचिन काळापासुन येथील लोक छोट्या टोळ्या करुन प्राण्यांचा शिकार करत. पशुपालन, शेती करुन जगतात. हे लोक भुमध्य रेषा प्रदेशात, वाळवंटात राहतात. पशुपोषण करणारे उंच पठारमय प्रदेशातील सवान्ना गवताळ जमीनीत त्यांच्या प्राण्यांना चारतात. नदी वाहणाऱ्या प्रदेशात जंगलाच्या काठी शेती कित्येक काळापासुन करत आहेत. समुद्राच्या किनारी कित्येक शहरे होती. तिथे दुरुन आलेले लोक व्यापर करत होते.



*Fig 6.4 Boabab tree*

SCERT TELANGANA

## आफ्रिका, युरापे, आशिया

खुप काळापर्यंत इतर खंडाना आफ्रिका खंडाबद्दल माहिती नव्हती. युरोपीयांना आफ्रिकेच्या समुद्र किनारी प्रदेशातील उत्तरे प्रदेश म्हणुन समजल्याने भारतीयांना अरेबीयन व्यापाऱ्यांना पुर्व किनारीय प्रदेशांची माहिती झाली.

- नकाशात निरिक्षण करुन युरोपीयन आफ्रिकेतील उत्तर समुद्रकिनारी प्रदेशाना कोणत्या प्रकारे पोहोचले असतील कल्पना करा? युरोपपासुन आफ्रिका जाण्यासाठी कोणत्या मार्गाने जावे लागते ते सांगा?

या किनारीय प्रदेशांना वगळले असता युरोपीयांना भारतीय किंवा अरब पर्यटकांना आफ्रिकेतील उरलेल्या प्रदेशाबद्दल माहिती नव्हती.

500 वर्षा अगोदर युरोपीयन समुद्रामार्गाव्दारे भारत देशाजवळ येण्यासाठी आफ्रिकेस गोल फिरुन येत असत. अटलांटीक महासमुद्र ओलांडत ते सेंयट मादिइरा, आजोरस व्दिपामध्ये येऊन थांबत असत. या व्दिपाच्या दक्षिणेस प्रवास व समुद्र सुध्दा गरम पाण्याने उकळत असते. असे त्यांना वाटत होते नंतर 1498 या वर्षी पोर्तुगिजचा नाविक वास्कोदगामा आफ्रिकेच्या दक्षिण मार्गाने जाऊन तिथुन भारत देशास येऊन पोहचला होता.



*Fig 6.5 Cape of Good Hope in South Africa*

नकाशा पाहुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

- आफ्रिकेपासुन भारतात येण्यासाठी कोणत्या मार्गाव्दिारे प्रवास करावा लागतो?
- आशिया, आफ्रिका खंड भुमार्गाव्दिारे जोडुन आहेत का?

## आफ्रिकेतील किनायरीय प्रदेश

तुम्ही युरोपचा अभ्यास करतेवेळेस तेथील समुद्रीय किनारे विविध खंडात आहेत हे पाहिलांत समुद्र किनारी वाहुन आलेल्या भुभागाबद्दल खाडीबद्दल तुम्ही शिकलात. युरोपीयांच्या समुद्र प्रवासास कोणत्या प्रकारची मदत झाली याची पडताळणी करु

- आफ्रिका खंडाच्या समुद्र किनारी प्रदेशांना पहा. तुम्हाला कोणता किनारा दिसतो, तुटलेला किनारा किंवा गुळगुळीत किनारा
- युरोप सारखेच येथे सुध्दा अनेक खाड्या समुद्र किनारे आहेत का? आफ्रिकेजवळ असणाऱ्या एखाद्या खाडी समुद्रास नकाशा -6 पाहुन शोधा?

युरोपीयांनी सुरुवातीस आफ्रिकेत जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा कित्येक आफ्रिकन लोकाच्या टोळ्यांनी त्यांच्याशी युध्द केले. युरोपीयांनी व्यापारात आफ्रिकावाल्यांना फसवुन त्यांा आपले गुलाम बनवुन इतर देशात विकले. युरोपीयांनी आफ्रिकेत त्यांच्या राज्याची स्थापना करुन तिथे असणाऱ्या साधन संपत्तीना लुट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आफ्रिकेतील लोकांनी त्यांचा मुकाबला करुन युरोपीयांना तोंड देवुन त्यांचा पराभव केला.

## गुलामांचा व्यापार (Slave Trade)

16 व्या शतकात युरोपीयन अमेरीकेत स्थानांतरासाठी तिथल्या जमीनी जप्त केल्या. तिथे खुप जमीनी होत्या पण त्या जमीनीत काम करण्यासाठी लोक नव्हते. या गरजा भागविण्यासाठी आफ्रिकेतुन गुलामगिरीची वागणुकीस सुरुवात झाली.

कोस्ता किनारीय प्रदेशातील गीनीयातील आफ्रिकेच्या पश्चिम किनारीय प्रदेशात असणाऱ्याना धरुन गुलाम म्हणुन ठेवुन घेत होते. या प्रकारे धरुन आणलेल्यांना समुद्र किनाऱ्यास आणुन युरोपियांना विकत होते. याच्या बदल्यात आफ्रिकेतील काही टोळ्यांचे पुढारी युरोपीयान पासुन बुंदके, लोखंडी अवजारे, दारु, कपडे घेत असत.



*Fig 6.6 A Slave*

या प्रकारे गुलाम झालेल्यांना खुप त्रास देत कित्येक जन प्रवास पुर्ण होण्या पुर्वीच काही गुंलाम मरण पावत होते. जहाज पुर्ण गुलामाने भरलेल्या असायच्या त्यांना आवश्यक तो आहार, पाणी औषधी उपलब्ध नसायच्या त्या पोहचण्यासाठी बरेच दिवस लागायचे त्यामुळे आजाराने पोषक आहाराच्या अभावाने कित्येक गुलाम प्रवासातच मरण पावत होते.

अमेरीकेत सुध्दा यांच्यावर क्रुरपणे कठिण काम घेत असत. यांच्या कडुन खुप काम करुन घेत पण त्यांना योग्य तो आहार राहण्यास वस्ती सोयी उपलब्ध करुन दिल्या नाही. या प्रकारे आफ्रिकेतुन कित्येक लाखो लोकांना गुलाम म्हणुन अमेरीकेच्या दक्षिण उत्तर प्रदेशांना जवळपासच्या व्दिपांना पाठवण्यात आले. त्यात बरेच जनर मारल्या गेल्या. 16 व 17 व्या शतकामध्ये या प्रकारच्या गुलामाच्या व्यापारास कित्येक कंपण्या बनवल्या 19 व्या शतकामध्ये ही व्यापारास बंद झाली. अमेरीकेत या प्रकारे येणाऱ्या गुलांमाना स्वतंत्रपणे अमेरीकेचा नागरीक म्हणुन 1860 मध्ये घोषीत करण्यात आले.

## युरोपीयनाचे वसाहत European Colonies

या अगोदर युरोपीयन लोक भारत देशात पोहोचण्यासाठी आफ्रिकेस फेरा घालुन येत असत हे तुम्हाला समजले असेल त्या प्रवासात त्यांनी आफ्रिकेच्या बंदरात मुक्काम करत असत. नंतर पोर्तुगिज, डच, इंग्रज, फ्रेच, जर्मनी, आफ्रिकेच्या खंडातील भुभागत जाऊन त्या प्रांतास आक्रमण करत 19 व्या शतकातील आफ्रिकेचा राजकीय नकाशा पहा. हा नकाशा -5 युरोपीयांनी स्थलांतर न केलेल्या प्रदेशांना दाखवितात.

**Map 5: European colonies in Africa in 1913**




- आफ्रिकेत स्थलांतर केलेल्या युरोपीयन देशांना युरोपाच्या नकाशात ओळखा ?
- सुडान, जैरीमध्ये स्थलातरण झालेले युरोपीयन देश कोणते ?

SCERT TELANGANA

◆ तुम्ही दाखवु शकाल का? आफ्रकेच्या अशा कोणत्या भागात वसाहती स्थापित झाल्या नाही?

त्यांनी नाईल नदीच्या उगमस्थानापासुन उत्तरेकडे प्रवास केला. पश्चिम प्रदेशातील नैजर लोया प्रदेशास आक्रमण करुन घेतले. दक्षिणेकडे केपटाऊन पर्यंत जावुन जांबेजी नदी वाहणाऱ्या प्रदेशावर आक्रमण केले. युरोपायनी आफ्रिकेतील सागवान खजिन संपत्तीस मोठ्या प्रमाणात युरोपात आयात करण्यात आली.

खरेतर आफ्रिका खंडातील दक्षिण प्रदेशातील सोन्याच्या खाणी, हिऱ्यांच्या खाणी आता सुध्दा युरोपीयनर कंपण्याच्या ताब्यात आहेत. जांबीया झिम्बाब्वे मध्ये मोजु शकत नाही तेवढ्या लोखंड्याच्या खाणी आहेत. कित्येक काळापासुन ही खनिजे त्यांना महत्वाच्या आयात म्हणुन समजत असत युरोपीयन आफ्रिकेतुन साधनांची आयात करणे थांबवले नाही. त्यांनी चहा, कॉफी, रब्बर, तंबाखु, इत्यादी मक्याची लावणी करुन त्यास युरोपात निर्यात करतात.

## नायजेरीयातील पिके

तुम्हास चॉकलेट आवडतात का? ते नायजेरीयातील को को या पिकापासुन तयार करतात. दक्षिण नायजेरीयात को को चे नाहीतर रब्बर ची पण उत्पत्ती होते. खाद्य तेलाची झाडे पण वाढतात. त्या पासुन गिरीजन लोक तेल काढतात. नाव जहाज व्दारे नाईल नदी पार करुन खाद्य तेल व फळे गिरीजन गोळा करतात. पुर्वी जगलातच खाद्य तेलाची झाडे वाढवत असत. त्यांची मागणी वाढल्यामुळे त्यांची लागवड जास्त प्रमाणात करण्यात येऊ लागली. रबर खाद्यातेल नायजेरीयातुन इतर देशांना निर्यात करतात व त्यांच्या बदलात इतर वस्तु आयात करतात.

◆ नकाशा 4 नायजेरीया ही पिके पिकणाऱ्या प्रांताना ओळखा आणि दाखवा?

झाडे वाढण्याची ब्रिटांशानी सुरुवात केली जंगला पासुन होणाऱ्या उत्पत्ती पासुन ते समाधान नसत ते जास्त उत्पादन करुन निर्यात करत असत. अशा प्रकारे पिके घेणे त्यांना सोपे पडु लागले. प्रथम त्यांना जंगलात जाऊन खाद्य तेलांची झाडे शोधण्याची गरज पडत नसे. व्यापाराकरीता उत्पत्ती वाढली. नायजेरियातील लोक ह्या मळ्यात काम करुन लागले आणि ब्रिटीश लोक त्यांच्यावर देखरेख करीत होते. या प्रकारे नायजेरीयात खाद्यतेल, को को, रब्बर यांचा व्यवसाय व्यापारास सुरुवात झाली.

एवढेच नाहीतर विविध प्रकारच्या बागयतीत त्या प्रांतात अनेक प्रकारचे उद्योगधंदे निर्माण करण्यात आले. यात को को फळातुन बिया काढणे व वाळवणे खाद्यतेलांच्या झाडापासुन तेल काढणे झाडापासुन रब्बर काढणे अशी कामे सुरुवात झाली. या पासुन होणारा फायदा जास्त ब्रिटीश लोक घेत असत. नायजेरीया लोक फक्त मजुरी आणि शेती करण्यापुरतेच मर्यादीत राहत. भारतात ब्रिटीशांच्या काळात चहा, कॉफी चाच व्यापार सुरुवात झाला. नायजेरीयात 1960 पर्यंत ब्रिटीशाच्या गुलामीत राहुन नंतर स्वतंत्र झाला. त्यांनतर त्या पिकांचा व्यापार केंद्र नायजेरीया लोकांच्या हातात आले आणि आता त्यांना फायदा होत आहे.

## स्वतंत्र आफ्रिका (Independent Africa)

गेल्या शतकात आफ्रकातील देशांना युरोपीयनाच्या नियंत्रणापासुन स्वातंत्र्य मिळाले. नविन देशाची निर्मीती होऊन तेथील लोकांनी नविन सरकारची स्थापना करुन घेतली. तर कित्येकजन युरोपीयन आफ्रिका खंडातच स्थिर झाले पण आफ्रिकन लोक हळुहळु त्यांच्या देशांवर, जंगलावर खाण्यावर

SCERT TELANGANA

शेतीच्या उत्पादनावर सत्ता चालवत त्यांचे फायदे घेत होते.

## आफ्रिकेतील खनिजे (Minerals of Africa)

आफ्रिका खंड खनिज संपत्ती ने संपन्न आहे. दगडी कोळसा, तांबे आणि लोखंड येथे मुबलक प्रमाणात आहे त्याशिवाय सोने आणि हिरे ही मौल्यवान खनिजे उत्पादन करणारा जगातील मोठा उत्पादक खंड म्हणून आफ्रिकेकडे पाहिले जाते. युरोपीयन देशांनी आफ्रिकेतील मंजुरांचा वापर करुन याच देशातुन मोठ्या प्रमाणात खनिजांचा उपसा केला. अध्यापही अनेक युरोपीन देशांचे हक्क आफ्रिकेतील अनेक खाणींनवर अबाधित आहेत.

उदा. नायजेरीयातील खनिज तेल आणि नैसर्गिक् वायु प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहेत. येथील या मौल्यवान खनिजावर सन 1958 पासुन डच कंपण्याचे आधिपत्य आहे. या कंम्पण्यानी नायजेरीयातुन मोठ्या प्रमाणातुन खनिजांची निर्यात केलेली आहे. यासाठी हारकोर्ट आणि वारिपोर्ट येथे तेलशुध्दीकरण कारखाणे उभारलेले आहेत.

या खंडातील अनेक खनिज उत्पादने परदेशी कंपण्याच्या हाती आहे. नायजेरीयन सरकारचा या उत्पादनात अतिशय अल्पसा वाटा आहे. आफ्रीकेतील पुष्कळशा खनिजांच्या उत्पादनांच्या संदर्भात असेच घडत आहे.

परदेशी कंपण्यांनी खनिज उत्पादनात नवनिवन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आणि प्रचंड भांडवलाच्या गुतंवणुकीनी स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. परंतु उत्पादक मात्र परदेशात जाते. मजुरीचे दर अत्यल्प असुन फायदा मात्र मोठा आहे. याचा फायदा आफ्रिकन लोकांना होत नाही. या कंपन्या सरळ सरळ पर्यावरणाच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष करतात. यामुळे आफ्रिकन खंडात लोकांच्या एकंदर जिवनमानास गंभीर धोका निर्माण झाला आहे आणि हे अध्यापही असेच चालत आहे.

- पुस्तकातील नकाशा-7 रंगवुन विविध देश वेगळे करा? आणि दाखवा?

**महत्वाचे शब्द:**

1. वसाहती प्रदेश 2. गुलाम 3. पठारे

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. युरोपापासुन आफ्रिकेतील उत्तर भागास पोहोचण्यासाठी मार्गामिध्ये कोणत्या समुद्रास ओलांडुन जावे लागते?
2. युरोपीयनांना आफ्रिकेतील भुभागात पोहोचल्यानंतर त्यांना त्या कोणत्या तीन अडचणींना तोंड द्यावे लागले?
3. आफ्रिकेतील दोन मोठ्या वाळवंटांची नावे सांगा?
4. या पाठात आफ्रिकेस संबंधीत दोन राजकीय नकाशे दिले आहे. या दोन नकाशास पाहुन नायजेरीया, झिम्बाब्वे हा देश कोणत्या युरोपीयन देशाच्या नियंत्रणात आहेत ते ओळखा?
5. आफ्रिकेतील भुमध्य प्रदेशात जंगले असणारे कोणतेही दोन देश ओळखा?
6. आफ्रिकेतील युरोपीयनांनी कोणत्या वस्तुंचा व्यापार केला? व्यापारासाठी त्यांनी कोणत्या शेती उतपादनाला प्रोत्साहन दिले?
7. गुलामगीरी या वागणुकीमुळे कोणाला फायदा मिळाला? अमेरीकेला गुलामांची आवश्यकता का भासली?
8. गुलामांचे जिवन अतिशय हिन असल्याचे तुम्ही कसे सांगु शकता?
9. या पाठातील ***शेवटचा परिच्छेद*** वाचून त्याचे विवेचन करा?



SCERT TELANGANA

## नकाशा -6 आफ्रिकेतील देश



नकाशा - 6 च्या मदतीने खालील नकाशात नावे भरा. त्यानंतर रंग भरा. रंगभरतांना आजुबाजुला सारखे रंग येणार नाही याची काळजी घ्या. तसेच एकमेकाच्या शेजारी देशांना सारखेच रंग देऊ नका.

**नकाशा -7 आफ्रिकेतील देश**



SCERT TELANGANA

पाठ 7

# हस्तव्यवसाय - हातमाग

## पहिला भाग

### अंदुगुला गावातील टोपल्या व्यवसाय

पोलय्या हा एक कुटीर उद्योगी टोपल्या विणतो. त्याचे गाव महबुबनगर जिल्ह्यातील मडगुला मंडळातील अंदुगुला गाव त्याचे वय 35 वर्षाचे आहे. त्याची जात गिरीजन आदिवासी संबंधीत एरुकुल जातीचा आहे. त्यांची बायको भाग्यम्मा देखील टोपल्या विणते. टोपल्या विणणे त्यांच्या पुर्वजापासुन चालत आलेला उद्योग आहे. पोलय्यास तीन मुले आहेत या गावात त्याच्या उद्योगात जास्त कमाई होत नसल्यामुळे 30 वर्षापुर्वी पोलय्या वडीलासोबत इतर कुटुंबीयासोबत हैद्राबादला निवास करुन राहायला गेला. तेथेच तो स्थिर झाला आहे. पोलय्या चादरघाट फुटपाथच्या बाजुला टोपल्या विकतो.

पोलय्या ताडाची पाने आणतो. त्यांना काही दिवस वाढवुन चाकुने कापुन कमड्या तयार करतो. कमडयांना काही दिवस वाळवितो. नंतर त्यापासुन टोपल्या विणतो. आपल्या अंदुगुला गावातुन बदंयाचे गठे विकत आणतो. व टोपल्या विणतो. अंदुगुला गाव हैद्राबाद पासुन 60 कि.मी. अंतरावर आहे. अंदुगूला गावातील त्याचे नातेवाईक गावा भोवताली असलेल्या झाडांची काटे गोळा करुन पोलय्या सारख्या टोपल्या विणणाऱ्याला विकतात.

- टोपल्या विणण्यासाठी कोणत्या कच्च्या मालाची गरज असते? तो कच्चा माल गोळा करुन कोण विणतात?
- टोपल्या विणण्यासाठी कोणत्या अवजरांचा वापर होतो?

पोलय्या एक गठ्ठा 120 रुपयांस या दरांने एकुण 10 गठे विकत घेऊन येतो. ते दोन महिण्यापर्यंत विणण्यास पुरतात. एका गठ्यापासुन 25 टोपल्या विणतो. 10 गट्याचे 250 टोपल्या बनतात. एका टोपली विणण्यास 30 मिनीटे लागतात. दररोज सकाळी 10 ते सध्याकाळी 5 वाजे पर्यंत काम करतो आणि मध्यंतरी दुपारी जेवणासाठी थोडा वेळ घेता.



चित्र 7.1 टोपल्यांचे दुकान आणि बाबूच्या वस्तु

पोलय्या प्रत्येक टोपले 20 रुपयास विकतो. कधी-कधी, घरातील विभिन्न विधींसाठी ग्राहक मोठ्या टोपल्या मांगतात. अशा टोपल्या जास्त

SCERT TELANGANA



*Fig 7.2 Basket weaving*

किंमतीत विकल्या जतात. टोपल्यांची किंमत कच्चा माल किती वापरण्यात आला ह्यावर आधारीत असते. पोलय्या वर्षभर टोपल्या बनवितो दोन महिन्यात 5000 रु. पर्यंत टोपल्या विकतो. खेरदी किंमत 1200 रु. ह्यात रवाना खर्च 100 रु. मिळविला जात नाही. गावाला जाण्यास प्रत्येक वेळी 100 रु. रवाना खर्च येतो. ही कमाई दोन महिण्याची कुटुंबाचा खर्चासाठी पुरेशी नाही. म्हणुन टोपल्या सहीतच बाबु पासुन तयार करण्यात येणारे टेबल स्टॅड देखील विणण्याचा उद्योग करतो आणि उत्पन्न वाढवितो.

टोपल्या विणने म्हणजे ही एक कला आहे. ताडीच्या झाडांची पाने, बांबु ही सामुग्री वन्यसंपदा आहे. ही संपदा रोज घटत आहे. कारण लोक उद्योग धंद्यासाठी चोरीने जंगल तोड करीत आहेत. याचा प्रभाव लोकांच्या उपजीविकेवर पडतो कारण ते जंगलावर आधारीत होते. या उत्पादनाची मागणी देखील घटत आहे. धंदेवाईक दुसरा मार्ग अवलंब करुन ग्रामिण जिवनापासुन दुर शहरी जिवन जगण्यासाठी जात आहेत. या परिस्थितीचा केवळ टोपल्या विणणाऱ्या व्यापरीवर्गावर नाहीतर इतर धंदेवाईकावर देखील प्रभाव पडतो. ग्रामिण प्रांतातुन स्थलांतर करुन शहरात जाऊन जगणाऱ्या लोकांना कोणत्याच प्रकारच्या योजनांचा लाभ मिळत नाही.

## शहरातील झोपडपट्टी (Urban Slum)

पोलय्या हैद्राबादमध्ये झोपडपट्टीत राहतो. तेथे डांस, माशा, सांडपाणी, दुर्गंध अशा अनेक समस्या असतात या समस्यांना तोंड देत जिवन जगावे लागते. पिण्याचे पाणी विद्युत यांची सोय नसते. झोपड्या तट्ट्यापासुन, प्लॉस्टीक कचरा पासुन बनविलेल्या असतात. पावसाळ्यात या झोपड्या गळतात. सभोवार पाणी वाहत असते. नगर पालीका अधिकारी सतत झोपड्या खाली करण्यास लावतात. परत झोपड्या बनवुन राहावे लागते.

कबाड कष्ट करीत जगणाऱ्या पोलय्या सारख्या लोकांना राशनकार्ड, मतदानांचा हक्क नाही. त्यांना राशनकार्ड नकारण्यात आले कारण त्यांच्याजवळ



*Fig 7.3 Basket weaving*

SCERT TELANGANA

ओळखपत्र आणि निवासस्थानाचा पुरावा नाही. त्यामुळे हे लोकशाही प्रक्रियेत कोणत्याही कार्यक्रमात भाग घेत नाहीत. गरीबांना मिळणाऱ्या कोणत्याही योजनांचा लाभ यांना मिळत नाही.

## टोपल्या विणणारे लोक Basket Makers

आपल्या राज्यात आणि आंध्रप्रदेशात अनेक प्रांतात ऐरुकुल गिरीजन जमीतीचे लोक राहतात. त्यापैकी अधिक प्रमाणात टोपल्या विणणारेच आहेत. पण ऐरुकुल जातीच्या स्त्रियांचा पारंपारीक उद्योग म्हणजे व्यक्तीचे भविष्य सांगणे म्हणून त्या लोकांना एरुकूल असे म्हणतात आणि त्यांच्या या भविष्य सांगणाऱ्या पद्धतीला एरुका चेप्पुटट्टा असे महणतात. हे लोक एका प्रकारची मांडलीक ऐरुकुल भाषा बोलतात. एरुकुल भाषा तेलुगु, तमीळ, कन्नड भाषेचे मिश्रीत रुप आहे.

योग्य शब्दाची निवड करा.

a. जंगले घटत आहेत. ( उद्योगधंद्यामुळे / टोपल्या विणण्यामुळे)

b. पोलय्या बांबुच्या कमड्यांचे गठ्ठे कोठुन विकत आणतो? (बाजारातुन / अंदुगुला गावातुन)

- टोपल्या विणण्याच्या धंद्यात कच्या मालावरील खर्च आणि होणारी कमाई या विषयी एक तक्ता बनवा?
- पोलय्या सारख्या लोकांच्या जवळ राशन कार्ड नाहीत तर त्यांना राशन कार्ड देता येईल का? मतदानाचा हक्क हैद्रबादेत बजावता येईल का?

वरील विषयाव्दारे आपल्याला माहित होते की, टोपल्या विणणे एक साधारण उत्पादन आहे. त्या करीता आवश्यक कच्चा माल म्हणजे ( ताडाच्या झाडाची पाने, बांबु) नैसर्गिक संपदा आहे. पण काही उत्पादने विशिष्ट असतात. त्यांच्या तयारीसाठी लागणाऱ्या कच्चया मालाच्या तयारीची उपकरणे देखील विशिष्ट प्रकारची असतात. अशाप्रकारचे उदाहरण म्हणजे कॉटन आणि सिल्कचे कापड. आज कापडाचे उत्पादन हातमागावर किंवा यंत्रमागावर किंवा मोठ्या कारखान्यात तयार करत आहेत. आता आपण हातमागावर वस्त्रे कशी तयार करतात ते पाहु या .

# दुसरा भाग

## हातमाग - पोचमपल्ली

तेलंगानातील पोचमपल्ली हे यादाद्री जिल्ह्यातील एक लहान गाव आहे. तेथील कामगार एक विशेष प्रकारच्या इक्कत आणि टाय ॲण्ड ट्राय साड्या विणतात. या साड्या जगात प्रसिध्द पावलेल्या आहेत. इक्कत म्हणजे धाग्यास विशेष पध्दतीत रंगावितात यालाच बाधंणी किंवा पोचमपल्ली म्हणतात. दर्जेदार रेशमी सांड्याना स्थानीक रित्या तयार केलेल्या डिझायनीत रुपांतरीत करुन विणतात. तीन प्रकारच्या शॅडोत (छायेत) या प्रकारे विणतात. पोचमपल्ली गावाच्या जवळपास 100 गावातील लोक सुमारे 10000 कुंटुंबाचा हा उद्योग पोचमपल्ली साड्यांची एक खास विशेषता आहे. ती विशेषता रंगात व डिझायनीत फार प्रसिध्द आहे. इतर रेशमी साड्यापैकी वेगळी अशी आहे. म्हणुन भारत देशात पोचमपल्ली सांड्याचा एक पेंटेट राईट (विशेष हक्क) मिळाला आहे. म्हणुनच जगातुन कोठेही या इक्कत डिझायनीचा वापर करुन घेण्याचा हक्क कोणालाही नाही. इक्कम साडी म्हणताच पोचमपल्लीची आठवण येते. पोचमपल्ली साड्यांना इक्कत ब्रांड असतो.



SCERT TELANGANA

पोचमपल्ली गावाच्या जवळपासच्या गावातील लोक ब्रांड सहीत तयार केलेल्या सांड्यांनाच विकतात. देश विदेशात जादा दराने विकतात.

साड्या तयारी करीता लागणारे रेशीमी धागे रंग, सुत वगैरे वस्तुंना कामगार स्वत: तयार गरीत नाहीत र जवळच्या बाजारातुन विकत आणतात. रेशमी धागे रेशमी किड्यांच्या कोषातुन काढतात. स्थानिक शेतकरी मलबांरी बागांची वाढ करतात. व रेशमी किड्यांना पाळतात. सुती धागा कारखाण्यातुन किंवा घरातुन सुतकातणाऱ्या जवळुन गोळा करता. रंग स्थानिक बाजारपेठेतुन विकत आणतात.

**सामग्री (Tools)**

वस्त्र कामगारांच्या जवळ लाकडापासुन बनविलेले स्वत:चे हातमाग असतात. हातमाग कापड विणण्याचे मुख्य साधन. त्या शिवाय चाकुचा पण वापर करतात. डिझाईन काढण्यासाठीच वस्त्र कामगार प्राधान्यता देतात. वस्त्र कामगारांना साडी विनण्यासाठी साडीच्या डिझानची रुपरेषा माहित असणे गरजेचे आहे. एक खास डिझाईनचा ग्राफ तयार करतात. व पिढी दर पिढी काम करत येत असल्याने कोणत्याच प्रकारच्या चुका कामगाराकडुन होत नाहीत. अनेक नविन डिझायनी देखील तयार करतात.

- कोणत्याही एका साडीस पहा व त्यावरील एक डिझाईन चे चित्र काढुन दाखवा?



## साडी विणण्याचे विविध टप्पे

साडी विणकामात साडी विणण्याच्या विविध टप्पे आहेत. पहिली रेशमी धागा कातणे, नंतर धागे टाकणे आडवे धागे रोळांना गुंडाळुन धाग्यावर डिझायनीची चिन्हे देणे. रंग लागु नये अशा ठिकाणी बांधणी करुन रंगवितात. धाग्यांना रंगविण्यास फार वेळ लागतो. प्रत्येक रंग लावणे वाळविणे या क्रिया कराव्या लागतात. रंग डिझायनी झाल्यानंतर धागे मागावर चढविता.

## धाग्यांना रंगविणे (Dyeing yarn )

रेशमी धाग्यास बांधणी घालुन रंगविणे, सुकविणे, परतबांधी काढुन रंग दिलेल्या बांधणी करणे, पांढरा भाग दुसऱ्या रंगाने रंगविणे, सुकविणे या क्रिया सतत कराव्या लागतात. वेगवेगळ्या रंगाचे डिझाइन आणि विविध रंगाच्या साड्यांसाठी, धाग्यांना रंगविण्याच्या विविध पद्धती वापरतात. अशाप्रकारच्या डिझायनीस टॉय अॅन्ड ड्राय असे म्हणतात. लाल, गव्हाळ रंगाच्या छायेत पांढरा रंग येण्यासाठी आले जारीन रंग वापरतात. धाग्यांना कॅस्टर आईल( एरंडीतेल) अल्कोहोल च्या मिश्रणात बुडवितात. काही वेळ भिजु देतात. नंतर अलजारीन पेस्ट मध्ये बडवुन लालरंग येईपर्यंत उकळवितात. काळ्या रंगासाठी लोह किसात वेनिगर क्षार मिळवतात. या मिश्राणात धागे बुडविल्यास काळा रंग येतो.

**उभे धागे - आडवे धागे**

कपड्यातील धागे तुम्ही सहजपणे ओळखु शकता. जसे कपड्याच्या दोन्ही बाजुंना अनेक प्रकारे विनकाम केलेले असते.उभे धागे सरळ वरुन खालपर्यंत असतात. आडवे धागे डावीकडुन उजवीकडे असतात.( खालील प्रकारे चित्र पहा)



SCERT TELANGANA



उभे धागे



*Fig 7.4 At pit loom - weaving a saree*




*Fig 7.5 Winding thread*

विणकाम करणाऱ्या विणकरांच्या तेलंगानातील पोचमपल्ली येथे इक्कत प्रकारच्या विणकामासाठी अनेक कारागीर आहेत. ते वापरणारे विविध प्रकारचे विकणकाम वस्तु आणि धागे या विषयी माहिती घेऊ या.

जगतय्या हा पोचमपल्ली गावाचा निवासी आहे. याच्या कुंटुंबात चार जण आहेत. पत्नी, मुलगा, सुन सर्व वस्त्र कामगाराच आम्ही पोहचतात सर्व मंडळी वस्त्र विणण्यासंबंधीत कामात व्यस्त होते. जगतय्या रोळावर आडवे धागे गुंडळत होता. तर त्याचा मुलगा मुरली घरातील मागावर साडी विणत होता. इतर औजारे चितकासु, पन्नी, अच्चु दोरा आणि रबर ट्युब वापरण्यात येते. धाग्यावर रबराचंय तुकड्याची बांधणी घालुन टाय ॲण्ड ड्राय डिझायन टाकणे रंगविणे सुकविणे, आडवया धाग्या विचरणे, रोलांना गुंडाळणे हातमागावर वर रोल बसविणे उभ्या धाग्यात आडवे धागे फसविणे या सर्व पध्दतीव्दारे कापड विणल्या जाते. कापड विणण्या संबंधीत सर्व सामुग्री लाकडापासुन बनविलेली असतात. जगय्या जास्त वेळ धागे गुंडाळणे आणि मुलगा मागावर असतो.

जगतय्याची पत्नी,सुन मागावर आडव्या धाग्यांचे रोळ बसविण्याची कामे देखील करतात. घराबाहेर आडव्या धाग्यांच्या उभे ठेवणे, रोळांना धागे गुंडाळणे इत्यादी कामे सर्व मिळुन करतात. जगय्याची नातवंड शाळेत शिकत आहेत.

SCERT TELANGANA



*Fig 7.6 Bobbin winding*

मुरली, जगतय्या सहकारी संघाचा सदस्य आहे. एकदाच आठ साड्यांना आवश्यक सामग्री विकत घेतो. कुंटुंबातील सर्व मंडळी मिळुन 12-15 तास काम करतात. आठ साड्यांच्या तयारी करीता पन्नास दिवस लागतात. एका साडीपासुन त्यांची 1200 रुपयांची कमाई होते.

इक्कत साड्या विविणे हा जगतय्या परंपरागत चालत आलेला धंदा आहे. कुंटुंबातील सर्व मंडळी मिळुन काम केले तरी येणारी मिळकत पुरत नाही.

मुरली, जगतय्याचा मुलगा विणकर मालका कडुन किंवा सहकार संघातुन कच्चा माल जसे रेशमी धागे, जरी, रंग, डिझायनी विकत घेऊन येतो.



*Fig 7.7 Marking design*

मार्च ते मे महिण्यात थोडा काम करतात. कारण अधिक उष्णतेने सतत धागा तुटत जात असतो. त्यामुळे कामात अडचण येते. म्हणुनच दुपारपर्यंत काम करतात. वस्त्र कामगांराच्या बायका विणण्याची कामे करतांना कुंटुबांची काळजी घेण, स्वयपांक करणे, पाणी भरणे, मुलांना तयार करुन शाळेत पाठविणे इत्यादी घरगुत्ती कामे करतात. त्यामुळे कामगार महिलांचे हाल होत आहेत.

आधी जगतय्याचे कुंटुंब सोसायटी मध्ये (सहकार संघ) काम करायचे. संघातील सभासदांना रोग, आकलमृत्यु संबंधीत, विमा पॉलीसी व्दारे आर्थिक मदत मिळत होती. घराच्या निर्मीती साठी सहकार संघाकडुन कर्ज मिळत होते. आजकाल सोसायटी कडुन गरजेचे काम मिळत नाही. म्हणुनच विणकामा सहीत इतर कोणतेही काम करुन पैसे मिळवुन कुंटुंबाचे पालन पोषण करुन घेत आहेत. मालक विणकर लोक या लोकांना कामे मिळवुन देऊन उत्पन्न वाढविण्यास संधी देत आहेत.

SCERT TELANGANA

आपल्या पोचमपल्ली विणकर मालकासाठी इक्कत साडी विणत आहेत. येणाऱ्या दिवसात सहकार संघा कडुन काम मिळविण्याची संभावना आहे अशी अपेक्षा जगतय्याने व्यक्त केली. म्हणुन त्याने संघाचे सदस्य सोडले नाही.

## वस्त्र कामगारांच्या समस्या आणि सहकार संघ(सोसायटी)

भारत देशात तेलंगाना कापड विणकाम क्षेत्रात अग्रगण्य आहे. वस्त्र कामगारांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. ते यांत्रिक भागाची कापड गिरण्याची बरोबरी करु शकत नाहीत. हे वस्त्र स्वस्त असते कारण ते यंत्रावर तयार करण्यात येते आणि ते सिंथेटिक धाग्यांचा उपयोग करीत आहेत जे कॉटन किंवा सिलक्पेक्षा स्वस्त दरात मिळतात. त्यामध्ये सुती हातमागावरील कापडांच्या उत्पादनास भाव मिळत नाहीत.

तरीपण दर्जेदार, प्रसिध्द, आकर्षक सुंदर विकणकास चांगला दर्जा मिळाला आहे. पोचमपल्ली साड्यांचा भाव अधिक असता तरी जगतय्या सारख्या कुंटुंबाची कमाई साधारणच आहे.

दलालाच्या मध्यस्थी मुळे वस्त्र कामगारांना योग्य भाव मिळत नाही. विकत घेणारे जगभर पसरुन असले तरी पण त्याचा कामगाराशी सरळ मुखामुखी संबंध नसतो. दररोज लोकांची फॅशन



*Fig 7.8 Weaving in process*

वाढतच असते. बदलणाऱ्या डिझायनी विषयी कामगरांना माहिती नसते.

दलालाव्दारे स्थानिक रित्या वापरात असणाऱ्या डिझायनीची माहिती घेऊन बदल करावा लागतो. कच्चा मालासाठी देखील दलाल वर अवलंबुन राहावे लागते.



*Fig 7.9 Warping*

SCERT TELANGANA

मध्यवर्ती दलालांना कापड विणकाम क्षेत्रात एक विशेष स्थान असते ते ग्राहकाकडुन मोठ्या प्रमाणात लाभ मिळवितात. वस्त्र कामगारांच्या समस्या दुर करण्यास प्रोत्सहान द्यावे. कापड विणकाम करणाऱ्या सहकारी संस्था निर्माण करण्यास, कच्चा माल कमी दरात मिळवुन देऊन उत्पादनाचा बाजारपेठ मिळवुन देऊन मध्यवर्ती दलाल यांचे पात्र कमी करावे सहकार संघाव्दारे नव नविन डिझायनी च्या रुप कल्पनांचे तयारीच्या शिक्षण केंद्राची स्थापना करावी.

कोणतेही काहीही असले तरी सध्या जगतय्या सारख्या तेलंगानातील कापड विणकाम करणाऱ्या कुंटुंबाना सहकार संघा कडुन योग्य काम काम मिळत नाही. कच्चा माल गोळा करणे, विकणे या विषयीच्या निर्णयात सहकार संघ सभासदांना मदत देत नाहीत. बदलण्याऱ्या ग्राहकाच्या अभिरुची आवडीनुसार वस्त्र कामगारांना सहकार संघाकडुन मदत मिळत नाही. परत दलाल यांच्या अधिकारास झुकावे लागते.



*Fig 7.10 Folding the Ikkath Saree*

तेलंगानामध्ये सहकार संघापेक्षा, विणकर मालके अधिक प्रमाणाण कामे मिळवुन देत आहेत. मध्यवर्ती विणकर मालकापासुन कच्चा माल विकत घेतात. वस्त्र कामगारांकडे पोहवितात. तयार झालेला कापड त्यांच्या कडुन विकत घेतात. नंतर दलालास तो माल विकतात. रक्कत देतात. अनेक विणकर मालक विणकामा संबंधीत माग, कामाची अवजारे कच्चा माल पुरवित आहेत. पण तयार केलेल्या साड्या इतर विणकर मालकास विकु नये असा नियम पाळावा लागतो. केलेल्या कामाची मजुरी देतात. जर का कामगार कमाई वाढविण्यासाठी प्रयत्न केला तर कमी मजुरी घेणाऱ्या कामगारास ते काम सोपवितात. वस्त्र कामगारांच्या देण्यासाठी विणकर मालकापासुन बचाव करण्याची जबाबदारी सहकार संघावरच आहे.

- इक्कत साड्या तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, अवजारांची यादी तयार करा. व तक्त्यात लिहा?
- जगतय्याचे कुंटुंब विणकर मालका जवळच का काम करतात?

### महत्वाचे शब्द

1. कच्चा माल
2. इक्कत
3. पेटेन्ट हक्क
4. ट्राय ॲण्ड ड्राय
5. उभे धागे-आडवे धागे
6. सहकारी संघ



SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. टोपल्या विणकामात, कापड विणकामात आवश्यकते पेक्षा जास्त कामाई होत असते असा तुमचा विचार आहे का?
2. तुमच्या आईवडीलासोबत चर्चा करुन टोपल्या बनविण्या संबधीत इतर पर्यायी वस्तुची यादी करा.
3. हस्त व्यवसायीक उत्पादनांच्या स्थानात इतर यांत्रिक उत्पादने आली आहेत त्यांना ओळखा. ती उत्पादने कशा प्रकारे झालेली आहेत?कामगांराच्या जिवनास कसे प्रभावित करतात?
4. पोलय्याचे कुटुंब हैद्राबादला का आले? त्यांना हैद्राबाद मतदांनाचा हक्का का नाही?
5. टोपल्या ऐवजी इतर वस्तुंची तयारी करणाऱ्यांना पाहिले असाल तर त्यांच्या विषयी माहिती भरा.

| अ.क्र. | हस्त व्यवसायीचे नांव | उत्पादीत वस्तु | एक किंवा दोन उपयोगी कच्चा माल | कच्चा माल मिळण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलय्या | टोपली | बाबुंच्या कांड्या/पाने | अंदुगुला -स्वत:चे गांव |
| 2 | | | | |
| 3 | | | | |

6. पोचमपल्लीच्या सांड्याना पेटेंट हक्का मिळाल्याने कामगारास कोणत्या प्रकारचा लाभ मिळतो?
7. वस्त्र कामगार कच्चा माल विकत घेऊन इक्कत साड्या तयार करतात व स्वत:च बाजारेपठेत विकतात?
8. टोपल्या विणण्याच्या, हातमागाच्या कापड विणण्याच्या विविध उत्पादन अंशाचा फ्लोचार्ट बनवा?
9. टोपल्या विवणे हातमागावर कापड विणणे यातील समानता व फरक तक्त्यात भरा?

| उत्पादन | उपयोगी कच्चा माल | उपयोगी अवजारे | वस्तु विकण्याची पध्दत |
|---|---|---|---|
| टोपल्या विणणे | | | |
| कापड विणणे | | | |

10. तेलंगानातील विविध हस्तव्यवसाय स्थानाची यादी तयार करा, एक तक्ता तयार करा.

**चर्चा :**

एखाद्या कलाकाराला आमंत्रिच करुन त्याच्या व्यवसायाबद्दल चर्चा करा?

**प्रकल्प कार्य:**

1. एखाद्या हस्त व्यवसायीकास तुमच्या शाळेत बोलवा अथवा त्यांच्या कामाच्या ठिकाणी भेट द्या. त्या संबंधी एक चार्ट तयार करा. आणि त्यांच्या उत्पादनाच्या विविझ प्रक्रिया दर्शवा?
2. गावातील काही हस्तकला व्यवसायीकांची भेट घेऊन खालील तक्ता भरा. आणि वर्गात चर्चा करा?

| अ.क्र. | व्यवसायीकांचे नांव | व्यवसाय | चालु/ बंद | बंद असल्यास कारणे | जर चालु असेल तर समाधानी आहात काय? |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

SCERT TELANGANA

पाठ 8

# औद्योगिक क्रांती

या अगोदरच्या पाठामध्ये विविध कामगारांची विविध पध्दतीत वस्तुंना कोणत्या प्रकारे तयार करतात याची माहिती घेतली. त्यांनी तयार केलेल्या वस्तुंना यंत्रानी तयार केलेल्या वस्तुंनी स्पर्धा करु शकत नाही. म्हणुन त्यातील बरेच लोक त्यांच्या व्यापाराला सोडुन देत आहेत. यंत्रे वस्तुच्या निर्मीतीमध्ये कोणत्या प्रकारे प्राधान्य देण्यात आले आहे. ते समाजातील लोकांच्या जीवन पध्दतीस कोणत्या प्रकारे प्रभावित करतात या पाठात आपण पाहु या.

## सुरुवातीस काही बदल

इ.स. 1500 B.C.E. पासुन 1800 B.C.E. वर्षामधील काळात अफ्रिका, अमेरीका, आशिया, युरोप खंडातील देशांमध्ये व्यापार वेगवेगळया पध्दतीने वाढला. सध्या युरोपीयन व्यापारी सह व्यापारी पध्दतीने सुरु करुन कपड्यांच्या उद्योगास आवश्यक त्या सामुग्रीस उत्पादन करण्यासाठी हातकामगारांकडुन छोट्या शेतकऱ्यांकडुन काम करवुन घेत. या काळात शेतीपासुन मिळणारे उत्पादन घटल्यामुळे अनेकजन शेतीत नुकसान झाल्यामुळे शेतीस जनावरे चरण्यासाठी वापरत असत. म्हणुन यांना जगण्यासाठी आवश्यकतो खर्च कारखाण्यात काम करण्यामुळे मिळाला.

सह व्यापारी पध्दतीखाली ब्रिटनमध्ये एक कापड्याच्या व्यापारी सुत कातण्याचा माल पुरवठा करणाऱ्याकडुन विकत घेऊन त्यास धागातयार कणाऱ्याजवळ घेऊन जाऊन धाग्यावर रुपांतर करुन हातमागाजवळ जाऊन शेवटी कपड्यांना रंग दिल्यामुळे कापड तयार होते.

या पुर्ण अवस्था देशातील विविध प्रदेशात घडतात. कापडास इतर देशात विकण्या अगोदर सुरुवातीस काम लंडणमध्ये घडते. या पध्दतीने कापड्याचे उत्पत्ती करतात. अनेकजन उत्पादक उत्पती करतात. येथे कारखाना ची व्यवस्था नाही. कापड्याच्या तयारीत येणाऱ्या विवधि टप्यात पध्दतीत एकाच ठिकाणी नाहीतर विविध कुंटुंबात कामे होतात. प्रत्येक संदर्शक (दलाल) वस्त्रांच्या तयारीत प्रत्येक टप्पयात 20 पासुन 25 जन हस्तकामगारांची नियुक्ती करत.

काही काळानंतर कापडाचे व्यापारी हातकामगांराच्या घरी न जाता सर्वाऐनी एकाच जागावर गोळाकरुन त्यांना जशा पाहिज्या तश्या वस्तु उत्पादन करुन घेत या प्रकारे तयार झालेल्या कार्यशाळांना कामगार म्हणुन बोलवत असत. कामगार स्वत:ची अवजारे घेऊन कार्यशाळेत येऊन माल तयार करत असत. या प्रकारे हस्तकलाकारांवर मालकांची सत्ता वाढली. या अवस्थेस अनेकजन हस्तकलात्मक उत्पत्तीच्या प्रक्रियेत सहभागी होऊन श्रमिकांवर बारांवर नियंत्रण ठेऊन हस्तकलेच्या उत्पत्ती सर्वजगात बाजारांचा विकास झाला. ह्या प्रगतीच्या टप्प्याला प्रोटो इंडस्ट्राइलाइझेशन असे म्हणतात.

SCERT TELANGANA

## औद्योगिक क्रांतीची सुरुवात 1750-1850 (B.C.E.)

या काळात अनेक बदल झाले 1750 हे वर्ष वस्तुंच्या तयारीत, वाहतुकीत, यंत्राचा वापर, यांत्रिक शक्तीचा, वाफेच्या शक्तीचा वापर वाढला. अनेक लोक आपले जिवन जगण्यासाठी कामा निमीत्त गावातुन शहरात स्थलांतरण झाले. आपण सध्या यंत्राणे तयार झालेल्या वस्तुचा वापर करत आहेत. हेच ब्रिटन मध्ये यांत्रिक अवस्था ची सुरुवात झाली.

कापडाची मागणी वाढल्यामुळे हस्तकलाकारांना नुकसान झाल्यामुळे पुरवठा कसा वाढवावा याचा अनेक प्रकारे विचार करण्यात आला. यात काहीचे विचार या दिवसामध्ये आपल्या कापडाची मागणी जास्त असल्यामुळे पुरवठा आपण वाढवु शकत नाही. एवढेच नाही. एवढेच नाहीतर हातमागावरील कापड्याची तयारी खर्चाची बाब आहे. वेगाने सुत कातण्याच्या यंत्राणे कापड विणण्याचे यंत्र तयार केले असता. आपण कमी पैशात जास्त कापडाचे उत्पादन करु शकतो. तेव्हा अनेकजन जास्त खरेदी विक्री करतात. जास्त कमाई करतात. उद्योगकामाच्या दबावामुळे अनेकजन यंत्राच्या तयारीच्या प्रयत्नास लागले. या प्रयत्नांच्या बदल्यात खुप काळानंतर जास्त कापड कमी वेळात विण्याच्या यंत्राचा शोध लागला. याचे वजन जास्त असायचे याच्या वापरात श्रमिकांना जास्त मेहनत करावी लागत असे. त्यामुळे ते लवकर थकत म्हणुन त्यांनी यंत्र आपोआप चालावे असे त्यांना वाटत असे हे विचार जेम्स वॅट ने शोधलेल्या शोधाने म्हणजे वाफेच्या यंत्राने खरा ठराला.



*Fig 8.1 Spinning Jenny - A new machine to spin yarn.*

### जेम्स वॅटचा शोध James Watt's Invention

जेम्स वॅट इंग्लड देशाचा हस्तकलाकार यंत्राची तयारी करत असे. पाण्याच्या वाफेस जड वजनास हालवण्याची शक्ती असते असे त्याने ओळखले. या विचाराने शक्तीची मदत न घेता पाण्याच्या वाफेवर चालणारे यंत्र तयार केले. जेम्स वॅटने स्वत:तयार केलेल्या यंत्रास बॉलटन म्हणणाऱ्या व्यापाऱ्यास दाखवुन त्यानी दोघांनी यंत्र बनवण्याची सुरुवात केले.

बोलटन मुळ यंत्राच्या तयारीचा खर्च दिला. एवढेच नाहीतर वॅटला पगारपण दिला. या दोघांनी




*Fig 8.2 This is one of the steam engines made by James Watt. The piston under the pressure from the steam pushes the rod up and down which, in turn, turns the wheel.*

SCERT TELANGANA

मिळुन यंत्राची तयारी करुन त्याचा भागीदार केली. नफ्यात 2/3 टक्के वाटा तर बोल्टन 1/3 टक्के वॅटने वाटुन घेतला. यंत्रे वाफेवर चालतात. याचा शोध लागल्यानंतर अनेक प्रकारच्या यंत्राना कापड विणण्यासाठी सुत कातण्यासाठी, लोखंडी वस्तुंचा तयारीसाठी वाहनांसाठी जहाजे ओढण्यासारख्या कामासाठी तयार केल्या गेल्या.

- इंग्लड मध्ये स्वयंचलीत यंत्राचा शोध लावण्याची गरज का भासली?
- वरील उदाहरणाव्दारे शास्त्रज्ञ आणि भांडलवदार यांच्या दोघांमध्ये झालेला करार न्यायपुर्ण आहे असे तुम्हास वाटते का?

## उत्पादनात फॅक्टरीची (कारखाना) पध्दत

इ. स. 1750-1850 या मधील काळात कारखान्याची पध्दत या नविन पध्दतीचा शोध लागला. मानवीय श्रम शक्तीच्या बदल्यात नविन वाफेच्या यंत्राचा वापर वाढला. कारखान्या ऐवजी उत्पादन घरात होत असे. छोटी छोटी अवजारे दुरुस्ती करण्यापर्यंत कारखाण्यास महत्व वाढले. खुप मोठ्या प्रमाणात वस्तुंची उत्पत्ती झाली. जेथे उत्पादन होत होते त्या जागेस कारखाना म्हणतात.

उत्पादनास आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवाणाऱ्या व्यक्तीस भांडवलदार म्हणतात. भांडवलदार खर्च करतात. कारखानातील कच्चा माल तयार झालेल्या मालावर मालकाचाच पुर्ण अधिकार असतो.

दलालांची पध्दत प्रमाणिक नुसन श्रमिकांच्या मजुरीसाठी काम करतात. पण उत्पादनावर यांना अधिकार असतो. सुरुवातीस कारखानामध्ये काम करण्यासाठी खुप भयंकर परिस्थिती असायची.

## 19 व्या शतकातील बालकामगारांचा अनुभव

19 व्या शतकामध्ये युरोपातील कारखानातील कामगारांना खुप भयंकर अडचणींना तोड द्यावे लागत होते. आपण इंग्लड मधील कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या बालकांचे अनुभव पाहु या.

*“मी या खाणीत चार वर्षापासुन काम करत आहे. कामगार विळीने खोदुन कोळसा वेनमध्ये भरतात. या वेगनला घोंडयावर, गाढवावर ओढुन घेवुन जातात. या वेगनमागे असुन ढकलनेच आमचे काम. हे वेगन पाणी चिखल सरळ असणाऱ्या प्रांतामधुन जात असल्यामुळे आम्ही लवकर थकतो. दररोज बारा तास काम केल्यामुळे घरी गेल्यानंतर जेवणसुध्दा करु वाटत नाही. काल घरी जातांना रस्त्यातच झोपलो. माझी आई मला शोधत येऊन घरी घेवुन गेली. ”*



*Fig 8.3 Children pushing a cart inside a coal mine.*

SCERT TELANGANA

कारखाण्यामध्ये आणि खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगरांचे निर्मुलन करण्यासाठी अनेक चळवळी निर्माण झाल्या त्या चळवळीच्या बदल्यात बालकामगार निर्मुलन युरोप आणि अमेरीकेत 1936 नंतर करण्यात आले. हे युरोपीयन देशामध्ये प्राचिन काळाचे एक चिन्ह म्हणुन उरले

## कारखान्याची सुरुवातीची परिस्थिती

नविन यंत्रे आल्यामुळे उद्योगधंद्यामध्ये खुप बदल घडला. कौशल्य नसलेली उद्योग सुध्दा यंत्रावर आधारीत असत. या प्रमाणे कौशल्य गरज भासेनाशी झाली. खुप स्त्रिया, मुले त्यांच्या प्रदेशातील कारखान्यामध्ये कमी मजुरी घेऊन काम करीत असत.

यंत्राच्या तयारीचा खर्च जास्त असल्यामुळे साधारण हस्तकला कामगारांना हा खर्च भरण्याची ताकद नसते धनीक दलालच यंत्रावर आधारीत कारखाण्याची निर्मीती करत. हे काही कामगारांनी त्यांच्या परिस्थिती सांगीतलेल्या कामासाठी सकाळी सहा वाजेपासुन रात्रीच्या आठ वाजेपर्यंत काम करत होतो. दुपारी जेवणाची वेळ फक्त एक तास असायची संध्याकाळी खुप थकवा येऊन काम करण्याची ताकद नसतांना सुध्दा कारखानाचा मालक येऊन अजुन काम करा म्हणुन दाबाव टाकत असत.

सध्याच्या काळात नवनविन यंत्रे येत आहेत. कित्येकजन करणाऱ्या कामास ही यंत्रे केल्यामुळे श्रमीकांची गरज कमी झाली प्रत्येक वेळी एक नविन यंत्र आल्यामुळे आमच्यातील काही जण मजुरी सोडुन देऊन रस्त्यावर यायचे हे कार्मीक त्या आगोदर त्या त्या जमीनी सोडुन दिल्यामुळे यातील बऱ्याच लोकांना यंत्र न दिल्यामुळे मजुरीसाठी दुसरा मार्ग उरला नाही. छोट छोटे दुकाने सुध्दा बंद करावे लागले. क्रमाणे कारखाणे, खाणीत कामगारांचे संघटना तयार होऊन कामाच्या मागण्या म्हणजे दररोज आठ किंवा दहा तास काम जास्त पगारी 14 वर्षाच्या कमी वय असणाऱ्या मुलांकडुन काम न करुन घेणे इत्यादी काही काळांनतर त्यांच्या लढाच्या परिणाम म्हणुन श्रमीकांची परिस्थिती सुधारली.



*Fig 8.4 Redrawing of an illustration of inside of a factory.*

SCERT TELANGANA



*Fig 8.5*



*Fig 8.6*



*Fig 8.7*

*Fig 8.5, 8.6 & 8.7*

- Look at these illustrations. They are called etching. There were no photograph, but the artists tried to show the details in them. They were made during the time of Industrial revolution There is also a redrawn illustration on the previous page in colour. How are these pictures different? Which illustration shows more detail? Do you notice children in these illustrations? What detials of a factory do you see in them?

SCERT TELANGANA

- यंत्रावर काम करण्यासाठी कोणाला नौकरी देण्यात आली?
- तुमच्या जवळपास असणाऱ्या कारखाण्या बद्दल तुम्हाला माहित आहे का? यात कामाच्या परिस्थितीस इंग्लडमधील 150 वर्षाअगोदरची कामाशी तुलना करा?

सध्या कारखाण्यासुध्दा बदल झाला पाहिजे. सध्या सर्व प्रकारची कामे संघटकाच्या सुचनेव्दोर संगणकाच्या सुचनेव्दारे काम करणारी यंत्रे करत आहेत. यांच्या आयोजनसाठी कमी संख्येत कारखाणे, कमी श्रमिकांची आवश्यकता असते.

## शक्तीवर आधारीत - औद्योगिक विकास

कारखाण्यातील यंत्रे चालण्यासाठी शक्तीची (विद्युत) आवश्यकता असते. कोळसा, विद्युत, पेट्रोल इ. पासुन शक्ती मिळते. मुळातच कारखाणे शक्तीसाठी कोळशावर, पाण्याच्या वाफेवर अवलंबुन आहेत. त्यानंतर थर्मल विद्युत शक्तींना पेट्रोल, डिझल, गॅस, अनुशक्ती, सौरशक्ती इत्यादीचे वापर करतात.

## वाहतुक क्षेत्रात क्रांती Transport Revolution

स्टिम इंजीन/ वाफेचे यंत्राचा शोध या मुळेच नौका जहाजांची निर्मीतीच्या विकसाची सुरुवात झाली. जलवाहतुक रस्ते वाहतुकीतील 1/3 टक्केचा खर्च कमी झाला तरी सुध्दा लोक अजुन चांगल्या वाहतुकीच्या पध्दतीची वाट पाहु लागले. हालणाऱ्या यंत्राना वाफेच्या यंत्राचा उपयोगामुळे वाहतुकीच्या क्षेत्रात खुप मोठा बदलावास सुरुवात झाली. जॉर्ज स्टिवेन्सनचे वाफेवरील इंजन लिव्हरपुल पासुन मॅचेस्टर पर्यंत 64 कि.मी. अंतर 46 कि.मी. प्रतितास या वेगाने खुप मोठी सामग्री घेऊन गेले.

1840 मध्ये जॉन लेंडन मेकडम यांनी दगडाच्या व गोट्याच्या सहाय्याने पक्के रस्ते तयार करण्याच्या पध्दतीचा शोध लावला. हा शोध रस्त्याच्या निर्मीतीस एक महत्वाचा टप्पा होय. दुसऱ्या शतकात सध्या आपण टाकतो. ते डांबर रस्त्यांची निर्मीतीतील झाली. या प्रकारचे रस्ते मोटार वाहन चालवणाऱ्यांना खुप उपयोगी पडतात.

20 व्या शतकाच्या सुरुवातीस रैटबंधुनी विमानाचा शोध लावल्यामुळे हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात महत्वाची क्रांती झाली.

## औद्योगिक उत्पादने - व्यापार

औद्योगिक उत्पादने मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे स्वत:च्या देशात पुर्ण उत्पादनांना विकणे शक्य नव्हते. कारखाणाचे मालक वाढलेल्या उत्पादनांना इतर देशात विकण्यास सुरुवात केली. यंत्राने तयार केलेल्या वस्तु चांगल्या, दर्जेदार, टिकाऊ असल्यामुळे यास जगभरात मागणी वाढली. यामुळे इंग्लडमध्ये इतर देशामध्ये उद्योगास प्रोत्सहान मिळाले. पण औद्योगिक देशांना आवश्यक तो कच्चा माल मिळत नसे. उदा. कापडासाठी लागणारा कच्चा माल कापुस भारतातुन व इतर देशातुन विकत घेऊन कारखाणदांराना विकत घेतल्यानंतर दलाल तयार झालेला वस्तुंना विकत घेऊन भारत, अमेरीकासारख्या देशात विकत. आपल्या व्यापारासाठी औद्योगीक विकासासाठी युरोपीयन कच्चा माल मिळणाऱ्या देशांतर आक्रमण करुन घेतले. इंग्लड, फ्रांन्स, जर्मनी, स्पेन, पोर्तूगल, बेल्जीयम, हॉलंड इतर युरोपीयन देश मातृ देश म्हणुन म्हणवुन घेतात. आशिया आफ्रिका, आस्ट्रेलीया, अमेरीका खंडामध्ये वसाहतीकरुन घेतले.



SCERT TELANGANA

(ज्या देशाच्या नैसर्गिक संपत्तीस इतर देशाच्या फायद्यासाठी वापरतात त्या देशांना वसाहती देश म्हणुन म्हणतो) हे युरोपीयन देश इतर खंडातील वसाहती देशांना लुटुन सुसंपन्न झाले. खालील दिलेला नकाशा-1. पहा ज्यात युरोपियन देश आणि त्यांच्या वसाहती दिसत आहे. या वसाहती 1800 मधील आहे.

## शहरीकरण, गलिच्छवस्त्या

औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणुन क्रमाणे लोक गावातुन शहराकडे जाण्याची परिस्थिती निर्माण झाली. कारखाणे इतर शहरातील कार्यालियामुळे लोकांना उदरनिर्वाहासाठी काम मिळत असे. नविन निर्माण झालेल्या शहरांमध्ये लोक मोठ्या प्रमाणात गेल्यामुळे यांना घरे, झोपड्या, निवारा ओबड धोबड बांधल्यामुळे हे स्वच्छेच्या इतर सोयीस अडथळा निर्माण करणारे होते. दुर्घटना, महामारी यांचा प्रसार वाढला.

खुप श्रमीकांचा निवारा स्वच्छता, प्रकाश, आरोग्याच्या सोयी सुविधा नसलेल्या असतांना कारखानाजवळ झोपड्या, नाल्या, गलिच्छ वस्त्या सर्व शहरात असतात. श्रीमंत लोकांसाठी रुंद असे रस्ते स्वच्छ अशा शौचालयाच्या सोयीयुक्त घरे निर्माण झाली. कालानुक्रमे लोकांनी नागरीकांच्या हक्कासाठी कार्मिकांच्या परिस्थितीबद्दल घरांच्या निर्मीतीसाठी व विकासासाठी चळवळी केल्या.




*Map 1: A world map showing colonies of European countries in 1800. Do you notice at this time most colonies were coastal areas including in India. Look at the map of Africa on page 61 and describe the change?*

**महत्वाचे शब्द:**

1. क्रांती
2. उत्पादन
3. कारखाणे
4. बालकामगार
5. न्युक्लीयर एनर्जी(अणुशक्ती)
6. संघटन
7. शहरीकरण
8. झोपडपट्या



SCERT TELANGANA

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. हे वाक्य दुरुस्त करुन लिहा?

   **सब कॅंट्राक्टरी पध्दत मध्ये**

   a. *सुतकाम धाग्यांना विणणाऱ्याकडे घेऊन जातात.*

   b. *व्यापारी पध्दतीमध्ये व्यापारीच काय उत्पादन करावे ठरवतात.*

   c. *पुर्ण काम एकच गट करतो.*

   **दलाली पध्दतीमध्ये**

   a. *सर्व लहान शेतकऱ्यांना विनकाम करण्याची संधी दिली.*

   b. *विनकर उत्पादनांची दर्जा व किंमती ठरवतात.*

2. कापड्याच्या कारखाण्यात सब कॉन्ट्रक्ट पध्दती औद्योगिक उत्पादनापेक्षा श्रेष्ठ आहे? तुम्ही सहमत आहात का? कारणे सांगा?
3. भारत देशातील रेल्वे लोकांच्या सोयीसाठी वसाहत राज्यकर्त्यांनी निर्माण केल्या म्हणुन निरजा म्हणणारी मुलगी वाद घालत आहे. तुम्ही याचा विरोध कसा करा?
4. कामगरांच्या पगारांची वाढ कारखाण्यास कसे प्रभावित करते?
5. कारखानदार कार्मिकांना कमी पगार देऊन जास्त वेळा काम करा असा दबाव का आणतात?
6. कारखाणातील परिस्थितीना सुधारावे असे तुम्हास का वाटते?
7. कारखाण्यातील परिस्थिती सुधारण्यासाठी सरकार कोणते कायदे काढावेत?
8. बालकांना कारखाण्यात कामगार म्हणुन नियुक्त करु नये? असे कशासाठी म्हणतात?
9. वाहतुक व्यवस्थाची औद्योगीक विकासात मदत होते. या मतांवर औद्योगीकरणाच्या संदर्भात चर्चा करा?
10. जगाच्या नकाशात खालील स्थळे दाखवा.

    1. इंग्लड 2. स्पेन 3. फ्रांस 4. पोर्तुगाल

11. पान क्र. 84 वरील ***शहरीकरण झोपडपट्टी*** हा परिच्छेद वाचून त्याचे विवेचन करा?

**प्रकल्प कार्य :**

1. सहाव्या इयत्तेतील शेती आणि व्यापार हा पाठ आठवा.तेलंगाना आणि ब्रिटीन किंवा युरोपातील शेती आणि व्यापाराशी तुलना करा? यासाठी काही महितांचा उपयोग करु शकता?
2. बालकामगार एखाद्या कारखाण्यात काम करीत असलेला तुम्हास माहित आहे का? जर असेल तर तुम्ही त्यासाठी काय कराल?



SCERT TELANGANA

पाठ 9

# कारखाण्यातील उत्पादन-कागद कारखाना

छोटी कुंटुंबे अल्पसाधातांच्या साहाय्याने काही वस्तु घरच्या घरी तयार करतात. त्यालाच हस्तकला उत्पादने ही म्हणतात. याच्या विरुध्द कारखाने मोठ्या प्रमाणात वस्तुचे उत्पादन करतात. यासाठी यंत्रसामुग्री हाताशी असते. मोठ्या प्रमाणात मनुष्य बळ असते. मोठ्या कारखाण्यात उत्पादन कसे होते हे आपण आता पाहु या.

- तुम्ही एखाद्या कारखाना पाहिला आहे का? त्या विषयी माहिती द्या?
- तुम्ही पाहिलेल्या कारखाण्याचा चित्र तुमच्या कल्पना शक्तीच्या आधारे काढा. तसेच कारखाण्यात काय होत असेल या विषयी 300 शब्दात माहिती लिहा.

आपण कागदाचा भरपुर वापर करतो. पुस्तके, रजिस्टर, प्रगती पुस्तके, वर्तमानपत्र इत्यादी तयार करण्यासाठी कागदाचा वापर करतात. आपल्या तेलंगाना राज्यात दोन मोठी कागदाचे कारखाने आहेत. यात सिरपुर कागजनगर (आदिलाबाद जिल्हा) आणि भद्राचलम (खम्मम जिल्हा) यांचा समावेश आहे.

- तेलंगानाचा नकाशा काढुन ते जिल्हे ओळखा. कारखाना उभारणी तेथेच का करण्यात आली असावी याचा विचार करा?

## कच्चा माल (Raw Materials)

एखाद्या वस्तुला तयार करण्यासाठी लागणारा पदार्थांना कच्चा माल किंवा कच्चे साहित्य असे म्हणतात. उत्पादनासाठी कच्चा मालाचा पुरवठा



*Fig 9.1*
*Factory from outside*

SCERT TELANGANA



*Fig 9.2 Lorries waiting with bamboo loads*

अखंडपणे होणे गरजेचे आहे. दररोज डझनवारी वाहते कच्चा माल घेऊन जात असलेले तुम्ही पाहिलेच असाल. कागदाच्या उत्पादनात मुख्यता बांबु, सुबाबुळ, युकॅलिप्टर्स झाडांचा उपयोग होतो. सद्या परिस्थितीत सुबाभुळीचा वापर वाढला आहे. या सोबतच विविध रसायने साधे मिठ सोडा आदिंचा वापर विविध पातळ्यावर केला जातो. वापरलेल्या कागदावर प्रक्रिया करुन पुन्हा कागदाची निर्मीती केली जाते. कारखान्यात मोठ्या यंत्राचा केला जातो. विद्युत शक्तीचा आधारे कारखाणे चालतात. यासाठी मोठ्या प्रमाणात विद्युत आवश्यक असते. चित्रातील कागद कारखाणाला वार्षिक 25 मेगावॅट एवढी विद्युत उर्जेची आवश्यकता असते. कारखान्याला लागणारा अर्धा विद्युत पुरवठा कारखान्याच्या स्वतःच्या जनरेटरनी पुरविला जातो. याशिवाय कागद कारखाण्यांना बारमाही पाण्याची आवश्यकता असते.

## कागद उद्योग -बांबुची लोप

कागद उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल जंगलातुन आणतात. कच्चा माल गोळा करणे सोपे काम नाही. साधारणत: बांबु आणि इतर मृदू लाकडांची झाडे भरपुर असणाऱ्या जंगलाजवळ कागद उद्योग उभारलेले जाते. कागदाच्या उद्योगात बांबु इतर सामग्री गोळा करण्यासाठी कंत्राटदाराची नेमणुक होत असे काही दशकापुर्वी पासुन हीच पध्दत प्रचलीत आहे. जंगलातुन बांबु गोळा करण्यासाठी कत्राटदारांनी आदिवासी समुदायांचा वापर केला जायचा (तुम्ही सहाव्या वर्गात कुनवरम या विषयी माहिती वाचली असेलच)

गतकाळात मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याने आता कच्चा मालाची उणीव जाणवत आहे. सद्या कागद उद्योग कच्चा मालासाठी ग्रामीण भागातील उप उत्पादने जसे सुबाभळीचा उत्पादनाला सरकार प्रोत्साहन देत आहे. दुरदुरच्या प्रदेशातुन मोठ्या प्रमाणात कच्चा मालाची वाहतुक होत आहे.

- कागद उद्योगासाठी लागणारे कच्चे पदार्थ कोणते ?
- विद्युत शक्ती ही एक प्रकारचा कच्चा माल हो का? कारणे सांगा ?
- तुम्हाला माहिती असलेल्या कारखाण्या बाबत तुमच्या शिक्षकांशी चर्चा करुन खालील तक्ता भरा ?



*Fig 9.3 Bamboo lifter*

SCERT TELANGANA

| अ.क्र. | उत्पादने | उद्योगाचे नांव | कच्चा माल |
|---|---|---|---|
| 1 | बुट/चपल | चप्पल कारखाना | चमडी, रब्बर, कॅन्वस |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |

- आपण कागदाचा वापर केला तर जंगल तोड मोठ्या प्रमाणात होईल त्यामुळे आहारोत्पादनाचे क्षेत्र घटेल असे तुम्हास वाटते का? या विषयी चर्चा करा?

आम्ही कागद कारखाण्यावर पोहोचलो. तेथे सुबाभुळ आणि बांबु यांनी भरलेले चार पाच ट्रक उभे होते. सकाळी 9.30 वाजल्यानंतर त्यांना आत प्रवेश होते. कामगारासाठी एक प्रवेशव्दार आणि वाहनांसाठी एक मोठे प्रवेशव्दार अशी वेगळी व्यवस्था होती. कागद कारखाणा जवळ आमची माहिती नोंदवुन आम्ही आत प्रवेश केलो. तदंनंतरच वाहने आत आली.

## कागद तयारीची प्रक्रिया Process of Paper-making

मालवाहु मोटारीतील कच्चा माल एक क्रेनच्या साहय्याने उचलुन बाजुच्या चबुतऱ्यावर टाकल्या जात होता. तेथुन तो माल यांत्रिक पट्याव्दारे तुकडे करणाऱ्या यंत्राकडे आपोआप रवाना होत होता. कागद तयार करण्यासाठी एकंदर पाच टप्पे आहेत. या कारखाण्यात प्रत्येक टप्प्यासाठी एक स्वंतत्र विभाग आहे. विविध टप्यावर विविध यंत्राचा वापर होते ते टप्पे असे.

*(i)* **तुकडे करणे** *(Chipping):* या पहिल्या टप्यात मोठमोठ्या लाकडाचे वा बांबुचे लहान लहान यंत्राच्या सहाय्याने तुकडे करतात. या विभागात साधारणत: 15 ते 20 कामगार काम करतात. तुकड्याच्या आकारावरुन त्यांची विभागणी केली जाते. एक ट्रक एवढ्या लाकडाचे तुकडे करण्यासाठी साधारणत: अर्धा तास लागतो. दिवसाचे 24 तास अखंडपणे काम चालु असते. 24 तास काम चालावे यास किती झाडे लागत असतील याची कल्पना करु शकता का?

*(ii)* **लाकडाचा लगदा तयार करणे** : लहान लहान तुकड्याने यंत्राच्या सहाय्याने फैबरलैन विभागकडे पाठविले जाते तेथे मोठमोंठ्या पात्रातुन अनेक रसायनांच्या साहय्याने यावर प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेमुळे लाकडाच्या तुकड्याचे लागदयात रुपांतर होते. या लगद्यात पुन्हा रसायने मिसळुन



*Fig 9.4 Labourer at chipping machine*



*Fig 9.5 Labourers at setting machine*



*Fig 9.6 Pulping machine (Fiber line)*

त्याचा रंग पांढरा शुभ्र केला जातो. कांही वेळानंतर हा लगदा पांढऱ्या शुभ्र दुधासारखा मळ नसलेला तयार होतो.

(iii) **लगदा पसरविणे** *(Spreading the pulp):* हा तयार झालेला लगदा पसरविला जातो. यासाठी मोठमोठ्या आकाराचे सिलेंडर,पडदे वापरले जातात. लांबी, रुंदी आणि जाळी यांच टप्प्यात ठरविले जातात. कागद तयारीत हा टप्पा अतिशय महत्वाचा असतो. याच टप्पयात आपणास दिसणारा कागद तयार होतो. यानंतर उरलेला लगदा सरकल्या पट्याव्दारे पुढे पाठविला जातो. उष्णतेपुढे व विशिष्ट बनावटी मुळे लगद्यातला अतिरिक्त पाणी बाहेर काढले जाते.

(iv) **दाब वाळवणे, गुंडळाणे** *(Pressing, drying and rolling):* या टप्प्यात हव्या त्या जाडीचा कागद तयार करण्यासाठी त्यावर दाब दिला जातो. यात लगदा पुर्णत: वाळल्यानंतर अंतीम टप्यात पुन्हा एकदा सिंलीगवर पसरविला जातो.

(v) **कापणे** *(Cutting):* यानंतरचा अंतीम टप्पा म्हणजे हव्या त्या आकारात कागदाची कापणी केली जाते. विविध आकारात कापुन गुंडाळत त्याची रवानगी गोदामात केली जाते. कागद उद्योगात अहोरात्र काम चालु असते.

## तुकड्या (Work in Batches)

या सर्व टप्यानंतर कागदाचे वेटोळे, गटे यांना अनुक्रमांक दिनांक अन्य माहितीची पत्रके चिकटवली जातात. यात अनेक प्रकारची माहिती असते. गट म्हणजे काय? तर कारखाण्यात येणाऱ्या एक ट्रक भरुन मालास एक गट असे म्हणतात. हा टप्पा टप्याने एका विभागातुन दुसऱ्या विभागात प्रक्रियेव्दारे जात असतो. एका गटातील कच्चा मालाचा अखेर पर्यंत वापर केला जातो. उदा. गट क्र. 201 असतो. जेव्हा तुकडे केला जातो तेव्हा लगदा तयारी विभागात गट क्र. 199 असतो त्याच प्रमाणे गट क्र. 201 जर लगदा विभाजित असेल तर तुकडे करण्याच्या विभागात गट क्र 202 असते. एक गटाशी संबंधीत सर्व कागदपत्रासाठी एकाच प्रकारचे कच्चे माल वापरला जातो. प्रक्रिया आणि दर्जा एकच असते. ही गटवार उत्पादन पध्दती अहोरात्र चालु असते. कोणत्याही गटात कोणतीही समस्या उत्पन्न झाल्यास तत्क्षण नियंत्रण कक्षाला कळते.

## कामाचे तास - पाळी

अहोरात्र चालणाऱ्या या कागदाच्या कारखाण्यात कामगार तीन पाळ्यात काम करतात. प्रत्येक आठ तासाच्या कालावधी प्रमाणे या पाळ्याचे नियोजन असते. अ,ब,क अशी पाळ्यांची नावे असतात. एकएका पाळीत साधारणत: 800-900 कामागार आसतात.

अ) सकाळी 6 ते दुपारी 2 पर्यंत

ब) दुपारी 2 ते रात्री 10 पर्यंत

क) रात्री 10 ते सकाळी 6 पर्यत

रात्र पाळीत काम करणाऱ्यां कामगरांना विशेष भत्ता दिला जातो. कर्मचाऱ्यांच्या पाळ्या बदलत



SCERT TELANGANA

असतात. दर आठवड्याला एक पाळी दुसऱ्याचे स्थान घेते. तर सकाळी 9.30 पासुन सायंकाळी 5 वाजेपर्यंत साधारण पाळी प्रशासकिय सेवक वर्गासाठी असते. ज्यात दैनंदिन कामे, प्रशासन, व्यापार, खरेदी, विक्री, कामगारांचे समस्या आदी कामे यावेळी केली जाते. ही कामे प्रशासकिय वर्गाद्वारे केली जातात.

### कागदाची विक्री (Selling the Paper)

कागद कारखाण्याना विविध शहरात विक्री केंद्र असतात. विक्रीत्यांचे जाळे असते. श्रीलंका, बांग्लादेश, नेपाळ, मलेशिया, सिंगापुर, नायजेरीया आणि दक्षिण आफ्रिका आदि देशासोबत कागदाचा व्यापार होत आहे.

या विक्री केंद्रा व्दारे कागदांची विक्री होत असते. इकडे विकसित रस्ते, लोहमार्ग आहेत. यामुळे कागदाची कच्च्या मालाची ने आण सोपी होती.

- कागदाच्या गठ्यावर गट क्रमांक, वजन, दिनांक इ.माहिती का चिटकवतात?
- कागदाचा उद्योग अहोरात्र का काम करतो? या उद्योगाची तुलना शेती कामासोबत करा?

- गेटवर सुरक्षा रक्षकाची गरज का आहे? वॉचमेन प्रमाणे तुम्ही अभिनय कराल का? वॉचमेन कोणाला आत सोडतो? कोणला प्रवेश नकारतो

### कागद उद्योगातील काम

एखाद्या कारखाण्यात अनेक प्रकारच्या कामगारांची भर्ती केली जाते. काही जण यंत्रावर काम करतात. व काही जण त्यांना मदत करतात. काही विद्युत पुरवठा करतात. तर काही दळणवळणाची कामे करतात. यात काही जण उच्च शिक्षीत असतात. जर काही जण तंत्रशिक्षिण घेतलेले अभियंता तसेच प्रशिक्षण घेतलेले आणि पॉलीटेक्नीक कॉलेजमधील पदविधर असतात. काही निरक्षर व्यक्तीही येथे काम कामाला असतात. त्यांना साफ सफाईची काम दिली जातात. या सर्वांची नियुक्ती काही अटीच्या आधिन राहुन केली जाते.

काही कामगार कायम स्वरुपी तर काही रोजनदारी स्वरुपाचे असतात. या प्रकारच्या कामगाराची गरज कामांनुसार असते. यांच्या बरोबरच कंत्राटी पध्दतीने कामगारही असतात. या विषयी आपण विस्तृत चर्चा करु या. कारखान्याच्या दाब विभागीय मधील आनंद हा एक कायम स्वरुपी कामगार आहे. निळे पॅट शर्ट तथा खाकी रंगाचा पॅट असा त्याचा पोषाख

**खालील रिकाम्या जागा भरा.**




SCERT TELANGANA

आहे. गत 10 वर्षापासुन तो काम करीत आहे. महिण्याला 15000 रुपये एवढे वेतन त्याला मिळते भविष्यनिर्वाह निधी, जिवन विमा इत्यादी सर्व सवलती त्याला मिळतात. सेवानिवृत्त झाल्यावर भविष्य निधी मिळते. त्यात भर म्हणजे कांही कारणास्तव जर त्याला नौकरीवरुन काढुन टाकल्यास अथवा एखादी दुर्घटना घडल्यास उद्योगाकडुन त्याला काही अंशी नुकसान भरपाई मिळते. दर वर्षी सुरजच्या पगारात काहीशी वाढ हाते. सुरजला अथवा त्याच्या कुटुंबातील इतर सदस्यांना आरोग्याच्या काही समस्या असल्या तरी त्यासाठी सरकारी इस्पीताळात मोफत इलाज केला जातो) (ईएसआय राज्य कर्मचारी विमा) यासाठी सुरजला स्वत:च्या वेतनातुन आणि त्याचे याजमान्य असे दोघे मिळुन आरोग्य विमाचा हप्ता भरतात. सुरजला या बरोबरच आठवड्याच्या शेवटी एक सुटी, सण-वार, काही जास्त सुट्या या सवलती मिळतात. गणवेश खरेदीसाठी, धुलाईसाठी विशेष भत्ता दिला जातो. उद्योगाने व्यापारात जास्त नफा कमविल्यास त्याला त्याचा थोडाफार फायदा होतो. यालाच बोनस असे म्हणतात. या कारखाण्यात साधारणत: 1800 कायम कर्मचारी सेवा बजावतात.

चंदु नावाचा आणखी एक कामगार दररोज कारखाण्यात येऊन काम करतो. तथापी तो कायम कर्मचारी नव्हे. तो कंत्राटी कर्मचारी आहे. मोठ मोठ्या वाहणातुन कच्चा माल उतरविणे, पॅकींग करणे, तयार कागदाचे गट्ठे चढविणे इत्यादी कामे तो करतो. तो गत वर्षी महाराष्ट्रातुन येते आला आहे. कागद कारखाण्यात काम मिळवुन देतो म्हणुन सांगणाऱ्या एका कंत्राटदाराच्या माध्यमातुन कामाला आला. त्यांची व त्यांच्या कंत्राटदाराची त्यांच्या राहत्या गावी भेट झाली. कायम कर्मचाऱ्यांच्या तुलनेत उमर सारख्या कर्मचाऱ्यांला कमी वेतन मिळते. (महिण्याला साधारण 8000 रुपये) याला इतर भत्ते, वैद्यकीय सहाय्य, बोनस इत्यादी मिळत नाही. त्याला पगारी सुट्या मिळत नाही. तरीही वर्षभर कामाची उपलब्धता असते. दोन ते तीन वर्षानंतर त्याची सेवा नियमीत केली जाते.

या कारखाण्यात काम करणाऱ्या महिलांना साफ सफाई तयार कागदांच्या गठ्ठ्यावर लेबल लावणे सारखी कामे असतात. याच कारखाण्यात तारा रोजंदारी कामगार म्हणुन काम करते. गरजेनुसार अशा कामगारांना रोजगार दिला जातो. अशा कामगारांना रोजंदारी कर्मचारी असे म्हणतात. तारा दररोज कामाच्या अपेक्षेने कारखान्यात येते. आठवड्याला चार ते पाच दिवस तीला काम मिळते. मुख्यत्वे करुन तिला साफ सफाईचे काम दिले जाते. लाकडाचे तुकडे जिथे केल्या जातात तिथे मोठ्या प्रमाणात केर कचरा, धुळ जमा होते तिला तिथे सफाई करावी लागते. तसेच उर्वरीत वेळेत यंत्र पुसने या सारखी लहान लहान कामे करावी लागते. गेल्या तीन वर्षापासुन ती येथे काम करीत आहे. तिला 2500 रुपये महिण्याकाठी मिळतात. तीला 100 ते 150 रुपये एवढी मजुरी दिवसाकाठी दिली जाते. तीची मजुरी दररोज दिली जाते. या उलट सुरज सारख्या कायम कामगारांना मिळणाऱ्या सुविधा तिला मिळत नाहीत. साधारणत: कारखाणदार उत्पादन खर्च वाचविण्यासाठी



*Fig 9.7 Paper cutting machine*

अनेक कामे रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या मार्फत करणे पसंद करतात. कधी कधी कमी मनुष्यबळ वापरुन यंत्राच्या सहाय्याने जास्तीत जास्त कामे करुवुन घेतली जातात.अशा प्रसंगी कामगार आणि त्यांच्या संघटना यांच्यात संबंध सुरळीत ठेवण्यासाठी वेळोवेळी चर्चा करुन वातावरण सौहार्द्र ठेवल्या जाते. खाजगी मालकीच्या कारखाण्यात कामगार पाठोपाठ लेखा परिक्षक, लिपीक, व्यवस्थापक इत्यादी अधिकारी असतात. त्यांना जास्त वेतन दिले जाते. कारखाण्यातील अनेक वरीष्ठ पदावर मालकाच्या कुंटुंबातील व्यक्तीची नेमणुक होते. त्यांना अर्थातिच जास्त वेतन दिले जाते. त्यांना अनेक प्रकारचे भत्ते, मोफत निवास, मुलांना मोफत शाळा इत्यादी सवलत दिल्या जातात.



*Fig 9.8 Inside the factory*

## कागद उद्योग मालकी कोणाची?

कागदाच्या उद्योगाची मालकी कोण्या एकाडे नसते. तर अनेक जन एकत्र येऊन एका कंपनीची स्थापना करतात. त्याव्दारे कारखाण्याची उभारणी केली जाते. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असते हे लोक मग भांडवल तथा बॅंकेचे कर्ज यातुन उद्योगाची उभारणी करतात. विशिष्ठ कार्यलयीन कामासाठी कायम कर्मचाऱ्यांची व्यवस्थापक प्रशासकिय वर्गाची नेमणुक केली जाते. त्यांना चांगले वेतन दिले जाते. परंतु कामगार मात्र वेतन घेत नाही. उत्पादन खर्च वजा करुन मिळालेल्या नफ्याचे मात्र ते वाटेकरी असतात. कधी कधी नफ्यासह तोटाही त्यांना सहन करावा लागतो.

◆ आनंद, उमर, पुष्पा यांची तुलना करुन खालील तक्ता भरा.

| अ.क्र. | नांव | काम | अनुभव | उत्पन्न | इतर फायदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सुरज | | | | |
| 2 | चंदु | | | | |
| 3 | तारा | | | | |

- उद्योगात कायम, कंत्राटी तथा रोजंदारी कामगारांची आवश्यकता का असते?
- हंगामी कामगारांच्या समस्या काय असतात? असे तुम्हास वाटते?
- तेलंगानातील कागद कारखाण्यात काम करण्यासाठी बाहेरील राज्यातील लोक का येत असतील याचा विचार तुम्ही करु शकता का?

SCERT TELANGANA

खालील विषयांना अनुसरुन औद्योगीक उत्पादनाच्या प्रमुख लक्षणावर चर्चा करा?

1. यंत्रे
2. कच्चा माल
3. उर्जा(विद्युत) आणि जल
4. उत्पादन
5. कर्मचारी
6. व्यवस्थापक
7. बाजारपेठ
8. मालक

काही कारखाने एक व्यक्ती, समुह किंवा गटाच्या मालकीत न राहता. सरकारी व्यवस्थापनात राहतात. याचा उद्देश जनतेच्या फायद्यासाठी सरकार मार्फत केला जातो.

कारखाण्यासाठी मोठ्या प्रमाणात कच्च्या मालाची आवश्यकता असते. यामुळे सहजपणे निर्माण झालेली नैसर्गिक जंगले, नद्या, खाणी, यांचा समावेश होते आहे.याच वेळी कारखाण्यातुन निघणारा धुर ही एक मोठी समस्या आहे. यामुळे परिसरातील अनेक गोष्टी प्रदुषीत होत आहेत. पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी विविध मार्ग शोधावे लागत आहे. कारखाण्यामुळे अनेकांना रोजगार मिळतो. तथापी कारखाण्यातील प्रदुषण मुळे विषारी वायुमुळे कामगाराां गंभीर आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते. कमी वेतन दिले जाते. यामुळे त्यांचे राहणीमान खालावते. गलिच्छ वस्त्यातुन अल्प सुविधासह त्यांना जिवन जगावे लागते. कारखाण्यामूळे निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणुक कशी करावी ही एक सध्या मोठा प्रश्न आपल्या पुढे आहे. कामगाराचे जिवनमान उंचावण्यासाठी काय करावे याचा विचार करणे गरजेचे आहे.

## प्रदुषण (Pollution)

आपण कारखाण्यात प्रवेश केला तर एका विशिष्ठ प्रकारच्या दुर्गंध येतो. याचे कारण म्हणजे त्या कारखाण्यात वापरली जाणारी विविध रसायन होत. परिसरातील अनेकांशी आम्ही बोललो. कारखान्याचा वास आम्हाला नित्याचाच आहे. शेतातील झाडे, भाजीपाला, फळे, फुले आदि उत्पादने धुर तथा धुळी ने माखलेले असतात असे ते म्हणाले. या कारखाण्यात शुध्द पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो व प्रदुषीत पाणी मोठ्या प्रमाणात बाहेर टाकले जाते तेच पाणी नदीत सोडले जाते.

गत वर्षी या कारखाण्यात जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पात रसायण मिश्रीत पाण्याचे शुध्दीकरण केले जाते. यात यंत्राच्या सहाय्याने घातक पदार्थ जसे हवा, पाणी, आहार, जमीन यांना घातक रसायनांना वेगवेगळे करुन प्रदुषण होणार नाही. असे पाणी बाहेर पुरविले जाते. यातील उर्वरीत धनरुप कचरा शेतात खत म्हणुन तर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर कृषी उद्योगासाठी केला जातो.

आपल्या राज्यात देशात अनेक उद्योग आहेत. अनेक प्रकारच्या वस्तु निर्माण करतात. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त उत्पादन केल्या जाते.



*Fig 9.9 Rolls of papers*

SCERT TELANGANA

**महत्वाचे शब्दः**

1. उत्पादनाची प्रक्रिया
2. सरकता पट्टा
3. फायबर लाईन
4. लेबल
5. भत्ते
6. बोनस
7. प्रदुषण
8. कामाचे तास
9. कच्चा माल

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. समजा तुम्हाला एखाद्या चर्मद्योग किंवा वस्त्र उद्योग उभारवयाचा आहे त्यासाठी काय काय तयारी करावी लागेल ते सांगा?
2. कागद तयारी प्रक्रिया तुमच्या शब्दात लिहा?
3. कधीतरी कागद कारखाना बंद पडेल असे तुम्हास वाटते का? कामगारांची परिस्थिती काय?
4. कागद नसलेल्या जगाची कल्पना करा. कागदाऐवजी कशाचा वापर केला जाईल कल्पना करा?
5. कारखान्याच्या प्रदुषणापासुन रक्षणाचे काही उपाय सांगा?
6. कागद कारखाण्याची आवश्यकता/अनावश्यकता या विषयी वर्गात चर्चा करा?
7. कागद कारखाण्यातील कायम कामगारांच्या वेतन उत्पन्नाविषयी एक सारणी तयार करुन त्याच बरोबर हंगामी, कंत्राटी, रोजंदारी कामगारांची तुलना करा?
8. हातमागावरील कापड उद्योग तथा कारखाण्यातील कागद उद्योग याची खालील मुद्या आधारे तुलना करा (i) कामाचे ठिकाण (ii) यंत्रे/उपकरणे (iii) कच्चा माल (iv) कामगार (v) बाजारपेठ (vi) मालक
9. कोमारम भीम जिल्ह्यातील सिरपुर कागजनगर येथील कागद कारखाना जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी का उभारण्यात आला नाही याची चर्चा करा?
10. जगाच्या नकाशात खालील देश दाखवा.
    1. श्रीलंका 2. सिंगापुर 3. नायजेरीया 4. दक्षिण आफ्रिका 5. नेपाळ
11. पान क्र. 91 वरील 3 रा परिच्छेद वाचा. तुम्ही विचार करु शकता का? कारखान्याचे मालक कामगारांच्या आरोग्याची काळजी घेतात का?

***प्रकल्प कार्यः***

तुम्ही पाहण्यातच आले असेल की, तुमच्या भागात कांही कारखान्यांमुळे प्रदुषण होत आहे, किंवा कल्पना करा की, तुमच्या भागातील एका कारखाण्यामधुन बाहेर पडणाऱ्या धुरामुळे मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदुषण होते. त्या संबंधी एका दैनिकाच्या संपादकाला तक्रार करणारे पत्र लिहा. आणि ह्या विषयावक वर्गात चर्चा करा?

SCERT TELANGANA

पाठ 10

# दळण वळणाचे महत्व

आपल्या नित्य जिवनात आपण एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जाण्याकरीता विविध प्रकारच्या वाहणाचा वापर करत असतो. नागरीक कशा प्रकारे राज्यमार्ग, रेल्वेमार्ग, वायुमार्ग, जलमार्ग यांचा उपयोग घेतात. या विषयी या पाठात आपण शिकु या. ऐवढेच नाहीतर लोक कशा प्रकारे वाहतुकीच्या साधनाच्या नित्य जिवनात, व्यापारात त्याचा कसा वापर करुन घेतात. या विषयी माहिती पाहु या. इतर वाहतुकीच्या साधनाचा अभ्यास तुम्ही पुढच्या वर्गात अभ्यास कराल.

विविध प्रकारच्या दळण वळण व्यवस्थे विषयी तुम्हास माहिती झालीच आहे.

- काही शब्द देण्यात आले आहेत. त्यांचा वापर करुन खालील तक्ता पुर्ण करा. काही शब्दांची पुनरावृत्ती झाली आहे. त्यांची कारणे सांगा
  ***यात्रेकरु, कार, मासे, पशु, धाण्य, बैलगाडी, पेट्रोल, कामगार, जहाज, हेलीकॉप्टर, टँकर, लॉरी, सायकल, साधु, लोखंड, वस्तु, रेल्वे, आंबे, नाव, मीठ***

| रवाना व्यवस्था | वापरण्याचे वाहन | कांही उत्पादक/ सामुहीक नागरीक वापरावयाचे वाहन |
|---|---|---|
| रस्ते | | |
| रेल्वे | | |
| जलमार्ग | | |
| वायु मार्ग | | |

## तेलंगानातील दळण वळण व्यवस्था

तेलंगानातील रवाना व्यवस्थेचे जर मुखचित्र पाहिले तर खालील माहितीची आपणास जाणिव होते.

**रस्ते (Roads)**: भारत देशात जास्त रोड निर्माणीचे कार्य केंद्र व राज्यसरकार तर्फेच होत असते. आपल्या अनेक प्रकारचे रस्ते, रोड आहेत. त्यापैकी राष्ट्रीय महामार्ग अनेक राज्यातुन निर्माण केल्या गेले आहे. उदा. राष्ट्रीय महामार्ग नं.7 किंवा (44) उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगाना, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामीलनाडु राज्यातुन जातात. सरकार जिल्ह्यांना लहान लहान शहरांना गांवाना जाण्याकरीता रोड निर्माण करत आहे. सिमेंट, गिट्टी पासुन तयार केले जाणाऱ्या रोंडाचे काम ग्राम पंचायतीना सोपविण्यात येते. शहरातील रोड निर्माण

SCERT TELANGANA

काम नगर पालीकेस सोपविण्यात येते. राज्याच्या सरहद्देस असणाऱ्या रोडला अंतरराज्य सरहद्द रोड म्हणतात. खेडे गावातील लोकांना शहरास जोडण्याकरीता असे रस्ते महत्वपुर्ण भूमीका पार पाडत आहे.




*Fig 10.1: In 1932 road transport was introduced under the Nizam with 27 vehicles. You can also see the logo of the then transport company*

**रेल्वमार्ग (Railways):** भारतातील 1/5 इतके लोक रेल्वेने प्रवास करतात. रेल्वेमार्गाव्दिारे मुख्यता कोळसा, खते, सिमेंट, धान्य इत्यादी वस्तु रवाना केल्या जातात. सगळया जिल्ह्यांना जोडल्या गेल्यासारखे आपल्या राज्यात रेल्वेचे जाळे आहे. रेल्वेव्दारे विविध वस्तु घेऊन जाणे व आणणे केले जाते. ते समुद्रापर्यंत पोहचविल्या जातात.

**वायुमार्ग (Airways) :** तेलंगानात फक्त एकच विमानतळ आहे. हे अंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. हैद्राबाद शमशाबाद येथील विमानतळ अंतराष्ट्रीय आहे. विमानामुळे विविध देशांना प्रवास केला जातो. देशी विमानतळ व्दारे देशातील मुख्य शहर नगरांना प्रवास केला जातो.

**जलमार्ग (Waterways):** भारतीय व्यापारी विविध प्रकारच्या वस्तु जलमार्गाव्दिरेच आयात निर्यात करतात. याची मोठमोठी बंदरे असतात. तेलंगानात एकही बंदरे नाहीत. आंध्रप्रदेशात 15 बंदेर आहेत. त्यापैकी विशाखापट्टणम बंदर हे सर्वात मोठे बंदर आहे. गोदावरी, कृष्णा, पेन्ना नदी आणि त्याचे कालवे याचा वापर जलमार्गा करीता केल्या जातो.

- भारताच्या नकाशात विमानतळे आणि जलमार्गाची बंदरे ओळखा?

## रस्त्यांचा उपयोग व उत्पादनाची विक्री

जास्तीत जास्त लोक रस्त्यावर चालणाऱ्या वाहनाचा उपयोग घेतात. रवाना व्यवस्थेवर दृष्टी केंद्रीय केली तर तेलंगानात खेडे गावाशी जोडल्या जाणाऱ्या रस्ते यास खुपच विकास झाला आहे. 2001 पर्यंत 3/4 ग्रामिण प्रांतात रवाना व्यवस्था झाली आहे.

आता पर्यंत वर्गात शिकविल्या जाणाऱ्या पाठात शेतकरी मासे पकडणारे मजुर वर्ग वेगवेगळ्या कारणास्तव रवाना व्यवस्थेवर कशा प्रकारे अवलंबुन आहेत. याचे वर्णन करण्यात आले. शेतकऱ्यांचे पिकविलेले धान्य रयतु बाजारा पर्यंत पोहचविण्या करीता मासे पकडणारे मासे बाजारपेठे पर्यंत पोहचविण्या करीता ट्रक हे महत्वाचे साधन आहे. कारखाण्यातील वस्तुची उत्पत्ती करते वेळेस रवाना व्यवस्थेचा विचार केला जातो. उदा. कापसाचे पिक घेतले तर शेतकऱ्यांने काढलेला कापुस कारखाण्यास घेऊन जातात. कापसा पासुन कपडा तयार करण्यापर्यंत पुष्कळ बदल कापसात येत असतो. शेवटी कापड तयार होतो. कोणत्याही शहराची बाजारपेठ ही दळणवळणाच्या सोयीवर आधारीत असते.

SCERT TELANGANA

- खालील ओळी वाचुन त्यातुन निर्माण होणाऱ्या समस्यांना उपाय दाखवा?

सत्यामपेल्ली गावातील शेतकरी आपले धान्य सात कि.मी. दुर असणाऱ्या नयापेट शहरात विकण्यास घेऊन जातात. बैलगाडी व्दारे 10 पोते धान्य घेऊन जाण्यासाठी 50 रु. खर्च येतो. ट्रक्टर असेल तर एका पोत्यास 20 रुपये घेतात. त्यात 30 ते 40 पोते घेऊन जाता येते. लॉरी एकावेळी 150 ते 170 पोते घेऊन जाता येते व ते एका पोत्यास 10 रुपये घेतात. जर लांबचा प्रवास असेल तर लॉरी जास्त पैसे घेते म्हणजे नायपेट शहरात असणारा होलसेल व्यापारीस धान्यास नायपेट पासुन जिल्हामुख्यालयापर्यंत असणारे 100 ते 120 कि.मी. अंतराचे शहर मार्टुरुला धान्य रवाना करण्याकरीता एका पोत्यास 50 रुपये वसुल करतात. ट्रक ऑपेरटला 500 कि.मी. वस्तु रवाना करण्याकरीता एका टनमागे 800 ते 1000 रुपये वसुल करीत आहेत.

त्या गावात धान्य पिकवणारे तिन शेतकरी आहेत. त्यांचे उत्पन्न 25, 50, 75 पोते हे शेतकरी बाजारपेठ यात विकण्याकरीता इच्छुक आहेत. ते शहर 25 कि.मी. दूर आहे.

आता त्यांचे धान्य शहरास रवाना करण्याकरीता तुम्ही कसे मार्गदर्शन कराल का?

- तुम्हास माहिती असणाऱ्या दोन वेगवेगळ्या प्रदेशातील विविध प्रकारच्या बसमध्ये प्रवास करण्यासाठी लागणारा वेळ व त्यांचे भाडे याची माहिती खालील तक्त्यात भरा?



*Fig 10.2 Transporting Animals*

## परिवहन कार्यव्यवस्था व रोजगार

प्रत्येक बस चालविण्याकरीता चालक व वाहकाची गरज असते. वाहणे चालवण्याकरीता शेकडो हजारों लोकांची गरज असते.

उदा. तेलंगाना राज्य मार्ग परिवहन महामंडळ (TSRTC) 64,000 कामगार कडुन 10000 बस चालवतात. व जनेतला योग्य त्या ठिकाणी पोहचवितात. हजारों प्रवासी एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जातात. या संस्थेतील कामगार अंकाऊट पाहणे, बसदुरुस्ती करणे, बस डीपोतील काम व इतर कामे करतात तसेच कांही कामगार बसपास टिकेट विकणे, बस चेकींग इत्यादी कामे करतात.

तेलंगाना रोडवर चालणाऱ्या कोठ्यावधी वाहनात कमी जास्त 3/4 एवढी वाहने दोन चाकी, आहेत. पेट्रोल पंप, डिझल पंप, वर्कशाप, वाहने विकण्याचे दुकान लहान लहान भाग विकण्याचे इत्यादी दुकाने रवाना व्यवस्था सुव्यवस्थीत चालण्यासाठी उपयोगी पडतात.

| बस प्रकार | टिकीट | लागणारा वेळ |
|---|---|---|
| ग्रामिण बस/ साधारण | | |
| जलद | | |
| डिलक्स | | |

SCERT TELANGANA

- तक्त्यात दाखवलेल्या विविध प्रकारच्या बसचे भाडे वेगवेगळे आहेत ते तुम्हास योग्य वाटते का?
- बस भाड्यात फरक आहेच तसेच प्रवासात लागणारा वेळ पण फरक आहे. ते कसेही असो. तुमच्या मते जास्त लोक कोणत्या प्रकारच्या प्रवास करण्यास इच्छुक असतात. तुम्ही प्रवाश्यांना सवलती उपलब्ध करुन देणारे अधिकारी असल्यास कोणत्या प्रकारच्या बसला तुम्ही प्राधान्य देता?

## परिवहन सेवा व निवड

जनतेस उपयोगी पडणारी परिवहन व्यवस्था ही सुविधा व प्रवासाचे भाडे भरण्याच्या क्षमतेवर अवलंबुन असते. एका एका वेळेस वेगवेगळी वाहने वापरण्याची गरज असते. उदा. बेंगलुरु जाण्यासाठी बस, रेल्वे व वायुमार्ग आहेत.

पिढ्यान पिढ्या पासुन दुर देशांना जाण्याकरीता किंवा दुर देशांना सामान घेऊन जाणे व दुर देशातुन समान घेऊन येण्याकरीता जहाज, नावे फारच उपयोगी पडत असतात. पण सध्या जहाजाने प्रवास करणारे प्रवासी कमी झालेत. पण सामान पाठविण्यासाठी जहाजच वापरले जातात.

शहरात वाहने वापरण्याची पध्दत थोडी वेगळी दिसुन येते. शाळेत जाण्यासाठी कांही मुले बसचा उपयोग घेतात. तर काही मुले चालत जातात. कारखाण्यात काम करणारे कामगार तसेच बँकेत मध्ये काम करणारे कर्मचारी तसेच दुकान व घरी काम करणारे कामगार पण वाहणावर अवलंबुन असतात. प्रत्येक शहरात सार्वजणिक बस वाहन



*Fig 10.4 Railway workers*



*Fig 10.3 Old and new modes of transport*

असु शकत नाही. त्यामुळ लोक स्वत:चे वाहन किंवा किरायाचे वाहन ऑटो, टक्सी यावर अवलंबुन असतात.

वाहतुकीचे भाडे जर जास्त असतील तर लोकांना एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी त्रास होतो. उदा. एकाद्या प्रदेशात पगार जास्त असेल तर कमी पगार असलेल्या भागातील लोक जास्त पगार भेटणाऱ्या भागात जाण्याचा पर्यंत करतात. जर प्रवासाचे भाडे जास्त असतील तर लोक जास्त भाडे भरुन जाण्यास मागेपुढे विचार करतात. कमी उत्पन्न असणारे लोकांना आपल्या उत्पन्नाचा अधिकभाग प्रवास भाडे म्हणुन द्यावा लागत असतो. तो त्यांना त्यांच्या उत्पन्नाच्या क्षमतेपेक्षा जास्त होते. चालत जाणे, सायकल चालवणे याव्दारे दुर प्रवास करणे त्रास दायक ठरते. मोठठ्या शहरात जनतेना चालवण्यासाठी सगळे रस्ते असतात. पण त्यावर लहान लहान व्यापारी अतिक्रमण करीत आहेत. रस्त्यावर चढाव करत असत. मोटार वाहणावर प्रवास करण्यास तयारी दाखवत नसत.

SCERT TELANGANA

- उमर आणि इब्राहीम ही मुले एका शाळेत एकाच वर्गात शिकतात. ते राहण्याचे ठिकाण मात्र वेगवेगळे असले तरी त्या दोघांना तीन कि.मी. अंतर प्रवास करुन यावे लागते. इसाक शाळेस सिटी बस व्दारे येतो. तर राजेश शाळेच्याबस व्दारे येतो. तरही दोघे वेगवेगळ्या वाहणाव्दारे शाळेत येण्याकरीता यांच्या कुटुंबिया समोर कोणकोणते कारणे असतील?

## दाट वस्ती - प्रदुषण

सध्याच्या परिस्थितीत शहरात लोकसंख्या वाढत आहे. गर्दी व परिवहन भाडे वाढत आहेत. शहरात जर सरकारी सार्वजनिक वाहतुकीची साधने नसती तर लोकांना स्वत:चे वाहन घ्यावे लागले असते. त्या करीता शहरात ट्राफिक व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी ट्रफिक कंट्रोल रुम (वाहतुक नियंत्रण कक्ष) व रोड दुरुस्ती कराव्या लागतात. उदा. सहा महानगरात निवास करणाऱ्या लोकांची संख्या 1981-2001 च्या काळात दुप्पट वाढ झाली. तर मोटार वाहणांची संख्या त्या काळात आठ पटीने वाढली.

मोटार सायकल, वाहणाचा वापर फार वेगाने वाढला. यामुळे जास्त पेट्रोल, डिझलचा वापर होत असल्यामुळे वायु- हवा प्रदुषणास वाढ झाली आहे. वायु प्रदुषण कमी करण्यासाठी पेट्रोल वापरणे कमी करावे. कमी खर्चात जास्त लोक प्रवास करणाऱ्या वाहनामुळे काही प्रमाणात प्रदुषण नियंत्रण करता येते.

## सुरक्षित प्रवास Travelling safety

सध्याच्या धावपळ गर्दीत प्रवास करणे धोक्यात पडत आहे. रोड अपघात, जख्मी होने असे कुटुंबातील मुख्य व्यक्तीवर झाल्यास त्या कुंटुंबातील इतर लोकांना त्रास होत आहे. रोड अपघातात मरणाऱ्याच्या संख्येत जास्त सायकल स्वारच आहेत. पायी चालणे रस्ता ओलांडणे या पासुन पण अपघात होतात. अपघात हा फक्त रोडवरच नाही तर इतर ठिकाणी सुध्दा होत असतो. रोड व रेल्वे पहा ज्या ठिकाणी मिळतो त्या ठिकाणी गेट असते रेल्वे येत असल्यास इतर


[redacted]

वाहने रुळावर न येण्याकरीता गेट लावतात. व रेल्वे गेल्यास ते काढतात. पण कांही ठिकाणी रोड व रेल्वे रुंळ एकत्र असतात. त्या ठिकाणी गेट असत नाही त्या वेळेस वाहणदांराची इकडे तिकडे पाहुन रेल्वे गेट क्रांस करावा. नाही तर अपघात होण्याची शक्यता असते.

## रोड सुरक्षतेचा आठवडा

प्रत्येक वर्षी पहिल्या आठवड्यात देशातील रोड रवाना शाखा रोड सुरक्षा महोत्सव कार्यक्रम आयोजीत करतात. यात वाहतुकीच्या नियमांची माहिती दिली जाते. शासनातर्फे चालवल्या जाणाऱ्या संस्था टीएस आरटीसी ही चालकांना शिक्षण देण्याचे कार्य करीत

SCERT TELANGANA

असते. ही संस्था शाळेतील मुलांना निंबध स्पर्धा तसेच वाहतुकीचे नियमाचे पालक करणे, सुरक्षीत प्रवास करणे, रोड पार करणे, यावर मार्गदर्शन करतात. आपण प्रवास करीत असलेले वाहन कोणतेही असो बस, रेल्वे, विमान, जहाज, मोटार सायकल हे यातुन प्रवास करतांना नियमांचे पालन करावे. नियमाचे पालन केल्यास अपघाताचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते.



*चित्र 10.6 विशाखापट्टम मधील बंदरगाह*

- तुमच्या जवळच्या ट्राफिक पोलीस किंवा ड्रायविग स्कुल किंवा ड्रायविंग लायसन्स असणारा व्यक्तीशी संपर्क करा व चालक कशाप्रकारे प्रशिक्षण घेत आहे यावर चर्चा करा व ड्रायविंग शाळेत प्रदर्शित असणाऱ्या विषयांचे निरक्षण करा?
- रोडचा वापर करते वेळेस कोणते नियम पाळावेत, रोडवर कशा प्रकारे सुरक्षित प्रवास केल्या जातो यावर चर्चा करा व तुमच्या वर्गात ट्राफिक नियमावर एक चार्ट तयार करुन वर्गात प्रदर्शित करा?

**महत्वाचे शब्द :**

| | |
|---|---|
| 1. सुरक्षित प्रवास | 7. राज्य महामार्ग |
| 2. रस्ते मार्ग | 8. ग्रामिण रस्ते |
| 3. वायुमार्ग | 9. शहरी रस्ते |
| 4. जलमार्ग | 10. सरहद्द रस्ते |
| 5. रेल्वेमार्ग | 11. टिएसआरटीसी |
| 6. राष्ट्रीय महामार्ग | 12. रस्ताबंदी |

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. व्यवसाय वस्तुनिर्मीती करीता वाहतुक व्यवस्था कशाप्रकारे उपयोगी पडते?उदाहरणसहीत स्पष्ट करा.
2. बसचा वापर रेल्वेच्या प्रवासापेक्षा वेगळा कसा आहे?
3. ग्रामिण भांगाना वाहतुक व्यवस्था का आवश्यक आहे?
4. आपल्या देशासाठी जलमार्ग का आवश्यक आहे?
5. वाहतुक मार्ग व जिवनाचा जवळचा संबंध असे का म्हणतात.
6. कारखाण्यात तयार झालेल्या वस्तु विकण्याकरीता वाहतुक भाड्यात जर वाढ झाली तर काय होईल? उदाहरणासह वर्णन करा?
7. रेल-रोड अपघात टाळण्यासाठीच्या कांही घोषणा लिहा?
8. वाहणाच्या जादा वापरामुळे गर्दी वाढतच आहे. यासाठी तुम्ही काही सुचना कराल काय?
9. तेलंगानाचा नकाशा काढुन त्यात हैद्राबाद दर्शवा?

**चर्चा:** विद्यार्थ्यांसाठी, पोलीस अधिकारी/हवालदार यांची एक चर्चा/प्रात्यक्षिक ***रस्ते अपघात-निवारण*** याविषयावर990 आयोजित करा?

**Project:**

दळणवळणाच्या कार्यालतील एका वाहणचालकाची मुलाखत घेऊन दुर्घटना रहीत प्रवासाविषयी एक अहवाल तयार करा?



SCERT TELANGANA

पाठ 11

# नविन राज्ये आणि राजे

## पहिला भाग

सातव्या शतकानंतर अनेक राजघराने निर्माण झाले. सातव्या आणि बाराव्या शतकातील मध्य काळातील भारतीय उपखंडातील विविध राज्यांचा राज्यक़ारभार चालविणाऱ्या राजघराण्यांचा नकाशा -1 मध्ये आपण पाहु शकतो.

- गुर्जर, प्रतिहार, राष्ट्रकुल, पाल, चौल, चहामन इत्यादी राज्यांना ओळखा.
- वरील राजघराण्यांच्या राज्यकारभारात राज्ये आज काणे कोणकोणत्या प्रदेशात आहेत ते ओळखाल का?




**नकाशा - 1**
**इ.स. 7-12 व्या शतकातील प्रमुख राजे व त्यांची राज्य**

SCERT TELANGANA

## नविन राजघराण्यांची निर्मीती

भारत देशात सातव्या शतकात विविध प्रांतात अनेक जमीनदार किंवा मुख्य योध्दा शासन चालवित होते.त्या काळाचे राजे या शासकांना स्वत:चे सामंत राजे व गौण समजत असत. स्वत:चे सामंत राजे स्वत:साठी उपहार,भेट आणावेत त्यांच्या न्यायस्थानात हजर व्हावेत. सैनिक दलात मदत घ्यावेत अशी आकांक्षा करीत असत. सामंत राजांचा हक्क, संपदा प्राप्त होण्याच्या क्रमात स्वत:चे स्वत:ला महासामंत, महामंडळाधिकारी म्हणुन घेत असत. काही वेळा त्यांनी स्वतंत्र राज्याची स्थापना करुन घेतली.

दख्खन प्रांतात राष्ट्रकुटा संबंधीत या सारखे उदाहरण आढळुन येते. राष्ट्रकुल अगोदर कर्नाटकातील चालुक्य राजांचे सामंत राजे होते. आठव्या शतकाच्या मध्यक काळात राष्ट्रकुट घराण्याचा मुख्य राजा दंतदुर्ग यांने चालुक्य प्रमुखास काढुन टाकले. हिरण्यगर्भ नावाच्या धार्मिक विधिची स्थापना केली. या विधीस ब्राम्हणांच्या मदतीने चालवु लागले. जन्माने मी क्षत्रीय नसुन कर्माने माझ्या क्षत्रियात पुनजन्म होऊ शकतो असा विधीचा सार होय.

- आजच्या काळात राजा होण्यासाठी राज्यकारभार चालविण्यासाठी क्षत्रिय जातीतच जन्म घ्यावा लागतो का?

काही संदर्भात संपन्न कुटुंबांनी त्यांच्या सैनिक शक्तीस गोळा करुन स्वत:च्या राज्य विस्तारासाठी त्यांचा उपयोग करुन घेतला. कदंब घराण्याचा मयुरशर्मा, गुर्जर घराण्याचा प्रतिहोर हरीशचंद्र यांनी ब्राम्हण असुन देखील सांप्रादियक धर्म (वृत्ती) सोडुन हातात शस्त्र घेतली. कर्नाटक, राजस्थान ही राज्य काबिज करुन नविन राज्याची स्थापना केली.



*Fig 11.1 Wall relief from Cave 15, Ellora, showing Vishnu as Narasimha, the man-lion. It is a work of the Rashtrakuta period*

## प्रशस्ती आणि भुदान (*Prashastis* and Land Grants)

पुर्वी राज्यकारभारात राजे लोकांची प्रशंसा केली जात असते व प्रशंसा पत्रे लिहिली जात असत. ही प्रशंसा पत्रे राजा, त्यांचे कुटुंब, त्याच्या पुर्वकाळ त्याच्या पुर्वीचे राजे कोणत्या काळातल्या राजाची महानता त्याचा पराक्रम या बाबींची माहिती देतात. राज्यकारभारात सहकार्य करणारे ब्राम्हण पंडीत अशा प्रशंसा पत्रास लिहित असत. विजयाचे वर्णन करीत असत.

**नागभट्टाचा पराक्रम (The "achievements" of Nagabhata)**

त्या काळाचे अनेक राजे स्वत:च्या पराक्रमाचे वर्णन करुन घेत असत व प्रशंसा पत्रावर लिहायला लावत मध्यप्रदेशात ग्वालीयर मध्ये उत्त्खननात सापडलेल्या संस्कृत लिपीतील प्रंशसा पत्रात प्रतिहार घराण्याचा राजा नागभट्ट याच्या पराक्रमाचे वर्णन आहे. आंध्रराजे सैधंव(सिंध) राजे, महाराष्ट्रातील विदर्भ राजे, ओरीसातील कलिंग राजे, तो युवराज असतांनाच नागभट्टाने या राज्यावर विजय मिळविला होता. त्याने कनोज काबिज केले. त्याने बंगालचा एक भाग वंग, गुजरात मधील एक भाग अनार्थ, मध्य प्रदेशातील मालवा, तुरुष्क( टर्कीचे) वत्स, मस्त्य यासारख्या उत्तर भारतातील राजांचा पराभव केला व राज्य काबिज करुन घेतले. चित्र 1 नकाशात नागभट्टाच्या राज्यांना ओळखा.(घराण्यातील राज्यांना ओळखा)



*Fig 11.2 This is a set of copper plates recording a grant of land made by a ruler in the ninth century, written partly in Sanskrit and partly in Tamil. The ring holding the plates together is secured with the royal seal, to indicate that this is an authentic document*

विजय या बाबींची कशा प्रकारे वर्णन करुन घेत असत या प्रशंसापत्राव्दारे माहित होते. तामपत्रात वर लिहुन दानग्रहीत करण्याऱ्यांना द्यायचे.

कश्मीर प्रांतातील राजे लोकांच्या इतिहासावर बाराव्या शतकातील असाधारण मोठे संस्कृत पद्यग्रंथ आहे. यास कंल्हन याने लिहिले. त्याने राज्यकारभार लिखीत पत्रे, पुर्व इतिहास या दृष्टांता सारख्या विविध अंशाचा स्वत:च्या पत्राच्या रचने प्रमाणेच राज्य कारभाराची नेहमी टिका देखील करीत असत.

**जमीनीसोबत काय द्यायचे ?**

चौलांच्या भुदान पत्राविषयी तमीळ मधुन घेतलेला एक भाग.

आम्ही या जमीनीच्या सिमेवर मातीचा कठडा बांधुन किंवा काट्यांची झाडे लावुन जागेची ओळख दाखवत आहोत. ही जागा (जमीन) फळांची झाडे, पाणी, जमीन, इत्यादी बागा एक गाव बिळे, रंगमंच, सरोवरे, खळगे (खड्डे) नद्या, सुपीक जमीन, विहिरी, धान्यगार, मास्त्याचा तलाव, मधाचे पोळ,तळे मिळुन आहे.

दान घेणारा या खालील अंशावर कर वसुल करु शकतो. इतर न्यायाधिशांनी लागु केलाला कर विडंयाच्या पानावरील कर, कपड्यावरील कर, वाहनावरील कर वसुल करतात. जागेवर जाळलेल्या विटापासुन अनेक मजली इमारत बांधु शकतो. झाडे, काटेरी झुडपे, लावु शकतो. गरज असल्यस पाणी पुरवठ्यासाठी कालव्याची निर्मीती करु शकतो. पाणी व्यर्थ वाहुन जाऊ नये यासाठी बांधघालु शकतो.



SCERT TELANGANA

- या काळातील पाणी पुरवठ्या करीता उपयोगी जलसिंचनाची यादी तयार करा. जे शिलालेखवर आहे? सामग्रीचा कशाप्रकारे उपयोग केला गेला चर्चा करा?

## राजांचे प्रशासन (Administration in the Kingdoms)

या नविन राजां लोकांना महाराधिराज, त्रिभुवन चक्रवती वगैरे पदवी मिळत असे. पण काही संदर्भात सामंत, शेतकरी संघ, व्यापारी, ब्राम्हण या प्रकारच्या संघात अधिकार गाजवत असत.

प्रत्येक राज्यात शेतकरी पशुपालक, हस्त व्यवसायींयाच्या पासुन उत्पत्ती मधील वाटा घेत असत. सर्व राजे लोकांच्या अधिकारातील आहेत व हा वाटा त्यांच्या किराया असे समजत असत. व्यापाऱ्यापासुन कर देखील वसुल करत. कराची रक्कम राज्य कारभाराकरीता देवळांच्या निर्मीती करीता. किल्ले बांणण्याकरीता खर्च करीत असत. युध्द करुन राज्य संपदा लुटुन घेण्यासाठी व्यापार मार्गाच्या विकासासाठी सतत तयार असत.

कर वसुली करीता संपन्न कुटुंबातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करत. यांची नियुक्ती नेहमी वंशपरंपरागत होत असे. सैन्य विषयी देखील याच पध्दतीने नियुक्त करीत असत. अनेक संदर्भात राजांच्या कुंटुंबातील मंडळीचीच नियुक्ती होत असे.

- या प्रकारचा राज्यकारभार आजकालच्या राज्यकारभारापेक्षा कोणत्या प्रकारे वेगळा आहे?

## संपदेसाठी-युध्द Warfare for Wealth

एकेक राजवंश एकेका प्रातांत स्थिर झाले. त्याच काळात त्यांनी इतर प्रांतास काबिज करुन घेण्याचा प्रयत्न केला. गंगेच्या खोज्यातील कनोज एक महत्वाचा प्रांत आहे. या प्रांतावर सत्ता गाजविण्यासाठी गुर्जर प्रतिहार, राष्ट्रकुल व पाल घराण्याच्या राजांनी शतकापर्यंत प्रयत्न केला. या दिर्घकाळ युध्दात तीन पक्षांनी भाग घेतला होता. म्हणुन इतिहासकार यास त्रैपाक्षिक युध्द म्हणतात.

नकाशा-1 पहा कनोज राजे गंगेच्या खोऱ्या या प्रातांस स्वत:काबिज करुन घ्यावे व राज्य चालवावे अशी आकांशा करण्याचे कारण काय?

## महमंद गझनी (Mahmud Ghazni :)

इ.स. 997-1030 अफगाणिस्तान चा राजा गझनी याने आशिया, इराण भारत या देशांनवर विजय मिळवुन आपल्या राज्याचा प्रसार केला. जवळ जवळ प्रत्येक वर्षी उपखंडावर स्वाऱ्या करीत राहिला. संपन्न अशा गुजरातमधील सोमनाथ सारख्या देवालयावर याचे लक्ष होते. लुटलेल्या संपदेच्या अधिक भागाचा वापर याने राज्यांचे वैभव वाढविण्यासाठी केला. महमंद गझनीने काबीज केलेल्या प्रांतातील लोकाविषयीची माहिती घेण्याची त्याला फार आवड होती. त्याने भारत उपखंडाविषयी रचना करण्यासाठी आलबिरुनी या ग्रंथकाराची प्रवाशंकी नियुक्ती केली. किताब अल हिंद लिहिली हा अरेबिक ग्रंथ इतिहासकारांचा महत्वाचा आधार आहे. हा ग्रंथ लिहिण्यासाठी आलबिरुनी ने संस्कृत पंडितांची मदत घेतली.

## चहामन घराणे Chahamanas (Chowhans)

नंतरच्या काळात चहामन घराण्याच्या राजांनी दिल्ली अजमेर या राज्यावर राज्यकारभार केला. त्यांनी पश्चिम पुर्व दिशेत राज्यांचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. गुजरात मधील चालुक्य राजे, पश्चिम



SCERT TELANGANA

उत्तरप्रदशोतील गद्‌वाल राजे यांनी चहामनांच्या विरोधात युध्द केले व विरोध केला. अफगाण चा महम्मद घोरीस इ. स. 1191 मध्ये चौहान घराण्याचा राजा पृथ्वीराज चौहान याने (1168-1192) हरविले. पणे 1192 मध्ये पृथ्वीराज चौहान घोरी कडुन पराभुत झाले.

नकाशा - 1 पहा चहामन घराण्याच्या राजांनी आपले राज्याचा कशासाठी प्रसार करुन घेण्याचा प्रयत्न केला?

## दुसरा भाग

### चौल राजे (The Cholas)

दक्षिण भारताच्या इतिहासात पुर्ण पणे नोंद असलेल्या घराण्यापैकी एक चौल राजे प्रशसकीय दृष्टीने त्यांनी कसे विजय मिळविले. हे आता पाहु या.

**नकाशा - 2 चौलाचे साम्राज्य आणि त्याचे शेजारी राज्य**




### उरायपुर पासुन तंजावुर पर्यत

चौल राजे अधिकारात कशाप्रकारे आले? कावेरी डेल्टा या प्रांतात एका छोट्या कुंटुंबाच्या मुत्तुरायर या घराण्याणे काबिज करुन घेतले व राज्य करु लागले. कांचीपुर चे राजे पल्लव यांचे सामंत राजे होते. नवव्या शतकाच्या मध्यकाळात उरयार प्रांताचा पुरातन चौल वंशाचा विजयाला युडेने मुत्तरायर च्या डेल्टा प्रांतावर आक्रमण केले व काबिज करुन घेतले. त्यांने तंजापुर शहरात निशुंभसुदी देवायलयाची निर्मीती केली.

विजयालयुडु च्या नंतरच्या आलेल्या राजे लोकांनी आजुबाजुच राज्यांना जिकुंन घेतले व राज्याचा विस्तार केला. पांड्या पल्लव इत्यादी उत्तर दक्षिण प्रांत यांच्या राज्यात विलीन झाले. चौलापैकी



*Fig 11.3 The temple at Gangaikonda-Cholapuram. Notice the way in which the roof tapers. Also, look at the elaborate stone sculptures used to decorate the outer walls*

अधिक शक्तीसामर्थ्य विषयी प्रसिध्द राजा पाहिला राजराजु इ.स. 985 मध्ये राजा झाला. या प्रांतात आपल्या अधिकारात घेतले व स्वत:च्या राज्य परिपालनाची पुनव्यवस्था केली. पहिला राजराजुचा मुलगा पाहिला राजेंद्र यांने आपल्या वडीलांच्या राज्यव्यवस्थेची पुनरावृत्ती केली. गंगेचे खोरे, श्रीलंका, आग्नेय आशिया प्रांतावर आक्रमण केले. यासाठी त्याने नौकादलाची स्थापना करुन त्यात वाढ केली.

## अद्भुत देवालये- कांस्य शिल्पकला

पहिला राजराजु, पहिला राजेंद्र यांनी तंजावुर मध्ये गंगैकोंडा चौलपुरम येथे मोठ मोठ्या देवालयाची निर्मीती केली. या देवालयाची निर्मीती अद्भुत व आकर्षण अशी आहे. त्यांच्या आजुबाजुस लोक निवास करुन राहण्यासाठी ही देवालये केंद्र झालीत राजे इतर लोक यांनी दिलेल्या देणग्यामुळे ही देवायले संपन्न झालीत. देवालयात काम करणारे पुजारी, हार बनविणारे स्वयंपाकी या देवालयांची स्वच्छता करीत. संगीत वाद्य, कलाकार, नृत्यकरीणी यांच्या उदरनिर्वाह करीता या जमीनीत पिकणारे पिक उपयोगी पडत असे. देवालये फक्त पुजा आधारणा केंद्रा शिवाय आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक जिवन केंद्राविषयक प्रसिध्द झाले.



*Fig 11.4 A Chola bronze sculpture. Notice how carefully it is decorated*

देवालयाशी अनुबंधीत शिल्पकार विशेष कास्य मुर्त्या तयार करत. चौलांच्या काळातील कास्य मुर्त्या जगभरातुन सुंदर शिल्पकला म्हणुन प्रसिध्द आहेत. अनेक मुत्यदिवांच्या देखिल आहेत.

## शेती आणि पाणी पुरवठा

शेती व्यवसायात नविनवाढ योजना आमलात आणल्यामुळे चौलांनी अनेक विजय मिळविले. नकाशा -2 पहा बंगालच्या उपसागरात मिळण्याआधी कावेरी नदीपासुन अनेक फाटे फुटलेले दिसुन येतात. अनेकदा हे फाटे पुराने भरुन जात व तिरांच्या जमीनीस सुपीक बनवत या प्रांतातील पिके पिकण्यासाठी मुख्यत: साळीस आवश्यक पाणी पुरवठा या फाट्यातुन वाहणाऱ्या पाण्यापासुन होत असे.

SCERT TELANGANA



*Fig 11.5 A ninth century sluice gate in Tamil Nadu. It regulated the outflow of water from a tank into the channels that irrigated the fields*

तामीलनाडु इतर प्रातांत शेती व्यवसायात वाढ झाली तरी मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय 5,6 व्या शतकाच्या मध्य काळापासुन चालत आलेला आहे. काही प्रांतात जंगलतोड करण्यात आली. काही प्रांतात जमीनी सपाट करण्यात आल्या डेल्टा प्रदेशात पुरांच्या निवारासाठी बांध घालुन शेतीस पाणी पुरविण्या कालव्यांचे निर्माण करण्यात आले. अनेक प्रातांत वर्षभरातुन दोनदा पिके पिकवित. अनेक संदर्भात पिकांना कृत्रिम रित्या पाणी पुरवठा करण्याची गरज भासत असे. पाणी पुरवठ्या करीता विविध पध्दतीचा उपयोग करत असत. काही प्रांतात विहिरी खोदण्यात आल्या. काही प्रांतात पाण्यास साठवुन ठेवण्यासाठी तलांवाची निर्मीती करण्यात आले. पाणी पुरवठाच्या सोयीच्या वाढीसाठी कालबध्द कार्यक्रम, नैसर्गिक सामग्री आणि कामगार संघटीत करणे सारख्या अंशा चे आयोजन करण्यात आले. पाण्याचा पुरवठा कशा प्रकारे करावा असे अनेक अंश मिसळुन आहे. अनेक नवीन राजे तसेच गावातील लोकांनी ह्या उपक्रमात उत्साहाने भाग घेतला.

## राज्यकाराभाराची पध्दत

त्या काळची राज्यक़रभार व्यवस्था कशाप्रकारची असायची ?

राजाला मदत करण्यासाठी प्रतिनिधीमंडळ असायचे राजाकडे लष्करी सेना आणि नौसेना होती. साम्राज्याचे विभाजन मंडलम किंवा प्रांत आणि पुन्हा वलनाडू आणि नाडूमध्ये झाले.

शेतकरी स्थिर निवासास गाव म्हणत ही गावे पाणी पुरवठा, शेती व्यवसायाचा प्रसार या बाबतीत फार संपन्न होती. या सारखी काही गाव मिळुन नगर म्हणत. ग्रामसभा नगरसभा शासनासंबंधीत व्यवहाराशिवाय न्याय प्रशासन कर वसुलीची कामे देखील पाहत असत.

वेल्लाला जाती संबंधीत संपन्न शेतकरी चौल राज्यातील नगरासंबंधीत शासन व्यवहार पाहत असत. चौलराजे धनवंत अशा जमीनीच्या मालकांना मुव्वेंडवेलन/शेतकरी जो तीन राजासाठी काम करे अरय्यार सारख्या गौरव सुचक (मान्यवर) या पदव्या देऊन त्याच्या गौरव करीत असत. राज्य व केंद्र पातळीवर त्यांना मुख्य जबाबद्या सोपवुन राज्यकारभार सुरळीत चालवित असत होते. पुर्ण व्यवहार ते पाहत असत.

राजा हा फक्त राज्यकारभारा पुरताच मर्यादीत राहत असुन तो फक्त कर वसुली चा हिशोब बघत असे. राज्यविस्ताराबाबत विचार करीत असे

### जमीनीचे प्रकार

चौल राज्यकारभारात जमीनीना खालील प्रकारात विभाजीत करण्यात आले.

***वेल्लन वागै***

ब्राम्हणेत्तर शेतकऱ्यांची जमीनी

***ब्रम्हादेय***

ब्राम्हणांना दान देण्यात आलेली जमीन

***शालभोग***

शाळा बांधण्यासाठी उपयोगी जमीन

***देवादान, तिरुनामत्तुक्कनी***

देवालयास बहुमती देण्यात येणारी जमीनी

***पल्लीच्छंदम***

जैन संस्थाना दान देण्यात आलेली जमीनी

ब्राम्हण लोक नेहमी भुदान किंवा ब्रम्हेदंयाचा स्विकार करतात हे आपण बघीतलेच आहे. या प्रभावाने दक्षिण भारत देशातील इतर प्रातांप्रमाणेच कावेरी नदीच्या खोऱ्यात ब्राम्हण लोक स्थिर झाले. प्रत्येक ब्राम्हदेय (देवाल्याची देगणी) प्रसिध्द ब्राम्हण जमीनदाराच्या अधिकारात असायचे. हे संघ फार समर्थपुर्ण काम करायचे. यांच्या निर्णयास राज्यक़ारभारास देवलयावरील भिंतीवर कोरण्यात आले. नगरम नावाचा मध्यवर्ती व्यापारी संघ देखील राज्यकारभारात संदर्भानुसार भाग घेत असे.

सभेचे आयोजन कशाप्रकारे करीत असत तामीलनाडुतील चंगलपट्ट जिल्ह्यातील उत्तर मेरुर शिलालेखा वरुन कळते. सभेत पाणी पुरवठा, बांगाची, देवालयाची एकेक कमीटी संरक्षण असायची. या कमिटीसाठी योग्य सभासदांची नावे लहान लहान ताडपत्रावर लिहत असत. या पत्रांना एका मडक्यात टाकत असत. एका लहान मुलाकडुन चिट्टी उचलायला लावत. ऐकेका कमिटीसाठी एकेक चिट्टी उचलायला लावत होते.

### राज्यकाराभाराविषयी माहिती

सभेत कोण सभासद असत? उत्तर मेरुर शासन खालील प्रमाणे माहिती देते.

सर्व सभासद नियमाप्रमाणे जमीनीचा कर भरत असत सभासदांच्या नियुक्ती करीता काही नियम होते.

त्यांना स्वत:ची जमीन असावी, स्वत:चे घर असावे, त्याचे वय 35-70 वर्षाचे असावे. वेदाविषयी माहिती असावी. शासनाविषयक अधिक ज्ञान असावे. ते नितिवंत, इमानदार असावे. या सभासदांच्या काळ तीन वर्षाचा असतो. त्यांनी इतर कमीटीचे सभासदत्व घेऊ नये असा नियम गत काळात हिशेब न दाखविणारे त्यांचे नातलग निवडणुकीत भाग घेत नसत.

- तुम्ही विचार करा का. या सभेत महिला भाग घेत असत का? तुमच्या मते सभासदांची निवडणुक करण्यास लॉटरी पध्दत उपयोगी आहे का?

त्या काळात राजे सामर्थशाली व्यक्ती यांच्या विषयी त्यांच्या राज्यकारभाराविषयी शिलालेखवर माहिती देतो. 12 व्या शतकातील तमीळभाषेतील

SCERT TELANGANA

पेरीय पुराण ग्रंथातुन सामान्य लोका विषयीची माहिती मिळते. अडनुर गावाच्या सिमेवर पुल्ल्या लोक तांडयाच्या पानापासुन तयार केलेल्या झोपड्यात राहत असत. व शेतमजुर राजांचे दास म्हणुन जिवन जगत असत. त्यांच्या झोपड्या कातड्यांनी झाकलेल्या असत. गळ्यात लोखंडाकड्या धारण करुन असणारी मुले समोर, नाचत उड्या मारत, लहान मुलासोबत खेळत असत. (महिला कामगार) मरुडु (अर्जुन) झाडांच्या सावल्यात बाळास मुका कातडीच्या तुकड्यावर झोपवुन कामकरीत असत. आंब्याच्या झाडांच्या फांद्यांना पाळणे लटकविलेले असत. नारळ्याच्या झाडाच्या सावलीत कुत्रे बसुन असायची. कोंबडे सुर्योदयापर्वुीच आवरत असत. त्या सोबत पुलय्यार लोकांची दिनचर्या सुरु होत असते. दिवासाची कामे सुरु करत असत. कंजी झाडाखाली लाटा लाटांमध्ये विभाजीत मोकड्या केससहीत पुलय्यार महिला गाने गात साळी कांडत असत.

- गावात होणाऱ्या अनेक कार्यक्रमाचे वर्ण लिहा.

**महत्वाचे शब्द:**

| | | |
|---|---|---|
| 1. सामंत राजे | 2. देवालय | 3. नाडू |
| 4. सभा | 5. साम्राज्य | 6. सुलतान |

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. त्रिपक्ष युध्दा मध्ये भाग घेणार कोण?
2. चौल साम्राज्यात सभेचा सभासद होण्यासाठी कोणते नियम लागु होते?
3. चहामन घराण्याच्या आधिकारात असणारी दोन नगरे कोणती?
4. राष्ट्रकुल राजे कसे बलाढ्य झाले? राष्ट्रकुल साम्राज्याचा विस्तार कशा प्रकारे झाला?
5. जनतेकडुन अंगीकार मिळवुन घेण्यास नविन राजांनी काय केले?
6. तमीळ प्रांतात कोणत्या प्रकारच्या पाणी पुरवठ्याच्या कामाची वाढ झाली?
7. चौलांच्या काळातील देवालया संबंधीत कार्यक्रमे कोणती?
8. उत्तर मेरुर मधील निवडणुका सध्याच्या पंचायतीराज निवडणुका यांच्यात कोणता फरक आहे?
9. पुरातन मंदीरांची चित्रे गोळा करुन एक वहि तयार करा?
10. **कृषी आणि पाणी पुरवठा** या मधील खालील दोन परिच्छेद वाचुन टिप द्या?

**प्रकल्प कार्य:**

1. नकाशा - 1 पाहुन सद्याच्या तेलंगाना राज्य कोणकोणते राज्ये आहेत ते शोधा?
2. या पाठातील देवालय व तुमच्या परिसरातील देवालये यांची तुलना करा, समानता, फरक सांगा.
3. सध्याच्या काळातील विविध कामावरील लागु केलेल्या करा विषयी अधिक माहिती मिळवा. हा कर नगदी रक्कम, श्रम किंवा वस्तु रुपांत लागु केलेला आहे का?



SCERT TELANGANA

पाठ 12

# प्रांतीय राजांचा उदय - काकतीय राजे

पल्नाटी घराण्याचे ब्राम्हनायाडु, बालचंद्राडु आणि 66 नायक यांच्या यौध्दा विषयी आणि युध्द नितीविषयी आपरशक्ती आणि सामर्थ्य विषयी, त्यांनी केलेल्या युध्दा विषयी अनेक विरगाथा, कथा तुम्ही एकलाच असाल. समक्का आणि सारक्का जात्रेस गेलेच असाल. यांनी आदिवासी गिरीजन लोकांच्या रक्षणासाठी, हक्कासाठी राजांच्या सैन्यासोबत युध्द केले. पशुपालकांच्या रक्षणासाठी हक्कासाठी नेल्लुरु च्या राजा सोबत लढणारा काटमराजु याच्या कथा एकुण आनंदित झाले असाल.

- तुमच्या आई वडीलांकडुन मोठ्या मंडळी कडुन पल्ननाटी विरांच्या कथा विषयी समक्का, सारक्का यांच्या विषयी काटमराजु कथा विषयी माहिती घ्या. वर्गात चर्चा करा?

या सर्व कथांचा इतिहास इ.स. 1000 ते 1350 चा आहे. हा काळ आपल्या इतिहासाचा महत्वाचा काळ आहे. गेल्या पाठात भारत देशात नविन राज्यांची स्थापना कशा प्रकारे झाली याची आपण माहिती घेतली. विविध जातीचे, आदिवासी, शिकारी (परधी), धनगर(पशुपालक), या देशातुन शेती करावयाच्या स्थायीस कशाप्रकारे पोहचले याची आपण माहिती घेतली यांनी विरांचा दर्जा मिळवुन पशुपालन शेती व्यवसायीक म्हणुन गावात स्थिर झाले. व छोट्या छोट्या राज्यांची स्थापनाप करुन घेतली आपल्या राज्यांचा विस्तार करावा अशी त्याची आंकाक्षा असणारे विर योध्दा निरंतर युध्द करत असत. अशा परिस्थितीतच वरंगल्लु मध्ये काकतीय घराण्याची राजांनी राज्य स्थापना केली.त्याच काळात पहिले तेलुगु ग्रंथ लिहिण्यात आले. संप्रदाय प्रकारे श्रीमद-आन्ध्रमहाभारतास पहिले तेलुगु महाकाव्य रचना करणारे कवियत्र नन्नय्या, तिकन्ना, येर्रा प्रेगडा इ.स. 1000-1400 शतकाच्या मध्य रचले गेले. या तिघांना कवी त्रिमुर्ती असे म्हणतात. काळातील काकातीय काळातील माहिती मिळण्यासाठी आपल्या कडे अनेक शिलालेख व साधने उपलब्ध आहेत. (त्यात प्रामुख्यो खय्यारम, हजारखांबी मंदीर, नागुलापाडु, पिल्लामरी, पालमपेट, कोंडपर्थी, भुतपुर) यातुन तत्कालीन राजे, राणी, सामंत पुढाकारी, शेतकरी, गोपालक, पंडीत आदि सह राज्यकारभाराविषयी माहिती मिळते. यासह तेलुगु आणि संस्कृत भाषेत अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. प्रतापरुद्र यशोभुषणम हे पुस्तक विद्यनाथने काकातीयांच्या काळात लिहिले. तर कांही पुस्तके जशी क्रिदाकीराममु हे विनुकोंडा वल्लभाचय एकमारानाथाने प्रतापरुद्र चरित्र हे पुस्तक यांच्या काळखंडानंतर लिहिले.



*Fig 12.1 Kirti Torana entrance of Svayambhu Siva Temple - built by Kakatiya kings in Warangal.*

SCERT TELANGANA

- वरील माहिती आधारे काकतीय राजा विषयी माहिती देणारे दोन आधार सांगा? ( दोन उदाहरणे सांगा)

शासनाव्दारे साहित्याआधारे दुर्जय हा काकतीय घराण्याचा पहिला राजा आहे. यांनी तेलुगु भाषेत मान देऊन राज्य भाषेतच राज्य कारभार चालत असे. तेलुगु भाषेस दिल्या गेलेल्या प्राधान्यतेमुळे यांना आंध्र राजे अशी किती मिळाली. तेलुगु भाषिक कोस्ता प्रांत, तेलंगाना प्रांत, रायलसिमा प्रांत या सर्व प्रांताना एकमेकांत विलीन करुन घेण्यात आले. (एकाच छत्राखाली घेण्यात आले) या प्रकारे काकतीय घराण्याची तेलुगु भाषा बोलण्याऱ्या प्रांताच्या ऐक्यतेसाठी प्रयत्न केले. या प्रयत्नामुळेच जनतेचा विश्वास प्राप्त करुन घेतला. काकतीय घराण्याचा राज्यकारभार चिरस्मरणीय आहे व आजपण ऐतिहासीक प्रशंसा मिळवत आहे.

**प्रमुख काकतीय राजांचा काळ**

| | |
|---|---|
| दुसरा पोलराजा | 1116 - 1157AD |
| रुद्रादेवुडु | 1158 - 1195AD |
| गणपती देव | 1199 - 1262AD |
| रुद्रम्मादेवी | 1262 - 1289AD |
| प्रतापरुद्र दुसरा | 1289 - 1323AD |

प्रथम कर्नाटकावर राज्य करणारे राष्ट्रकुट, चालुक्य यांच्या शासनाकाळात प्रथम काकतीय घराणे प्रारंभात स्थानिक पुढारी आणि सामंत राजे होते.

हे प्रथम ग्रामोद्योगी ग्रामांचे मुख्य अधिकारी म्हणुन नियमित झाले त्यांना रताडी असे म्हणतात. स्वत:च्या सैनिक बळाच्या सामर्थ्याने छत्रपती राजांना मानवुन सैन्यधिपती सामंत या स्थायीस वाढले. त्यांनतर तेलंगाना प्रांतातील हन्माकोंडास (अन्नमाकोंडा) प्राप्त केले. पश्चिम चालुक्याच्या

**नकाशा - 1 वरंगल किल्ला**




पतनानंतर काकतीयांनी आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली साम्राज्याची वाढ केली.

रुद्रदेव यांच्या शासनकाळात राजधानी हंनमाकोंडा पासुन ओरुगल्लुत (वरंगल) बदलविली. नविन राजधानी नगराची प्रणालिका बध्द निर्मीती केली. वाढणाऱ्या लोकसंख्येस आवश्यक वस्तीनिर्माण सर्व सोयी मिळवुन देवुन, गरजापुर्ण करण्यासाठी मोठ्या किल्याची निर्मीती केली. तळे खोदविले अनुमाकोंडा नगरात हजार स्तंभाच्या शिव मंदीराची निर्मीती केली.

वरंगल्लु किल्याचे चित्र बघा बाहेरच्या किल्याच्या भिंतीस चार व्दारे आहेत. शेतीजमीनीच्या अनेक तळ्यांचे रक्षण होते. या किल्ल्यातच कुटीर उद्योगी कामगारांच्या (टोपल्या विणणारे) झोपड्या आहेत. या झोपड्या ओलांडताच नंतर मोठा खंदे त्या बाजुलाच मातीने बनविलेल्या किल्ल्याच्या भिंतीजवळ आपण पोहचू शकतो. किल्याच्या

SCERT TELANGANA

मध्यभागी पोहचण्यासाठी आणखी समोर गेल्यास दुसऱ्या खंदकास लागुन दगडाचा किल्ला बनविण्यात आला आहे. या किल्ल्याच्या मध्ये राजधानी नगर भवने इमारती राजसंत पुर राजमहाल आहे. या किल्यास चार ही बाजुस व्दारे आहेत. पुर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण व्दारे आहेत प्रत्येक दारातुन किल्ल्याच्या आत जाण्यासाठी रस्त्यांनी व्दारे जोडलेली आहेत. स्वयंभु शिवालय देखील चार दिशेला दारे आहेत. ओरुगल्लु नगरात विविध वाड्यात गल्लीत विभाजीत केल्या गेले आहे. एका वाड्यात एका जातीचे(एकाच प्रकारचा धंदा करणारे) लोक राहत असत.

- तुमच्या गावाचा किंवा शहराचा नकाशा काढा त्यास ओरुगल्लु नकाशाशी तुलना करु बघा?
- आधुणिक काळातील गावे/शहर आणि ओरुगल्लु गावे/शहरामधील तुम्ही बघीतलेले फरक कोणते ते सांगा?
- चित्रात दाखविलेल्या स्केलचा वापर करुन ओरुगल्लु बाहेरचा किल्ला पुर्वेपासुन पश्चिमेकडे किती रुंद आहे ते मोजा?
- दगडाचा किल्ला आतला भाग उत्तर पासुन दक्षिणेकडे किती लांब आहे ते मोजा?
- जर तुम्ही वरंगल ला गेला असता तर त्या बद्दल वर्गात चर्चा करा?
- स्वयंभुशिवालय काकतीयांचे कुल दैवत किल्ल्याच्या मध्यभागी राजमहले किंवा बाजारपेठांची निर्मीती न करता देवलयाची का निर्मीती केली? विचार करा?

काकतीय साम्राज्याची वाढ झाल्यानंतर अनेक पुढाऱ्यांनी काकतीयांचे अधीपत्य स्विकारले. काकतीय स्वत:च्या सामंत राजांवर विदेशी आक्रमण यापासुन बचाव करत. विदेशी लोकांच्या स्वाऱ्यांना आळा घालत त्याच बरोबर सामंत राज्यांना सहभागी करुन घेतले. परिस्थितीनुसार सामंत राजांनी स्वतंत्र होण्यासाठी आकांक्षा बाळगली परंतु काकतिया राजांनी त्यांना नमविण्यासाठी सैन्य दलास पाठवित असत.

## रुद्रम्मादेवी (Rudrama Devi)

अत्यंत धैर्यसाहस शक्तीशाली महिला शासक राणी रुद्रामादेवी विषयी तुम्ही कधीतरी ऐकलात का? त्यांनी आपल्या शक्तीसामर्थ्याने दिग्वीजय मिळवुन राज्य कारभार व्यवहारात महानतेने चालविले. प्रख्यात काकतीय वंशाची राणी रुद्रमादेवी ओरुगल्लु राजधानी वरुनच शासन केले. इ. स. 1262 ते 1289 पर्यंत सुमारे 27 वर्षापर्यंत चांगल्याप्रकार शासन केले. आपल्या देशात महिला शासक खुप कमी आहेत. राणी रुंद्रामादेवी काही काळापुर्वीच दिल्लीवर रजिया सुल्ताना नावाच्या महिला शासकाचे शासन होते. मालक वर्गांना स्त्री रजिया सुलतानाचा शासक म्हणुन स्वीकार केला



*Fig 12.2 Rudramadevi - Riding the Horse. (Modern representation in Hyderabad)*

SCERT TELANGANA

नाही व तिचा नाश केला. प्रमुख इटालीयन प्रवासी मार्कोपोलो याने रुद्रामादेवी च्या राज्यास भेट दिली. तिचा राज्यकारभार, धैर्य, साहस, पराक्रमाची प्रशंसा केली. ती पुरुषांचा वेष धारण करुन सहजपणे घोड्यावर स्वारी करायची. असे त्याने म्हटले आहे. त्या काळाच्या शासनात रुंद्रमादेवी ने रुद्रदेव महाराज असी किर्ती मिळविली होती.रजिया सुलताना प्रमाणेच रुद्रमादेवीने देखील स्वतःच्या वडीलांच्या शासन काळातील मुख्य नायकांच्या बंडखोरीचा नायनाट केला होता. रुंद्रामादेवीचा नातु प्रतापरुंद्रा विविधा पध्दतीने बंडखोराचा नायनाट करीत होता. मांडलीक राजापैकी एक कायस्थ अंबादेव यांच्या नलगोंडा जिल्ह्यातील चांदुपटला येथील युध्दात रुद्रमादेवीचा मृत्यु झाला.



*Fig 12.3 A segment of the inner earthen wall with its (dry) moat at right*



*Fig 12.4 Aerial view of the eastern gateway in the city's inner stone wall, showing the 'bent entrance' (Vankadari) and open courtyard (anganam). The doorway at right is the 'great city gate' leading to the royal avenue (raja margambu)*

## नायंकर पध्दत Nayankara System



*Fig 12.5 The remains of the great temple dedicated to Lord Siva*

रुद्रमादेवी, प्रतापरुद्र यांनी शक्ती सामर्थ्यवान अनेक योध्दांतना सामंत कुंटुबातील लोकांच्या शिवाय राजभक्ती असणाऱ्या नायकांना प्रोत्साहन देण्यासाठी उन्नत स्थानात मिळवुन देत. नायक ही पदवी सहीत नियुक्ती करुन घेत असत. यांच्या सेवेच्या रुपात अनेक गावातुन कर वसुल करण्याचा हक्क पण मिळवुन दिला या गावात त्यांच्या नायंकरी म्हणुन व्यवहार करीत असत. या करामुळे गोळा होणाऱ्या रक्कमेपासुन नायकुडु राजाने निर्देशित केलेल्या सैन्याचे पोषण करीत अशा गावा गावावर नायकांना कर वसुली करण्याचा हक्क कायमचा न ठेवता सतत नविन प्रदेशात बदलत असत. नायक राजांस किंवा राणीस त्यांच्यावर विश्वास असे पर्यंत पदवीत राहत असत. राजास व्यतिरेक करणाऱ्या विरोधास पराभव करण्यासाठी हे भाग घेत असत. या नियमाधारे रुपांतरीत केल्या गेलेल्या विधानासच नायंकर पध्दत म्हणतात. रुद्रामादेवी शासन काळातील एक नायकाने विधीत केलेला खालील शासनातील काही भागास वाचा.

इ.स. 1270 वर्षी संक्राती सणाच्या संदर्भात काकतीय रुद्रदेव महारांचा व्दारपालक असणारा बोल्लीनायकुडु 10 मोजमापाच्या जमीनीस कल्याण केशव देवालय कामगारांना कर्ज गावातील स्वत:च्या नायंकर असणाऱ्या जमिनीस माझे राजे रुद्रदेव महाराजांना गौरवार्थ दान देण्यात आहे

- बोल्लीनायकुडु रुद्रमादेवीस रुद्रदेव महाराज असे का म्हणतात? ते सांगुन स्पष्ट करा?

## शेतीचा विकास - देवालयांची निर्मीती

काकतीयांनी सरोवरांची निर्मीती केली. विहिरी खोदविल्या. अधिक मोठ्या प्रमाणात जमीनीस शेती व्यवसाया साठीच वापरु लागले. राजकुटुबीच, सामंत राजे, समाजातील धनवंत, व्यापारी लोक, हस्तव्यवसायी, कुटीर उद्योगी, सरोवरांच्या निर्मीती व्दारे शेतीच्या विकासासाठी कारणीभुत झाले. या प्रकारचे कठिण अशा पक्या जमीनीना तेलंगाना व रायलसिमेत काही प्रमाणात असणाऱ्या शेती जमीनीना मोठ्या प्रमाणात शेतकीस आणण्यासाठी प्रयत्न केले.

काकतीय मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या देणग्या देण्यामुळेच देवालय फार मोठ्या विस्ताररुपात निर्माण करण्यात आली. राजकुटुंबातील स्त्रींया मुप्पमांबा मैलम्मा सारख्यांनी देवालयांच्या निर्मीतीसाठी अधिक

*Fig 12.6 Ramappa Temple*



SCERT TELANGANA

प्रमाणात जमीनीच्या देणग्या दिल्या. इतर संपन्न वर्गातील स्त्रियां देखील देवालयांच्या विकासासाठी भुदाना सहीत तळे, गायी, नगद रक्कम, सोन्याचे दागीने इत्यादी दान देत असत.



*Fig 12.7 Sri Ahita gaja kesari - Gold coin issued by Kakatiyas*

## व्यापार (Trade)

त्या काळाचे शासक राजे, सामंत राजे, नायक जास्त प्रमाणात स्वत:ची मिळकत अनेक व्यापार उद्योगावर लागु केलेल्या करापासुन मिळवुन घेत. विशेषता बाहेर देशाशी व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी समुद्रकिनाऱ्या वरील बंदरात देण्यात येणाऱ्या कराची रक्कम राज्याच्या मिळकतचा अधिक प्रमाणात भाग असायचा. खाली दिलेल्या काकतीय गणपती देवाच्या



*12.8 Motupalli Pillar Inscription*

मेटुपल्ली शासनाव्दारे अधिक समाचार माहित करु या. गणपती देवाने विधित केलेला अभयशासन विदेशी व्यापार, खंडातर व्यापार करणाऱ्या रक्षणाचा हक्क मिळवुन दिले. त्या आधीचे राजे वादळामुळे नावा, होड्या वाहुन जावुन व्यापार ठप्प पडला तरी कर वसुली जबरदस्तीने करीत असत. सोने, दागीने, हत्ती, घोडे घेत असत. या परिस्थितीपासुन व्यापाऱ्यांना संरक्षणासाठी हक्क मिळवुन देवुन विदेशी व्यापाराकरीता प्रोत्साहान देत. आम्ही आमचे नाव व किर्तीसाठी, पुण्य मिळविण्यासाठी दयेने, करुणेने फक्त नाममात्र कर लागु करीत आहोत. असे त्याने प्रकटीत केले.

- गणपती देवा आधीच्या शासकांची विदेशी व्यापार करणाऱ्या सोबत कशी वागणुक होती ?
- गणपतीदेव यांनी विदेशी व्यापार करणाऱ्यांना कोणत्या प्रकारची हमी दिली होती ?
- गणपती देवाने विदेशी व्यापाऱ्यांना रक्षणाची मंजुरी का मिळवुन दिली ?

इटलीचा प्रवासी मार्को पोलोन मोटुपल्ली बंदरास भेट दिली. तो म्हणतो की, या बंदरातुन हिरे रेशमी कापडापासुन मऊ तलम विणकामाचे कापड निर्यात होत असत. या कापड्यांना विदेशी राजा, राण्या आवडीने धारण करतात न करणारे दुसरे कोणीही नाहीत

## काकतीय शासन -शेवट(अंत)

सुमारे इ.स. 1190 काळात दिल्लीत नवीन राज्याची स्थापना झाली. हे राजे सुलतान म्हणवीत. यांनी टर्कीस्तानावरुन येऊन भारतात दिल्ली येथे राज्य स्थापना केली. सामर्थ्यवान शक्तीवान अशा सैन्यांना गोळा करुन उत्तर भारतातील अनेक राज्यांना हरवुन त्याचे राज्य काबीज करुन घेतले. दक्षिणेकडे देखील आपली दृष्टी वळविली. सुल्तान महंमद बिन तुघलक काकतीय राज्यावर चालुन आला. स्वाऱ्या करुन प्रतापरुद्राचा पराभव केला.

TELANGANA

त्यामुळे इ.स. 1323 या वर्षी काकतीय घराण्याचा अंत झाला. काकतीय घराण्याच्या नंतर कर्नाटक मध्ये दोन नविन बहुमनी विजयनगर या राज्यांची स्थापना झाली. त्या विषयी आपण पुढच्या पाठात करु या.

**जाती भेदास दुर करणाऱ्या पल्नाटी विरांची कथा:**

पल्नाटी विरांचा इतिहास सुमारे इ.स. 1350 मधला आहे. श्रीनाथ याने यांचा इतिहास लिहिला. या रचनेव्दारे त्या काळातील विर योध्दा आकलनाव्दारे मिळुन मिसळुन जबाबदाऱ्यांचे पालन कशाप्रकारे करत होते. याची माहिती मिळते. यात मुख्य पात्र असणारे विविध अंशात परिपुर्ण बालचंद्रासहीत त्यांचे विश्वासपात्र अनुसरा विषयी माहितीस मिळते. त्यापैकी बालचंद्र ब्राम्हण व इतर कुंभार, सोनार, धोबी, न्हावी, सारखे विविध धंदेवाईक होते. हे सर्व भाऊ बंधकी प्रमाणे जबाबदारीने वागत. युध्दास जाण्याआधी बालचंद्राची आई त्या भावानसाठी स्वत:आहार बनवयाची पण विविध पात्रात वाढायची ( माती, पान, कास्य, इत्यादी पात्रे) असा भेदभाव बालचंद्राला आवड नव्हते युध्द विरांना जातीशी काही संबंध नसतो. बालचंद्र म्हणायचा त्या काळाच्या आचार व्यवहाराचा विरोध करीत स्वत:च्या एक्त्र सत्तेस ओळख म्हणुन सगळे भाऊ स्वत:च्या भोजन पात्रास एकमेकांत बदलुन जेवन करीत असत.

**महत्वाचे शब्द:**

1. विर योध्दा 2. नायंकार पध्दत 3. सामंत 4. कारागीर

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. काकतीय काळातील योध्दा, वीर व आधुनिक काळातील सैनिक यांची तुलना करा?
2. काकतीय राजे, सामंत यांनी शेतीच्या विकासासाठी खोदविलेल्या तळे आज आपल्याला कशा प्रकारे उपयोगी पडत आहेत? ते सांगा?
3. सामंत राज्यांच्या नियंत्रणाखालील काकतीया राजांनी कशाचा अवलंब केला असेल विचार करा?
4. काकतीय राजे, शक्तीशाली, धनवान सामंत कुटुबातील नायकांचीची नियुक्ती का करीत असेल असा तुमचा विचार आहे?
5. त्याकाळात स्त्रियांशासन करणे का बरे कठिण होते?आजच्या काळाप्रमाणे विपरीत होते का?
6. त्या काळी समर्थ स्वत:ची जमीन असणारे शेतकऱ्यांपासुन व्यापाऱ्यापासुन धंदेवाईकापासुन कर वसुल करीत असत. आजच्या काळातील समर्थ लोक असे करु शकतील का? तर कारणे शोधा?
7. पान क्र. 111 वरील ***नायंकर पध्दत*** हा परिच्छेद वाचुन विवेचन करा?
8. महिला ही समर्थपणे प्रशासन चालु शकतात? तुम्ही या वाक्याचे समर्थन करता का? का?

**प्रकल्प कार्य:**

1. कोणत्याही तीन घराण्यांचा इतिहास प्रदर्शित करण्याची सविस्तर नाटीका तयार करा.
2. तुमचे गाव/शहराच्या अविर्भाव/ निर्मीती विषयीची कथा माहित करा.
3. तुमच्या प्रांतातील पुरातन देवालयास भेट द्या. त्या देवायलयाची निर्मीती केव्हा झाली? कोणी केली माहिती करा. तेथे कोणत्या घराण्याचे शासक होते ते पाहा?

SCERT TELANGANA

पाठ 13

# विजयनगरचे राजे

राजामहारांनी गावाना कोणत्या प्रकारे त्यांच्या अधिपात्याखाली आणुन घेतले. त्यांना काकतीयांनी कसे त्यांच्या आधीन करुन मोठ्या साम्राज्याची स्थापना केली. हे आपण गेल्या पाठात शिकलो. दिल्लीच्या सुलतानानी वरंगलवर विजय प्राप्त केल्यामुळे काकतीयांच्या साम्राज्याच्या अस्त झाला. नंतर उत्सुकराजांनी विजयनगर साम्राज्यांची स्थापना केली. विजयनगर साम्राज्यास कर्नाटक हे साम्राज्य म्हणुन ओळखण्यात आले.

विजयनगर म्हणजे विजयांचे नगर असा अर्थ होतो. कर्नाटकाच्या तुंगभद्रा नदीच्या काठी हे शहर वसलेले आहे. यास विद्यारण्यस्वामी आर्शिवादाने इ.स. 1336 मध्ये हरीहरराय, बुक्काराय यांनी याची स्थापना केली. विजयनगरचे विरुपक्ष देवाची भक्ती केली. त्यांनी या मंदीराची स्थापना करुन त्याचा विस्तार करण्यात आला. विजयनगरचे साम्राज्या सुमारे 250 वर्षापर्यंत चालले. पण एकाच वंशाचे राजे परिपालन करीत नसत संगम सालव, तुल, आणि आरविटु वंशानी एकानंतर एकाने राज्य केले. त्यात काही चक्रवती राजे कन्नड भाषात बोलत असत. पण कृष्णदेवरायांनी तेलुगु भाषेस जास्त प्राधान्य दिले.

तुंगभद्रा नदीच्या उत्तरेस काही नविन राज्याची स्थापना झाली. ते बहुमनी राज्य हे सुरुवातीस महासाम्रज्य होते. त्यांचे मुख्य शहर गुलबर्गानंतर इ.स. 1489-1520 काळात छोट्या राज्यात विभागणी झाली. याची बिजापुर गोलकोंडा मोठे राज्यात रुपांतर झाले. त्यातील जास्त भाग सध्याच्या कर्नाटक, तेलंगाना आणि आंध्रप्रदेश राज्यामध्ये आहे.

या राज्यांना इराण, अरेबियापासुन आलेल्या सुलतान आणि सम्राटांनी यांचे परिपालन केले. या राज्यांची निरंतर युध्दे करत आणि त्यांच्या राज्याचा विस्तार वाढवला. यांनी स्थानिक राजांच पुढारी म्हणुन निवडत असे. गेल्या पाठात शिकलोत. त्याच्या व्दारे गावातील शेतकऱ्याकडुन व्यापाराकडुन कर वसुल करत आणि गावाला आपल्या ताब्यात करुन घेत होते.

**विजयनगरातील मुख्य राजे:**

| | |
|---|---|
| हरीहाराराव | 1336-1357AD |
| पहिला बुक्काराया | 1357-1377AD |
| दुसरा हरीहाराराव | 1377-1404AD |
| दुसरा देवराया | 1426-1446AD |
| साल नरसिंगराव | 1486-1491AD |
| कृष्णदेवराय | 1509-1529AD |
| अच्युतराय | 1529-1542AD |
| आलीया रामारावा | 1543-1565AD |
| व्यकंटापती राया | 1585-1614AD |

SCERT TELANGANA

## आपणास राजांची ओळख कशी झाली?

विजयनगरच्या इतिहासा बदल समकालीन ग्रंथ ताडपत्रे शासन त्याकाळी बांधलेली इमारते, दैनंदिन जिवनच प्रशासन, सामाजिक संस्थेने दिलेल्या आधारानुसार माहिती घेऊ शकतो. इतर देशातुन आलेल्या पर्यटकापैकी इटलीचा प्रवासी निकोलो कौटी यांनी विजयनगरास इ.स.1420 व्या वर्षी सुरुवातीस भेट दिली. अब्दुल रज्ञाक नावाचा पर्शियन पर्यटक इ. 1443 मध्ये पोर्तुगल पर्यटक डोमिंगो पेयीज इ.स. 1520 न्यूनीज इ.स. 1537 मध्ये भेट देऊन लिहिलेल्या रचनेव्दारे विजयनगरच्या इतिहासाशी संबंधीत महत्वपुर्ण माहिती मिळते.

## विजयनगर शहर

विजयनगर हे शहर तुंगभद्रा नदीच्या काठी वसलेले आहे. येथील प्रचिन देवायले, विरुपाक्ष, पंपादेवी देवालये मिळुन आहेत. अब्दुल रज्जाक ने सांगीतल्या प्रमाणे हे शहर सात जाळ्यांनी बनवलेले आहे. किल्ले चिऱ्यांच्या भिंतीनी बांधलेली आहे. त्यातील काही किल्ल्यांची निर्मीती पुरातन वास्तु शास्त्रज्ञांनी यांचा शोध लावला. अशा मजबुत भिंती कुठेच नाहीत. पोर्तुगल पर्यटक पेयीज यांनी शहराबद्दल लिहलेले वर्णन वाचा.

राजाने शहराची निर्मीती अत्यंत कुशलतेने केली आहे. अभेद्य भिंती आणि पुरेसे संरक्षण देण्यात आले आहे. इतर शहराप्रमाणे या आवराभिती सर्व साधारण पणे नाहीत तर अतिशय मजबुत बांधकाम आहे. आतच्या बाजुने एकासरळ रेषेत सुध्दा इमारत विशाल छत दिसत आहेत.

रस्त्याच्या विस्तृंती प्रमाणेच घरांची रचनाही सुंदर आहे. ही सर्व घरे व्यापारांच्या मालकीची आहेत. व्यापाराकडे सर्व प्रकारचे हिरे, मोती, मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. तसेच पृथ्वी तलावरील सर्व प्रकारचे कापड येथें उपलब्ध होते. दररोज सायंकाळी राजमार्गावर बाजार भरत असे. या बाजारात घोड्या पासुन ते भाजीपाला पर्यंत सर्व वस्तु मुबलक प्रमाणात मिळत असत.



*Fig 13.1 Bronze images of Krishnadeva Raya and his two wives installed in Tirumala Temple.*

- भाजीपाला, फळे, घोड्यांना सायंकाळीचे का विकत असत?

देवालय डोंगरावरच स्थापित केले. दुसऱ्या भागात शेतीच्या जमीनी, नाले, तिसऱ्या भागात अनंतपुरातील इमारती राजांचे इमारती आणि मुख्य राजाचे निवास, चौथ्या भागात सामान्य प्रजा राहत होती. प्रत्येक भाग वेगवेगळ्या दाखवणारे नकाशे खाली दिला आहे.

- विजयनगर आणि वरंगल शहरांतील फरक, सारखेपणास ओळखा? आणि त्यात काही समानता आहेत का ते सांगा?

SCERT TELANGANA




**नकाशा -1 विजयनगरचे शहर**

- आधुनिक शहरांमध्ये या प्रकारचे किल्यांच्या भिंती का बांधत नाहीत?

## सैन्य आणि सैनिक अधिकारी

युध्दामध्ये ताकदवान सैनिक कसे लढतात. हे तुम्हाला माहितच असेल किंवा वाचनात आले आहे.

- देशातील सैनिकाना कोण बलवान करतात. असे तुम्हाला वाटते?
- आधुनिक सैनिक वापरणारी शस्त्रे, युध्दाची सामग्री कोणती?

आता आपण विजयनगर राजाच्या काळात कोणत्या प्रकारची युध्दाची सामग्रीचा वापर करण्यात आला. याची माहिती येऊ या. विजयनगर राजांची सैन्य बलवान बनवण्यासाठी खुप मोठ्या प्रमाणात खर्च लावला. अरेबिया इराण देशातुन मेली प्रकारच्या घोड्यांना पश्चिम किनाऱ्यातुन जहाजातुन निर्यात करुन घेत असत.

सैनिकांची निवड करत असत. किल्यांच्या भिंती मजबुत बांधल्या दुसऱ्या देवरायाने मुस्लिमांना लढे देणारे सम्राटांनी नियुक्ती करुन त्यांना युध्दात वापरण्याऱ्या नविन शास्त्रांची शिकवण दिली. त्यांना सैनिक शिबिरांमध्ये मस्जिदांची सुध्दा निर्मीती झाली. याच काळामध्ये बंदुके, फिरंगी यांची सुरुवात झाली. भारत देशातच आधुनिक अश्वध्वज सैनिक दल, दोघांनी मिळुन एक बलवान अशा सैन्याची निर्मीती केली.

- त्या दिवसांमध्ये वेगाने जाण्यासाठी अश्वदलाचा वापर करत. त्या ऐवजी सध्याच्या काळात कशाचा वापर होत आहे?
- हत्ती हळु चालुन युध्दात शत्रुंवर आक्रमण करण्या ऐवढे शक्तीवान होते. सध्या त्यांच्या स्थानात कोण आहेत?

## सैन्यदलांतील अधिकारी अमर अधिकारी

सर्व राज्यास सैनिक अधिकारीचे परिपालन वर नियंत्रण ठेवत असत? ते कोण आहेत? त्यांनी काम करत होते. ते आपण पाहु या. पोर्तुगीज चा प्रवासी डोमिंगोपेयीज यांनी श्रीकृष्णदेवराया च्या काळात विजयनगरास भेट दिली. तेव्हा असे म्हणाले.

SCERT TELANGANA

राजांजवळ लांखो बलवान सैन्य असुन 35000 अश्वदल, कोणत्याही वेळी कोणत्याही ठिकाणी युध्द करण्यासाठी तयार असत. त्यामुळे इतर राजे त्यांना भीत असे. सैन्यदलांतील अधिकारी उच्च वर्गातुन नियुक्त करत असत. यांचा राज्यांच्या शहरांवर नगरांवर, गावांवर अधिकार असायचा यातील काहीजन लाखो रुपये मिळणाऱ्या सोन्याच्या नाण्यावर कर वसुली करत असत. काहीजण दोनशे, तिनशे, चारशे हजारों नाण्यावर कर वसुली करत असत. राजे सैनिक सेनापती निवडण्याच्या आधारे (पदातील अश्वदल, गज) सोन्याच्या नाण्यावर कर ठरवतात. हा कर सेनापती पदातील, घोडे हत्तीच्या पोशनावर खर्च करत असत. कोणत्यावेळी यांना कामासाठी तयार ठेवत. हेच नाही तर राजास वार्षिक खर्च, इनामे देत असत. दलाधिकारी राजाकडे सैन्य पाठवीत असे. ह्याशिवाय राजा स्वतःच्या सैन्याला पगार देत असे.



*Fig 13.2 Stone Chariot at Hazara Rama Temple*

वरील परिच्छेद वाचुन खालील प्रश्नांचे उत्तरे द्या.

- क्रिष्ण देवरायाला सर्वात जास्त का घाबरत असे.
- विजयनगर साम्राज्यात गाव, शहरांवर कोणाचे नियंत्रण होते?
- अधिकाऱ्याने गावकऱ्याकडुन घेतलेल्या कराच्या बदल्यात राजांना काय देत?

- सेनाधिकाऱ्याने पाठविलेल्या सेनावरच राजा अवलंबून होता का?
- सर्वांना सारखेच उत्पन्न होते का?

सैन्याधिकारास अधिकारी म्हणुन सुध्दा निवडत यासच अमर कर वसुल करण्यास सांगत. अमर म्हणजे निर्धारीत काही ठराविक प्रांतावर कर वसुल करण्याचा अधिकार म्हणजे यांना दिलेल्या गांव, शहरातुन कर वसुल करुन त्यांचा वापर करण्याचा अधिकार दिला. ऐवढेच नाहीतर याकराने सैनिकदालाचे पोषण करण्याचे काम होते. यांच्या आधिन असणारे प्रांताचे प्रशासन करणारे न्यायपुर्ण अधिकारी असत. गुन्हेंगारांना कायद्यानुसार कठिण शिक्षेची अमलबजावणी करण्याचा अधिकार सुध्दा असत.

हे त्या काळाच्या दिल्ली सुलतानाच्या राजासारखे असायचे. त्यांनी पण इक्तास अधिकाऱ्यांना अमीर यांना रेवेन्यु वसुल करण्याचा अधिकार दिला. खुप अमीर नेत्यामध्ये तेलुगु वीर होते. या गावातुन, पाहुण्यातुन, सैनिकांची निवड करुन प्रशिक्षण देत. राजापेक्षा अधिकाऱ्यांच्या जास्त

SCERT TELANGANA

आधिन असायचे.बलवान राजा सोलव राजा नरसिंग किंवा नरसानायक याने अनेक वेळा विजयनगरच्या राजास सवाल करुन उभे राहत होते. एखाद्या वेळी राजा मरण पावला तर तेव्हा राण्यास बलवान अधिकारी त्यांच्या हातात घेऊन तोच राजा म्हणुन जाहिर करत.

### आता आपण तुलना करु या.

तुम्ही चोल राजांबदल वाचलांत त्यांनी जमीनीचा कर कसा वसुल करत होता. हे माहिती करुन घेतले पण विजयनगरचे साम्राज्य अमर सैन्यधिकारी व सैनिक यांच्या आधिन गावे व शहरे राहत असत.

- सध्याच्या गावामध्ये अमर अधिकाऱ्यांची व्यवस्था असली असती तर त्याचा प्रभाव पडला असता ? तुमच्या वर्गात चर्चा करा.
- गेल्या पाठात तुम्ही आपल्या देशातील सध्याचे गाव शहर यांचे प्रशासन कसे होते. हे वाचलात यास विजयनगरच्या प्रशासनाशी तुलना कराल का ?फरक सांगा

### कृष्णदेवराय- महान प्रशासक

कृष्णदेवरायाने इ.स. 1509 पासुन 1529 पर्यंत प्रशासन केले. बाहमनी सुल्तान आणि उडीसाचे गजपतींच्या विरोधात विजयनगरच्या सैन्याना यशस्वीपणे चालवणारा एक मोठा सम्राट. यांना विरोध करणारे कर्नाटक, आंध्र, तमीलनाडु प्रदेशातील राजांचा पराभव केला. या प्रकारे साम्राज्यावर अधिपत्य मिळविले. विशेष करुन दक्षिण प्रदेश आणि कृष्णानदीच्या किनाऱ्या पुर्वेच्या किनाऱ्यावरील नियंत्रणखाली आणले.

याचवेळी गोव्यातील पश्चिम किणाऱ्यावर पोर्तुगीजांनी बेटाजवळ तंबु टाकुण आपल्या नियंत्रणाखाली आणुन घेतले. कृष्णदेवरायाने यांच्याशी स्नेहपुर्वक संबंध ठेवले. विशेषकरुन घोडे, स्फोटक सामग्रींना त्याच्या कडुन घेण्यासाठी यांना आपल्या सैन्यात समावुन घेतले. त्यांना स्वतंत्र दलाचा दर्जा दिला.

दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी खुप मोठा सन साजरा करत. सैनिकादलाचे प्रदर्शन घडवत. हे मोठ्या प्रमाणात सैनिक कवायतीने स्वत: त्यादिवशी अमर नेत्यांना प्रमुखांना चक्रवतीयांना इनाम, बक्षीसे देत. कृष्णदेवरायाने त्यांच्या साम्राज्यातील देवालयाची विशेष काळजी घेत. त्यांनी स्वत: तिरुपती श्रीशैलम आहोविलास भेट देत. खुप मंदीरांना मोठ्या प्रमाणात देनगी देत. क्रिष्ण देवरायांच्या शिलालेखाप्रमाणे

श्रीकृष्णदेवरांयानी अनेक युध्दात विजय प्राप्त



*Fig 13.3 Relief on Hazara Rama Temple. Can you write a story based on this image?*



SCERT TELANGANA



*Fig 13.4 Gopuram of Ekambareshwar Temple in Kanchipuram.*

करुन मिळणाऱ्या धनराशीचे दक्षिण भारत देशातील मोठमोठ्या मंदीरांना दान दिले. या मंदीरामध्ये यांच्या स्मरणार्थ रामगोपुरम समजल्या जाणाऱ्या मोठ्या देवळाच्या मुखव्दार बांधले या प्रकारे दान धर्मामुळे दक्षिण भारतातील लोकांमध्ये त्यांचे नाव चिरकाळ टिकले. विजयनगर शहरात सुध्दा अशी सुदंर अशी मंदीरे बांधली गेली.

श्रीकृष्णदेवराय स्वत: तेलुगु साह्यि रचनेत कवि होते. त्यांने आंदाला म्हणणाऱ्या तमीळ भक्तीकवियत्रीच्या जिवना बदल अमुक्त माल्यदा ग्रंथ लिहिला. यांच्या काळातील अलसानी पेदन्ना सारख्या कवी बरोरच दुर्जेटी, तेनाली रामकृष्ण, मुक्कू तिमन्ना, पिंगली सुरन्ना, रामराज भुषण, मदयागीरी मल्लन्ना, आय्यालराजू रामभद्रासारख्या अष्ट दिग्वीजयी रामांच्या घराण्यांना अलंकारीत केल्या गेले. श्रीकृष्णदेवरायाचा पुत्र आच्युत देवराय आणि आलीया रामरायाच्या काळात विजयनगरच्या राजांचे वर्चस्व वाढले. यांनी बाहमनी सुलतांनाच्या राज्य व्यवहारात जास्त लक्ष दिले. नेहमीच्या भांडणामुळे त्रासुन गेलेल्या पाच बहुमनी सुलतांनानी इ.स. 1565 मध्ये एक होऊन राक्षसतागडी युध्द किंवा तालीकोटच्या युध्दात यांचा पराभव करुन विजयनगर शहरास लुटुन सर्वनाश केला. नंतर येणारे वारस राजांनी राजधानीस तिरुपती जवळील चंद्रगीरीला बदलले. परंतु पुर्ववैभवास प्राप्त करु शकले नाही. काही प्रदेश वर सुलतांनानी आक्रमण केले. उरलेल्या भुभागावर नेत्यांनी स्वतंत्र राजे म्हणुन घोषीत केले.

**गोलकोंडयाचा कुतुबशाही (1512 – 1687)**

| कुतुबशाहीचा कालावधी | |
|---|---|
| **कुली कुतुबशाहा** | (1512-1543) |
| **जामशेद कुली** | (1543-1550) |
| **इब्राहम कुली कुतुबशाहा** | (1550-1580) |
| **मोहम्मद कुली कुतुबशाहा** | (1580-1612) |
| **मोहम्मद कुतुबशाहा** | (1612-1626) |
| **अब्दुल्ला कुतुबशाहा** | (1626-1672) |
| **अब्दुल हसन तानाशाहा** | (1672-1687) |

या पुर्वीच्या पाठात आपण तेलंगानातील काकतिया राज वंशाबद्दल वाचले आहेच. काकातीय राजवंशाच्या पतनातुन तर त्यांचे काही मांडलीक राजे स्वतंत्र झाले. यांच्यापैकी राच्चकोंडा आणि देवरकोंडा येथील वेल्मा राजघराणे होय. या घराण्याने आणि राजांना आव्हाने दिली. विजयनगर आणि बहमनी राजांशी दोन हातकरण्याची त्यांची तयारी होती. साधारणत: 1512 सालाच्या जवळपास बहमनीचा राज्यपाल असलेल्या कुली कुतुबशाहा तेलंगानाचा प्रमुख होता. त्याने तेलंगानाचा प्रांत स्वतंत्र घोषीत केला. या प्रकारे गोलकोंड्यात कुतुबशाही घरण्याची स्थापना करण्यात आली. अल्पावधीतच त्याने वरंगल, कोंडापेल्ली, एलुरु आणि राजमहेंद्री येथील किल्ले जिंकुन आपले राज्य विस्तारीत केले. या राज्याचा प्रमुख भाग मात्र तेलंगाना होते. या राज्याच्या वारसांनी 1687 पर्यंत राज्य केले.सुल्तान इब्राहीम कुतुबशाहा (1550-80) ने तेलगु

SCERT TELANGANA




**Map 2: Qutb Shahi Dynasty**

साहित्याला ब्राम्हणांना, मंदीरांना मोठे प्रोत्साहन दिले. काकतीया राजा प्रमाणेच पाटबंधारा कामांना महत्व दिले. सिंगनाचार्युडु, आंदकी गंगाधरुडु, कंदुकुरु रुद्राकवी आणि पोनगंटी तेलगनाराय या सारखी अनेक कवी मंडळी या राजाच्या काळात पुढे आली. कवींने इब्राहीम कुतुबशाहाचे वर्णन मलकिबा रामा या शब्दात केले आहे. त्याने अनेक जुन्या काकतीया वंशातील मांडलीकांना पुन्हा सेवेत सामावुन घेतले. विशेषत: काकतीया राजा प्रताप रुद्राजवळ काम केलेल्या सांमतापैकी अनेकजन इब्राहीम कुतुबशहाकडे आले. तो एक चांगला राजा होता. कुतुबशाहाने या सर्व लोकांना सन्मानाने आणि काही प्रमाणात स्वांतत्र्य ही बहाल केले. तसेच किल्यांचा कारभारही त्यांच्या कडे सोपविले होते. कुतुबशाही राजांनी अल्पापधीतच स्थानिक परिस्थितीचा अंदाज घेऊन शेती आणि पाटबंधारे पाणीपुरवठा क्षेत्रात जुन्याच काकतीय राजांची परंपरा चालु ठेवली. संपुर्ण तेलंगाना राज्यात काकतीय राजांनी आमलात आणलेल्या योजना पुन्हा कार्यान्वीत केल्या. गोलकोंडा किल्यात राहत असतांनाच 1562 मध्ये हुसेनसागर तळ्याची निर्मीती करण्यात आली. या तळ्याच्या निर्मीतीत मोलाचा वाटा सुफीसंत हजरत हुसेन शाहवली यांच्या नावावरुनच या तलावाला त्याचे नाव देण्यात आले. मुसी नदीतील पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात या तलावात होतो. अशाप्रकारे या कृत्रिम तळ्यांची बांधणी करण्यात आली. हैद्राबाद शहरास पिण्याचे पाणी पुरवठा करण्याचे ते एका मोठे साधन होते. इब्राहीम पट्टनम येथे आणखी एका तलावही यांच काळात बांधण्यात आला. पुरानापुल ही याच काळात मुसी नदीवर बांधण्याता आला. इब्राहीमचा मुलगा मोहम्मद कुली हा फार मोठा दुरदृष्टीचा राजा होता. आधुनिक हैद्राबाद शहराची निर्मीती आणि संरचनेच्या दृष्टीने त्याने पाऊले उचली त्याचा काळात मीर मोमीन

अस्तराबादी हा हैद्राबाद शहराचा स्थापत्य अखत होता. कुली कुतुबशाहाचा पंतप्रधान पदावरुन त्याने ही सर्व कामे केली. सद्याच्या चारमिनार आणि तत्सम जांगाचे आरेखन त्याच्याच काळात झाले. त्याच्या पुढाकाराने नव्या हैद्राबाद शहराची रचना करण्यात आली. नव्या हैद्राबाद शहरात मोहम्मद कुली कुतुबशाहाने मक्का मशिद आणि जामा मशिदीचे बांधकाम केले. या मशिदीची निर्मीती मक्केतील मशिदीच्या धर्तीवर करण्यात आली. मक्का येथुन आणण्यात आलेल्या मातीपासुन विटा तयार करण्यात आल्या. या विटांचा उपयोग मध्यवर्ती ठिकाणी करण्यात आला. यामुळे या मशिदीला मक्का मशिद असे नाव पडले. या मशिदीतील एका खोलीत महमंद पैगंबराचे केसही ठेवण्यात आले आहेत. आज कुलु कुतुबशाहनेच चार मिनार या इमारतीची निर्मीती केली. आज ही इमारत हैद्राबाद शहराची ओळख जगभर सांगते. तो पर्शीयन आणि उर्दु भाषेचा जाणकार कवी होता. याच्याच काळात उर्दुला राजभाषेचा दर्जा मिळुन तीची भरभराट झाली. एक राजा म्हणुन त्याचे भाषेप्रती योगदान मोठे आहे.मोहम्मद कुली कुतुबशाहाची मुलगी हयात बक्शी बेगम हिने ही हयातनगर येथे हयात बक्शी मशिदीची निर्मीती केली. तिला मा साहेबा म्हणुन ओळखले जाते. आताचे मसबटँक हे जुन्या मा साहबा टँकचे चे अपभ्रंशीत नाव होय. अब्दुल्ला कुतुब शाहा हा काव्याचा आणि संगीत प्रेमी होता. त्याने प्रख्यात अशा क्षेत्रय्या या कवीला दरबारात आमत्रंण दिले. या घराण्याचा सर्वात शेवटचा आणि लोकप्रिय राजा म्हणजे अब्दुल्ला हसन तानाशाह होय. त्याने कंचर्ला गोपन्ना उर्फ रामदास याला पालवंचा गावचा तहसिलदार (करविभाग प्रमुख) म्हणुन नेमणुक केली. रामदासाने कराचा पैसा (जनतेचा पैसा) वापरुन भद्राचलम येथे भव्य असे श्रीरामाचे मंदीर बांधले. तसेच त्यातुन श्रीराम, लक्ष्मण आणि सितेसाठी जडजवाहीर हि घेतले. तानाशाहाने जनतेच्या पैशाच्या दुरुपयोग केल्यामुळे रामदासाला तुरुगांत ठेवले. काही काळानंतर सत्य परिस्थिती समजल्यामुळे सुटकाही केले.



*Fig 13.5 Charminar*

कुतुबशाही कालावधीत गोलकोंडा जगभरात प्रसिध्द पावले ते तेथे मिळणाऱ्या दर्जेदार हिऱ्यामुळे त्या काळात मच्छलीपट्टनम हे शहर बाह्य देशांच्या व्यापाराचे मोठे ठिकाण झाले. येथुनच पुर्व आशिया, चिन, पर्शिया, अरेबिया आणि युरोपाशी व्यापार चालत असे. विविध देशातील मोठमोठे व्यापारी सोने, चांदी, हिरे, मोती यासह गोलकोंड्यास येत असत. हैद्राबाद मधील गोलकोंडा किल्यास लागुन असलेल्या इब्राहीम बागेत कुतुबशाही वंशाच्या सातही राजांच्या समाध्या बांधलेल्या आहेत. हे सातही थडगे विशिष्ट अशा पर्शियन आणि हिंदु पध्दतीने बांधण्यात आले आहेत. शहजहान बादशाहा ही थडगी पाहुन फारच प्रभावित झाला. त्याने पांढऱ्या संगमवराच्या साहाय्याने ताजमहालाची निर्मीती केली. ही सर्व थडगी दगडाच्या सुंदर कोरीव कामाने सजलेली आहेत आणि परिसर संपुर्ण पणे निसर्ग सुंदर आहे. अगोदर पासुन म्हणजेच इब्राहीम कुतुबशाहाच्या काळापासुन मुघलांचा या संपन्न राज्यावर डोळा होता. त्यांना हे राज्य हवे होते. शेवटी सन 1687 साली औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली मुघलांनी गोलकोंड्यावर विजय मिळविला.

कुतुबशाहीच्या पतनांनंतर मुघलांनी जुन्या सर्व पध्दतीचा त्याग करुन नविन पध्दती अमंलात आणल्या. महत्वाच्या आणि मोठ्या पदावरुन स्थानिक लोकांची हकालपट्टी करण्यात आली. त्या ठिकाण बाहेरच्या लोकांची नियुक्ती करण्यात आली. याच

SCERT TELANGANA

वेळी लोकांची पिळवणुक करुन जास्तीत जास्त महसुल गोळा करण्याचा सपाटा लावला. कर गोळा करण्यासाठी कंत्राटी पध्दती सुरु केली. जो जास्तीत जास्त कर देईल त्याला कर वसुलीचे कंत्राट दिले जाई. यामुळे सरकार दरबारी देण्यात येणाऱ्या रक्कमेपेक्षा किती तरी जादा रक्कम गोरगरीब जनतेकडुन वसुल केली जात होती. शिवाय लिलावाव्दारे कर वसुलीचे कंत्राट देण्यात येत असे. त्यामुळे बलवान आणि वजनदार लोकांनाच हे कंत्राट मिळत असे. याचा परिणाम म्हणुन लोकांत नैराश्य, असंतोष आणि स्थलांतराचे प्रमाण वाढले.

- कुतुबशाही राजवटीचा नकाशा पाहुन त्यात गोलकोंडा,मच्छलीपट्नम, भद्राचलम आदि ओळखा.
- गोलकोंडा राजघराण्याची आर्थिक क्षमता कुतुबशाही कालावधीत सर्वोच्च स्तर मोगलांच्या राजवटीत निच पातळीला गेली असे तुम्हास का वाटते?



*Fig 13.6 Golconda Fort*

- गोलकोंडा राज्यातील हिऱ्यांच्या खाणीची स्थळे शोधा. तसेच व्यापाराची ठिकाणे ही शोधा?

**महत्वाचे शब्द**

1. अमर नेते
2. अमिर
3. इक्ता
4. पुरातन शास्त्रज्ञ
5. रायगोपुरम

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. विजयनगरचे राजे ओरुगल्लु सारखे शहरात न राहता वेगळे का राहिले? असे तुम्हास वाटते?
2. अमर नेते बलवान का होते?
3. काकतीयांच्या पाठातील नेते आणि अमर नायक या मध्ये काही फरक किंवा साम्य आहे का? कशाप्रकारे?
4. विजयनगर शहर पश्चिम किनारपट्टी निर्यातीवर का आधारीत आहे?
5. श्रीकृष्णदेवरायाने त्यांचे राज्य बलवान होण्यासाठी शत्रुशी युध्द केले. त्यांची यादी तयार करा?
6. तेलुगु साहित्याच्या सेवेसाठी विजयनगराच्या राजांनी केलेल्या कार्याची माहिती द्या?
7. भारताच्या नकाशात खालील स्थळे दाखवा?

   1. हंपी 2. बिजापुर 3. तिरुपती 4. गोलकोंडा 5. कांची 6. तुंगभद्रा नदी
8. विविध राजांनी तेलुगु साहित्यासाठी केलेले योगदान यावर चर्चा करा?
9. कुतूबशाही राजाच्या शिल्पकला आणि वास्त कलेचे वर्णन करा?

SCERT TELANGANA

पाठ 14

# मोगल साम्राज्य

मध्ययुगीन काळात कित्येक प्रकारच्या जाती, प्रत्येक संस्कृती, परंपरागत पध्दत अशा विशाल भारत उपखंडात कोणत्याही राजाला पालन करणे कठिण झाले. पण फारच कमी काळात मोगल इ.स. 1550 ते 1700 च्या काळात दिल्ली सोडुन पुर्ण भारत उपखंडावर आपल्या राज्याची विस्तारणा करण्यास यशस्वी ठरले. यांच्या शासन करण्याच्या पध्दती, व्यवस्था, भविष्यवाणी, नंतरच्या काळातील राजावर बऱ्याच वर्षापर्यंत त्यांचा प्रभाव पडतो. सध्या भारत स्वतंत्रता दिवशी भारताचे प्रधानमंत्री ज्या किल्यावरुन देशास संबोधुन भाषण करतात. तो लाल किल्ला मोगलाचे निवासस्थान होय.



*A Coin with the picture of Jahangir*

## मोगल कोण होते ?

मोगल म्हणजे मध्ये आशिया देशातील उजेकिस्तान व मंगोलीया देशाचे होते. सर्व प्रथम मोगल चक्रवती राजा बाबर 1526 ते 1520 इतर राजाच्या त्रासामुळे येथील वडिलोपार्जित सिंहासन सोडुन येण्यास भाग पडले. बरेच वर्ष फिरुण शेवटी इ.स. 1504 काबुल वर कब्जा केला व 1526 मध्ये दिल्लीचा सुलतान ईब्राहीम लोदीचा पराभव करुन दिल्ली आणि आगरा ताब्यात घेतल्या गेली.



Fig 14.1 Red Fort



SCERT TELANGANA

# महत्वाचे मोगल राजे - प्रमुख मोहीम आणि घटना



**बाबर (इ.स.1526-1530)** (डावीकडे)
इ.स. 1526 मध्ये इब्राहीम लोदीचा पराभव करुन दिल्ली आणि आगरा काबीज केले.



(उजवीकडे) **हुमायुन (सन1530-1556)**
शेरखॉन हुमायुनचा पराभव करुन त्याला इरानला पलायन करण्यास भाग पाडले. त्याने सफाविद शाह यांची मदत घेतली. हुमायुनने इ.स.1555 मध्ये दिल्लीवर आक्रमण करुन दिल्लीवर विजयी मिळविला. पण एका वर्षातच अपघात होऊन त्याचा मृत्यु झाला.



**अकबर (इ.स**1556-1605) (डावीकडे)
अकबर राजा झाला त्यावेळी त्याचे वय 13 वर्ष होते. अकबर बंगाल तर्फे मध्यभारत देशाला व राजस्थान, गुजरात यावर फारच कमी काळात कब्जा केला. त्यानंतर त्याने अफगानिस्तान, कश्मिर व दक्खनच्या कांही भाग कब्जा केला. त्याच्या साम्राज्याला नकाशा -1. मध्ये पहा.



**जहांगीर** (इ.स**1605-1627)** (वर)
अकबरने केलेली सर्व आक्रमण जहांगीर पुढे चालु ठेवली. पण त्याने फारसे साम्राज्य वाढविले नाही.

**शहाजहान** (इ.स1627-1658) मोगल राज्याची झालेली विस्तारणे शहाजहाने पुढे सांभाळुन ठेवण्याचे कार्य केले. त्याला त्यांच्या साम्राज्यातील वरीष्ठ अधिकारी आणि प्रमुख व्यक्तिकडून अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. इ.स. 1657 ते 1658 या काळात सिंहासनासाठी त्याला मुलात खुप वादविवाद झाले. औरंगजेबने तिन भावांना हरवुन त्यांना मारुन टाकण्यात आले. शहाजहानला कैदी केल्यामुळे त्याचे बाकी जिवन कैदखाण्यात काढावे लागले. तो आग्रा कैदखाण्यात होता.



**औरंगजेब (इ.स. 1658-1707) उजवीकडे**
औरंगजेब आसामवर कब्जा केला पण अफगाणिस्तान सोडुन आसाम, राजस्थान, पंजाब, डेक्कन यात त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. गुरुतेज बहादुर, गुरुगोविंदसिंग व शिवाजी महाराज स्वतंत्र मराठा राज्य स्थापना करण्यात यशस्वी झाले. इ.स. 1685 मध्ये औरंगजेब ने बिजापुरवर विजय प्राप्त केला व इ.स. 1687 मध्ये गोलकांडा ताब्यात घेतला. औरंगजेबच्या मृत्यु नंतर त्यांच्या मुलात सिंहसणानासाठी वादविवाद सुरु झाले.



SCERT TELANGANA

## मोगलांचा इतर राजांशी संबंध

त्या काळी पुर्ण भारतदेशात अनेक लहान लहान राज्य होते. त्यांना तेथील स्थानिक राजे चालवत असत. मोगल राज्याच्या स्थापने नंतर या लहान लहानर राज्यावर मोगलांचे नियत्रंण झाले. तेथील राजांना प्रशासन पाहण्यासाठी परवानगी दिली व त्यांच्या कडुनच तहसिल कर वसुल करण्यात येऊ लागले. राज्या, राज्यातील युध्दांना तोंड देण्यासाठी सैन्याना सदैव तत्पर राहण्याचा आदेश होता. जो राजा याचा हुकुम ऐकत नसे त्यांच्यावर सैनिकी हमला करुन ते राज्य ताब्यात घेतल्या जात असे. जेव्हा मोगलांचे राज्य भव्य व शक्तीशाली झाले त्या वेळेस इतर लहान लहान राज्य यात येऊन समाविष्ठ झाले. यांचे राजपुत हे उत्तम उदाहरण आहे. कित्येक राजांनी आपल्या मुलींचा विवाह मोगलांशी करुन मोगल राज्यातील उन्नत पद प्राप्त केले. पण त्यावेळेस कांही लोकांनी याचा विरोध पण केला. चित्तोड व सिसोडीया हे राजपुत बरेच वर्ष मोगलांच्या अधिकारांना ओळखुन शकले नाहीत. यांच्याशी युध्दात हरल्यानंतर राजांचा गौरवाने त्यांची जमीन त्यांचे राज्य त्याला परत करत असत.त्याचा मुख्य उद्देश हरवणे पण शत्रुचा अपमान करणे नव्हता. असा सामजिक न्याय असल्यामुळे अनेक नायकांचा गौरव करण्यात येऊ लागला. असा स्नेहप्रेम पाहुणच ते त्यांच्या मुंलीचा विवाह मोगलांशी करु लागले. जहांगीर याची आई म्हणज राजपूतचा राजा(सध्याचे जयपुर) याची मुलगी होय. व शहाजहाणची आई जोधपुर राजाची युवराणी होय.

## मनसबदार आणि जागीरदार

मोगल साम्राज्याचा विस्तार जास्त होत असल्यामुळे विविध प्रांतातील लोकांना वेगवेगळ्या नौकऱ्यावर नियमीत करण्यात आले. यात तर्की, इराणी, भारतीय मुस्लीम, अफगानिस्तान, राजपुत्र, मराठा इतरांना नौकरी देवुन मनसबदार पदावर नियुक्त करण्यात आले. सैन्यात पदे देण्यात आली.




SCERT TELANGANA



*Fig 14.2 A mansabdar on march with his sawars (A miniature painting)*

हे सर्वजन चक्रवती राजांच्या नियंत्रणातच राहत असत. यांना अंगरक्षक व आपआपल्या प्रांताचे रक्षण करणे, एखाद्या प्रातांचे शसन पाहणे, नविन राज्यावर आक्रमण करण्याचे कार्य त्यांना सोपवण्यात येत असे. ह्या मनसबदारांना स्वत: काही निर्णय घेण्याचा अधिकार नसे. फक्त चक्रवर्ती राजा सांगेल त्याप्रमाणे ऐकावे लागत असे. असा नियम मोगलाच्या शासनात केला होता. विजय नगरच्या राज्यातील नेते, राजकीय नेते, स्वत:निर्णय घेऊन चक्रवर्ती राजांना कसे कमजोर करतात हे तुम्हास माहितच आहे. त्या करीता मोगल यांना नियत्रित करण्यासाठी त्यांना दोन किंवा तीन वर्षाला एका प्रांताहुन दुसऱ्या प्रातांस प्रांतीय मनसबदार म्हणुन त्यांची बदली करत असत. त्यामुळेच कोणताही मनसबदार एका प्रांतात स्थीर राहु शकला नाही. त्यामुळे त्यांची एकता शक्ती वाढेल हे शक्य नसते.

मनसबदार हे कांही प्रमाणात घोडे व सैनिकांचे पोषण करणे, त्याची वाढ करणे ही जबाबदारी त्यांच्यावर असत. प्रत्येक मनसबदार आवश्यक सैन्याची समिक्षा घेत त्याच्या पगारीसाठी रजिस्टर ठेवत त्यात पुर्ण माहिती नमुद करुन त्यांना पगारी देत असत.

एका मनसबदाराचा मुलगा मनसबदार होत नसे. म्हणजे यात वडीलांची नौकरी मुलास येत नाही. वंश परंपरागत नसल्यासारखे चक्रवर्तीनांच कुणाला मनसबदार करण्याचा अधिकार असे. ऐवढेच नाहीतर मनसबदारांच्या मृत्यु नंतर त्यांची संपुर्ण संपत्ती पुर्ण चक्रवर्ती जप्त करत असत. मनसबदांची पगार जागीरदाराच्या उत्पादनातुनच काढल्या जात असे. तो त्यांच्यावर कर म्हणुन लादल्या जात असे. पण हे विजयनगर वासीयांना पसंद नव्हते. त्यामुळे मनसबदार हे तहसिल कर जांहागीदार कडुन घेत व आपल्या चक्रवृर्त्ती कडे पाठवतात. जागिरदाराच्या शासनाची देखरेखा चक्रव्रर्तीकडुन नियुक्त केलेले अधिकारी भरायची गरज नाही असे ते शेतकऱ्यांना सागत असत. हे जागीरदार पण दोन किंवा तीन वर्षानी एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी बदली होत असत.

अकबरच्या काळात हे जागीरदार मनसबदार च्यापगारी होतील याची काळजी घेऊन त्याच्या

पगारीचा हिशोब ठेवुन पगार दिल्या जात असे. औरंगजेबच्या शासनात मनसबदारांची संख्या वाढलेली दिसुन येत नाही. पण जागीरदार होण्यासाठी बरेच वर्ष वाट पाहावी लागत असे. त्या कारणानेच जागीरदाराची कमी संख्या झाली. याचा परिणाम बऱ्याच दिवसांनी जागीरदारी मिळाल्या मुळे जेवढी वसुली कर लावयाचा तेवढा ते लावत असत. औरंगजेब सुध्दा शेवटी या अन्यायी कर वसुलींना थांबवु शकला नाही. त्याचाच परिणाम शेतकऱ्यांना अनेक त्रास सोसावे लागले.

## जप्त आणि जमीनदार *Zabt* and *Zamindars*

मोगल राजांचा मुख्य उत्पन्न म्हणजे उपलब्ध भौगोलीक संपदा व शेतकऱ्यांवर लादल्या जाणारा कर हे होय. अकबर काळातील अर्थमंत्री तोडरमल्लु इ.स. 1570-1580 च्या काळात कोणत्या प्रांतात कोणते पिके कितपत पिकते कोणकोणते पिक पिकवल्या जाते व त्यावरील धान्यांना काय भाव मिळतो. याचे त्याने जागृतीने सर्वेक्षण करुन असे अहवाल तयार करुन त्याच्या आधारावरच कोणत्या पिकास किती कर लादायचा हे ठरवल्या जात असे. प्रत्येक प्रांतास तहसिल कार्यलिय चालु करण्यात आले. त्यातुन पुर्ण शेतकऱ्यांची कर भरण्याची यादी तयार केली जात असे. व त्यांच्यावर कर लादल्या जात असे. या पध्दती जप्त पध्दत म्हणतात. ज्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी सर्वे केले होते. त्या ठिकाणी ही पध्दत यशस्वी झाली पण गुजरात व बंगाल या प्रांतात ही पध्दत यशस्वी झाली नाही.

बऱ्याच प्रातांत गावातील मोठ्या व्यक्ती तर्फे कर भरल्या जात असे. मोगल व शेतकऱ्यांच्या मध्यस्ती राहुन जो व्यक्ती कर वसुल करुन मोगलांना देत असे त्यांना त्या काळी जमीनदार असे म्हणत.




*Fig 14.3 Details in a miniature from Shah Jahan's reign showing corruption during his father's administration 1. A corrupt officer receives a bribe and 2. A tax collector punishes poor peasants*

यांना चक्रवर्ती राजा नियुक्त करीत नसत हे वंश परंपरागत वडीलापासुन मुलाला येत असत. हे सर्व लोक स्वत:चे रक्षक ठेवत असत. जमीनदारांना चक्रवर्तीकडुन वाटा मिळत असे. हे जमीनदार मोगल अधिकारी व ग्रामवाशी यांत मध्यवर्ती प्रतिनीधी म्हणुन काम करीत असतात.

काही प्रांतात हे फारच शक्तीशाली होते याचा परिणाम मोगलाच्या अन्यायी लुटमारी विरोधात हे विरोधी आवाज उठवत आंदोलन करत. कित्येक वेळेस जातीयवाद लक्षात घेऊन मोगलाच्या विरोधात आंदोलन केल्या जात असे. अशा प्रकारचे मोगल विरोधी आंदोलन 17 व्या शतकाच्या शेवटी मोगल साम्राज्याच्या पालन व्यवस्थेवर प्रश्न उभा करणारे ठरला.

- मनसबदार व जमीनदार यातील फरक सांगा ?

SCERT TELANGANA

- चक्रवर्तीच्या नियंत्रणात कोण-कोण होते?
- नायक व मनसबदार यांच्या स्थानाची तुलना करा?

## अकबर-राजकीय पध्दत

अकबरच्या शासनाची पध्दत नियम, नियमावली या सर्वाचे वर्णन अकबरचे मित्र अबुल फजल याने लिहिलेले अकबरनामा या पुस्तकात पुर्णपणे वर्णन केले आहे. इ.स. 1570 मध्ये अकबर फत्तेपुर सिक्रीत (आग्राजवळ) राहत होता. त्यावेळस मतावर चर्चा करण्यासाठी मुस्लीम पंडीत, ब्राम्हण, रोमन महाराज व इतरांना बोलावत असे. प्रजेत असणारे विभिन्न मत यांची अकबरला विशेष आकर्षण होते. प्रत्येक जातीतील महान पंडीत किंवा मत कोण जास्त मतांवर विचार करतो. त्यावर दृष्टी ठेवण्यात आली. यांच्या उपदेशामुळेच प्रजेत जातीयवाद मतभेद हा मानवतेस धोका असे तो समजत असे. प्रत्येक मतात काही चांगले उपदेश असतात व त्यामागे काही वाईट पण असतात. प्रत्येक मताचे सहणशिलता कितपत आहे हे महत्वाचे वेगवेगळ्या विचार करणाऱ्यांना एकत्र ठेवावे असे त्यास वाटत असे. सुल्हॉ - ई-कुल (जागाची शांती) असा विचार त्याच्यात आला. अशा प्रकारच्या विचार त्यावेळच्या काळात असलेल्या मतपंडीत, धर्मगुरु यांच्यात मतभेदीभाव कमी करण्यासाठी उपयोगी आला. कोणताही एक मत नसुन निर्मी, सामाजिकन्याय, शांती याची मानव जातीना आवश्यकता आहे अशी पध्दत सर्वजन पाठावी असे तो सर्वाना उपदेश करीत असे. सुल्हॉ-ई-कुल या पध्दतीव्दारे राजकीय शासन चालवण्यासाठी अकबरला अब्दुल फजल याने मदत केली. औरंगजेब या पध्दतीपासुन दुर झाला. इतर मतांची प्रजा याचा जोरदार विरोध करु लागली. औरंगजेबने तो स्वत: सुन्नी मुसलमान आहे असे दर्शविले.



*Fig 14.4 Akbar holding discussions with learned individuals of different faiths in his* ibadat khana

सुल्हॉ-ई-कुल(जागतीक शांती)

अकबरचा मुलगा जहांगीर याने या बदल असे विचार व्यक्त केले.

*"या विशाल दैवनिर्मीत जगाला सर्वांना स्थान आहे. या आपल्या राज्यात सर्व दिशा नियंत्रीत आहेत. बाजुस समुद्राशिवाय बाकी काही नाही. इतर श्रध्दा व मत पंडीतांना येथे स्थान आहे. मतप्रचारास संधी नाही. मुस्लीम,सुन्नी, सिया हे मस्जिद मध्ये प्रार्थना करता तर ख्रिश्चन चर्च मध्ये करतात. याने जग शांती सुल्हॉ-ई-कुल या पध्दतीचा अवलंब केला. (sulh-i kul)."*

## 17 व्या शतकानंतर मोगल साम्राज्य

प्रशासन व सैनिक, आर्थिक व्यापार क्षेत्रात मोगल साम्राज्यांनी बरीच प्रगती केली. विदेशी यात्रीयांना प्रसिध्द व प्रगतीशील देश म्हणुन सांगु लागला. पण हे यात्रिक प्रगती बरोबर देशात बेरोजगारी दारिद्र्य पणा पाहुन नाराज होऊ लागले. शहाजहानने 20 व्या वर्षी लिहिलेले अधिकार पत्रात खालील विषय पहावयास मिळतात. साम्राज्यात पुर्ण मनसबदार 8000 लोक आहेत तर त्या उच्च वर्गात श्रेणीत फक्त 445 एवढेच आहेत. म्हणजेच ते 5.6 एवढेच पण त्यांना नौकदाराची पगार रुपये 61.5% दिल्या जात असे.

मोगल चक्रवर्ती मनसबदाराच्या उत्पादननातुन जास्त भाग पगार दररोज भास

### सरदार सरवाई पापन्ना:



सरवाई पापन्ना हे वरंगल जिल्ह्याचे तेलंगानातील मुघल सत्तेविरुध्द यांनी युध्द पुकारले. औरंगजेबाच्या कालावधीत त्यांनी तेलंगानातील दिन दुबळे गोरगरीबांचे नेतृत्व केले.

सन 1687 ते 1724 या कालावधीत पापन्ना यांनी तेलंगानाच्या भागावर राज्य केले. त्यावेळी तेलंगानावर मुगलांची सत्ता होती. वरंगल जिल्ह्यातील खिलशापुर येथे किल्ला बांधुन राज्यकारभार केला. मुघलांकडुन सामान्य जनते वर होणाऱ्या अत्याच्याराविरुध्द लढा उभारण्यासाठी त्यांनी एक लहानसे दल तयार करुन त्या दलास गनिमी काव्याचे शिक्षण दिले. आपल्या 30 वर्षाच्या कारकिर्दीत भुवनगिरी, कोलानुपाकु (नल्लगोंडा जिल्हा) ताटीकोंडा, वरंगल जिल्ह्यातील चेरीयाला, हुजुराबाद, हुस्नाबाद (करीमनगर) आदि प्रदेशावर अधिपत्य मिळविले. सरवाई पेटा येथे त्यांनी पहिला किल्ला बांधला. तेथुन राज्य विस्ताराची मुहुर्त मेठ रोवली. त्यानंतर ताटीकोंडा वेमुलकोंडा आणि शाहपुरम असा विस्तार केला. ताटीकोंडा येथील सद्याचे तळे त्यांच्याच कालावधीत बांधण्यात आले. यावरुन हा विकासशिल राजा होता हे लक्षात येते.



सुभुदार, जमीनदार आणि मोठ्या शेतकऱ्यावर गनिमी काव्याच्या साहाय्याने हल्ला करुन युध्द आणि साम्यासाठी पैसाठी गोळा केला. पापन्नाचे वाढते बळ आणि लोकप्रीयता पाहुन औरंगजेबाने रुस्तुम-दिल-खानाने कासीम खान ला त्याला आवर घालण्याचा सल्ला दिला. त्यानुसार रुस्तुम दिल खानाने कासीम खानांची रवानगी केली. त्याने प्रथम पापन्ना आणि शाहपुराकिल्यावर हल्ला केला. त्यात कासीम खानाला पराभवासह जिव गमवावा लागला. ही वार्ता ऐकुण रुस्तुम दिल खान स्वत: युध्दात उतरला. हे युध्द सुमारे तिन महिणे चालले. शेवटी रुस्तुम दिल खानाला युध्दातुन पळ काढावा लागला आणि पापन्नाला उत्तम मित्र सहाकारी सर्वन्नाला गमवावे लागले.

औरंगजेबाच्या मृत्यु नंतर सन 1707 मध्ये दख्खनचा सुभेदार कामबक्ष यांचे अधिपात्य कमी होऊ लागले. त्याचे नियंत्रण हळु हळु कमी होत गेले. नेमकी हिच गोष्ट हेरुन पापन्नाने 1 एप्रिल 1708 रोजी वरंगलचा किल्ला जिंकुन घेतला. याच वर्षी पापन्नाने पुढे गोलकोंडायाचा किल्ला जिंकुन घेतला.

SCERT TELANGANA

असणाऱ्या गरजा व इतर वस्तु खरेदी करीता वापर करत असत या खर्चाव्दारे वस्तु पुरवठा करणारे शेतकरी व मजुरी करणाऱ्या काम मिळत असे. पण अतिगरीब लोकांना याचाकाहीच फायदा होत नसे. कारण यांच्या कडे आवश्यक तेवढे भांडवल कामाकरीता लागणाऱ्या वस्तु खरेदी करीता त्यांच्या कडे नसत. यामुळे श्रीमंत शेतकरी व लहान उद्योगी यांना खुप फायदा होत असे. 17 व्या शतकातील भौगोलीक नैसर्गिक संपदावर मोगलाचे आधिपत्य असल्यामुळे हा शक्तीवंत वर्ग म्हणुन ओळखाल्या जावु लागला.

मोगलांचे अधिकार हळुहळु कमी होऊन प्रांतीय राजे जोर धरण्यास सुरुवत होऊ लागली. पुढे ते लहान राज्य हैद्राबाद व अवध अशा राज्यांची स्थापना करु लागले. शेवटी दिल्ली चक्रवर्ती आपला देव म्हणुन समजले तरी 18 व्या शतकात ही राज्य स्वतंत्र निर्माण झाले.

## हैद्राबादची असफजाही 1724-1948

### असफजाही राजघराणे

| | |
|---|---|
| निजाम -उल-मुल्क | (1724-1748) |
| नासर जंग | (1748-1751) |
| मुझफर जंग | (1751-1751) |
| सलाबत जंग | (1751-1762) |
| निजाम अली जंग | (1762-1803) |
| सिंकदर झाह | (1803-1829) |
| नसिर उद दौला | (1829-1857) |
| अफजल उद दौला | (1857-1869) |
| महबुब अली खान | (1869-1911) |
| मीर उस्मान अली खान | (1911-1948) |

सन 1720 मध्ये दख्खन मध्ये मुघल सत्ता कमजोर पडली. याचा फायदा अनेकांनी घेतला यापैकी एक दख्खनचा सुभेदार चीन कुलीच खान होय. तो निजाम उल मुल्क यानावाने ओळखला जात असे. तो असफजाही राज घराण्याचा संस्थापक होय. हे राजघराणे 1724 साली हैद्राबादेत उदयास आले. निजाम उल मुल्काने एकंदर 24 वर्ष राज्य केले. (1724-1748) या राजघराण्यात एकुण दहा राजे झाले. यांनी 1724 ते 1948 पर्यंत राज्यकारभार केला. निजाम सातत्याने मराठे आणि मैसुरचा राजा विरुध्द लढत राहिला. परंतु यामुळे हळुहळु तो ब्रिटीशांच्या अमलाखाली जाऊन स्वातंत्र्य टिकवण्यासाठी ब्रिटीशांवर अवलंबुन राहु लागला.

ब्रिटीशांच्या अनेक सुधारणा निजामाने आपल्या राज्यात करण्याचा प्रयत्न केला. वसाहतवादाकडे त्याचा कळ होता. हैद्राबादची झपाटच्याने विकासाकडे वाटचाल होऊ लागली. ब्रिटीशांना हैद्राबाद फार आवडायचे 19 व्या शतकात खऱ्या अर्थाने या शहराचा विकास झाला. सन 1853-1883 या काळात सालारजंग हा निजामाचा पंतप्रधान होता. त्याने हैद्राबादच्या विकासाठी मोठे योगदान दिले. अनेक योजना राबवल्या होत्या.



*Salar Jung*

सहावा निजाम मीर महबुब अली याचा कालावधीत सुधारणांच्या दृष्टीने अतिशय महत्वपुर्ण होता. त्याच्या काळात असंख्य सुधारणा झाल्या. असिफिया ग्रंथलाय, विक्टोरीया मेमोरीयल, अनाथश्रम, महबुबीया मुलींची शाळा आदिंची स्थापना याच कालावधीत करण्यात आली. 1908 मध्ये मुसी नदीला महाभयंकार असा पुर आला या पुरामुळे शेकडो लोकांचे जनजिवन विस्कळीत झाले. स्वत: निजामाने बचाव कार्याचे मार्गदर्शन केले.

SCERT TELANGANA

लोकांना प्रचंड मदत केली. त्यांना निवारा पुरविला. तथापी सातव्या निजामाला मात्र उदारतावादी धोरणा ऐवजी जमीनदारी पध्दती आणि सामतीकरणाकडे वळावे लागले. याच काळात उदरतावादी सुधारणाचे वारे वाहु लागले.

**महत्वाचे शब्दः**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मनसबदार | 2. | जागिरदार | 3. | जप्त |
| 4. | इलीट | 5. | जमीनदार | 6. | सुल्हॉ-ई-कुल(जागतीक शांती) |

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. मनसबदार आणि जागीरदार यातील संबंध स्पष्ट करा?
2. मोगल साम्राज्यात जमीनदाराचे कोणती मुख्य भुमीका होती ते सांगा?
3. कुलगुरु आणि मतपंडीतांशी केलेल्या चर्चेचा परिणाम अकबरच्या प्रशासनावर कसा पडला?
4. मोगलांशी युध्दात हरलेले राजे पुन्हा त्यांना त्यांचाच राज्यात राज्य का करविण्यात आले?
5. मोगलांचा विशाल साम्राज्यावर नियत्रंण ठेवण्यासाठी सुल्हॉ-ई-कुला ही पध्दत कशी महत्वपुर्ण ठरली ते सांगा?
6. पान क्र. 130 वरील जप्त आणि जमीनदार हा परिच्छेद वाचुन टिप लिहा?
7. मुघल राजांची माहिती मिळवुन खालील तक्त्यात भरा?

| अ.क्र. | राजाचे नाव | कालावधी | महत्वाची वैशिष्टये |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

SCERT TELANGANA

पाठ 15

# भारतात ब्रिटीश राज्याची स्थापना

औरंगजेब हा मोगल साम्राज्याचा शेवटचा राजा होता. सध्या भारत देशात असणाऱ्या अखंड अशा भुभागावर त्यांनी वर्चस्व गाजवले. इ.स. 1707 मध्ये औरंगजेबच्या मरणानंतर मोगलांचे सुभेदार, मोठे जमिनदार, प्रांतीय राज्य निर्माण करण्यास सुरुवात केली. याचाच परिणाम म्हणुन देशात अनेक बलवान अशी प्रांतीय राज्ये निर्माण झाल्यामुळे दिल्लीस राजधाणी सांभाळणे अवघड होत गेले.

इ.स. 18 व्या शतकाच्यामध्यकाळात ब्रिटीशांच्या रुपात नविन अधिकारी केंद्रास गावात आले. ब्रिटीश लोक छोटे व्यापारी करण्यासाठी आपल्या देशात आले. हे तुम्हास माहित आहे का? तसे लोक एवढ्या मोठ्या देशाचे शासक कसे झाले?

## इस्ट इंडीया कंपनी पूर्वेला आली.

इंग्लडची पहिली राणी एलिजाबेथ व्दारे पुर्व देशांशी मध्यस्थी करण्यासाठी इ.स. 1600 या वर्षी इस्ट इंडीया कंपनीवर अधिकार गाजवण्यासाठी रॉयल चार्ट व्दारे आले. यानुसार इंग्लडमधील इतर कोणतीही व्यापार कंपनी इस्ट इंडीया कंपनीनी स्पर्धा करु नये. या करारामुळे कंपनी समुद्राच्या पलीकडील नविन भुभागावर वस्तु स्वस्त दरात घेऊन, युरोप मध्ये अधिक किमतीत विकण्याची संधी मिळाली.

## व्यापारी देवाण - घेवाण

मर्कनटाइल ही एक व्यापारी संस्था आहे. जी व्यापाराद्वारे फायदा मिळवीते. मिळवणारी संस्था कमी किमतीत वस्तु खरेदी करुन जास्त किंमतीत विकत असत. त्याकाळी व्यापार संस्था स्पर्धा नसुन अधिक नफा घेत असत. इतर युरोपीयन देशांना पुर्व देशात येऊ देण्यास चार्टर थांबु शकले नाही.



*Fig 15.1 The headquarters of East India Company in London*

SCERT TELANGANA



*Fig 15.2 VascodaGama*

ब्रिटीशांचा सुरुवातीची नौका आफ्रिकेच्या पश्चिम दिशेच्या गोल प्रवास करुनर गुडहोप आग्रहपार करुन हिंदु महासागरात जाते वेळी पोर्तुगिजानी भारत देशाच्या पश्चिम भागेस गोवात आपले स्थान मांडले. पोर्तुगिजचा नाविक वास्को दि गामा इ.स. 1498 मध्ये भारत देशास समुद्र मार्गाव्दिारे शोध लावला 17 व्या शतकाच्या सुरुवातीस डच देशातील लोक सुध्दा हिंदु महासागर किनाऱ्यावर व्यापार करण्यासाठी संधी शोधु लागले.

नंतर फेंच व्यापारी येऊन पोहचले. यात अडचण काय म्हणजे सर्व कंपन्यानी एकाच प्रकारच्या वस्तु विकत घेण्याची आवड दाखवली. भारतात तयार झालेल्या चांगल्या सुत, सिल्कला युरोपमध्ये मागणी वाढली. कागद,लवंग, मिरे, विलायची, अद्रक यासारख्या मसाले पदार्थाना जास्त मागणी आहे. युरोपीयन कंपण्यामधील स्पर्धेमुळे त्या त्या वस्तुच्या किंमती वाढल्या व्यापारात स्पर्धा वाढल्या मुळे व्यापार केंद्र सांभाळण्यासाठी सैन्य आणि किल्ल्यांची आवश्यकता भासली. किल्ले बांधुन, कोठारे बांधुन, इमारतींना बाधुन राहण्याचे प्रयत्न वाढले. फायदेशीर व्यापाऱ्यांची वाढ स्थानिकांशी संघर्षास सुरुवात झाली.

## शस्त्रे वापरणारी व्यापारी Armed Traders

भारत देशामध्ये व्यापार करण्यासाठी युरोप व्यापाऱ्यानी स्वत:च्या कंपन्या काढल्या ब्रिटीश व्यापाऱ्यानी इस्ट इंडीया कंपणी, फ्रेच व्यापाऱ्यांनी फ्रेच इस्ट इंडीया कंपनीची स्थापना करुन घेतले. भारत देशात व्यापाऱ्यांना हस्तगत करुन घेण्यासाठी हे दोन कंपण्या एक दुसऱ्याशी संघर्ष वाढला. त्याचा संघर्षास मदत देण्यासाठी इंग्लड, फ्रान्समधुन त्या त्या देशाची सैन्य बोलावुन घेतले. त्या त्या देशाचे राजे सुध्दा त्यांच्या कंपनीस मदत करण्याची सुरुवात केली.



*Fig 15.3 A drawing of Machilipatnam from 1676*

या कंपण्या भारतातील जमीनी जप्त करुन स्वत:राजवाडे बांधुन एक दुसऱ्या वर युध्द करण्यास सुरुवात केली. व्यापारात झालेल्या फायद्यामुळे

SCERT TELANGANA

त्यांच्याकडे जमा झालेली संपत्ती ब्रिटीश लोकांच्या औद्योगिक विकासाची वाढीस भर पडली. या काळातच इंग्लड, डच सहीत युरोपीयन देश स्पेन, पोर्तुगल, फ्रान्स, हॉलंड, जर्मनी, उत्तर दक्षिण अमेरीका, आफ्रिका आशिया खंडमध्ये सर्वांनी वसाहती करुन घेतले. ही वसाहती युरोपीयन देशांना अधिकार व संपत्ती मिळवुन दिले.

मोगल राजे, स्थानिक राजे, नवाब या व्यापारीयांना परवानगी दिल्यामुळे त्यांची सैन्याची वाढ करुन राजवाडे बांधत एकमेकांत युध्दे करण्यास सुरुवात झाले. स्थानिक राज्यात विदेशी मध्यस्थ सैन्याच्या मदतीने आर्थिक वर्चस्व वाढवणे किती भयंकर आहे हे त्यांनी ओळखले.

मोगल राजे बलवान असे तो पर्यंत युरोप कंपनी त्यांच्या सैन्याच्या वाढ करणे भारतात शक्य झाले नाही. शहाजहान, औरंगजेबाच्या काळी अनेक वेळी युरोपीयन कंपनण्यानी युध्द करुन पराभव पत्कारला होता. औरंगजेबाच्या मृत्युनंतर काही काळानंतर विविध सावंत राजांनी स्वतंत्रपणे आपले संस्थान बांधण्यास सुरुवात केली. त्या पध्दतीने बंगाल, आवध (लखनऊ) हैद्राबाद प्रांतातील मोगल राजांना नाममात्र राजा बनवुन ते स्वत: राज्य करीत गेले.

मोगल साम्राज्याचे छोट्या छोट्या राज्यात तुकडे झाल्यामुळे या कंपनीने त्याच्या अधिकारात मागणीस पाऊल उचलले. नवाब आणि राजे त्यांच्याशी जास्त व्यापार करु इच्छित होते त्यांनी कंपनीच्या वाढत्या सैनिक बळावर नजर ठेवली.



*Fig 15.4 Mughal Emperor Shah Alam granted Robert Clive the right to rule Bengal*

उदा. इ.स. 1764 व्या वर्षी आर्काट(उत्तर तामीलनाडु) चा नवाब अन्वरुयुद्दीन खान फेंच सैन्याच्या विरोधी लढा केला. फ्रेंचासारख्या छोट्या सैन्याने नवाब सारख्या मोठ्या सैन्यास हरवले. युरोपचे सैन्याने मोठ्या भारतासारख्या देशाला हरवले या विजयामुळे युरोपीयन व्यापाऱ्यांचे धैर्य वाढले. आणि त्यांचा असा समज होता की, सैन्याच्या बळावर ते भारतामध्ये त्यांना जे पाहिजे ते करु शकतात.

इ. स. 1700 व्या वर्षी भारताच्या सैन्यापेक्षा युरोपीयन सैन्य कसे वेगळे होते? युरोपीयन सैन्य चांगले शिक्षण घेऊन जास्त पगारीना उचलत होते. त्यांच्या जवळ चांगल्या फिंरगी बंदुका होत्या. ते दररोज ड्रील, परेड करीत असत. या प्रकारच्या निरंतर शिक्षणामुळे युरोपच्या सैन्यात दाखल झालेल्या भारतीय सैनिक सुध्दा युध्दात चांगले परंपरागत झाले.

SCERT TELANGANA

## भारतात वाढलेला, युरोपीयनांचा हस्तक्षेप:

कंपण्यानी व्यापाऱ्यातील फायदा वाढुन घेण्यासाठी सैन्याचा फायदा घेतला. दोन भारतीय राजे जेंव्हा आपआपसात युद्द करायचे तेंव्हा एका राजाची बाजु घेवुन या संघर्षास सहभागी होते. त्यांच्या सैन्यास एक पक्षात मदत करण्यास पाठवुन त्याचा पराभव करत. याचेच परिणाम म्हणुन व्यापाऱ्यास लागणाऱ्या आवश्यक त्या वस्तु जिंकणाऱ्या राजांकडुन घेत. भारतातील राजे इंग्रज सैन्याचे सहकार्य घेतल्यामुळे बक्षीस म्हणुन मोठ मोठ्या प्रमाणात रक्कम देत असत. या रक्कमेचा उपयोग कंपणीचा विकास करण्यास होत असत.

याचे एक उदाहरण म्हणजे मुजफरजंगास दक्षिणेचा नवाब केल्यामुळे फ्रेंच, इस्ट इंडीयाचा गवर्नर डुप्लेक्स यांना पांडेचेरीजवळील काही भुभाग आणि मछलीपटनम देण्यात आले आणि ऐवढेच नाही तर कंपनीस 50 हजार, फ्रेंच सैन्यास 50 हजार, डुप्लेला वर्षाला लाख रुपयाची जागीर आणि रुपये 20 लाख देण्यात आले.

यामुळे कंपण्या स्थानिक राजांकडुन त्यांच्या त्यांच्या राज्यातील छोटे छोटे भु भागास बक्षीस म्हणु घेण्यास सुरुवात केली. त्यांनी त्यांच्या भु-भागावर असणारी गावे, शहरातुन भुमीचा कर वसुल करण्यास सुरुवात केली. या पैशास त्यांच्या व्यापारासाठी लावला. त्याच्या सैन्याची वाढ करण्यासाठी रक्षण करण्यासाठी वापरत. भारत देशात झालेल्या लढाईत हळु हळु इंग्रजी कंपण्यांनी, फेंच कंपण्यांवर विजय मिळविला.

## कंपणीचा अधिकाराचे दुरुपयोग

ब्रिटीश इस्ट इंडीया कंपणीस बक्षीस देणे, सैन्याच्या खर्च देणे हे अवघड आहे हे भारतीयांच्या राजाच्या लक्षात आले. कंपणी करत असलेली इतर कामे सुध्दा या राजांना कंटाळा आणली. काही भारताचे राजे त्यांच्या जवळ असणाऱ्या वस्तुंवर कंपनींना कर देण्यास सुट दिली हिच संधी साधुन इंग्रजांनी याचा दुरुपयोग केला. उदा. कंपणीच्या नौकरांनी त्यांनी स्वत:चा उद्योग सुरु करत. कर भरत असत पण त्यास कंपणी ची वस्तु म्हणुन कर भरत असत.

या कंपणीची संपत्ती वाढले एवढेच नाहीतर त्यात काम करणारे कामगार आणि अधिकारी सुध्दा पैसा कमवुन त्यांच्या देशात सुसंपन्न होऊन परत गेले.

*Fig 15.5 Local boats bring goods from ships in Madras, painted by William Simpson, 1867*



SCERT TELANGANA

कंपणीच्या व्यापाऱ्यास भारतीय व्यापारी धनिकांनी मदत दिली. यांनी सुध्दा आपल्या वस्तुस कंपणीची वस्तु म्हणुन कर भरत असत. आणि कर भरण्यापासुन स्वतःची सुटका करुन घेत असत.

या प्रकारे कंपणी स्थानिक राज्यांच्या रक्कमेस धोका देऊन लुटुन कंपणीना त्यांच्या सैन्यावर खुप गर्व होता. कंपणीनी हस्तव्यापाऱ्यांना त्याच्या वस्तुंना कमी किमतीस विकण्यास सक्ती करत असत. त्यांच्या अधिन असणाऱ्या प्रदेशातील शेतकऱ्यांची पिळवणुक करुन अधिक कर वसुल करत होते. त्या पिळवणुकीस राजांनी विरोध केल्यामुळे इंग्रज लोक लढाईत उतरत आवश्यक असल्यास त्या राजास काढुन व्यापाऱ्यास मदत करणाऱ्या राजाची निवड करत.

- व्यापाऱ्यांना कच्चा माल खरेदी करण्यासाठी पैसा आवश्यक होता. भारतात ब्रिटीशांच्या व्यापारासाठी मिळालेल्या पैशाचे तीन स्त्रोत सांगा ?
- इंग्रजाकडुन भारतीय राजांना कोणता फायदा झाला ?

## इंग्रजाचा शासन- त्याची अमलबजावणी

भारत देशास पुर्णपणे स्वतंत्रपणे व्यापारासाठी उपयोग करुन घेण्यासाठी त्यातील शासक असावे ही भावना इंग्रजामध्ये क्रमाने वाढु लागली. म्हणुन त्यांनी नवाब, राजांना काढुन स्वतःच शासन चालवण्यास सुरुवात केली.

इ.स. 1757 व्या वर्षी प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नवाब सिराजु उद दौला चा पराभव करुन बंगालमध्ये त्यांचे प्रशासन चालवण्यास सुरुवात केली. भारताच्या इतिहासात प्लासीची लढाई ही एक महत्वाची घटना आहे. इ.स. 1765 ते 1768 या मधील काळात आंध्रामधील कोस्ता जिल्ह्यांना (कृष्णा, पुर्व पश्चिम गोदावरीचे जिल्हे, विशाखापट्टनम, विजयनगर, श्रीकाकुलम, प्रकाशम, गुंटुर) इस्ट इंडीया कंपनीने सक्तीने हैद्राबाद निजामाकडुन ही जिल्हे हस्तगत करुन घेतले. या प्रांतास कंपनी मद्रास प्रांतातील उत्तर सरकार म्हणुन बोलवत असत. याचाच परिणाम म्हणुन निजामाना मदत म्हणुन इंग्रजांचे सैन्य ठेवावे या गोष्टीची परवानगी दिली. पण हे सैन्य निजामांना मदत न करता त्यांना अधिपत्याखाली आणण्यासच जास्त उपयोगी ठरले.

ब्रिटीशांच्या कटकारस्थानास काही राजांनी ओळखुन राजे व नवाबांनी त्यांच्या विरोधात लढले. तरी लढलेल्या राजांपैकी मैसुरचा राजा हैदर अली, टिपु सुलतान, मराठा सरदार माहदिजी सिंधीया, नाना फडणीस इत्यादी आहेत. पण ते छोटे राज्या असल्यामुळे एक नंतर एक इंग्रजानी हस्तगत करुन घेतले.

या संघर्षात ब्रिटीशाला मदत देणारे गवर्नर रॉबर्ट क्लोईव, वार्न हेस्टींगस वेलीसली इत्यादी महत्वाचे आहेत. क्रमाने भारत देशाच्या भुभागावर असणारे इंग्रजाच्या पालनाखाली आले. अनेक प्रांतातील राजे, नवाब शासन चालवत असुन ते इंग्रजाच्या सार्वभौमत्वाखाली काम करत असत. रेसिंडेंट म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या एक इंग्रज अधिकाऱ्यास राजा नवाबांच्या राज्यात निवडुण ब्रिटीश सरकार त्यांच्यावर एक डोळा ठेवत असत होते. त्याचा राजकारभार ते पाहत होते.

- भारतात व्यापार करणाऱ्या इस्ट इंडीया या कंपणीस आपल्या देशावर शासन चालवावे असे का वाटले असेल ? यावर वर्गात चर्चा करा ?

SCERT TELANGANA










*भारत देशात ब्रिटीश अधिकाऱ्यांचा प्रसार- प्रभाव*

- वरील नकाशात पाहुन सध्याच्या भारताच्या नकाशाची तुलना करा? प्रत्येक नकाशात ब्रिटीशांच्या शासनाखाली नसणाऱ्या प्रांताना ओळखा?
- 1857 पर्यंत इंग्रजांचे प्रशासन कुठपर्यंत विस्तारले आहे? त्या काळातील भारतीय राज्यांच्या आधिन असणाऱ्या राज्यांची यादी तयार करा? बाजुच्या नकाशात पहा?

SCERT TELANGANA

## इंग्रजांच्या शासनावर भारतीय असंतोष

इंग्रज त्यांच्या शासनाची स्थापना करण्यासाठी अनेक राजे नवाबांबरोबर लढा दिला. येणाऱ्या पाठात त्या त्या शासना पध्दतीबद्दल शिकाल. त्यांनी भारतीय राजांचा नेहमीच विरोध केला. ब्रिटींशानी त्यांच्या आधीन असणाऱ्या राजांना शासनाखाली ठेवणे, काढणे, बदलणे, यामुळे राजांनी इंग्रजाविरुध्द लाढई केली.

जास्त कर लावणे, पिळवणुकीचे कर वसुल करणे, नेहमीच इंग्रजाच्या हाताखाली भित काम करणारी मालक, जमीनदार,कर लावला नाही तर जमीनी जातात. म्हणुन जमीनीचे मालक शेतकरी सुध्दा विरोध केले.

इंग्रजांनी आमलात आणलेल्या नविन कायदे नियमामुळे जंगलातील आदिवासी लोकांनी टोळ्या करुन विरोध केला. येणाऱ्या पाठात या बद्दल आण शिकु या.

खुप हिंदु, मुस्लीम धर्माचे लोक त्या इंग्रज त्यांना ख्रिश्च धर्म स्विकारावा लागेल म्हणुन भित होते. 1857 मध्ये काही महिने झालेल्या लढाईमुळे इंग्रजांची उत्तर भारतातील सत्ता कमी झाली. या विरोधास भारत शिपयांनीच सुरुवात केली. इतर राजे सुध्दा या लढाईस सहभागी झाले. शेतकरी, आदिवासी, जमीनदार, हस्तव्यवससायीक लोक सुध्दा या लढाईस हातभार लावला. नानासाहेब - पेशवांचे दत्तक पुत्र, तात्या टोपे, त्यांचे सेनापती, अवध बेगम आणि झाँसी ची राणी लक्ष्मीबाई या राज घराण्यातील उठावात भाग घेतला. हिंदू आणि मुसलमानांचे एकच ..... ब्रिटीश याच्याशी मिळून दोघांनी लढा केला.

---

### 1857 चा उठाव (The Revolt of 1857)

***जागा: मेरठ मिलटरी कंटोनमेंट, सुरुवातीच्या ब्रिटीश सैनिकांचे ठिकाण***

***दिनांक : रविवार 10 मे 1857 रोजी***

भारतीय शिपाई ब्रिटीश अधिकाऱ्यावर गोळीमार करतांना तेव्हाच सुर्यास्ताची वेळ होती. इंग्रज भारतीय राजांचा पराभव करुन त्याच्या साम्राज्यावर विजय प्राप्त करण्यासाठी सैनिकांची मदत केली त्यांनीच हा लढा दिला. त्यांना पगार वेळेवर मिळत नसत. त्यांना ब्रिटीश सैनिकाबरोबर समान दर्जा मिळत नसत. याचीच पराकाष्टा शिपयांना देण्यात येणाऱ्या बंदुकांच्या नविन रायफली त्यासाठी वापरण्यात आलेल्या गाय, डुक्कराच्या मासांपासुन काडतूस बनवत हे तोंडात घातल्यामुळे त्यांचा धर्म भ्रष्ट होतो अशी शंका शिपयांना आले. यामुळेच 1857 मार्च मध्ये कलकत्ता जवळील बारखपुरमध्ये सुध्दा विरोध खुप मोठा होता. त्या दिवशी सैनिकांनी त्यांच्या अधिकाऱ्यावर गोळीमार करुन दिल्लीच्या मार्गाने निघाले.




*Fig 15.6 A - Loading a gun*

*1) बारुद काढण्यासाठी पेपर सिसला तोंडाने ओढत असलेला शिपाई*

*2) रायफलमध्ये बंदुकाचे औषध भरतांना शिपाई*

*3) कागादात गुंडाळुन असलेला बारुदास बंदुकात भरत असलेला शिपाई.*



SCERT TELANGANA

*स्थान: मेरठ शहर दि. रविवार रात्री, सोमवार 10,11 मे 1857*



शिपयांच्या विरोधाची बातमी संपुर्ण मेरठ मध्ये पसरली. संपुर्ण शहर जागुन उठले सर्व लोक गल्ल्या बोळ्यातुन इंग्रजावर बंडावर धाड टाकले. त्या लोकांच्या समुहास पोलीस सुध्दा हातभार लावले. इंग्रजाच्या इमारतींना जाळुन टाकले. खुप इंग्रज लोकांना मारले

*Fig 15.7 A view of Sipahi revolt at Meerut in 1857*

[redacted]

*स्थळ: दिल्ली, लालकिल्ला दि. सोमवार 11 मे 1857*



Fig 15.8 A view of Delhi in 1857 showing the pontoon bridge the soldiers used to cross the Yamuna.

## उठावाचा प्रसार **The Revolt Spreads**

ही बातमी समजल्या नंतर इंग्रजाच्या विरोधी देशातील अनेक प्रांतामधुन विरोधांचा लढयांची सुरुवात झाली. आलिगढ, मेईनपुरी, बुलंदरशहर, अट्टक, मथूरा, कंटोनमेंटस मधील शिपयांनी लढा दिला. इंग्रज लोक थरथर कापले. आता त्यांची वाईट परिस्थिती होती.



*Fig 15.9 Jhansi Lakshmi Bai - Fighting with the Britishers*

तेव्हा फक्त 45 हजार ब्रिटीश अधिकारी आणि सैन्य भारतात होते. यांना भारतातील दोन लाख 32 हजार सैनिक इंग्रजांच्या विरोध केला. आता त्या शहराततील इंग्रजांच्या संपत्तीस जिवास कोण वाचवणार? इंग्रजाच्या सैन्यातील भारतीयांवर आता विश्वास नाही. या परिस्थितीत खुप ब्रिटीश सैनिक त्यांच्या कुंटुंबाना सांभाळु शकले नाही. म्हणुन लढ्यास लगेच टाळु शकले नाही. ते एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी स्थलांरीत झाले.



*FIg 15.10 Tantia Tope*

ब्रिटीशांच्या हाती राज्य गमावलेले सर्व राजघराने जास्तीत जास्त लढ्यात सहभागी झाले. त्यात अवधचा राजा माजी नवाब. मराठाचा पेशवा नाना साहेब हे होते. देशात विविध प्रांतात असणारे शासक दिल्लीकडे वळले. इंग्रजांना हकलुन लावावे. मोगलांचे शासन पुन: स्थापन करण्याची आशा सर्वामध्ये निर्माण झाली.याच काळात हैद्राबादात ही असंतोष घुसमत होता. ब्रिटीशांच्या धोरणामुळे लोक नाराज होते. यात तुर्रेबाज खान हा सर्वात अग्रेसर होता. तो क्रांतीकारी होता. हैद्राबादेत तो इंग्रजाविरुध्द लढला. 1857 च्या उठावाच्या वेळी त्याने इंग्रजाचा कडाडुन विरोध केला. त्याला मौलवी अल्लाऊद्दीन ची मोठी साथ होती. दोघांनी मिळुन 6000 लोकांचा एक जमाव तयार करुन ब्रिटींशाच्या वसातहतावर हल्ला केला. आताचे कोटी येथील महिला कॉलेज म्हणजेच तत्कालीन ब्रिंटीशांची वसाहत होती. या उलट त्यावेळी निजामाचा मात्र ब्रिंटींशांना पाठिंबा होता. वास्तविक ही चळवळ दडपली गेली आणि तुर्रेबाज खानाला फासावर लटकविण्यात आले.



*Turrebaz Khan*

- विरोध करणाऱ्या सर्व भारतीयांना मोगल साम्राज्याची भावना का वाढीस आले? याबाबत चर्चा करा?
- तुम्ही कशासाठी विरोध केला असता. त्याच्या स्थानात पर्याय असावा. तुमच्या अनुभवातुन पर्यायाची गरज आहे का या बद्दल विचार करा?

SCERT TELANGANA

## उठावात गावांचा सहभाग

उत्तरप्रदेश, बिहारमधील प्रत्येक गावागावात, गल्ली गल्लीत उठावाच्या ज्वाला पसरल्या. शेतकरी जमीनदार, हत्यारे घेऊन इंग्रजाना त्यांच्या अधिकाऱ्यांना हकलुन लावले. ब्रिटीश सरकारला कर भरण्यास थांबवले, रेल्वेमार्गांना उधवस्त करण्यात आले पोलीस चौक्या जाळुन टाकल्या. टेलीग्राफ वायरांना तोडुन डाक टपाल खातांना जाळुन टाकले. इंग्रज भारतामध्ये तयार केलेले नविन कार्याचा नायनाट केला. इंग्रजाचा पराभवच भारतीयांमध्ये दिवसेंदिवस धैर्य वाढवुन आपण इंग्रजांना लढु शकतो. याचा विश्वास वाढला.

विरोधकांनी कर घेण्यास व्यापारांच्या घरातील कागदपत्रे जाळुन टाकली. हे कर व्यापारी ब्रिटीश कायद्यास समोर ठेवुन गावांर वर्चस्व वाढवले.

## उठावाचे नायनाट The Revolt is Suppressed

विरोधकांच्या लढ्यामुळे एवढा विजय मिळवुन ही ब्रिटीशांनी क्रमाने परिस्थिती आपल्या हातात घेतली.

विरोधकांनी धैयाने लढा दिला पण त्यांच्यामध्ये दोन महत्वाच्या कमतरता होत्या. प्रत्येकांनी आपआपल्या प्रांतात वेगवेगळ्या लढ्या लढल्या. त्यांनी ऐक्येतेने लढाया लढल्या नाहीत. त्यांची पुर्वतयारीने योजनायुक्त ऐक्यतेने लढले नाही. विरोधकांना एकानंतर एक अशा प्रकारे अडचण सोडवत आले. विरोधकारकांना आधुनिक शस्त्रांची कमतरता होती. त्यांना लागणाऱ्या बंदुका, फिरंगी तोफ, बारुद भारताच्या बाहेरुन आणावे लागत असे. त्यामुळे विरोधकांना जुन्या बंदुका बाण ईटा, खंजीर चाकु ढाल या वस्तुनेच लढ्या लढाव्या लागल्या.



*Fig 15.11 Hanging the rebels.*

आधुनिक हत्याऱ्यापुढे या तलवारे, कताराने कुठपर्यंत लढणार? तरीपण विरोधकांचा प्रसाराचा वेग पाहुन ब्रिटींशाना भिती वाटु लागली म्हुणन विरोधकांना वंचित होणारे त्यांना क्रुर प्रकारची वागणुक देत. विरोधकांरांना अमानुषतेने मारुन त्यांच्या प्रेतांना गावातील झाडांना फाशी दिल्यासारखे लटकवत गावकरी विरोध केल तर त्याचा किती भयंकर परिणाम होते हे समजुन दाखवले.

काही विरोधकारकांना फिरंगी ना बाधुन त्या फिरंगीस स्फोट करत त्यांच्या शरीरांचे तुकडे तुकडे करत. शरीराचे चिंथ्या होऊन हवेत पसरायचे खुप विरोधक इंग्रजांना न सापडता दुसऱ्या प्रांतात जावुन लपत असत. काही नेपाल सारख्या प्रदेशात सुध्दा जाऊन लपले. बहादुरशहा जाफर चक्रवर्तीस दुर प्रांतात रंगूनला पाठविले. शेवटचा मोगल सम्राट तिथेच मरण पावला. ब्रिटीशांना केलेला मोठा विरोध या बंडाचा नाश केल्यानंतरच त्यांचे वर्चस्व अजुन बलवान होऊन अजुन 90 वर्षापर्यंत शासन चालवले.

- योग्य ते उत्तरे ओळखा

a) 1857 उठावाने मोगलांच्या शासनास...... (काढावे / निर्माण करावे) मागणी केली.

SCERT TELANGANA

b) ब्रिटीश सैन्याची कमतरता म्हणजे त्यांच्या सैन्यातील जास्त लोक.......... (युरोप/भारतीय) आहेत.

- विरोध करणाऱ्या भारत सैन्याची कुमकुवत कोणती ?

## उठावानंतरचा काळ After the Revolt

1857 च्या उठावाचा नाश करण्यास इंग्रजाना वर्षभराचा वेळ लागला. या काळात त्यांच्या पध्दतीमध्ये बरेच बदल झाले नविन पध्दती मांडल्या. 1858 मध्ये विक्टोरीया राणीने एक मुख्य जाहिरात काढली. तिथे भारत देशात भारताचे राजेच शासन चालववितात. यामुळे भारतीयतील इंग्रज आपल्याला अधिकारातुन काढुन टाकु शकत नाहीत. त्यांनी भयभीत न होता. प्रशासन चालवु शकत नाहीत. या प्रकारे इंग्रजांनी राजकीय घराण्याबरोबर चांगले संबंध बाळगले. त्याच प्रकारे जमीनदारांना सुध्दा त्यांची संपत्ती सांभाळण्यासाठी आवश्यक ती सुट दिली. ब्रिटीश सरकारने भारतीयांच्या धर्म विश्वासात हस्तक्षेप करु नये.जुन्या परंपरेनुसारच चालावे पंडीत, मौलविकांना अभय देण्यात आले. भारतीयांना शासनात शामील करु घेतो. म्हणुन वचन देण्यात आले. 1857 मध्ये भारतीयांना त्यांच्या साम्राज्यास स्वत: ओढुन घेतले. हे इंग्रजांनी अक्षरशा डोळ्यानी पाहिले होते. हे सत्य आहे. म्हणुनच भारतासाख्या संपन्न देशाची मदत घेण्यासाठी आवश्यकती त्या सर्व सुट देऊन त्यांचे प्रशासन चालवण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला.

## हैद्राबाद राज्य आणि ब्रिटींश

भारतातील इतर संस्थाना प्रमाणेच हैद्रबादचे संस्थान ही ब्रिटीशांच्या अमलाखाली आले. निजामाच्या राज्यात ब्रिटीश इस्ट इंडीया कंपनीची ढवळढवळ वाढु लागली. संपुर्ण हैद्रबाद संस्थानात प्रशासन सांभाळण्याची जबाबदारी ब्रिटीशांवर पडली. निजामाने पंतप्रधान किंवा दिवान नेमण्याचा असला तरी त्यासाठी ब्रिटींशाची परवानगी घ्यावी लागायची. निवासी ब्रिटींश अधिकारी आणि गर्व्हनरचच्या परवानगी ने सर्व कारभार चालत असे. निजामाच्या राज्यातील सर्व विभागाचे प्रमुख हे ICS (Indian



औरंगजेबानंतरचा आणि भारतातला शेवटचा मोगल शासक बहादुर शहाजफर आणि त्याच्या मुलांना ब्रिटीश कॅप्टन हडसन अटक़ करतानाचे हे चित्र 1857 च्या बंडाच्या वेळी बहादुर शहा दिल्लीच्या गादीवर होता. तो प्रतिकात्मकच होता. बंडखोरांनी बहादुर शहा जफरला भारताचा राजा घोषीत केले. परंतु बंड शमताच इंग्रजांनी राजाला अटक केली व मुलांना गोळ्या झाडुन ठार मारले.

Civil Services) परिक्षा पास असलेल्या व्यक्तीला देण्यात येत असे. या प्रकारे ब्रिटीशांनी निवडलेल्या अधिकाऱ्या कडुन कारभार चालवला जाऊ लागला. अशाप्रकारे ब्रिटीशांनी प्रशासनावर पुर्णतः ताबा मिळविला हळुहळु इंग्रज धोरणे अमलबजावणीत भाग पाडण्या इतपत त्यांनी संस्थानाला परावलंबी केले. तुम्ही कधी हैद्राबादला गेला तर तेथे तुम्हाला प्रसिध्द असे सालारजंग वस्तुसंग्रहालय दिसेल. सालारजंग हा हैद्राबादचा दिवान होता. त्याने अनेक सुधारणा घडवुन आणल्या त्याच्या सुधारणामुळे हैद्राबाद संस्थानात मोठ्या प्रमाणात आर्थिक वाढ झाली. त्यानेच सर्व प्रथम राज्याला विभागणी सुत्रे आणि जिल्ह्या या प्रकारात केली. त्यानेच देशमुखी पध्दत बंद केली. महसुल गोळाकरण्याची जुनी पध्दत रद्द करुन जिल्हाधिकारीच्या मार्फत थेट शेतकऱ्यांकडुन कर (महसुल) गोळा करण्याची पध्दत सुरु केली. तसेच न्यायव्यवस्थेत ही त्याने सर्वोच्च, उच्च, आणि जिल्हासत्र न्यायालयची निर्मीती केली. दिवाणी व फौजदारी अशा दोन भिन्न न्यायालयाची निर्मीती केली. दळणवळणाची सोय करण्यासाठी रेल्वे आणि रस्त्याचा विकास केला. देशभरातल्या महत्वाच्या शहराशी हैद्राबादला रेल्वे मार्गाने जोडण्यात आले. हैद्राबाद ते वाडी, मद्रास ते सोलापुर आणि मद्रास ते मुंबई हे मार्ग निर्माण करण्यात आले. सन 1855 साली चादर घाट मधील दारुम उलम येथे इंग्रजी माध्यमाची शाळा काढण्यात आली. तर 1870 मध्ये सिटी कॉलेज दख्खन अभियांत्रिकी कॉलेज, मदर साई आलीया या शाळांची स्थापना ही करण्यात आली. या सुधारणामुळे हैद्राबाद देशातील एक अग्रणगी संस्थान म्हणुन अल्पावधीतच पुढे आले.

**महत्वाचे शब्दः**

1. रॉयल चार्टर
2. सुभेदार
3. गुपधिकार
4. मागणी
5. जहागिर
6. कंटोनमेंट
7. वसाहत
8. मौलवी

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. युरोपीयन व्यापारी कंपण्यांनी भारतात सैन्यास का वाढवले? कंपणीच्या व्यापारात या सैन्याचे कोणते पात्र होते?
2. 1700 आणि 1800 वर्षामध्ये युरोपीयन सैन्याने भारतीय सैन्याचा पराभव कसा केला?
3. 1857 च्या उठावाच्या वेळच्या माहिती आधारे तक्ता भरा?

| अ.क्र. | उठावात भाग घेतलेले लोक | उठावापासुन दुर असलेले लोक |
|---|---|---|
| | | |

4. 1857 मध्ये ब्रिटीशांच्या विरोधात उठावात साथ देणारे भारतीय कोण आहेत?उठावानंतर सहभागी न होणारे कोणते आहेत? त्यांनी सहभाग का घेतला नाही याचे वर्णन करा?
5. 1857 मध्ये आपल्या धर्मभ्रष्ट होत आहे असे कोणत्या सैनिकास वाटले? का वाटले?
6. 1857 मध्ये लढा दिलेल्या जनतेला काय प्राप्त करायचे होते?
7. 1858 मध्ये विक्टोरीया राणीने काढलेल्या जाहिरातीत कोणत्या मागणीची सोडवणुकीचे वचन दिले?
8. वास्को-द-गामाने पोर्तुगाल पासुन भारताला पोहोचण्याचा समुद्र मार्ग नकाशात दाखवा?
9. परदेशी आक्रमण थोपण्यासाठी देशात ऐक्य असणे गरजेचे आहे, यावर तुमचे मत मांडा?
10. ब्रिटींश सत्तेच्या विरोधात तुमचे असमाधान व्यक्त करा?
11. ज्या पद्धतीने मोगल आणि इंग्रजांना भारतावर सत्ता स्थापित केली, त्यातील साम्य व भेद कोणते?



SCERT TELANGANA

पाठ 16

# विधान सभेत कायद्यांची निर्मिती

या विभागात आता पर्यंत आपण जनता सार्वजनिक कामे, सरकारी कामे कशी करते तसेच प्रशासन कसे चालते या विषयी माहिती घेतली. गत वर्षी आपण लहान - लहान आदिवासी समाजाच्या चाली रीती, व्यवहार, ग्राम प्रमुख्यांचे निर्णय या बाबत माहिती घेतली. राजे, सम्राट कशा प्रकारे प्रशासन करीत नियंत्रण ठेवीत. अधिकारी किंवा तत्सम लोकांमार्फत राज्य कारभार, राज्य विस्तारासाठी युध्द यातुन मिळणारे फायदे या सोबतच मनमानेल तसा कर त्यांची वसुली, विनियोग कसा झाला या बाबतची माहिती पाहिली. मोठ मोठ्या इमारती त्यांचे बांधकाम, त्यासाठी आलेला खर्च, जनकल्याणासाठी वेगवेगळ्या सुविधा जसे तळे, कालवे, देवालय, मशिद यांची निर्मीती कशी झाली. यांची ही माहिती मिळविली. इंग्रजांनी आपल्या देशावर सत्ता कशी स्थापन केली. त्यांनी देशाचीकशी लुट केली. देशवासीयांना इंग्रजांचा प्रतिकार कसा केला हे ही आपल्याला ज्ञात आहे.

सध्या राजे किंवा योध्दे नाहीत. साधारणत: 70 वर्षापुर्वी आपणास ब्रिटीशांकडुन स्वतंत्र मिळाले आपणच आपले प्रशासन सध्या पाहत आहोत. खासदार, आमदार, मुख्यमंत्री, मंत्री, वरीष्ठ अधिकारी यांच्या विषयी तुम्ही ऐकलेच असाल. हे सर्व लोक जुन्या काळातील राज्यासारखेच आहेत असे तुम्हाला वाटते काय? आताचे प्रशासकीय अधिकारी मनाला येईल तसे वागु शकतात काय? नाही. आधुनिक सरकार कायद्यानुसार चालतात. कायद्या सर्वापेक्षा श्रेष्ठ मंत्री असो वा अधिकारी असो कायद्यानुसारच वागले पाहिजे. परंतु हे कायदे कोण तयार करते? कसे तयार करतात? शासनाच्या इच्छेनुसार कायदे तयार होतात का? नाही. कायदे तयार करण्यासाठी शासन सदस्य, ससंद सदस्य मदत करतात. भारतीय राज्यघटना कायदे कसे तयार करावे हे सांगते? त्याप्रमाणेच कायद्याचे निर्मीती होते. या पाठात आपण कायद्याची निर्मीती संबंधी कशी-कशी हाते याचा अभ्यास करु या.



*Fig 16.1 Telangana -Assembly*

- वर्तमान पत्रीका नेहमी मोठी मानसेच वाचतात. असा

SCERT TELANGANA

या ठिकाणी एक समाचार आहे. त्यात काय आहे समजुन घेण्याचा प्रयत्न करा. आंध्रप्रदेश धुम्रमान विरोध - आरोग्य संरक्षण कायदा - 2002

## सार्वजणिक ठिकाणी धुम्रपान निषेध कायदा मंजुर

आमच्या विशेष प्रतिनीधी कडुन

**हैद्राबाद : मार्च 27**

सार्वजणिक ठिकाणी शासकीय संस्था, शासकीय कार्यालय, वाहनात धुम्रपान विरोधी कायदा पास करण्याकरीता राज्य शासन सभेत कायदा ठेवण्यात आले. या कायद्याची जर कोणी उल्लंघन केले तर 100 रुपये ते 1000 रुपये पर्यंत दंड आकारण्यात येईल. या विषयात विरोधी पक्षांनी अशा सुचना केल्या.

शैक्षणिक संस्थेच्या 100 मिटर पर्यंत सिगारेट विकण्यावर बंदी, 18 वर्षाच्या आत असलेल्या व्यक्तीला सिगारेट विकु नये, सिगरेट विकण्याच्या जाहिरातीवर बंदी घालणे तर काहीजन तंबाखु शेतकरी, दुकानदार यांच्या जीवनावर प्रभाव पडतो असे म्हणाले. मंत्र्यांनी याविचाराशी सहमत झाले नाहीत. सिगरेट जनतेच्या आरोग्यास हानीकारक आहे. नोव्हेंबर 2, 2001 मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरुनच हा कायदा पास करण्यात येत आहे. असे मंत्र्यांनी उत्तर दिले. सार्वजणिक जागी, शासकीय संस्था, शासकीय वाहणात धुम्रपान करण्यास निषेध असा बोर्ड ठेवण्याकरीता कलम 5,6,10 उल्लंघन करणाऱ्यावर 100 रुपये दंड किंवा दुसऱ्यांदा चुक केल्यास 200 ते 500 रुपये दंड व शिक्षा आकाराण्यात येईल.

**(27 मार्च 2002 दी हिंदु या इंग्रजी पत्रीकेतुन घेण्यात आले.)**

अंदाज बांधून लिहतात. त्या करीता खालील शब्दांचे अर्थ पाहु या. निषेधकरणे, नजरअंदाज करणे, शंका अनुमान, उल्लंघन करणे, अंमलबजावी करणे

- वरील वर्तमानपत्रा नुसार खालील रिकाम्या जागा भरा.

1) सार्वजणिक ठिकाणी धुम्रपान निषेध ...... प्रवेश करण्यात आला. ( बिल,कायदा, अट, परंपरा)

2) धुम्रपान यासाठी खालील पैकी काय जोडल्या जात नाही.......... (काम करण्याची जागा, शासकीय वाहन, खाजगी बगीचे, बसस्थानक)

3) हा कायदा सर्वोच्च न्यायालय आदेशाला ........ करावयचे सुचवले. ( निशब्द, दंडपणे, नाकारणे, स्विकारले.)

4) या बिलाला प्रवेश करण्यात आले ते ...... (सर्वोच्च न्यायालय, मंत्री, जिल्हाधिकारी कार्यालय, विधानसभा.)

- ही बातमी प्रत्येकास या बिल विषयी एकाच निर्णयावर रहावे असे सुचविते का? यावर चर्चा करा?
- ही बातमी या कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यास कोणत्या प्रकारचा दंड द्यावा असे सुचवते?

प्रत्येक राज्यास भारतीय संविधानानुसार विधि मंडळ असते. प्रत्येक राज्यात राज्यपाल एक किंवा दोन कायद्यांसबंधीत सभा असतात. राज्याच्या



SCERT TELANGANA

विधान मंडळात दोन सभा असल्यास बाय कॅमेरल किंवा एक सभा असल्यास युनि कॅमेरल असे म्हणतात.

खालच्या सभेस विधानसभा व विधान व वरच्या सभेस विधान परिषद म्हणतात. सध्या काही राज्यातच विधान सभा आणि विधान परिषद आहेत.

## विधान सभा (Legislative Assembly)

राज्यात कायदा निर्माणासाठी ही सभा महत्वाची असते. राज्य विकास करीता, निर्णय घेण्याकरीता नियम बनविण्याकरीता व त्यांची अमलबजावणी करण्याची डवाबदारी राज्य सरकारची असते , जी आमदारांनी (एम.एल.ए) बनलेली असते. पंचायत सदस्या प्रमाणे जनता यांना प्रत्यक्ष मत देऊन निवडतात.

प्रत्येक विधानसभेचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो. कांही बाबतीत कार्यकाळ पुर्ण होण्या पुर्वी पण राज्यपाल विधानसभा रद्द करु शकतो. त्याप्रमाणे संसद पण संकटकालीन परिस्थितीत एक वर्ष वाढविता येतो.

राज्य विधानसभा वर्षातुन दोन वेळेस भरते. दोन सभेतील अंतरात सहामहिने अंतर असावा लागतो.

## विधानसभा मतदार संघ (Assembly Constituency)

वरील सर्व 119 सभासद सदस्यांची निवड वेगवेगळ्या मतदार संघातुन वेगवेगळ्या मतदाता करुन निवड करतात. याप्रकारे आपल्या राज्यात 119 मतदार संघ आहेत. राज्यातील ही



नकाशा 1: तेलंगाना राज्य विधान सभा मतदार संघ

SCERT TELANGANA

| तेलंगाना विधान सभेत असणारे कायदा बनवितात | | |
|---|---|---|
| **सभा** | **नांव** | **सदस्यांचे नाव** |
| विधानसभा | आमदार | एमएलए (MLA) |
| विधान परिषद | आमदार | एमएलसी (MLC) |

मतदारासंघाची संख्या ही तेथील लोकसंख्यावर आधारीत असते. तेलंगानातील एका एका मतदार संघात 1,70,000 लोक मतदान करतात. 18 वर्ष पुर्ण झालेल्या सर्व स्त्री- पुरुषांना मतदानाचा अधिकार असतो. हे आपले नाव आपण राहत असलेल्या जागेवरुन मतदान यादीत नाव नोंदवितात.

एका मतदान संघातुन एकच सदस्य नविडला जातो. एका एका मतदारसंघात अनेक गावे, शहरे, नगरे असतात. हैद्राबाद सारख्या मोठ्या नगरात तेरा विधानसभा मतदार संघ आहेत. तेलंगानाचे नकाशा पाहुन प्रत्येक जिल्ह्यातील मतदार संघ पहा. आणि त्यातील सभासद ओळखा. जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी जास्त मतदार संघ कमी लोक संख्या असलेल्या ठिकाणी कमी मतदार संघ हे आपण पाहु शकतो.

## आमदाराची निवड (Election of MLA)

हे सर्वसाधारण पणे विधानसभा निवडणुका प्रत्येक पाच वर्षानी होत असतात. विधानसभेत निवडुण येण्याकरीता ही निवडणुक लढवावी लागते. प्रत्येक राजकीय पक्ष आपआपल्या उमेदवारांना निवडुण लढविण्या करीता आपल्या उमेदवार उभा करतात. कोणत्याही राजकीय पक्षाचा उमेदवारा नसतांना सुध्दा स्वतंत्रपणे आपले नामाकंण पत्र भरु शकतो.यास अपक्ष उमेदवार म्हणतात.

या निवडणुकीत निवडणुक लढविणाऱ्या उमेदवाराची पात्रता: तो भारताचा नागरीक असावा. त्याचे वय 25 वर्ष पुर्ण झाले असावे. तो/ती कोणत्याही केंद्रीय किंवा राजकीय कार्यालयात कार्यरत नसायाला पाहिजे आणि अजुन इतरही पात्रता पुर्ण करायला पाहिजे कायद्यानी विहीत केले आहे.

ती निवडणुकीत राजकीय पक्षाची मुख्य भुमीका असते. सर्व राजकीय पक्ष आपआपल्या उमेदवारांचे निवडणुक पत्र जाहिर करतात. म्हणजे आम्ही निवडुण आल्यास काय काय कार्यक्रम भविष्यात करतोत काय काय आश्वासने आपल्या मतदार संघातील लोकांना ते निवडणुक सभेत देतात. व घरोघर जाऊन निवडणुक प्रचार करतात.

- तुमच्या प्रांतातील, राज्यातील राजकीय पक्षांचे नावे व त्यांचे पक्षांचे चिन्हांची यादी तयार करा?
- तुम्ही जर तुमच्या जिल्ह्यातुन निवडणुकीस उभे राहत आहात जर तुमच्या लोकांना कशा प्रकारे निवडणुक पत्र, आश्वासन व निवडणुकीची कशी रुपरेषा कराल?
- निवडणुक लढविणे म्हणजे खुप पैशांची गरज असते हे फक्त श्रीमंत लोकांनाच शक्य आहे असे कांही लोकांचे मत आहे. तुम्ही या विचारांशी सहमत आहात का?
- केवळ पैसा असणाऱ्या व्यक्तीच जर निवडणुक लढवल्या तर विधानसभा समावेशात हे कशाप्रकारे निर्णण घेतात ते कितपत प्रभावित करतात?

SCERT TELANGANA

*Fig 16.2*



- निवडणुक आयोगाने छापलेल्या कॅलेंडर मध्ये वरील (चित्र 16.2 आणि 16.3) आहेत. विविध काळातील निवडणुकीस संबंधीत विविध विषयाची ते जाणीव करुन देतात. या आधारे गत काही वर्षापासुन होत असलेला बदल यावर तुमच्या पालकांशी, शिक्षकांशी त्यावर चर्चा करा.

निवडणुकीच्या दिवशी लोक एक नंतर एक मत टाकत असत. पोलींग अधिकारी ओळखपत्र, निरिक्षण करत असतात. निवडणुक आयोगातर्फे सर्व लोकांना ओळखपत्र दिल्या जाते. ते कार्ड या पोलींग अधिकाऱ्यास दाखवावे लागतो. गुपीत मतदान असल्यामुळे मत आपण कुणास टाकत आहोत ते सांगता येत नाही. मतदान आयोग निवडणुकीत मतपेटी किंवा वोटींग मशीनचा वापर मत घालण्यासाठी करतात.




*Fig 16.3 Model Voter ID & Electronic Voting Machine (EVM)*

- मतदान हे गुपीत असावे असे तुम्हास का वाटते?
- तुमच्या आई वडीलांनाप दिलेल्या निवडणुक ओळख पत्रांचे तुम्ही निरिक्षण करा व तसेच कार्ड तुम्ही तयार करा?

SCERT TELANGANA

निवडणुकी नंतर एके दिवशी मतमोजणी केल्या जाते. ज्यांना सर्वात जास्त मते पडली जातात त्या उमेदवारांना विजयी घोषीत केल्या जाते.

- एका मतदार संघात सुमारे 1,50,000 लोक मतदान करतात. असे समजु या विवि उमेदवारांना आलेले मत खाली दिल्या गेले आहेत तर त्यातुन तुम्ही विजयी घोषीत कराल ?

| | |
|---|---|
| राजेश | 45,000 |
| राघवुलु | 44,000 |
| शिवाजी | 16,000 |
| जुबेर खान | 20,000 |
| लक्ष्मण | 15,000 |
| पुजा | 10,000 |

- निवडुन आलेला उमेदवार तुमच्या संघातील लोकांच्या इच्छा आकांक्षा कितपत पुर्ण करतो. असे तुम्ही समजत आहात ? तुमच्या शिक्षकांच्या मदतीने माहित करुन घ्या ?
- तुमच्या जिल्ह्यातील इतर तीन मतदार संघाचे नाव लिहा.__________
- तुमच्या मतदार संघाचे नाव __________ __________
- तुमच्या विधानसभा सदस्यांचे नाव __________ __________
- तुमच्या कुटुंबातुन शेवटी झालेल्या निवडणुकीत कोण कोण मत टाकले ? __________
- तुमच्या जिल्ह्यातील राखिव असलेल्या मतदार संघाना रेखांकीत करा. __________, _____

## सरकार स्थापन करने

तक्ता-1 दाखवल्या प्रमाणे विधानसभा निवडणुकीचे निकालाचे निरक्षण करा.
पाहिल्या प्रमाणे राजकीय पक्ष अ यांनी 75 विधायक निवडुण आलेल्या पक्षाला पुर्ण जागेपैकी अध्यापेक्षा जास्त जागेवर निवडुण आलेल्या पार्टीला सरकार बनवण्या करीता बहुमत आली असे समजल्या जाते. कोणताही कायदा बनवायचा असल्यास अर्ध्या पेक्षा जास्त सदस्य असणाऱ्यास प्राधान्य दिले जाते.

जास्त जागा जिंकलेली पार्टी वरील नकाशा प्रमाणे पक्षाचे सर्व सदस्य मिळुन एका सदस्यास नेता म्हणुन निवडतात. राज्य राज्यपाल त्या मुख्य सदस्यास राज्याचा मुख्यमंत्री म्हणुन नियुक्त करतो मुख्यमंत्री पक्षातील पक्षातील आमदारांना मंत्री निवड करीत असतो, या सगळ्यांना कॅबिनेट शासकिय मंत्रीमंडळ सरकार म्हणुन ओळखल्या जाते. सभेत कायदे तयार करण्याची, कायद्यांच्या अंमल बजावणीची आणि कल्याणकारी योजनांची जिम्मेदारी मंत्रिमंडळाचीच असते.

| Table 1 | Political Party | No. of Candidates Elected |
|---|---|---|
| 1 | Political Party - A | 75 |
| 2 | Political Party - B | 17 |
| 3 | Political Party - C | 10 |
| 4 | Political Party - D | 7 |
| 5 | Political Party - E | 6 |
| 6 | Political Party - F | 4 |
| | **Total** | **119** |

SCERT TELANGANA

- निवडणुक निकाल तक्ता -1 पहा ज्यात दुसऱ्या राज्यातील विधान सभेचे निवडणूकीचे निकाल देण्यात आले आहे. तिथे 119 मतदार संघ आहेत. कोणत्या पक्षाने सरकार स्थापित केली असेल ?




*Website of Telangana Election Commision*
*http://ceotelangana.nic.in/*

- निवडणुकी नंतर तक्ता-3 दाखवल्याप्रमाणे उमेदवार विजयी झाले तर कशा प्रकारे सरकार बनवितात ? चर्चा करा ?

| Table 3 | Political Party | No. of Candidates Elected |
|---|---|---|
| 1 | Political Party - Abcd | 45 |
| 2 | Political Party - Mnop | 33 |
| 3 | Political Party - Wxyz | 26 |
| 4 | Political Party - Stuv | 15 |
| | **Total** | **119** |

कोणताही राजकीय पक्ष असो कोणतेही कारण असो कोणत्याही पक्षास ज्या वेळेस बहुमत येत नाही. अशा वेळेस दोन किंवा तीन त्या पेक्षा जास्त पक्ष एकत्र येऊन सरकार बनवितात.यालाच संयुक्त सरकार असे म्हणतात.

## मंत्री मंडळ (Council of Ministers)

मुख्यमंत्री मंत्रीमंडळातील मंत्र्यांना वेगवेगळ्या शाखा सोपवल्या जातात. एकाला अर्थमंत्री दुसऱ्याला शिक्षणमंत्री किंवा महसुल मंत्री सोपवल्या जाते. हे मंत्री आपण करावयाचा आढावा सहाय्य अधिकाऱ्यांना सांगत असतात. सरकारी नियम नियमावली तयार करुन विधान सभागृहात मंजुरी मिळे पर्यंत मंत्र्यांची जबाबदारी असते. व नंतर संबंधीत अधिकारी ते सरकारी नियम नियमावली योग्य त्याप्रमाणे अमल करण्यासाठी प्रयत्न करतात. सर्व साधारण पणे आपआपल्या विभागाचे नियम नियमावली स्वतंत्रपणे पारीत करतात. तरी महत्वाचे काम करायचे असल्यास सर्व मंत्री मंडळाची बैठक घेऊन सर्व संमत्तीने निर्णण घेतात. कारण काही जरी चुक झाली तर मुख्यमंत्र्यासह सर्व मंत्रीमंडळ त्यास जबाबदर असतो. तसेच चांगला निर्णय घेऊन काही योजना अमल करुन चांगले नाव आल्स ते पण सर्व मंत्रीमंडळास त्यांचे मुल्य जाते.

## राज्य विधानसभा The State Assembly

विधानसभा सदस्य सर्व संमत्तीने एक सदस्यांस विधानर सभा अध्यक्ष म्हणुन निवड करतात. विधानसभा अध्यक्ष सभा आयोजीत करत असतो. हा कोण कोणत्या समस्यां केव्हा सभागृहात चर्चेस ठेवाण्यात ? कुणाच्या नंतर कोण बोलावे याचा निर्णय तो घेत असतो. जर अध्यक्षांच्या निर्णयाचे कोणी उल्लंघण केले तर त्याला दंड देण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षाला असतो.

वर वर्णन केलेल्या प्रमाणे सरकार तर्फे बनवल्या गेलेल्या प्रत्येक कायदा पध्दतीने लावण्यात येणारा कर या सर्वांना सभागृहाची मंजुरी असणे आवश्यक

SCERT TELANGANA

आहे. सभागृहात सविस्तर चर्चा केली जाते ही चर्चा दुरदर्शनवर पत्रिका व्दारे सर्व जनतेला कळविण्यात येते. विधानसभा सदस्य आपआपल्या मतदार संघातील समस्यांना जेव्हा तेव्हा सभागृहात चर्चेस आणत असतात संबंधीत मंत्री संबंधीत सदस्य चर्चेस आलेल्या समस्यांना उत्तर देत असतात. किंवा चौकशीचे आदेश देतात. मंत्र्यांना व्यक्तीगत विधानसभा गृहात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे उत्तरे द्यावे लागतात. जर मंत्र्यांने दिलेल्या उत्तरांचे समाधाकारक नसेल तर विरोधी पक्ष मंत्र्यांचा राजिनामा मागुन त्यांच्यावर दबाव टाकत असतात.

## कायदा निर्माण (The Making of Laws)

विधानसभेत कायदा कशा प्रकारे बनविला जातो? सर्व साधारणता: विधानसभेत जास्त संख्या असलेल्या अधिकारी पक्ष कायदा बनवुन तो सभागृहात पारीत करत असतो. काही वेळेस परिस्थिती प्रमाणे पक्षाचा सदस्य कायदा निर्माण करण्याची मागणी करु शकतो.

सभा मंजुरी अगोदर तयार केलेल्या कायद्यास बिल म्हणतात. सभामंजुरी व नंतर राज्यपाल मंजुरी झाल्यास तो कायदा बनतो. यालाच कायदा म्हणतात. संबंधीत मंत्री तयार केलेल्या कायदा बिल रुपात सभागृहासमोर ठेवतो व त्यांची पुर्ण माहिती आवश्यकता सभा सदस्यांना वर्णन करतो.

### तेलंगानातील विधान परिषद

तेलंगाना मध्ये कायदा तयार करण्यासाठी दोन सभागृह आहेत हे आपण पाहिलेच आहात. दुसऱ्या सभागृहात विधान परिषद म्हणतात. ही 1958 मध्ये स्थापन करण्यात आली व त्यास 1985 पर्यंत काम करुन बंद झाली व नंतर 2007 मध्ये पुन्हा प्रारंभ होऊन आता पर्यंत चालु आहे.

यातील सदस्यांची माहिती देत असतात. यांनाच विधान परिषद सदस्य (एमएलसी) म्हणतात. या सभागृहात निवडुण येण्याकरीता तो भारताचा नागरीक असावा. त्याचे वय 30 वर्षपुर्ण झालेले असावे व कोणत्याही सरकारी नौकरी त्यास असु नये या सभेत पुर्ण 40 सदस्य असतात.

- 1/3 म्हणजे 14 सदस्यांना विधान परिषेदत निवड केल्या जाते.
- 1/3 सदस्य म्हणजे 14 स्थानिक संस्था पंचायत नगरपालीका यातुन निवड करतात.
- 1/12 सदस्यांना म्हणजे 3 पदवीधारक निवड करतात.
- 1/12 सदस्यांना म्हणजे 3 सदस्यांना शिक्षक निवड करतात.
- 1/6 सदस्यांना म्हणजेच 6 सदस्यांना राज्यपाल निवड करत असतो.

राज्यात कोणताही कायदा पास करायचे असल्यास या दोन्ही सभागृहाची मंजुरी असावी लागते.

**राज्यपाल (Governor) :** राज्यापालाची नेमणुक राष्ट्रपती व्दारे केली जाते. भारतीय राज्य घटनेनुसार राज्य सरकार व्यवस्थीत काम करत आहे किंवानाही हे पाहाण्याचे काम राज्यपाल करत असतो. मुख्यमंत्रीची नियुक्ती राज्यपाल राज्यघटनेचा नियमानुसार करतात. मंत्री लोकांची नियुक्ती मात्र मुख्यमंत्र्याच्या सल्लानुसार केली जाते. भारतीय राज्यघटनेनुसार राज्यपाल राज्य सरकारचे व्यवहार पाहण्याचे काम दिल्या गेले आहे.**सध्या तेलंगानाराज्याचे राज्यपाल कोण आहेत?**

**राखिव पध्दत** **(System of Reservation)**

आदिवासी, मागासवर्गीय लोक या निवडणुकीत निवडुन येणे म्हणजे फारच अवघड असते. या

जातीतील फारच कमी लोक निवडणुकीत निवडुण येतात. आदिवासी मागासवर्गीय लोकां करीता भारतीय राज्यघटनेत काही मतदार संघाची निवड करण्यात आली आहे.

**तेलंगाना विधान सभेत राखीव केलेल्या मतदानासंघाची संख्या**

| | | |
|---|---|---|
| एकुण मतदार संघ संख्या | : | 119 |
| अनुसुचित जाती (एससी) | : | 19 |
| अनुसुचित जमाती (एसटी) | : | 12 |
| ॲग्लो इंडीयन लोकांमधुन नामनिर्दिशित व्यकती | : | 1 |

- अनेक लोक वरील प्रमाणे स्त्रींयापण राखीव जागा ठेवण्यात अस मत व्यक्त करीत आहेत. यावर तुमचे विचार काय आहे?

फार सविस्तर चर्चा होत असते.विरोधी पक्षाकडुन विरोध केला जातो. एक एक काही वेळेस ते सुचना देतात.

अधिकारी पक्ष व विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्ष मिळुण एक कमिटी बनवुन एक निर्णयावर येतात. व त्यात आदलाबदल केल्यास त्या बिलाला कॅबीनेट मंजुरी करीता विधानसभेत मतदानासाठी आणले जाते. सभेत 50 टक्के पेक्षा जास्त सदस्यांना मत टाकल्यास त्याबिल ला सभा मंजुरी मिळते व नंतर हे बिल विधान परिषदेत मंजुरी करीता ठेवल्या जातो. त्यात पण मंजुरी मिळाल्यानंतर त्यास राज्यपाल मंजुरी करीता पाठवले जाते. राज्यपाल मंजुरी नंतर त्यांचे रुपांतर कायद्यात होते. आणि ते सरकारी आज्ञा पत्रामध्ये छापल्या जाते.

## विधान सभेत चर्चा

एका उदाहरणाव्दारे शासन सभेत चर्चा कशी चालते हे आपण पाहु या.

**आमदार MLA (1)** : आदरनिय सभापती साहेब गेल्या तीन वर्षापासुन माझ्या मतदार संघात पाऊस पडत नाही. त्यामुळे पाण्याची खुपच टंचाई निर्माण झाली आहे. जमीनीत पाण्याची पातळी कमी आहे. यावर शासनातर्फे आता पर्यंत काहीच कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे बोरची संख्या पण वाढली आहे. या समस्यांवर शासन कार्य कार्यवाही करीत आहे ते मी या सभेत जलसिंचन मंत्री याच्या कडुन माहिती घेऊ

**आमदार MLA (2):** आदरनिय महोयद साहेब होय माझ्या मतदार संघात पण हीच परिस्थिती आहे. अधिकाऱ्यांचे काम करण्याची पध्दत संतोषजणक नाही. पाण्यासाठी लोकांना दुर जावे लागत आहे.

**आमदार MLA (3):** आदरनिय सभापती साहेब, तळ्यांच्या मातीचा गाळ काढावा व पावसाच्या पाण्याचे साठवण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी. तळ्याचे कट्टे फुटुनये म्हणुन योग्य ती काळजी घ्यावी व कट्ट्यावर झाडे लावावीत.

**आमदार MLA (4):** आदरनिय अध्यक्ष प्रत्येक परिस्थितीची जाणिव आहे. त्यामुळे आणखी जास्त नुकसान होऊ नाये म्हणुन शासनाने लवकर




Fig 16.4

SCERT TELANGANA

काही कार्य केले पाहिजे. पाण्याची पातळी कमी झालेल्या तालुक्याचे सर्वेक्षण करावे.

**आमदार MLA (5)** : आदरनिय सभापती महोदय, विरोधी पक्षांना मी विनंती करतो की, शासनाच्या कार्यवाहीची त्यांना करावी व योग्य ते मार्गदर्शन करावे. विनाकारण शासनावर आरोप करावे योग्य नाही. माझ्या मतदार संघात डोंगरातुन येणाऱ्या पाण्यास आडवल्या मुळे जमीनीत पाण्याची पातळी वाढली आहे. शासकीय अधिकारी पण जनतेच्या सवेत निमग्न आहेत.

**आमदार MLA (6)** : आदरनिय सभापती माझ्या मतदार संघात कारखाने जास्त असल्यामुळे कारखण्याचे घाण पाणी नदीत सोडल्यामुळे नदीचे पाणी दुषीत होत आहे व त्यामुळे जनतेच्या आरोग्यवर परिणाम होत आहेत. तर शासन यावर काय योग्य कार्यवाही करीत आहे ते कमी या संभेत संबंधीत मंत्र्याकडुन माहिती करुन घेऊ इच्छीतो.

**मंत्री Minister:** आदरनिय सभापती महोदय, जनतेच्या आरोग्यविषयी शासन त्याच्या सेवे करीताच आहे. दुष्काळीग्रस्त तालुक्याची व पाण्याची टंचाई असलेल्या तालुक्याची यादी घेऊन त्यावर कार्य करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पाण्याची टंचाई दुर करण्याच्या प्रयत्न केल्या जात आहे. तळ्यांची दुरुस्ती केल्या जात आहे. झाडे लावण्याची पण आम्ही कार्यवाही करीत आहोत.

- तुम्ही जर विधानसभा सदस्य असतात तर वरील सर्व समस्यांचा कसा स्विकार केला असता?
- अधिकारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्या चर्चेत काय फरक आहे?

बालकांच्या संरक्षणासाठी भारत सरकारने खालील दोन कायदे काढले आहेत.

**1. पोस्को एक्ट 2012:** बालकांचे लैंगिक गुणहान पासुन संरक्षण देणारा कायदा 2012. हा कायदा बालकांच्या कल्याण आणि सुरक्षतेची हामी देतो.

**2. बाल न्याय (संगोपण आणि संरक्षण) कायदा 2015:** ज्यामुलांचे कायद्यासंबंधी वाद असतील आणि ज्यामुलांची काळजी आणि सुरक्षा (अनाथ आणि इतर) घ्यायची गरज असते, अशा मुलांना हा कायदा सुरक्षतेची हामी देतो. अशा मुलांना हा कायदा शिक्षण, आरोग्य, पौष्टीक आहार, मार्गदर्शन इत्यादी देतो, ज्यामुळे समाजात ही मुले निमार्णात्मक भूमिका पार पाडु शकतात.

**महत्वाचे शब्द:**

1. Manifesto
2. Cabinet
3. Speaker

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. जनतेच्या सुखी जिवनाकरीता कोणकोणत्या बाबतीत कायदा करु शकता?
2. शिक्षण विभागाने तयार केलेले कोणकोणते कायदे तुमच्या शाळेस लागु पडतात ते सांगा? (विद्यार्थी, पालकवर्ग, शिक्षकवर्ग, प्रधान अध्यापक, प्राचार्य, शिक्षकांच्या संघटना).
3. 6-14 वयोगटातील सर्व मुले - मुली शाळेतच शिकावे, बाहेर काम करु नये असा कायदा आहे समजा तर या कायद्याची अमलबजावणी करण्यासाठी काय कार्यवाही करावी? चर्चा करा?
4. कायद्याची निर्मीती हा परिच्छेद वाचुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या?

समजा तुम्ही तेलंगाना विधानसभेचे आमदार (सदस्य) असाल तर कोणत्या समस्येवर किंवा विषयावर चर्चा कराल?



SCERT TELANGANA

5. जर समजा पुरबगर नावाच्या राज्यात विधानसभा सदस्य 368 आहेत. निवडणुकी नंतर विविध पक्षांना आलेल्या जागा खालील प्रमाणे आहेत.($AS_3$)

| | | |
|---|---|---|
| Party A | = | 89 |
| Party B | = | 91 |
| Party C | = | 70 |
| Party D | = | 84 |
| Others | = | 34 |
| Total | = | 368 |

वरील तक्ता वाचुन खालील प्रश्नांचे उत्तरे द्या.

a) पुर्ण 368 जागे पैकी सरकार बनविण्याकरीता कोणत्याही एका पक्षास किती जागा हव्यात?

b) वरील निकालाप्रमाणे सर्वात जास्त जागेवर विजयी झालेला पक्ष कोणता?

c) निवडुण आलेली सर्वात मोठी पक्ष सरकार स्थापन करु शकते का? जर नसल्यास इतर कोणत्या मार्गाने सरकार स्थापन करण्यात येते?

d) एका पक्षाने बनविलेल्या सरकार व संयुक्त सरकारात काय फरक आहे?

6. सध्या आपल्या देशात काही राज्यातच दोन सभागृह आहेत ते कोणकोणते राज्य आहेत?($AS_1$)

7. खालील चित्र पहा व पाठ्याक्रमानुसार चित्रात काय घडत आहे ते ते काल्पनिक संवाद लिहा? ($AS_1$)



8. तुमच्या जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघ दाखवा? (नकाशा क्र 1 ची मदत घ्या) ($AS_5$)

SCERT TELANGANA

पाठ 17

# जिल्ह्यातील कायद्यांची अमलबजावणी

मागील पाठात आपण कायदा कसा तयार करतात, जनकल्याण कार्यक्रम व विकास संबंधीत योजना कशी तयार करतात ते पाहिले. तर मग या सर्वांची अमलबजावणी कशी केल्या जाते. जनतेने निवडुण दिलेले सदस्य, प्रतिनिधीच याचे अमल करता असे तुम्हास वाटत आहे का? आता या सर्व कामाची कशी अमलबजावणी होते ते यापाठातुन तुम्हास कळते. खालील विषयावर तुमच्या वर्गात मित्रांसोबत चर्चा करा.

i. प्रकल्प आणि कालवे काढणे
ii. घरोघरी विजेची व्यवस्था करणे
iii. स्वस्त धान्य दुकान चालवणे
iv. रेल्वे वाहतुक
v. नोटांची छपाई (प्रिंटींग)
vi. जनतेकडुन कर वसुली
vii. बाल मजुरी पध्दत नष्ट करणे, बाल शोषण सर्व मुलांना शिक्षण
viii. भारत देशाच्या सरहद्दीचे संरक्षण
ix. दारिद्रय रेषाखालील लोकांची ओळख व त्यांच्या विकासासाठी योजना बनवते.
x. चोरापासुन रक्षण, जनतेच्या संपत्तीचे रक्षण

- एवढेच नाही तर आणखी कित्येक पध्दतीने शासन कार्य करत असते ते तुम्ही ऐकलेच आहात ते तुमच्या मित्राशी चर्चा करा?

आपण अगोदरच्या पाठात शासनाच्या विविध शाखा विविध कार्यक्रमा विषयी पाहिलोत. या शाखा पुर्ण मंत्र्यांच्या नियंत्रणात असतात. सरकारी शाखेत अनेक अधिकारी मंत्री सरकारी नियमांचे पालन करतात. यापैकी काही मुख्य अधिकारी राज्य राजधानी हैद्राबाद मध्ये राहुन त्याचे काम करत असतात. शासनाचे आदेश पुर्ण राज्यात कसा अमल केला जाईल यावर लक्ष ठेवतात. तसेच राज्य सरकार योग्य पध्दतीने चालविण्यासाठी विविध जिल्ह्यात राज्य विभाजन केले आहे. प्रत्येक शासकीय शाखेत जिल्ह्यात आपआपल्या कार्यालियात सरकारच्या योजना अमल करत असता. तेलंगाना राज्यात एकुण 31 जिल्हे आहेत.

- तुमचे जिल्ह्याचे नाव काय? त्याचे मुख्यालय (जिल्हाधिकारी) कार्यलय कुठे आहे?

SCERT TELANGANA

प्रत्येक जिल्ह्यात विविध शाखेचा समन्वय ठेवण्यात करीता जिल्हाधिकारी असतात. आपण जिल्हाधिकारी व मॅजिस्ट्रेटच्या कामाचा आढावा पाहु या.

## नल्लावरम जिल्हाधिकारी

नल्लावरम जिल्हा नसुन फक्त उदाहरणा करीता ते नांव घेण्यात आले आहे. या जिल्ह्यातील खालील तालुके आहेत. ते गारीपल्ली, मल्लेपल्ली, नर्सापिट, गुर्तर, नल्लावरम जिल्हाधिकारी कार्यालय नल्लावरम शहरात आहे.




*Fig 17.1 Nallavaram District*

नल्लावरमचे जिल्हाधिकारी मनिषा नागले ह्या दररोज सकाळी 10.30 वाजता आपल्या कार्यालयात जाते. आज सकाळी विविध शाखेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक 11.30 वाजता असल्यामुळे अधिकार येतात. जिल्हाधिकारी बैठकीमध्ये विविध शाखा अधिकाऱ्यांशी गेल्या महिण्यात शासनातर्फे आमलात आणलेल्या योजना कितपत जनते पर्यंत पोहचल्या त्यात कितपत प्रगती झाली काय काय समस्या, अडचणी येऊ लागल्या याची माहिती घेण्यात आली. ही बैठक दुपारी 2.00 वाजे पर्यंत चालु होती. बैठक संपल्यानंतर मनिषा नागले आपल्या कार्यालयात फाईल्स तापसत होत्या व योग्य त्या ठिकाणी योग्य तो बदल करुन हुकुम लिहीत असत. पुर्ण फाईल्स तपासणी होई पर्यत दुपारचे 3.00 वाजले व दररोज 3.00 वाजल्या पासुन संध्याकाळी 4.30 पर्यंत विविध तालुक्यातुन अडचणी समस्या घेऊन आलेल्या लोकांना भेटत असत.

मल्लेपल्ली तालुक्यातुन काही शेतकरी त्यांच्या गावाच्या पाण्याची समस्या घेऊन आले. त्यांच्या शिवारातील तळे गेल्या दोन वर्षापासुन पाणी अटुन गेल्यामुळे पिके पिकत नाहीत, पाणी नाही त्या करीता त्यांनी घेतलेली बॅक बाकी माफ करावी म्हणुन व तळ्याची माती काढुन दुरुस्त करावे म्हणुन सांगण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास सांगण्यात आले.

मनिषा शेतकऱ्यांच्या समस्या ऐकुण घेऊन त्यांना म्हणते तुमचे गाव दुष्काळी ग्रस्त यादी मध्ये राज्य सरकाने तुमच्या गावाचे नाव नमुद केले नाही. त्या करीता तुम्हास मी ऋण माफ करु शकत नाही. तुम्ही तुमच्या आमदार तुमच्या तळ्यांची दुरुस्ती करण्याकरीता संबंधीत अधिकाऱ्यांस मी आदेश देते असे आश्वासन दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी 5.00 वाजता नर्सापिट तालुक्यातुन एक फोन येतो. नर्सापिट शहरात कापसाच्या जिंनिग मिल मध्ये जमा ठेवलेल्या कापसाला आग लागली. स्थानिक लोक आग थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. अग्नीशामक शाखा अधिकारी आगीवर नियंत्रण आणणयाच्या प्रयत्नात आहेत. आग इतर भागात पसरु नये म्हणुन प्रयत्न करीत आहेत. मनिषा नागले लवकरच नर्सापिट जाण्यास निघाल्या व पोलीस अधिकारी, वैद्यकिय अधिकारी यांच्या सोबत या म्हणुन फोन करुन सांगते. जिल्हाधिकारी नर्सापिट मध्ये सकाळी 7 वाजता जिनिंग मिलला पोहचुन तेथील परिस्थितीची चौकशी करते.मोठ्या प्रमाणात जमा केलेला कापुस जळुन खाक झाला. आग नियंत्रणात येत आहे.



*Fig 17.2 District Collector at the cotton factory.*

नगर पालीकेचे अध्यक्ष, पोलीस अधिकारी पण या ठिकाणी आले आहेत. तिथे आलेल्या अधिकाऱ्यांना किती कापुस नष्ट झाला याची चौकशी करा असा आदेश देण्यात आला. या अपघातात दोन कामगारांना गंभीर जख्मी झाले आहेत. त्यांना जवळच्या सरकारी दवाखाण्यात दाखल करण्यात आले आहे असे नगर पालीकेचे अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी यांना सांगीतले. तसेच अपघात ठिकाणाचे काही घरे सुध्दा जळुन गेले म्हणुन सांगीतले. मनीषा या अपघातात ज्याचे घरे जळाले त्यांना 10 हजार रुपये साणुग्रह अनुदान देण्याचे आश्वासन दिले व या अपघातांच्या कारणांची चौकशी करण्याचे आदेश दिले. अपघतांत जख्मी झालेल्या कामगारांना दवाखाण्यात जाऊन भेट दिली. आम्ही दोन कामगारांना 20 रु. मदत घोषित केली. शहरातील प्रत्येक रोडवर मंजुरी नसलेली दुकाने लावणे, रस्त्यावर कब्जा करणे या मुळे अग्नीशाम शाखा वाहन पोहचण्यास उशीर झाला असा ती अंदाज लावते. कायद्याच्या विरोधी दुकानदार दुकान वाढवणे, रस्त्याच्या हद्देत भिंती बांधणे या मुळे वाहतुकीस अडथळा येतो.यावर नियंत्रण ठेवावे व नंतर येणाऱ्या बैठकीमध्ये या विषयी पुर्ण तपसिल मला द्यावा असा आदेश ती नगर परिषद अधिकाऱ्यांना देते. खुप रात्र झाल्यामुळे ती नल्लावरम शहरास परत येते. आता पर्यंत आपण पाहितला तो उदाहरणात घेतलेला नल्लावरम जिल्हा पण जिल्हाधिकारी कशा काम करीत होत्या? त्या प्रकारे प्रत्येक जिल्हाधिकारी काम करतात का असे तुम्हास वाटते?

- कर्ज माफी करण्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारीला काय म्हणाले?
- या अपघाताच्या ठिकाणी कोण कोणते इतर अधिकारी आलेत आहेत?
- वरील पात्र करणाऱ्यात गैर अधिकारी कोण आहेत?

## तहसिलदार आणि गावातील तलाठी

**(Tahsildar (MRO) and Village Revenue Officers)**

नल्लावरम जिल्हा विविध तालुक्यात विभागल्या गेला आहे हे तुम्हास माहितच आहे. एका तालुक्यात वेगवेगळ्या गावे असतात. व त्यातुन एक तालुका निर्माण झाले. तुमच्या जिल्हात वेगवेगळ्या गांवाचे निरिक्षण करा. जिल्हा केंद्राप्रमाणेच तालुका शिक्षण अधिकारी, तालुका कृषी आधिकारी व इतर कार्यालय असतात.

- जिल्ह्याच्या नकाशात तुमच्या तालुक्याला रेखांकीत करा?
- तुमच्या जिल्ह्यातील तालुके कोणती ती ओळखा?



SCERT TELANGANA

अशा इतर कार्यक्रमाप्रमाणेच भुमी,शेती, जमीनी विषयी रिकार्ड ठेवणे हे सुध्दा शासनाचे कर्तव्य आहे.

तुम्ही कोणत्याही गावात किंवा स्वत:च्या जागेत राहत असता ते तुमची स्वत:ची म्हणुन तुम्ही तुमच्या आई वडीलांकडुन माहित करुन घेऊ शकता. देशातील गावातील, शहरातील जिल्ह्यातील सर्व जमीन मापुन त्याचा तपशिल सरकारी कार्यालयात ठेवतात. तसेच जमीन शेती संबंधीचे पिके, तळे इत्यादी सर्व माहिती नकाशात असते. अशा प्रकारचे प्रमाणपत्र खुप उपयोगी पडतात. जर कुणा मध्ये भुमी सरहद्द करीता वाद निर्माण झाला तर अशा प्रकारचे लेखी असलेले प्रमाणपत्र वाद, भांडण दुर करण्यास मदत करतात.




*Fig 17.3 Villagers verifying the land records at 'mee seva kendra'*

ऐवढेच नाहीतर कोणी शेती, जमीन विकली किंवा विकत घेतली तर याची नोंद शासकीय कार्यालयात करावी लागते. डोंगरी, पडीत जमीन, जनावरांना चारण्याकरीता उपयोगी पडणाऱ्या जमीनीचे पण रिकार्ड ठेवावे लागतात. त्यामुळे कोणी जमीन कब्जा केला तर तो आपण खाली करु शकतात. गावात तलाटी, तालुका पातळीवर तहसिलदार जमीनी संबंधीत रिकार्ड पाहाण्याचे काम करीत असतो. त्याच प्रमाणे ते जेव्हाचे तेव्हा ताजी बातमी ठेवणे व रेशनकार्ड देण्यासाठी मुख्य पात्र यांचे असते.

## कायद्यांची अमलबजावणी कशी होते ?

हे आपणास माहिती असावे म्हणजे त्या अगोदर कायदा म्हणजे काय? हे माहित असणे आवश्यक आहे. मागील पाठात आपण पाण्याची आवश्यकता, भौतिक वस्तु, शेती व्यवसायात विकास या बद्दल पाहितले. आपल्या देशात व्दिकल्प, नदी, तळे, जंगली भाग आहेत. तेलंगानात बऱ्याच प्रांतात पाण्यासाठी 1500 फुट बोर टाकल्या जातात. असेच चालु राहिले तर येणाऱ्या काळात बोरापासुन पाणी मिळणे अवघड आहे.

## आंध्रप्रदेशात पाणी जमीन झाडे रक्षण कायदा-2002

येणाऱ्या काळात सुखी जिवनाकरीता भौगोलीक नैसर्गिक वस्तुचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. या करीता आंध्रप्रदेश सरकारने 2002 मध्ये पाणी भुमी, जमीन, जंगले, झाडे रक्षण कायदा काढण्यात आला. हा कायदाा 19-04-2002 पासुन आमलात आला. या कायद्याचे काही विशेष महत्व ते खालील प्रमाणे आहेत.

a. बोअर, विहीरी खोदण्यासाठी तालुका तहसिलदार यांच्या कडुन परवानगी घ्यावी लागेल.

b. बोअर, विहिरी खोदणे कमी करण्यासाठी विहिरीतील आणि बोअर मधील अंतर दुर असावा लागतो.

SCERT TELANGANA

c. पावसाच्या पाणी व्यर्थ न जाता त्याचा योग्य उपयोग करुन घेणे.

d. औद्योगिक कारखाने न चुकता व्यर्थ पाणी शुध्द करुन पुन्हा त्याचा वापर करण्यात यावा.

e. शुध्द पिण्याच्या पाण्याबद्दल योग्य ते कार्यवाही करणे.

f. पाण्याची पातळी कमी असलेल्या भागात वाळु खोदण्यास बंदी ठेवणे.

g. सार्वजणिक जंगले वाढवण्याकरीता सहकार्य करणे.

h. मंजुरी असल्याशिवाय झांडाणा तोडु नये मंजुरी घेऊन तोडल्यास एका झाडाजागी दुसरे दोन झाडे लावावेत.

या कायद्यांची अमलबजावणी करीता राज्य सरकार एका अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. त्यांचे नाव Water, Land and Trees Protection Authority or WALTA. तुम्ही या कायद्याचे महत्व असे आहे. शासनात असलेल्या वेगवेगळ्या शाखा एकत्र येऊन एकतेने कार्य करावे लागते. तुम्ही जंगली शाखेचे उदा. घेतले, तर जंगल वाढवत पाण्याचें पण रक्षण करत असते. तसेच कारखाणे पाणी दुषीत न होण्याकरीता सहकार्य करतात.

अशाप्रकारे आपण खालील तक्ता तयार करुन, सरकारी विभागातील विभिन्न लोक, कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कसे जिम्मेदार आहेत ते पाहू या.

| **शाखा** | **विषय** |
|---|---|
| भुगर्भजल व भौगोलीक नैसर्गिक संपत्ती | बोर, विहीरी,वाळु, पाणी, नैसर्गिक संपतीचे विभाजन |
| नगर परिषदेचे शासन व शहर विकास | पावसाच्या पाण्याचे रक्षण, झाडे लावणे, नविन इमारती बांधण्यास मंजुरी देणे. |
| भुगर्भ व खान | वाळु खादेणे बंदी करणे |
| जंगल विभाग | झाडे कापण्यापुर्वी मंजुरी घेणे. |

या कायद्याची पुर्ण अमलबजावणी झाली तर काय होईल? खालील समस्याचे निरिक्षण करा व कोणती शाखा कसे आपली जबाबदारी पार पाडावी याचे मुल्यमापन करते. एका पेक्षा जास्त शाखा भाग घ्याव्या लागतो का ते निरिक्षण करा.

- शेतीकरणारी एक स्त्रि सत्यवती बोअर टाकण्याचा निर्णय घेते पण बाजुलाच एक बोअर आहे. तर ती कोणत्या नियमाचे पालन करावे लागते?
- आदित्याला नविन इमारत बांधण्याचे ठरविते त्या करीता जवळ असलेल्या नदीतील वाळु आणण्या करीता कोणता नियम पाळावा लागतो?
- अनुष एक ठेकेदार तो जंगलात दगडे खोदण्याचा निर्णय घेतो तर कोणता निमय पाळावा?



SCERT TELANGANA

अशाप्रकारे आपल्यासारख्या लोकशाही देशात आपण निवडुन दिलेले प्रतिनीधी आणि सरकारने नियुक्त केलेले अधिकारी विविध प्रकारच्या भूमिका बजावत असतात. ही पद्धत अनेक प्रकारे पुर्वीच्या पद्धतीपेक्षा भिन्न पुर्वी राजे आणि धर्मगुरुंनी सांगितल्या प्रमाणे लोकांना वागावे लागत होते. राजे आणि धर्म गुरु लोकांच्या जीवनाच्या विविध पैलूंवर आज्ञा देत असत. आपल्या समाजातून अत्यल्प, समानता आणि भेद-भाव पूर्णपणे कमी झाले नाही. तरी पण त्या दिशेने करायला पाहिजे.

**महत्वाचे शब्दः**

1. Magistrate
2. Tahsildar
3. Law implementation
4. VRO
5. Ginning

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. जिल्हाधिकारी यांच्या कामाचे वर्णन करा?
2. खालील दिलेल्या चुकीचे वाक्य बरोबर करा.
   a. कायदा निवडल्या गेलेल्या सदस्यांव्दारेच अमल केला जातो.
   b. जिल्हाधिकारी तालुक्याचा अधिकारी असतो.
   c. मंडळ अधिकारी जिल्हा संबंधीत सर्व अडचणी सोडवितात.
   d. तहसिलदार भुमी, जमीनी संबंधीत सर्व रिकार्ड पाहत असतो.
3. पान क्र.160 वरील तहसिलदार आणि ग्रामअधिकारी हे दोन परिच्छेद वाचुन खालील प्रश्नांचे उत्तर द्या? जमीनी संबंधीत सर्व रिकार्ड मंडळ आणि ग्रामपातळीवर का ठेवले जाते? असे तुम्हास वाटते?
4. मागील दोन पाठात आपण कायदा बनविने व त्याचे पालन करणे याबद्दल अभ्यास केला त्या त्या विषयाचे पात्र खालील तक्त्यात लिहा.
   a) निवडणुकीत उभे राहु शकतात
   b) सरकार मधील विविध शाखेचा सहभाग
   c) कायदा तयारी करीता जबाबदारी निभवतात
   d) कायदा अमल करण्यासाठी जबाबदारी
   e) सर्वसाधरणपणे 5 वर्ष एक वेळेस निवडणुका
   f) शासनाची नियुक्ती केली जाते.

| विधानसभा सदस्य (आमदार) | पालन करणारे अधिकारी वर्ग |
|---|---|
| | |
| | |
| | |

5. मनिषा नागले विषयी संक्षीप्तवर्णन करण्यात आले आहे. काळजीपुर्वक वाचन करा वत्याला पाठ्यक्रमाने पाठ 13 सैनिक, नायक, अमरनायक आणि पाठ 14 आधारे तक्ता मनसबदार आणि जगीरदार भरा.



SCERT TELANGANA

मनिषा नागले गेल्या पाच वर्षापासुन नल्लावरम जिल्हाधिकारी म्हणुन काम करीत आहे. ती जिल्हाधिकारी म्हणुन येण्या अगोदर राज्य राजधानीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग शाखेत उपसचिव म्हणुन काम केले. तीला आणखी एका जिल्ह्यास जिल्हाधिकारी म्हणुन किंवा राज्य राजधानीत सचिवायलयात बदली घेण्याची संधी पण आहे. ती केंद्र सरकारची कामगार यातील काहीजन केंद्र सरकारचे शासन पालन पाहण्याचे काम करतात. आणि त्यांना ह्यासाठी दिल्लीला जावे लागते. हे सर्वजन स्पर्धा परिक्षा पास होऊन नियुक्त केल्या जातात.

| अंश | शासकीय कर्मचारी | अमर नायक | मनसबदार |
|---|---|---|---|
| नियुक्ती पध्दत | | | |
| पगार | | | |

6. तुमच्या जिल्ह्याच्या नकाशात तुमच्या मंडळाला लागुन असलेल्या इतर मंडळाच्या सरहद्दींना रंग लावा.

**चर्चा करा:**

कायद्यांची अमलबजावणी या बाबत महुसल अधिकाऱ्यांशी चर्चा करा.

**प्रकल्प कार्य:**

1. तुमच्या किंवा दुसऱ्या शाळेच्या शिक्षकांची मुलाखत घेऊन नियुक्ती कशी झाली?
   विभाग कोणता?
   प्रथम कुठे रुजु झाले?
   बदली कशी होते?
   बढती/शिक्षा (प्रमोशन/पनीशमेंट) कशी होते?
   पगार देण्यासाठी कोण जिम्मेदारी?
   कामात कांही समस्या असतात काय?
   तक्रार कुठे करावी?
   इत्यादी माहिती गोळा करा.
2. शाळेतील नाव नोंदणी वाढवणे, दुपार जेवणाची अंमलबजावणी करणे किंवा इतर कामे करणे. या बद्दल त्यांचे/तिचे अनुभव काय? ही माहिती वर्गात विशद करा?

SCERT TELANGANA

पाठ 18

# जातीभेद आणि समतेची लढाई

जातीभेदामुळे देशात असमानेची भावना निर्माण करण्याचे महत्वाचे कारण आहे. अनेक शतकापासुन लोक जाती भेदाच्या विरुध्द लढत आहेत. आपली राज्यघटना सुध्दा याची संकल्पना बदलण्यास प्रतत्न करत आहे. जातीभेद निर्मुलन करणे हे आपल्या सरकारचे मुख्य उदेशांपैकी एक आहे. जाती व्यवस्था कशी काम करत आहे. जातीवाद काडुन टाकण्यासाठी घेण्यात आलेली कार्यवाही कोणकोणते ते पाहु या.

आपल्या देशातील खुप लोक कोणत्या तरी एका जातीशी संबंधीत आहेत. त्यांनी त्यांच्या नावाबरोबर जातीचे नाव सुध्दा जोडतात. साधारणतः एका जातीशी संबंधीत काही आचार, चालीरिती विशेष अशा देवतेची पुजा करणे या गोष्टी पाळतात. जातीचे नियम पाठणारे बरेच लोक त्यांच्या जातीतील लोकांशी विवाह करतात. प्राचिन काळात एका जातीचे लोक एकच धंदा करत. सध्या ही परिस्थिती काळानुसार बदलत आहे. त्या पध्दतीने जाती व्यवस्था काही वर्गातील लोकांना एकत्र आणते. तर काही वर्गातील लोकांना वेगळे करते.

- या गोष्टी तुमच्या प्रांतामध्ये कुठपर्यंत खऱ्या ठरतात व कुठपर्यंत यात बदल झाला याचा तुमच्या वर्गात चर्चा करा?

जातीव्यवस्थेमुळे आपल्या समाजात अने असमानता मतभेद वाढल्या याची कारणे पाहु या.

लोक आपले उदरनिर्वाह करण्यासाठी सुतार, लोहार कुभार, सुतकातणे, मांशा धरणे शती इ. कामे करतात. काही कामे एक दुसऱ्यापेक्षा कमी जातीची आहेत. असे समजत स्वच्छता करणे, कपडे धुणे, वारीक, कचरा काढणे या काम करणाऱ्या व्यक्तीस हलक्या दृष्टीने पाहत. ते काम करणाऱ्यास अपवित्र, घान समजत, जाती व्यवस्थेत हा विश्वास महत्वाचा ठरला.

जातीभेदात काहींना उच्च स्थान तर काहीं जातींना खालचे स्थान दाखविले. उच्च स्थानात असणारे स्वतःला श्रेष्ट समजतात. खालच्या स्थानात दाखविणाऱ्या जातीना हरीजन म्हणुन ओळखत. हरीजनांना सहभागी होऊ देत नव्हते. जातीचे नियम त्यांच्यावर लादले गेले.

उदा. काही वर्गातील लोकांना कचरा काढण्यास मेलेली जनावरे काढण्यास ही कामे लावत. पण त्यांना उच्च वर्गातील लोकांच्या घरी जाण्याची परवानगी नव्हती. गावातील विहिरीचे पाणी पिऊ देत नव्हते. देवहात त्यांना प्रवेश नव्हता. कमी जातीच्या मुलांना शाळेत उच्च जातीच्या मुलांसोबत



SCERT TELANGANA

बसु देत नव्हते. उच्च जातीच्या कुळातील लोकांना जे हक्क होते ते खालच्या जातीच्या कुळांना नव्हते.

- जाती व्यवस्थेमुळे कोणत्या प्रकारची असमानता वाढीस येते असे तुम्हास वाटते?

शिकणे आणि त्यांनी मागीतलेल्या नौकऱ्या करणे, अशा काही जनांना वगळले असता. त्यांना जातीभेदाच्या आहारी जावे लागत आहे. भारत देशातील मोठ्या नेत्यापैकी एक नेता डॉ.भिमराव रामजी अंबेडकर यांना 1901 पण या 9 वर्षाचे असतांना जातीभेदाचा एक अनुभवाची घटना घडली ती आपण पाहु या. त्यांनी एकवेळेस कोरेगावास असलेल्या आपल्या वडीलास भेटण्यासाठी आपल्या भावासोबत निघाले ते गाव महाराष्ट्रात आहे. ह्या घटनेबद्दल अजुन काही माहिती वाचु या.



**डॉ.भिमराव रामजी अंबेडकर**
**(1891- 1956)**
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि मसुदा समीतीचे अध्यक्ष आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री

"बराच वेळ वाट पाहली पण आमच्या कडे कोणीच आले नाही. एकातांसानंतर रेल्वे स्टेशन मास्तर आमच्या जवळ येऊन टिकेट विचारला. आम्ही त्याला टिकेट दाखवले. तुम्ही कोणाची वाट पाहत आहात म्हणुन विचारले आम्हाला कोरेगावला जायचे आहे. आमच्यासाठी आमचे वडील नाहीतर त्यांचा सेवक येणार होता. पण कोणी आले नाही. तिथे कसे जावे हे आम्हाला माहित नाही आम्ही चांगले कपडे घातलेले होतो.

आम्ही घातलेल्या कपड्यांनी किंवा बोलण्याने कोणीच अस्पृश्य म्हणुन ओळखले नाही. स्टेशन मास्तरांनी आम्हाला ब्राम्हण समजुन हात लावला. सर्वा सारखे स्टेशन मास्तरांनी तुम्ही कोण आहात म्हणुन विचारले लगेच आम्ही महार म्हणुन (बॉम्बे प्रेसिंडेटसीमध्ये महार ही एक अस्पृश्यतेची जात समजत होते) म्हणताच तो निशब्द झाला. त्याचा चेहरा एकदम बदलुन गेला. त्याच्या चेहऱ्यावर हावभावतील आक्रोशस लपवु शकला नाही. लगेच आम्ही त्याच्या खोलीपासुन दुर सुरुवातील उभा होतो. त्या जागी आलो.

पंधरा-वीस मिनीटे झाली. सुर्यास्ताची वेळ होत आली होती. तरी पण बाबा आले नव्हते. नौकर पण आला नाही. आम्ही येतांच जेवढ्या उत्साहात आलो. होतो तो उत्साह नाहिसा होऊन दु:खात रुपांतर झाले. अर्ध्यातासानंतर पुन्हा स्टेशन मास्तर आमच्या कडे येवुन तुम्ही काय करायच ठरवल ते सांगा तेव्हा आंबेडकर म्हणाले बैलगाडी नाहीतर चालत जायचे असे ठरविले म्हणुन उत्तर दिले.

तिथे भाड्याने जाणाऱ्या बऱ्याच बैलगाडी आहेत. आम्ही बैलगाडया जवळ जाऊन विचारल्या नंतर आम्ही महार आहोत हे समजल्यानंतर कोणीही

SCERT TELANGANA

*त्यांनी अस्पृश्य होतील त्यांना पण अस्पृश्य न म्हणतील म्हणुन कोणी शिवु नये त्यांच्या बैलगाड्या अस्पृश्य होईल म्हणुन किती ही पैसे दवायला तयार असुन सुध्दा त`घेऊन जायला तयार नव्हते. स्टेशन मास्तर काहीच न बोलता निशब्द राहिला.*

*संदर्भ : डॉ.बी.आर.अंबेडकर साहित्य आणि भाषणे भाग -12 वसंत मुन, मुंबई शिक्षण विभाग महाराष्ट्र*

- पैसे देण्यास मुले तयार होते. तरीसुध्दा बैलगाडीवाल्याने बसवुन घेतले नाही का?
- रेल्वे स्टेशन मध्ये डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या भावाबद्दल का भेदभाव वाढला?
- लहान वयात असणारे डॉ. अंबेडकर यांना महार म्हणुन सांगताच स्टेशन मास्तरच्या प्रतिस्पंदन पाहिल्यानंतर त्यांना कोणता अनुभव झाला असे तुम्हास वाटते?
- तुम्ही कधी भेदभवाच्या आहारी गेलात का? किंवा त्या संदर्भ पाहिलात का?
- या विषयामुळे तुम्हाला कोणता विचार मनात आला?

एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी सहजपणे जाऊ शकलो नाहीतर किती त्रास होतो. याची कल्पना करा? कोणीही हालक्या जातीच्या शिवारात पाहत असेल तर, सर्वजन पिणारे पाणी तुम्हाला पिऊ दिले नाही तर, तुम्हाला किती अपमान वाटतो. विचार करा.

एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी बैलगाडीत जाण्याची त्यांना संधी भेटली नाही. ते या छोट्या घटनेमुळे समजते. रेल्वे स्टेशनमध्ये असणाऱ्या सर्व बैलगाड्यांनी या मुलांना घेऊन जाण्यास नकार दिला. त्यांनी भेदभाव दाखवला या मुळे हे सिद्ध होते की, जाती भेदभाव, दलीतांना आर्थिक व्यवहरातुन काढुन टाकणेच नाहीतर, गौरव मिळेणासा झाला हे स्पष्ट दिसुन येते.

## शाळेतील अस्पृश्यतेंच एक उदाहरण

ओमप्रकाश वाल्मीकी एक प्रमुख दलीत रचनाकार होते. झुटन या त्यांच्या स्वत:च्या रचनेत असे लिहिले "मला दुसऱ्यापासुन खुप दुर वर जमीनीवर बसवत असत. मी बसलेल्या जागी चटईसुध्दा नसायची. कधी-कधी दाराच्या मागे सर्वांच्या दुर बसावे लागत असे. काही वेळेस विनाकारण मारत". ओमप्रकाश 4 थ्या वर्गात असतांना, मुख्याध्यापक त्यांना शाळा आणि खेळाचे मैदान साफ करण्यास सांगितले. त्या संघटनेबद्दल त्यांनी असे लिहिले "खेळाचे मैदान खुप मोठे होते, आणि मी खुप छोटा असल्यामुळे ते साफ केल्याने पाठ दुखायची. चेहरा पुर्णपणे धुळीत भरायचा. इतर विद्यार्थी शिकत असतांना मी झाडत होतो. मुख्याध्यापक त्याच्या खोलीत बसुन माझ्या कडे लक्ष देत. पिण्याचे पाणी पिण्यास सुध्दा परवानगी देत नसत. दररोज झाडत, शाळेतील सर्व दारे, खिडक्या, वर्ग स्वच्छ करत. मी हे काम करतांना विद्यार्थी व शिक्षक पाहत राहत होते." ओमप्रकाशचे वडील एकदा शाळेच्या रस्त्याने जातांना त्यांचा मुलगा झाडतांना दिसला. आपल्या मुलांचा हात धरुन घेऊन जाताना ते असे म्हणाले तुम्ही शिक्षक आहात म्हणुन मी तुम्हाला सोडुन देत आहे.पण तुम्ही लक्षात घ्या. ...... हा येथेंच आणि ...... याच शाळेत शिकतो हाच नाहीतर याच्यासारखे अजुन जास्त मुल येऊन शिकतील.

SCERT TELANGANA

- ओमप्रकाश वाल्मीकीला विद्यार्थी व शिक्षक असमातेने का पाहिले असे तुम्हाला वाटते?
- त्या परिस्थितीत तुम्ही असाल तर काय कराल? याबद्दल चार वाक्यात लिहा?

व्यक्तींना समानतेने न पाहिल्यास त्यांच्या अस्तित्वालाच ढेच पोहचते. ओमप्रकाश वाल्मीकी बरोबर मुख्याध्यापकाने दिलेली वागणुक पाहुन त्याचा दर्जा कमी झाला. शाळापुर्ण झाडण्यासाठी त्याची निवड करण्याचे कारण त्याची जाणीव जातच आहे. त्याचे सोबत शिक्षक त्याच्या दर्जेस धक्का देवुन तो इतर विद्यार्थ्यांपेक्षा कमी आहे. ही भावना वाढण्यासारखी वागणुक दिली. ओमप्रकाश वाल्मीकी मुलगा आहे. म्हणुन या परिस्थितीला तोंड देण्याचा प्रयत्न केला नाही पण त्याचा मुलगा झाडतांना पाहुन त्यांचे वडील शिक्षकाजवळ जाऊन या असमानते बद्दल विरोध केला.

आज ही स्थिती न राहता सर्वच शाळा मधुन नव नविन पध्दतीने शैक्षणिक वातावरणाची निर्मिती झाली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहुन त्याला प्रत्येक कार्यक्रमात ( भाषण,खेळ, संगीत, नाटक इत्यादी) मध्ये सहभाग केले जाते. त्या ठिकाणी जातीभेद - धर्मभेद केला जात नाही. कारण भारत हे धर्म निरपेक्ष राष्ट्र आहे. त्याच प्रार्थनेसाठी, कार्यक्रमाचे संचलनासाठी त्यांचा सहभाग हा महत्वाचा आहे.

मध्यान्ह भोजन, विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र बसुन मध्यान्ह भोजन (Midday Meals) घेतात. सर्वांना जेवणाचे व पाण्याचे वाटप केले जाते.

- Have you seen such efforts in your school or nearby schools? Share those experiences with the entire class.

## नेहमीच ही जाती पद्धत राहिल का?

नाही, एकेकाळी जाती व्यवस्था नसायची शिकारी टोळ्याच्या जिवनाशी आहारपदार्थाना मिळवणारे भटक्या जातीची कोणतीही जाती व्यवस्था नाही. वेदकाळात जातीयव्यवस्थेची निर्मीती होऊन ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, शुद्र हे चार वर्ण तयार झाले. त्यांनतरच्या काळात विवाह, मिळुन जेवण करणे, यावर मर्यादा बाळगत शिवाशिव इ. नविन आचार निघाले. लहान जातीचे लोक मोठ्या जातींच्या लोकांची सेवा करत, त्यांची आज्ञा पाळण्यास सांगीतले.

भारतात ही भावना वाढीस आली, अशा भावनेस अनेक लोकांनी टिका केल्या. जन्मताच तो श्रेष्ठ असतो. या विषयास तत्वज्ञ बुध्द महाविर रामानुजन बसवन्ना, कबिर, वेमन्ना यासारख्यांनी विरोध केला. जन्माने किंवा जातीने वृत्तीचासंबंध नसुन सर्वांनी स्वतंत्रपणे चांगली कामे करुन मोक्ष प्राप्त करु शकतात. पुढील पाठात याबद्दल तुम्हास अधिक शिकण्यास मिळेल.

## समानतेची चळवळ

ब्रिटीश राज्यस्थापना, त्यांच्या विरोधात केलेल्या चळवळीबद्दल तुम्ही शिकलात ना, ब्रिटीश शासनाकडुन स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जशा चळवळी केल्या तशाच चळवळी समानतेसाठी सुध्दा केल्या. दलित स्त्रीया, गिरीजन शेतकरी त्यांनी त्यांच्या जिवनात अनुभवलेल्या असमानतेबद्दल विरोधात चळवळी केल्या. 19 आणि 20 व्या शतकात अनेकजन समाज सुधारकांनी संस्कृती, स्वांतत्र्य, समानता, बंधुभाव, व्यक्तीगौरव, आर्थिक न्याय ह्या तत्वावर आधारीत एक नविन समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यातील एक ज्योतीराव गोविंदराव फुले, सावित्रीबाई फुले, पेरीयार इ.वी. रामासामी नायकर आणि श्रीनारायण गुरु आयंकाळी इ.मुख्य समाज सुधारकांचा समावेश होता. त्यांच्यापैकी काहीजणांबद्दल आपण आठव्या वर्गात शिकु या.



SCERT TELANGANA

तेलंगानातही सामाजिक चळवळीना वेग आला. या चळवळीत काही महत्वाच्या व्यक्ती होत्या त्यात पी. वेंकटास्वामी, इश्वरीबाई, टी.एन. सदालक्ष्मी इ.स. इथीराजन, आराग्ये रामास्वामी, एम. वेंकटास्वामी, बि.ए वेंकटराव इत्यादी होते. एकाच्या संघर्षाची कथा पाहु या.

## बी.एस. वेंकटराव (1896-1953)

बातुला वेंकटराव यांचा जन्म हैद्राबादेतील घासमंडी येथे झाला. रावसाहेब या नावाने ते प्रसिध्द आहेत. त्यांचे वडील सायन्ना हे युरोपीयांनाकडे खाजगी कामासाठी होते. वेंकटरावाचे शिक्षण 9 व्या वर्गापर्यंत झाले. तथापी त्याचे इंग्रजी, उर्दु, पर्शियन आणि मराठी भाषेवर आणि तेलुगु भाषेवरही प्रभुत्व होते. निजामाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात सामील होण्यापुर्वी त्यांनी प्रख्यात शिल्पकाराचे काम केले. स्वातंत्र्य पुर्वी स्वकष्टाने निजाम सरकारात ते मोठ्या पदावर पोहोचले होते.

दडपणाखाली असलेल्या सामाजिक वर्गावर अस्पृश्यतेचा कसा प्रभाव पडतो याचा अनुभव असल्यामुळे, याचे निर्मुलन करण्याचा त्यानी निश्चय केला. 1922 साली त्यांनी त्या दृष्टीने एम. गोविंराजुलु आणि एम. वेकंटस्वामी यांच्या सहकार्याने अदि द्रविड संघाची स्थापना केली. या संघटनेचा मुख्य उद्देश म्हणजे समाजातुन देवदासी प्रथेचे उन्मुलन करणे आणि दलितांना एकत्र करणे होय. तदनंतर 1927 साली आदि हिन्दू महासभेची स्थापना केली. एका दशकानंतर पुणे येथे असतांनाच त्यांनी काही तरुणांच्या साहाय्याने आंबेडकरी युवा संघ (Youth legue of Ambedkarities) एक संघटना स्थापून शिक्षित दलीत वर्गातील तरुणांना जाती आधारीत शोषणा विरुद्ध प्रचार प्रसार करण्याचे उद्देश ठेवुन त्या दृष्टीने कार्य केले. तदनंतर तिच संघटना हैद्राबाद संस्थान दलीत मागासवर्ग संघाच्या नावाने नावारुपास आले. या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गावोगावी जाऊन विविध सभा बैठका घेऊन जाती भेद निर्मुलनाचे मोठे कार्य केले. लोकांमध्ये प्रचार प्रसार केला. जनजागृतील केली या चळवळीने देशपातळीवर ही जम बसविला. दलीतांचे पुर्ण संघटना करुन त्यात ऐक्यता आणण्याचे मोठे कार्य या संघटने व्दारे झाले. यातील कांहीजणांनी धार्मिक सुधारणा करण्याकडे भर देऊन दलीतांना कर्मकांडातुन मुक्त करण्याचा प्रयत्न केला. घासमंडीत घरे बांधुन तेथे एका ग्रंथालयाची उभारणी केली. तदनंतर त्या भागास अदिनगर असे नामकरण करण्यात आले.

संपुर्ण हैद्राबाद शहरात दलीतांसाठी 18 मंदीराची उभारणी करण्यात आली. हैद्राबाद संस्थानात वेंकटरावांच्या कामाची दखल डॉ. आंबेडकरानी घेतली. त्यांनी त्यांचे कौतुक करुन 1939 सालच्या मुंबई राज्य महार परिषदेच्या अध्यक्षपदासाठी त्यांना आमंत्रित केले. या परिषदेला साधारण 10,000 लोक उपस्थित होते. या सर्वांनी एकत्रितपणे आंबेडकरांच्या चळवळीला एक मुखाने पाठींबा दिला.

1 एप्रिल 1947 रोजी हैद्राबाद विधान सभेने पलायन पिल्ले यांनी मांडलेल्या ठरावावर चर्चा केली. हैद्राबाद संस्थानातील दिन दुबळ्या दलीत समाजाच्या उन्नती करण्यासाठी सरकारकडे 20 लाख रुपयांच्या निधीसाठी मागणी केली. मंडळात यावर प्रदिर्घ काळ चर्चा झाली. यावेळी वेंकटराव यांनी मध्येच दुरुस्ती सुचवत हा निधी एक कोटी रुपये करण्याचे सुचविले. त्यांच्या सुचनेला सर्वांनी होकार देऊन एकामुखाने हा ठराव संमत करण्यात आला.

या ठरावान्वये पंतप्रधान निधी एक कोटी देण्याचे सांगण्यात आले. याच प्रमाणे निजामाने ही एक सुचना ठराव मान्य करुन दलित वर्ग संघासाठी


SCERT TELANGANA

निधी मंजुर केली. त्यातुन हैद्राबाद संस्थानातील दलीतांच्या उन्नतीसाठी निजाम राजाने त्यांना खुसरु - ए - दक्कन ही पदवी देऊन सन्मान केला. स्वतंत्र भारतात राज्य विधानसभेनी यांना 1952 साली राज्यसभेवर निवडुन दिले.

## स्वांतत्र्या नंतरची समानता

जेव्हा 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशात असणाऱ्या अनेक प्रकारच्या असमानतेबद्दल नेत्यांनी विचार केला. देशाचे प्रशासन चालवण्यासाठी नियमांना सांगीतलेल्या भारतीय राज्य घटना लिहिण्याऱ्यानी त्या काळी सामाजातील चालीरीती, आचरणात असणारे, जातीभेद, प्रथा त्याबद्दल झालेल्या चळवळीबद्दल त्यांना माहिती होती. डॉ. आंबेडकर सारख्या नेत्यांनी दलीतांच्या हक्कासाठी लढले.

या सर्वांनी सर्व भारतीयांना समान दर्जा देण्यासाठी राज्यघटनेत उद्देश मांडले. ही समानतेची भावना सर्व भारतीयांना एकत्र करेल. प्रत्येकजनांना समान हक्क आणि संधी द्यावी. अस्पृश्यता हा एक गुन्हा आहे. म्हणुन यास कायदेने रद्द केले. लोकांना त्यांच्या सरकारी नौकऱ्या मतभेद न करता सर्वांना दया भाव या बरोबरच भारतीय राज्यघटना गरीब, बलहीन वर्गांना, सर्व जनतेस समानत्वाचा अधिकार देण्याची सरकारची जिम्मेदारी आहे असे संविधान सांगते. सरकारने दोन प्रकारचे प्रयत्न केला. एक कायदा करुन अमलात आणणे दुसरा सरकारी प्रयत्नाव्दारे खालच्या वर्गातील प्रगतीसाठी श्रम करणारे समानतेसाठी कायद्याने अनेक कायदे काढुन, प्रत्येकांच्या हक्क व कर्तव्य सांभाळण्याचा प्रयत्न करते. कायद्यासहीत शासनाने अनेक योजनाव्दारे अनेक शतकापासुन असमानतेच्या आहारी जाणाऱ्या अनेक जाणांच्या विकासासाठी प्रयत्न केला. या योजनांमुळे बऱ्याच लोकांना पुर्वी न मिळालेल्या संधी मिळत आहेत, सरकारने घेतलेल्या कार्यवाहीत मध्यान्ह भोजन योजना हे एक होय. या योजनेनुसार सर्व शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण देणे ही योजना भारतात सुरवातीस तामीळनाडु राज्यात सुरु करण्यात आली. 2001 मध्ये भारतीय सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारांना सहा महिण्यात ही योजना सुरु करण्यात यावी म्हणुन आदेश दिला. या योजनामुळे अनेक अनुकुल फायदे झाले. जास्तीत जास्त गरीब मुले शाळेत भरती झाले. मुलांची हजरी पट वाढली. अगोदर मुल जेवणासाठी घरी जाऊन दुपारच्या शाळेत गैरहजर असायचे. या योजनामुळे हजरी वाढली म्हणुन शिक्षकांचे मत आहे. मुले दुपारी जेवण्यासाठी गेल्यानंतर आई - वडीलांना काम थांबवुन जेवन द्यावे लागत असे. पण आता त्यांची गरज नाही. खालच्या वरच्या जातीचे मुल शाळेत एकत्र बसुन जेवण करत असल्यामुळे जातीभेद कमी झाले आहे. तेलंगानातील जवळपास सगळ्या ग्रामीणभागातील शाळेत दुपारच्या जेवणासाठी महिला स्वयंपाकी सहाय्यक संघातील महिलाच स्वयंपाक बनवत आहेत. त्यांच्या पैकी बरेच जन खालच्या वर्गातील काही जागेवर स्वयंपाक करत आहेत. या योजनेव्दारे उपाशी पोटी येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांची भुक भागवुन त्यांना शिक्षण देत आहेत.

- दुपारच्या जेवणाची योजना म्हणजे काय? या योजनेचे तीन फायदे कोणकोणते?
- ही योजना समानतेस कशा प्रकारे साध्य करेल असे तुम्हास वाटते?

सरकारी योजना समानतेची संधी वाढविण्यासाठी बरेच प्रयत्न करत असली तरी अजुन बऱ्याच सुधारणा करायच्या आहेत. मध्यान्ह भोजन योजनामुळे गरीब विद्यार्थ्यांची भरती, हजरी वाढली असली तरी श्रीमंत

SCERT TELANGANA

मुले शिकत असलेली शाळा आणि गरीब मुले शिकत असलेल्या शाळेत बराच फरक जाणवतो. आजही आपल्या देशात असे अनेक शाळा आहेत ज्यात ओमप्रकाश वाल्मीकी सारखे मुल मतभेद आणि असमानतेच्या आहारी जातात. लोकांच्या मतभेदांबद्दल अजुन विचार करावा लागणार आहे. याचे मुख्य कारण आपली वागणुकीत फार हळु बदल होते. मतभेद कायद्यांच्या विरुध्द आहे. यांची माहिती असुन सुध्दा लोक जात, पात, धर्मभेद, वैकल्पीक, आर्थिकस्थिती, लिंगभेद यानुसार फरक करतात. प्रत्येकजन गौरव मर्यादेने पाहण्याची दृष्टी आल्यास ही वागणुक बदलेल. लोकशाही असणाऱ्या समाजात समानता साध्य करणे हे निरंतर चालणारे लढा आहे. व्यक्तीगतेने सामाजिकतेने प्रत्येकजन आपआपल्या रितीने प्रयत्न केल्यास समानता साध्य करणे शक्य होते.

**महत्वाचे शब्द:**

1. अस्पृश्यता - Untouchability
2. योजना - Scheme
3. संविधान - Constitution
4. आत्मचरित्र - Autobiography

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. एक चुक केल्याबद्दल शिक्षा करणे, भेदभावाच्या दृष्टीने पाहणे यात फरक आहे का? आंबेडकरांना बालपणी शिक्षा झाली होती का? ते भेदभावाच्या आहारी गेले का?
2. समाजात अनेक प्रकारच्या जाती आहेत, कोणत्या प्रसंगी त्यात समानता दिसुन येते?
3. आपल्या संविधानाने निर्मुलन केले आणि असपृश्यता गुन्हा आहे म्हणून सांगितले. या विधानाशी तुम्ही सहमत आहे का?
4. जाती आधारीत असमानता काढुन टाकण्यासाठी शाळेची कशी मदत घेता येते?
5. पान क्र. 170 वरील सरकारने दोन प्रकारचे ....... संधी मिळत आहे. वाचुन विवेचन करा?

**प्रकल्प कार्य :**

1. तुमच्या भागातील एका शासकीय योजनेची माहिती द्या? ती योजना कुणासाठी व का निर्माण केली आहे?
2. तुमच्या आई वडीलांच्या बालपणी जातीव्यवस्था कशी होती? त्यात कसे बदल होत गेले? काही बदल तसेच आहेत का? याची माहिती घेऊन एक अहवाल तयार करा आणि वर्गात दर्शवा?

SCERT TELANGANA

पाठ 19

# जीवनमान- शहरी कामगारांचा लढा

9 व्या पाठात आपण कागद उद्योगात काम करणाऱ्या कामगारा विषयी वाचलेच आहे. आनंद सारखे अनेक लोक पगार, बोनस, (कंपनीच्या लाभातील भाग) भविष्य निर्वाह निधी इतर सोयी घेत आहेत. आरोग्य, रक्षण, गृहस्ती या सारख्या सोयी देखील त्यांना मिळत असतात. भारत देशातील सर्व कामगारांपैकी हा एक फक्त छोटाभाग आहे. त्याच कागद उद्योगात उमर, पुष्पा सारख्या इतर प्रकारच्या कामगारांना कोणत्याच प्रकारच्या सोयी उपलब्ध नाहीत. यांना पगार कमी असतो. इतर सोयी मिळत नाहीत. आपल्या देशात अनेक लोक उमर, पुष्पा प्रमाणेचे आहेत. कामगार आपल्या मालकांसोबत का, कशा? चर्चा करतात उत्तम जीवन जगण्यासाठी संघ, न्यायालये व्दारे आपल्या समस्यांना कशाप्रकारे सोडवितात या पाठातुन माहिती करुन घेऊ या. आपण अजून संघाविषयी माहिती करु या. जी अशा लोकांसाठी काम करतात जे स्वतः काम करतात.

SCERT TELANGANA

जनतेच्या आवडीनुसार कायद्याची निर्मीती करते हे आपण आता पर्यत शिकलो. शेतात, कारखाण्यात, निमशासकीय, शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या कामगारांना हक्क मिळवुन देण्यासाठी आणि त्याच्या कायदे तयार करण्यात येतात. शासनाने प्रमाणपत्र मिळालेल्या मालक उद्योग धंदेवाईकांनी कायद्याचे पालन करुन कामगारांना पुरेसा पगार आणि गरजेच्या सोयी द्यावा. या कायद्यांची अंमलबजावणीची जबाबदारी मालकावरच आहे. कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली नाही तर कामगार विभात कोर्टात अपील करु शकतो. कायमच्या कर्मचाऱ्यांच्या संक्षेमासाठीच जबाबदारी कसे टाकतात. मालक उद्योगी रोजगार कामगार यांच्या संक्षेमाची जबाबदारी घेत नाही.

शासनाची अनुमती प्रमाणपत्र नसणारा उद्योगी देखील अनेक आहेत. या सारख्या काही उद्योगातील कामगारांच्या स्थिती गती कशी आहेत ते पाहु या.

## कारखान्यातील कायमचे कर्मचारी

**'Permanent Workers'**

खालील समाचार वाचाः- हैद्राबाद पासुन 30 कि.मी. अंतरावर महबुबनगर जिल्ह्यात कोत्तुर शहरात (नविन उद्योगधंद्याचे शहर) 2002 मध्ये प्रारंभ झालेल्या दोन कारखान्याविषयी दिलेल्या समाचार वाचा.

फायब्रोटेक्स (Fibrotex) (not a real name) 1976 वर्षी प्रारंभ झालेला एक फार मोठा उद्योग येथे फायबरग्लास तयार करतात. 2002 मध्ये या कारखाण्यात एकुण 570 कामगार होते. त्यापैकी 140 जण कायमचे कर्मचारी 60 जण रोजागार कर्मचारी आहेत यांना बदली कामगार म्हणतात.

या कारखाण्यात कामगार संघ आहे. सुरुवातीस कंपनीने कामगार संघ स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले. कारण कंपनीला वाटत होते की, त्यांच्या धोरणांना स्वीकारणे हे संघ वलढ्य कामगार संघात विकसीत झाले. कारण कामगारांची संख्यामध्ये उत्साहाने भाग घेतला होता. हे संघ व्यवस्थापकांशी रोजगार निश्चित करण्यासाठी तडजोड करते.

संघाबरोबर केलेल्या कराराप्रमाणे सगळ्या कामगारांना ठराविक रोजगार मिळतो. आरोग्य विषयक सोयी जसे कर्मचारी राज्य इन्शुरेन्स, प्रोवीडेंट फंड (भविष्य निधी), सारख्या सोयी कामगरांना मिळवून देतो. मोठ्या मोठ्या दवाखाण्यात वैदयकीय परिक्षण, चिकीत्सा सुट्या संबंधीत काम करण्याच्या ठिकाणी सुरक्षितत गोड पाण्याचा पुरवठा करणे, मुलांच्या शिक्षणाची सोय, रवाना (दळण वहणाची) सोय सुट्यामध्ये प्रवास सहलीसाठी अलवेंन्स फंड( एलटीऐ) सारख्या सोयी कामगार संघानी मिळविले आहे. आवश्यकतेनुसार कारखाण्यातुन कर्ज देखील मिळते. कामगारांच्या निवासासाठी क्वार्टर पण देतात. कारखाण्यातील दिर्घ कालीन कामगारांना शिक्षण पण देतात. उत्पादनांच्या दर्जा वाढविण्यासाठी त्यांना विदेशात शिक्षणांकरीता पाठवितात. एका निर्मीत काळानंतर कांट्रंक्ट कामगारांना बढती देवुन त्यांना कायमचे कामगार म्हणुन ओळख देण्यासाठी कामगार संघानी मालक यजमाना सोबत करार करुन घेतला आहे

फायब्रोटेक्स उद्योगातील कामगार संघ फार क्रियाशिल आहेत. या संघाने इतर उद्योगातील संघांच्या वाढी करीता, सक्षमा करीता सहाय्य केले आहे.

## कार्मीक संघ (कामगार संघ)

**Trade Union**

कामगारांच्या संक्षमाच्या रक्षणासाठी त्याच्या पासुन तयार झालेल्या सभासदांच्या गटास कामगार संघ म्हणतात. जर प्रत्येक कामगाराने फॅक्टरी मालकाशी एकटेच तडजोड करण्याचा प्रयत्न केला तर, कामगार लोकांची स्थिती मजबूत राहणार नाही. पण हेच कामगार सगळे मिळुन एकत्रपणे मालकाशी तडजोड केल्यास, त्यांची स्थिती मजबूत बनु शकते. हे संघास शासणनासोबत यजमान सोबत चर्चा करतात. संघ योग्य पगार मिळवुन देण्यासाठी इतर सोयी मिळवुन देण्यासाठी काम करण्याच्या ठिकाणी अनुकुल परिस्थिती मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करतात. सामाजिक संरक्षण आरोग्य विषयक सोयी, घर, भविष्य निधि, पेन्शन मिळवुन देण्यासाठी सभासदासोबत काम करतात. मालक कामगारांना सतविल्यास कोणताही अडचणीत असल्यास त्यांच्या त्या अडचणी दुर करण्यासाठी प्रयत्न करणे हे संघाचे काम आहे. चर्चा करणे, न्यायालयात खटला टाकणे आंदोलने करणे, कामास बंद करणे, सारख्या प्रजासत्ताक विधानाचे अनुसरण करीत मालकांवर दबाब टाकतात.

फायब्रो ट्रोटक्स उद्योगातील कामारांचा पगार

| | |
|---|---|
| ***कायमचे कर्मचारी*** | *Rs.4500 – 10,000 per month* |
| ***बदली कर्मचारी*** | *Rs.3000-4000* |
| ***कॉन्ट्रक्ट कर्मचारी (दिनचर कामगार)*** | *Rs.58 per day for eight hours* |

2002 जास्त प्रमाणात लाभ कायमच्या कर्मचारी 140 जणांनाच मिळत आहे. 360 बदली कामगार, तात्पुरते कामगार यांना पगार, भविष्य निर्वाह निधी इत्यादी इ.एस.आय. सारख्या काही सोयीच फक्त मिळत आहेत.

- कायम कर्मचारी आणि बदली कर्मचारी यांच्यातील फरक कोणता आहे ते सांगा?
- कायम कर्मचारी आणि बदली कर्मचारी यांच्यातील महिण्याच्या पगारीतील फरक काय आहे ते सांगा?
- एक किंवा दोन कारखाण्यातील कामगारांना ज्यांना ESI आणि PF चे फायदे मिळतात, त्यांना वर्गात आमंत्रित करा. त्यांना ह्या सोयी कशा उपलब्ध झाल्या त्याची जास्त माहिती मिळवा आणि त्यासाठी कोणत्या विधानांचा अवलंब करावा लागतो याची माहिती गोळा करा, तुम्ही तुमच्या वर्गातील कोणत्याही मित्राच्या पालकाला बोलावून ह्या गोष्टींवर बोलण्यास सांगावे.

## केआरएस औषधांचा कारखाना
## KRS Medicines Factory

ही कंपनी (वास्तविक नाही) अनेक प्रकारच्या औषधांचे उत्पादन करते अनेक औषधी कंपण्याना पॅक करुन पाठतव असते. या कारखाण्यात 118 कामगारापैकी 104 जन नियमित कामागार आहेत. फक्त 14 जन कायम कामगार आहेत यांची नियुक्ती रसायनांचे मिश्रण बनविणे, औषधांची पुड तयार करणे, या कामासाठी केलेली आहे. यांना महिण्यात 1500 ते 2500 रुपये पगार देतात. यांना नौकरी संरक्षण असते. ESI आरोग्य विमा प्राविडेंट फन्ड सारख्या सोयी असतात. इतर 104 जन नियमित कामागार पॅकेज करणे व लेबल लावणे या कामासाठी नियुक्त केलेले आहेत. 104 पैकी 56 स्त्रियां आहेत. हे दिवसभर काम करणाऱ्या कामगारांना लेबर कॉन्ट्रॅक्टर घेऊन येतो. व्यवस्थापकांनी सांगीतलेल.। प्रमाणे दररोज किती कामगारांची गरज असते, तेवढे कामगार तो घेऊन येतो. हे सर्व कामगार आजुबाजुच्या गावातुन येतात. हे कामगार निरक्षर असतात. महिला कामगार बारा तास काम करतात. त्यांची रोजी 30 रुपये आहे. पुरुष तेवढाच वेळ काम करता त्यांची रोजची कमाई 42 रुपये आहे. पुरुष तेवढाच वेळ काम करतात पण त्यांना रोजचे 42 रुपये मजुरी देतात. शासनाने लागु केलेल्या पगारापैकी हा कारखाण्यात देण्यात येणारा पगार फार कमी आहे. मालक कामगार संघाची स्थापना करु देत नाहीत. कोणताही संघ तयार झाला तर कारखाणे बंद करुन टाकु अशी भिती दाखवितात. आजकाल च्या अनेक कारखाने मालकांनी या प्रकारच्या विधानास अवलंब करीत कामगार संख्येत कमी करुन कॉक्ट्रक्ट कामगार व दिनसर कामगारांची संख्या वाढवित आहेत.

- के.आर.एस. औषधांच्या कारखाण्यात कार्मिक संघाची स्थापना करण्याची परवानगी का नाही?
- कायम कर्मचाऱ्यापेक्षा कांट्रक्ट कर्मचाऱ्यात जास्त जण स्त्रियाच का आहे? विचार करुन सांगा?
- पुरुषासमान प्रमाणात काम करुन देखील महिलांना कमी पगार योग्य पध्दत आहे का विचार करा?
- कामगार साक्षर असेल तर परिस्थिती वेगळ्या असत्या असे तुम्ही मानता का?

SCERT TELANGANA

## निर्माण क्षेत्र (बांधकाम)
## विट्यांच्या भट्ट्या



*Fig 19.1 Construction Labour*

*बिंदू आणि तीचा नवरा 10 वर्षाची मुलगी रंगारेड्डी जिल्ह्यातील एका गावातील विटभट्टीत काम करतात. ती आपल्या कुटुंबीयांन सोबत ओरीसा प्रांतातुन तेलंगानात येऊन काम करीत आहे. ओरीसा मध्ये तीची थोडी फार जमीन आहे. तिथे तिने रुपये 20,000 कर्ज घेतले ते कर्ज फेडण्यासाठी जमीन विकुण टाकण्याचा विचार केला. त्यावेळेस संबंधीत विटांच्या भट्टीत काम करणाऱ्या कामगारांना काम मिळवुन देणारा एक सरदार त्यांना भेटला, 10,000 रुपये अनामत देता म्हणाला. याव्दारे काही थोडे कर्ज फेडता येईल पण त्याच्या विटाच्या भट्टीत सहा महिणे पर्यंत काम करावे लागेल. त्यासाठी थोडे अधिक पैसे देतात. त्यानंतर राहयला देतात. डीसेंबर पासुन जुन पर्यंत काम असते. त्यानुंतर त्यांच्या प्रांतास परत जाता येतो. या प्रकारे बिंदानीचे कुंटुंब तेलंगानात आले. तेलंगानात विटांच्या भठटीत ओरीसातुन येणारे या सारखे दोन लक्ष कुंटुब काम करत आहेत. त्याच प्रमाणे हजारों कुटुंब तेलंगानातुन तामीलनाडु, महाराष्ट्रात सारख्या राज्यात विटांच्या भट्ट्यात काम करायला जात असतात. बिंदानी पहाटे चार वाजता उठते. स्वयंपाक करते दोन वाजेपर्यंत काम करुन आलेला तिचा नवरा झोपेतच असतो. बिंदाने मुलीला पण उठवते व दोघेही ते पाणी आणतात. रेती माती मिसळतात. त्यापासुन विटा बनवायच्या असतात. सकाळी पाच वाजता पासुन नऊ वाजेपर्यंत काम करतात. नंतर चहासाठी आराम घेतात. तिचा नवरा केव्हा केव्हा त्यांच्या सोबत काम करतो. नरम भिजविलेल्या मातीस साचा मध्ये टाकुन विटा तयार करतात. त्या विटांना त्यांची मुलगी स्वच्छ करुन त्यावर कंपनीचा शिक्का मारते. त्यानंतर विटा वाळवितात. बैलगाड्या व्दारे भट्टीस पाठवितात. हे काम रात्री दोन वाजेपर्वंत चालते. बिंदानी व तीचा नवरा 14 ते 16 तास काम करतात. तयार झालेल्या विटांच्या संख्येनुसार त्यांना पगार दिल्या जातो. ते सतत काम करतात.*

SCERT TELA

*प्रत्येक 1000 विटासाठी 108 रुपये देतात. आजारी असुन कामावर आले तरी पण पगार मिळत नाहा. सहा महिण्यापर्यंत दिवस रात्र काम करतात. खुप थकवा वाटला तेव्हा आजार आला तर काम करीत नाही लो क कण्या, वरण केव्हा तरी भाजी पाला खातात. सहा महिणेपुर्ण होताच घेतलेला अनामत रक्कम चा हिशोब करुन मिळालेले पैसे घेतात. काही संदर्भात खाली हाताने परत आपल्या प्रांतात जातात. कधी - कधी 4 किंवा 5 हजार रुपये घरी घेऊन जातात.*



*Fig 19.2 Cotton Pickers*

- बिंदानीच्या कुटुंबातील एकेकास सरासरी एका दिवसाची मजुरी किती पडते? तेस सांगा?
- सरदारापासुन घेतलेले रुपये 10,000 रक्कम चुकती करण्यास त्यांना किती दिवस लागतील हिशोब करुन सांगा?
- विटांच्या भट्टीत काम करणारे कार्मिक संघ तयार करुन घेण्यास शासनाने मदत करावी असे तुम्हास वाटते का?
- विटांच्या भट्टीत काम करणारे कामगार त्यांच्या स्थितीगती च्या सुधारणा शासनाने कोणकोणत्या कार्यवाही हाती घ्यावी?
- विट भट्ट्या कामगारांचा संघ असावा का असे तुम्हास का वाटते? उदाहरसही सांगा?

संपर्ण देशभर लाखो विट भट्ठीत काम करणाऱ्या कामगारांची स्थीतीचा प्रकारची आहे. कान्ट्रक्ट अडवान्स देणे, कामगारांना दुरच्या प्रांतात घेऊन जाणे, भाषा माहित नसलेल्या ठिकणी जातणे, रात्रदिवस काम करणे, कष्ट करणे, बायको मुलांसोबत अनेक महिण्यापर्यंत काम करणे असे घडतच असते. त्यामुळे कामगारांच्या मुलांचे शिक्षण होत नाही. काही लोक गुलामगिरीचे जिवन जगतात. काही संदर्भात शासन मध्यस्ती घेऊन त्यांना सोडविते व घरी पोहचविते घरी परत आल्यानंतर कामाच्या आवकाश मिळत नाही. त्यामुळे परत दुसऱ्या विट भट्टीत कामाला जाण्याशिवाय गत्यंतर नसते. त्याच्यासाठी लढणारे कार्मिक संघ नाहीत. ते स्थलांतरणे अनेक प्रांतात पसरुन आहेत. त्यामुळे संघाची दृष्टी त्यांच्यावर पडत नाही.

SCERT TELANGANA

- विटांच्या तयारीत कोणती यंत्रे उपकरणे सामग्री चा उपयोग होतो?
- या कामास कोणत्या प्रकारचे कौशल्ये आवश्यक आहे?
- कामगारास कशाकरीता दुर प्रांतात काम करावे लागते?

## जागतीक कामगार हक्क

तुम्ही आठव्या पाठात शिकलात की, औद्योगीक चळवळीच्या काळापासुन कामगार चांगल्या प्रकारच्या गौरवाने जगण्यासाठी औद्योगीक उत्पादनात त्यांचा वाटा मिळविण्यासाठी चळवळ करीत आहेत. ते अनेक प्रकारच्या रक्षणासाठी सोयी मिळविण्यासाठी व हक्कासाठी लढा देतच आहेत.

1. **उत्पादन व सुरक्षीत कमाईचा हक्क:** या हक्कामुळे कामगार त्याचे कौशल्ये सामर्थ्यानुसार त्याच्या आरोग्यास कोणतीही दुर्घटना घडत नाही. अशा परिस्थितीत काम करतो.
2. **विश्रांती घेण्याचा हक्क:** या हक्कामुळे कामगार काम करुन थकल्यास विश्रांती घेण्यासाठी सांस्कृतीक सामाजिक कार्यक्रमात आवडीने भाग घेण्यासाठी त्याला अवकाश मिळतो.
3. **नौकरी रक्षणाचा हक्क:** या हक्काव्दारे कामगार स्वत:ला कमाई आहे. त्यापासुन आपला उदरनिर्वाह करतो. मुद्दाम कोणी ही आपल्याला नौकरी वरुन काढुन टाकणारा नाही याची माहिती घेतात. एका एका कामगारास आवश्यकतेनुसार मुद्दाम काढुन टाकण्याचा विचार केल्यास तिला/त्याला योग्य नुकसान भरपाई द्यावी लागते.
4. **कमाई रक्षण:** या हक्काव्दारे कामगार स्वत:च्या कुटुंबाच्या गरजापुर्ण करण्यासाठी वृध्दकाळात गौरवाने जगण्यासाठी बचत करुन ठेवण्यासाठी एक क्रमात पगार मिळवितात.
5. **कामाचे रक्षण :** आरोग्य चांगले नसतांना दुर्घटना झाली असतांना योग्य वैद्य सहाय्य मिळण्या सोबतच त्याना त्या दिवसाचा पगार मिळतो.
6. **कौशल्याची वाढ करुन घेणे:** कामगार नौकरदार असतानाच स्वत:च्या कामात अधिक कौशल्य साध्य करुन घेण्यासाठी सामर्थ वाढविण्यासाठी अवकाश मिळतो.
7. **सामुहीक व्यक्तीकरण:** कामगार संघाची निर्मीती करुन घेऊन त्यांच्या समस्यांची गरजा माहिती देतात. एकेक व्यक्तीगत माहिती देण्याशिवाय सामुहीक रित्या संघाने माहिती देण्यामुळे भिती न बाळगता चर्चा करता येते.



***चित्र19.3 चाकु व्यावसायीक***

गेल्या दोनशे वर्षापासुन जागतिक सर्व कामगार चळवळी करुन हक्क प्राप्त करुन घेत असले तरी अनेक प्रांतात त्यांची अमलबजावणी होत नाही. अनेक देशातील शासनांनी यास कमीत कमी गरजा समजुन या हक्कांचा वापर घेण्याप्रमाणे कायदे बनविले आहे.

या पाठातील कायम कर्मचारी, औषधी कारखाणे, विटांच्या भट्ट्या विषयी खाली उतारा वाचुन कामगारांना मिळणाऱ्या हक्क, सोयी, सुचित करणाऱ्या डब्यात रंगभरा एका प्रकारचे कामगारास त्या उद्योगात तो हक्क किंवा त्या सोयी प्रात्प केल्यास थोडा भागच फक्त रंग भरा कोणताही हक्क किंवा सोयी नसल्यास त्या डब्यात (ẋ) चिन्ह वापरा.

SCERT TELANGANA

| अ.क्र. | हक्क | फायब्रोटेक्स | केआरएस औषधी | विट भट्ट्या |
|---|---|---|---|---|
| 1. | उत्पादन, सुरक्षीत नौकरीचा हक्क | | | |
| 2. | विश्रांती घेण्याचा हक्क | | | |
| 3. | नौकरी रक्षणाचा हक्क | | | |
| 4. | कमाईचा हक्क | | | |
| 5. | कामाचा हक्क | | | |
| 6. | कौशल्य वाढीचा हक्क | | | |
| 7. | संघ बनविण्याचा हक्क | | | |

## असंघटीत काम- शहरातील कामगारः

तेलंगानात भारत देशातील इतर प्रांतात शहरे, मोठी शहरे यांचा विस्तार वाढत आहे. लोक वेगाने गावातुन शहरात रहायला येत आहेत. शहरात कायमचे काम मिळत नसल्यामुळे आर्थिक व्यवस्था असंघटीत दिनसर कामगारात लोक बदलात आहेत. हे भाजीपाला विकणे, बिस्केट,चहा दुकानात काम करणे, छोट्या छोट्या कारखाण्यात काम करणे, कपडे शिवणे, वाहनात माल भरणे, उतरविणे, धनवान संपन्न लोकांच्या घरी कामे करणे सारख्या अनेक कामात शिरत आहेत.

बिड्या पापड तयार करणे, एम्बायडरी सारख्या कुटीर उत्पादनात काम करतात. मालक म्हणुन



*Fig 19.4 Workers laying cables*

SCERT TELANGANA

शासनाकडुन प्रमाणपत्र नसल्याने यास असंघटीत क्षेत्र म्हणतात. व कामगारांना असंघटीत कामगार म्हणतात.

या सारख्या कामाकरीता कमी भांडवल, कमी कौशल्याची गरज असते. पगार कमी देतात. हे कामगार सर्व दुर्लभ परिस्थितीस तोंड देत आहेत. काही एकाच वेळेस अनेक काम करतात. सकाळी समाचार पत्र टाकणे, नंतर चहा दुकानावर काम करणे, रात्री इतरांच्या घरात स्वंयपाक करणे, सारखी कामे करतात. यांना विश्रांती मिळत नाही मुले देखील कामे करतात. त्यांचे शिक्षण होत नाही. आर्थिक समस्येमुळे विद्यार्थ्यांना शिकविणे, औषधावरील खर्च कमी करतात. इतके केले तरी त्यांची पुरेशी कमाई होत नाही. आणि जबरदस्तीने मित्रांना जवळुन नातलगा जवळुन कर्ज आणावे लागते.काही वेळा व्याजाने व्यापाऱ्याकडुन घ्यावे लागते. व्याजाचा भार वाढल्यामुळे या व्यापाऱ्याजवळ काम करावे लागते. या सारख्यांच्या हक्कांसाठी काम करणारे कार्मिक संघ जवळ जवळ नाहीतच त्यांचे रक्षण करण्यासाठी शासनाने अनेक कायदे बनविले पण ते अंमलात आणण्यासाठी फंड व अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने अपेक्षीत फायदे मिळत नहीत. देशात सारखे कामगारांचे संख्या क्रमश वाढतच आहे. गावातुन स्थलांतरण करुन शिवाय जुने कारखाने बंद होणे देखील एक कारण आहे या सारख्या कारखाण्यातील कामगार दिनसर कामागरात बदल आहेत.

ह्या वरील समस्यांना पाहून, गुजरात मधील कांही कामगार संघांनी संघटीत कामगारांची (Informal Worker) जगातील सर्वात मोठी कामगार संघटना स्थापित केली. चला त्यांच्या बद्दल जास्त माहिती मिळवू या.



*Fig 19.5 Road Laying Work*

**स्वयं उद्योग महिला संघ - *Self Employed Women's Association (SEWA)***

1971 मध्ये अहमदाबाद कापड बाजारात महिला स्थलांतरण कामगार जाऊन (Textile Labour Association (TLA) ची भेट घेऊन गृहवस्ती सोयी सुधारुन घेण्यासाठी सहाय्याची मागणी केली. हा भारत देशातील प्राचीन व मोठा संघ महात्मा गांधीनी यांच्या सोबत काम केले. 1971 मध्ये स्वयं उद्योग महिला संघाची स्थापना झाली. 1972 मध्ये ती पुर्ण रुपेने कामगार संघात बदलली तेव्हापासुन (SEWA) विविध उद्योग धंद्यात काम करणाऱ्या महिला सोबत काम करीत आहे .

या संघात कामगार मालक संबंधे नाहीत. हा संघ कामगरांच्या

SCERT TELANGANA

वाढीसाठही काम करतो. त्यास भांडवल नाही पाच रुपये भरुन कोणतीही माहिला कामगार सभासदत्व मिळवु शकते.

उद्योगी महिलासाठी स्वत:च्या समस्या सोडविण्यासाठी आर्थिक रित्या वाढ करुन घेण्यास त्यांची कामे चालत ठेवण्यासाठी उपयोगी पडली. वाड्या वाड्यात जाऊन फिरुन विकणारे, भाजीपाला, फळे, अंडी, कुटीर उद्योग उत्पादने विकणारे, वस्त्रकामगार, कुंभार, बिडी बनविणारे, अगरबत्ती बनविणारे, पापड बनविणारे, कपडे विकणारे, शेतमजुर, बांधकाम कामगार, कान्ट्रक्ट कामगार, धोबी, पशु पालक, मीठ कामगार, गोंद गोळा करणारे सर्व SEWA सभासद झाले.

सेवा SEWA मध्ये आता तेरा लाख सभासद नऊ राज्यात आहेत. सभासदांना बॅंकेची मदत मिळवुन देत आहेत. सहकार संस्था चालवत, आरोग्यविमा, सोयी मिळवुन देत आहेत. त्यांच्या उत्पादनास बाजारपेठ मिळवुन देण्यात चांगली कमाई मिळवुन देण्यास SEWA मदत करते. तेलंगानात रस्त्याच्या बाजुनां बाजारात भाजीपाला विकणारे शेकडो महिलांच्या परिस्थितीची सुधाराणा करण्यासाठी या सारखे संघ फार उपयोगी पडतात.

**महत्वाचे शब्द:**

1. नुकसान भरपाई
2. भविष्यनिर्वाह निधी
3. बदली कामगार
4. मजुरी
5. नेमित्त कामगार
6. ईएसआय
7. कायम कामगार

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. विटांच्या भट्टीत काम करणाऱ्या कामगारांच्या स्थितीस, कारखाण्यातील कायम काम करणाऱ्या कामागरांच्या, कान्ट्रक्ट कामगरांच्या स्थितीशी तुलना करा?
2. तुमच्या प्रांतात दिनसर कामगार, स्वंय उद्योग कामगार यांच्या कामांची यादी बनवा?
3. विभिन्न कामगार संघाची यादी खालील तक्त्यात भरा?

| अ. क्र. | कामगार संघ करतात तो कारखाना | कामाचा प्रकार | मुख्य समस्या | सोडविणे |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |

4. कामगार संघ सभासदासोबत किंवा नायकासोबत बोलुन त्यास वर्गात बोलवा त्याच्या जिवनपध्दती विषयी विचारुन माहिती घ्या? विशेषता तो/ती संघात भाग घेण्याचे कारण माहित करा?
5. तुम्ही राहत असलेल्या भागातील कामगार अधिकाऱ्यास पत्र लिहून, कामगारांच्या कामाच्या जागेच्या परिस्थिती बद्दलची तक्रार करा?

SCERT TELANGANA

पाठ 20

# लोक परंपरा- धर्म

खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या वर्गात चर्चा करुन लिहा.

1. तुमच्या प्रांतात कोणकोणत्या देवतांची पुजा केली जाते?
2. कोणत्या साधुंना, संतांना, महाराजांना तुमचे कुटुंब आदरतेने पाहते?
3. लोक कोणकोणत्या झाडांची आणि कोणत्या प्राण्यांची पुजा करतात?
4. कोणकोणत्या प्रकारे लोक पुजा करता ते तुम्हाला माहित आहे काय?
5. देवांची पुजा कोण कोण व कशी पुजा करतात?
6. कोणकोणत्या भाषात देवांची पुजा करतात?

सर्वसाधारण पणे तुम्ही अशा प्रकारचे संभाषण ऐकलेच असतात.

*लक्ष्मी : एवढयात आमच्या मुलांची तब्येत खुपच खराबहोत आहे, ताप, सर्दी,पडसे, खोकला येत आहे.*

*समक्का : माझ्या नवऱ्याची तब्बेत पण गेल्या महिण्यापासुन बिगडत आहे.*

*येल्लमा : आई या देवीस राग आला असेल आपण तिला प्रसन्न करुन घेतले पाहिजे. त्या करीता नैवेद्य करावे व कोंबडे कापावे.*

***

*रामराजु : माझा मुलगी खुपच अस्वस्थ आहे काहीच खात नाही.*

*शिवाजी: तुम्ही पिरबाबा दर्गास जा व तिथे जाऊन मौलवी ताबीज बांध म्हणुन तुमच्या मुलीची तब्येत ठिक होते.*

आपल्या देशात बरेच लोक वेगवेगळ्या देवा, देवीवर श्रध्दा ठेवतात. चर्च व मश्चिद मध्ये प्रार्थना करीत असतात. एवढेच नाही तर अनेक गावात असणाऱ्या देवाची पुजा करतात. यात जास्त प्रसिध्द असणारे देव कोणते? यांनी कुठे केव्हा व कशी पुजा करतात? आपल्या गावात अनेक देव आहेत त्यातुन काही देव विषेश जाती, कुळा गावा, कुटुंबा एवढेच मर्यादीत असतात. सर्वसाधारणता पुजा करीत असणाऱ्या काही देव पाहु या.

**पोचम्मा :** तेलंगानात सर्वात जास्त प्रसिध्द असलेली ग्राम देवता म्हणजे पोचम्मा होय. प्रत्येक खेडे गावात या देवीचे मंदीर आहे हे मंदीर श्रीराम महादेव मंदीरापेक्षा वेगवेगळ्या पध्दतीने बांधलेले असते. हे मंदीर जास्त आकर्षिय नसते ते सर्व साधारण असते व या मंदीरांच्या बाजुसच कडु लिंबाचे झाड असते. देवीची मुर्ती ही दगडाने घडविलेली असते. कांही मोठ्या शहरात हे मंदीर वास्तुशिल्पाने बांधलेली व मुर्ती ही पुतळ्याच्या रुपात असते.

वर्षातुन प्रत्येक एका महिण्यात सगळ्या जातीचे लोक या देवीच्या नावाने नैवद्य करुन मंदीरास जातात. मंदीराच्या परिसरात भाग मंदीर धुवुन शुभ्र करता. त्या मंदीरात पुजारी कोणी असत



SCERT TELANGANA





*Fig 20.1 & 20.2 Here are two idols of Pochamma.*

नाही. लोक सगळे पारंपारीक रिती रिवाज पध्दतीने फुळ इत्यादी स्वतःच्या भाषेत पुजा करतात. देवी आई आमच्या पिकांचे रक्षण कर व भरपुर पिक आम्हास दे माझी मुलगी अस्वस्थ आहे ताप येत आहे. तिला बरे कर देवी आई रोगांपासुन दुष्ट शक्ती पासुन माझ्या कुंटुंबाचे रक्षण कर असे म्हणुन पाया पडतात. काही जन नैवद्य दाखवुन कोंबडे किंवा बकरे कापतात.

**मैसम्मा :** पशु संपदाचे रक्षण करणारी देवता म्हणुन ओळखल्या जाते. पशुचा गोठा असणाऱ्या एका भिंतीस चुना वगैरे लावुन कुंकु हळद लावुन त्याला मैसम्मा देवता म्हणुन ओळखतात. बऱ्याच ठिकाणी कट्ट्यावर दगडे वगैरे ठेवुन पुजा करतात व यास पाण्याची देवता कट्टा मैसम्मा म्हणुन ओळखतात.या देवीच्या कृपने तळ्यात पाणी भरुन राहते. पिके भरपुर पिकतात. अशी श्रध्दा लोकांत असते व त्यावर ते विश्वास करतात.

**गंगम्मा** : या देवीस पाण्याची देवी म्हणुन ओळखतात आणि समुद्रात जाऊन मासे धरुन आणणाऱ्या लोकांचे ही देवता रक्षण करते. म्हणुन ही प्रसिध्द आहे. गरीब आणि अनाथ लोकांना सभांळणारी देवता म्हणुन विश्वास करतात.

**येलम्मा** : पोलेरम्मा, मरीडम्मा, रेणुका, महांकाली, जोगम्मा, सोमलम्मा इत्यादी नावाने या देवीस



*Fig 20.3 Maisamma*

ओळखतात. ही गावाच्या शिवारात राहुन गावाचे रक्षण करते असा विश्वास आहे. दुष्ट शक्तीचा आणि विविध रोगांपासुन आमचे रक्षण कर म्हणुन लोक प्रार्थना करतात.

**पोतराज :** आपल्या पिकांचे, भुमीचे चोरापासुन जंगली जनावरा पासुन पोतराज रक्षण करत असतो असा लोकांचा विश्वास आहे. शेतकरी दगडावर चुना टाकुण आपल्या शेतात ठेवतात. पोतराजाची



SCERT TELANGANA



*Fig 20.4 Yellamma*



*Fig 20.5 Potharaju*

पुजा साधी असते. साधारण पणे पेरणी करणे पिके काढणे, अशा वेळेस या देवाची पुजा करतात. मोठी आई पेदद्दम्मा ही देवीची बहीन आहे असे म्हणतात.

**बिरप्पा आणि काटमराजु :** ह्यांची पूजा गुराखी जातीचे लोक करतात. बिरप्पा आणि काटमराजू मेंढ्यांना पाळत होते. गाईची पुजा करत व पाळत असत. हे पशुना मेढ्यांना रक्षण देणारा देव बिरप्पा अक्का महाकांळी कथा ऐकली आहे का? बिरप्पा हा कामरती शी लग्न करण्यासाठी कसे आंदोलन केलेक्ष त्यावेळेस त्याची आक्का कशा प्रकारे मदत केली तुम्हास माहित आहे का? पशु चालक पच्चीकाबयत मध्ये पशु सांभाळण्याच्या हक्काकरीता नेल्लुर राजाशी काटमराजु कशाप्रकारे युध्द केले तुम्हास माहित आहे का?

- स्थानिक सनात ग्रामदेवीच्या पुजा कार्यक्रमात तुम्ही कधी सामील झालाच असतात. त्याच प्रमाणे शिवाच्या, विष्णुच्या मंदीरास पण गेला असतात. वेगवेगळ्या मंदीरातील पुजांची तुलना करा व त्यातील फरकाची वर्गात चर्चा करा?

लोक सनात पशु, जंतु बलीदान करणे हे सर्वसाधारण झाले आहे. त्यामुळे हजारों पशु बळी होत आहेत. यास दृष्टीस ठेऊन आपल्या तेलंगाना राज्य सरकारने जात, मता प्रमाणे पशुबळी वर निषेध घालण्यात आला आहे.

## पारंपारिक देवतांची सामूहिक पूजा

अनेक लोक स्थानिक देवता, वीर पुरुष हे स्थानिक लोकाकरीता लढत लढत मुत्यु पावले. प्रजेच्या रक्षणाकरीता विशेष शक्ती, दैविशक्ती त्याच्यात त्यांची पुजा करणागेल्यास आपणास कष्ट होतात. त्रास होतो. असा त्यांचा विश्वास आहे. हरीजन गिरीजन समस्या सोडविण्यासाठी जे स्थानिक विरपुरुष लोक यांच्या मागे समक्का गौरवा करीता सामक्का सारक्का यात्रा भरवल्या जाते.

### समक्का सारक्का मेडाराम जत्रा

जयशंकर जिल्ह्यातील ताडवाय मंडळ मेडाराम गावात गिरीजन ही यात्रा भरवतात. तेलंगाना, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरीसा, छत्तीसगड आणि झारखंड या राज्यातुन गिरीजन व इतर लोक या जत्रेस येतात. जवळपास एक कोटी लोक या जत्रेस येतात.

SCERT TELANGANA

**कथा :** मेडराजू हा काकतिय राजा रुद्रदेव (प्रताप रुद्र-1) चा समकालीन होता. सध्याच्या जगित्याल जिल्ह्यातील पोलावसा राज्यावर त्यांनी राज्य केले. त्यांनी आपल्या मुलीचे समक्काचे लग्न पगीडीड्डा राजू जो मेडारमचा राजा होता, त्याच्याशी केले. यांना तीन मुले होती. सारलम्मा, नागुलम्मा, जंपन्ना आपल्या राज्याचा विस्तार व्हावा म्हणून रुद्रदेवाने मेडारम वर युद्ध घोषित केले. पगीडीड्डाराजूच्या सर्व कुटुंबियांनी, जातीच्या सर्व स्त्री-पुरुषांनी या युद्धात भाग घेतले व सर्व मृत्यु पावले. जंपन्ना पण धैर्याने शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहिला आणि लढता-लढता संपेंगा वागूमध्ये त्याचा मृत्यू झाला. आणि काकतिय सैन्याला नाला पार करण्यापासून थांबविले. म्हणून त्यास जंपन्ना वागू असे म्हणतात. सामक्का आणि सम्मक्का-सारक्कांनी सैन्याशी लढत आपल्या जातींसाठी आपल्या प्राण्याचे बलिदान दिले.

त्यांच्या धैर्याला त्यागाला आता पण त्या भागातील आदिवासी लोक आठवण करतात. त्यांच्या गौरवा करीता त्यांच्या आत्म्यांला शांती मिळण्याकरीता गिरीजन लोक आत मेडाराम मध्ये यात्रा भरवतात. ही प्रत्येक दोन वर्षानी भरत असते.


*Fig 20.6 Installation of goddess Sammakka on the platform*


*Fig 20.7 Scene from Medaram Jatara*

ही यात्रा तीन दिवस चालत असते. सामक्का सारखे देव तयार करुन त्यास जंगलातुन दिंडी यात्रा काढुन एका मोठ्या पेटीत ठेवुन आणतात. व संदुर आकर्षण तयार करुन झाडाखाली स्थापना करतात. या वेळेस खास देवीचे दर्शन झाल्यानें भक्त समजतात. लोक गुळ सोने म्हणुन वजनाबरोबर वाटत असतात.

## मोहरम (पीर) ऊर्स Moharram (*Peerilu*) Urs

दुष्टांच्या विरोधात लढाई करुन अमर झालेल्या लोकांचा मुस्लीम लोक पण गौरव करतात. असाच एक सण मोहर्रम, जो इराकमधील करबालाच्या युद्धाची आठवण करुन देतो, ज्यात महम्मद प्रवक्ताचा नातू मृत्यू पावतो. सजविलेले ताजिया घेऊन मिरवणूक काढली जाते. ज्यात सर्व जातीचे लोक सहभाग घेतात. बांबूपासुन गोलाकार छपराच्या आकारात घुमट तयार करतात. चमकदार कपड्यांनी त्याला छाकतात. पिरी पकडण्यासाठी त्या घुमटमध्ये एक बांबूचा खांब बसवितात आणि वरतील धातूचा चंद्रकोर किंवा ताडाच्या आकारासारखे त्याला जोडतात. शेवटी फूल आणि नारळाचा हार घालतात.

त्याच प्रमाणे मुस्लीम दर्गा असलेल्या जागी ते ऊर्स किंवा मुस्लीम पीरांची पुण्यतिथी साजरी करतात. जे राज्याच्या अनेक भागात पुरलेले आहेत. अधिक संख्येत लोक दर्गा दर्शनाकरीता येत असतात. फुल चादर, शाल दर्गावर अर्पण करतात व तेथे गात असलेल्या कव्वाली ऐकतात. अशा प्रकारे केल्यास

SCERT TELANGANA



*Fig 20.8 Ajmeer Dargah*



*Fig 20.9 Jahangeer Peer Dargah*

SCERT TELANGANA

त्यांना त्यांच्या अल्लाचा आर्शिवाद मिळतो. असा त्यांचा विश्वास आहे. संतान, नौकरी मागणारे लोक दर्गाचे दर्शन घेत असतात. हा उर्स उत्सव मतभेद दुर करण्यासाठी उपयेगी पडतो. सुफी तत्वावर प्रचार केलेल्या गुरच्या समाधीवर दर्गा बांधतात. सुफी गुरुच्या समाधी किंवा दर्गास्थळे तिर्थ क्षेत्रात बदलत असतात, जेथे हजारो लोक श्रद्धेने जातात लोकांचा असा विश्वास आहे की या सूफी संतांकडे अद्भूत चमत्कारी शक्ती असते व त्यांच्या दर्शनामुळेच आरोग्य छान राहते. अडचणी दुर होतात. असा विश्वास लोकांचा आहे.

**जहागीरपीर दर्गा धार्मिक सहनशीलतेचे चिन्हः**

रंगारेड्डी जिल्ह्यातील कोथुर मंडलमध्ये जहांगीर पिर दर्गा आहे. असे मानले जाते की, सन 15 व्या शतकात इराकमधुन सय्यद गौसोद्दीन आणि सय्यद बुरांनद्दीन हे दोघे बंधु येथे आले. तेव्हा हा भाग जंगलाने व्यापलेला होत याच ठिकाणी त्यांनी चिंतन करुन आपली जीवन यात्रा संपावली. त्यांच्या काही भक्तांनी त्यांच्या समाध्यावर लहानसा दर्गा बांधला. कालांतराने 16व्या शताकात औरंगजेब या भागात आला. त्याला या ठिकाणचे महत्व कळाले. त्याने इब्राहीम याला दर्ग्यावर काजी म्हणुन नेमुन दिले. या काजीने या दर्ग्याचा तिर्थ क्षेत्रासारखा विकास केला. दररोज शेकडो भक्त या दर्ग्याला भेट देतात. हैद्राबाद आणि परिसरातील लोकांचा वाटा मोठा असतो. गुरुवारी आणि रविवारी इतर राज्यातील अनेक भक्त येथे भेट देतात. या दोन दिवशी विशेष पुजा केल्या जातात. दरवर्षी तिन दिवसाचा एक वार्षिक उर्स साजरा केला जातो. या उर्सची सुरुवात गुरुवारी होते.

संक्रातीनंतर येणाऱ्या गुरुवारी हा उर्स प्रारंभ होतो. पाहिल्या दिवशी गंध पुजा(चंदानाचा पावडर) वाहिली जाते. दुसऱ्या दिवशी दिपाराधना केली जाते. आणि शेवटी तिसऱ्या दिवशी कव्वालीचा कार्यक्रम असतो. देशातुनच नव्हे तर विदेशातुनही लोक या उर्सच्या सणाला हजेरी लावतात. हजारों हिंदु मुस्लीम भक्त फुले मिठाई आणि चादर वाहुन भक्ती प्रकट करतात. हिंदु मुस्लीम एक्याचे ते एक प्रतिक होय.

***नैवद्य (Bonalu)***

तेलंगानातील प्रातांत प्रसिध्द असलेला नैवद्य दाखवण्याचा सन यात देवतेस आहार नैवेद्य रुपात ठेवतात. व त्याची पुजा केल्यानंतर तो आहार कुटुंबातील सर्व सदस्य खातात. सुंदर फुलांचा गुच्छा टोपलीत ठेवतात. तो स्त्रिया डोक्यावर किंवा मातीच्या



*Fig 20.10 Bonalu*

कुंडावर अन्न भरुन त्यावर कडु लिंबाचे पाणे ठेवेन स्त्रिया गावात फेरी काढतात. यालाच घट असे म्हणतात. पोतराजा प्रमाणे पुरुष नाचत गाणे गात स्त्रियांच्या सोबतच चालतात. भांड्यात किंवा मातीच्या कुंडात हे कडुलिंबाच्या झाडाच्या लहान लहान फांद्या व मोठे ढोलकी वाजवत चाबूक मारत समोर चालतात.

- तुम्ही कधीतरी यात्रेत किंवा ऊर्स उत्सवाहत नैवेद्य सनात सामील झाल तर त्या विषयी वर्गात चर्चा करा?
- ग्राम देवता व पुजा करण्याची पध्दत मंदीरात व मजिद मध्ये होणाऱ्या कार्यक्रमात कोणता फरक आहे? ते स्पष्ट करा?

### लोक व जुन्यापध्दती The antiquity of Folk Traditions

अशा प्रमाणे देवतेना प्राचिन काळात सुध्दा पुजा करीत असत असे अनेक चरित्र व ग्रंथाव्दारे आपणास समजते. आज पासुन 2500 वर्षापुर्वी नाग सांपाना, झाडांना पुजा करीत यक्ष-यक्षनी असत असे समजते. इ.स. 1450 च्या काळात श्री नाथने लिहिलेले पलनाटी वीर चरित्र कथा यातुन पोतराज पुजा विषयी माहिती मिळते. वल्लभरायाने लिहिलेले क्रिडाभीराममू वरंगलमधील पलनाटी वीर वरंगल मैलार देवता व इतर मातृदेवतेच्या आराधाना विषयी वर्णन केल्या गेले आहे. मंदीर, चर्च, मशिद, मध्ये होणाऱ्या पुजा पेक्षा लोक देवता आराधाना ही वेगळी असते हे तुम्हास माहितच झाले आहे. जात, पात, मत, आर्थिक संपत्तीचासंबंध न ठेवताच या देवतांची पुजा करतात.

उदा. मुस्लीम शेतकरी सुध्दा लोक देवतांची पुजा मध्ये भाग घेतात. त्याचप्रमाणे सर्व मताचे लोक दर्गाला जाऊन भक्तीने झाडांना भिंतीना धागे बाधुन आमच्या आडचणी दुर झाल्यानंतर नवस ठेवतात. दर्गास जाऊन दृष्ट शक्तीपासुन आमचे रक्षण कर व ताविज बांध म्हणुन पिर्जादीला प्रार्थना करतात.

### लोक देवता पुजा पध्दतीचा उन्नत मतांचे लोक सुध्दा पाळतात

लोकदेवतास नव्या पिढीचे लोक मानत आहेत. भारत देशात विविध प्रकारचे लोक व त्याच्या मतामध्ये निरंतर संबंध असत त्यामुळे विविध प्रथा रिवाजांचे लोक मिळु लागले. भारत देशात याप्रमाणे लोक देवता पुजा पध्दतीचा उन्नत मतांचे लोक सुध्दा पाळत आहेत. त्याचप्रमाणे अतीउन्नत मतात असणारा विश्वास लोक देवता पाळत आहेत. अशा प्रकारे उच्च मत परंपरतेत पण झाडाची, सापांची, पक्षांची, मातृदेवतांची पुजा करता. नागसाप, झाड, जंतु,पक्षी यांनी आपले स्थान प्राप्त केले आहे.

हळुहळु गौतमबुध्द, शिव, विष्णु, सारखे देवता पुजातील एक भाग म्हणुन लोक देवतास पण पुजा करत असत. नागसाप सिंह, नंदीबैल व झाडाची पण पुजा करण्यास सुरुवात केले. इस्लाम धर्मात वरील परिस्थिती वेगळ्या रुपात प्रकट झाली. इस्लाम उच्च मतसांप्रदयात देव हा एकच आहे. ग्रामीण भागातील काही मुस्लीम दर्गात असणारे सुफी संतावर

SCERT TELANGANA

विश्वास करणे आचरण करणे सुरुवात करु लागले. तसे केले तर त्याच्या समस्या अडचणी दुर होतात. असा त्यांचा विश्वास त्यामुळे सर्व धर्माचे मताचे लोकांत दर्गा उर्स या तिर्थ यात्रेतुन खरे सुख शांती अशी भावना निर्माण झाली.

## लोक परंपरा व उच्चमतः

सामान्य जनतेतुनर आलेले कबीर योगी वेमन यांनी अनेक सुफी पंताचा मताविषयी विचार यावर सखोल अभ्यास केला व यांनी उच्च मतांनी सांगीतलेला तात्वीक विचार याचा सामान्य प्रजेच्या विचाराशी जोड घातला. आज 300 वर्षापुर्वी प्रख्यात असा असणारा योगी वेमन याच्या तेलुगु च्या सुंदर कविता आहेत त्या तुम्ही वाचन करा.

स्वतः धैर्य हिम्मत असल्याशिवाय मनातील भिती निघुन जात नाही. तसेच अंधारात खुप मोठा जाळ लावल्यामुळे अंधार निघुन जात नाही.

“शडरस जरी वेगळे असले तरी चव एकच असते हे सत्य म्हणुन सांगणाऱ्या रुढी परंपरा सांप्रदाय जरी अनेक असल्यातरी सत्य हे एकच सन्याशी साधु, आपआपल्या पध्दतीने उपदेश करीत असतात. पण ते कुणा करीता ध्यान करतात तो सर्वाचा देव एकच.”

“संन्याशी साधु म्हणजे डोळ्यावर लांब केस वाढवुन जठा बांधणे, अंगाला राख लावणे, जप करणे, वेगवेगळ्या मताची कपडे अंगावर घेतल्याने मात्र संन्याशी होत नाही.”

“त्या करीता पवित्र ऱ्हदय पवित्र विचार आवश्यक आहे.”

वरील उपदेश आणि म्हणी सामान्य लोकांच्या जीवनाचे आणि विचारांचे एक भाग बनले आहे.

**महत्वाचे शब्दः**

1.लोक देवता 2. जत्रा 3. ऊर्स

4. पिर 5. नैवेद्य

## तुमच्या अभ्यासात सुधारणा करा

1. तुम्हाला वाटते का सध्या ज्याप्रकारे लोक, लोकदेवतांच्या पुजा करण्याच्या पद्धतीत कोणत्या प्रकारचा बदल झाला?
2. ग्राम देवतांची पुजा करण्यासाठी सर्वसाधारणता कोणते अंश दृष्टीसमोर ठेवावे?
3. लोक खेडेगावातुन शहराकडे स्थलांतर होऊन स्थिर होत आहेत व नंतर ते ग्राम देवतांची पुजा करणे चालु ठेवत आहेत का? कसे चालु ठेवत आहेत?
4. तेलंगानाच्या नकाशात महत्वाच्या जत्रा आणि उर्सच्या गावांची स्थळे दाखवा?
5. विविध धर्माच्या लोकांकडुन खालील माहिती भरा?

| अ.क्र. | नाव | धर्म | पुजा करणारे देव | सण - उत्सव-उर्स |
|---|---|---|---|---|
| | | | | |

6. पान क्र. 186 वरील जात-पात पिर्जादीला प्रार्थना करतात परिच्छेद वाचा आणि त्यावर टिप लिहा.

**प्रकल्प कार्यः** 1 .तुमच्या प्रातांत भरल्या जाणाऱ्या एका महत्वाच्या यात्रेबद्दल तुमच्या आजोबा, आजी कडुन माहिती घ्या. आणि अहवाल तयार करा?

2. तुमच्या प्रातांशी संबंधीत लोक देवतांच्या कथा गोळा करा व त्या कथा गोष्टीचे लहान बुक तयार करा.

पाठ 21

# देव दैवत्व - भक्ती मार्ग

